# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**सत्र–३ : पेपर क्रमांक** IDS-13

# समाज आणि मानवी हक्क

**(Society and Human Rights)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून

**एम. ए. भाग–२ : समाजशास्त्र**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
**द्वितीय आवृत्ती :** २०१६
**तृतीय आवृत्ती :** २०१७
**सुधारित चौथी आवृत्ती :** २०२१
**सुधारित आवृत्ती** २०२३
एम. ए. भाग २ (सत्र ३ : समाज आणि मानवी हक्क) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : २००**

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-8486-594-3

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिति


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ समाजशास्त्र अभ्यासमंडळ ■

अध्यक्ष – **डॉ. अर्चना राजकुमार कांबळे**
द न्यू कॉलेज, १०६२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती प्रतिमा एस. पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रल्हाद एम. माने**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. आनंद लक्ष्मण गाडीवड्ड**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
  ता. कालग, जि. कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती भाग्यश्री मल्लिकार्जुन पाटील**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज, (केएमसी) कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती सविता माधवराव गिरे**
  दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज,
  वडूज, ता. खटाव, जि. सातारा

- **डॉ. वसंत कृष्णा मोरे**
  मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव,
  ता. वाळवा, जि. सांगली

- **डॉ. कृष्णाजी मारूती देसाई**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर

- **डॉ. अर्जुन पांडुरंग जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
  इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

- **डॉ. संदिप मुरलीधर चौधरी**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  एसबीइएस कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स,
  छत्रपती संभाजी नगर

- **डॉ. सुगत शेशराव बनसोडे**
  श्री. शिव-शाहू कॉलेज सरूड,
  ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

- **डॉ. मधुकर गंगाराम धतूरे**
  विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे,
  ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. अभिजित पाटील**
  ७ए-३०१, अशोक नगर, दादलानी पार्क जवळ,
  बाळकुम, ठाणे (वेस्ट)-४००६०८

# प्रस्तावना

एम. ए. भाग-२ सत्र ३ साठी पेपर क्रमांक IDS-13 समाज आणि मानवी हक्क हा विषय ऐच्छिक आहे. समाज आणि मानवी हक्क यांचे जवळचे नाते आहे. सामान्य लोकांमध्ये मानवी हक्कांबद्दल जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी आणि मानवाला समाजात निर्भयपणे जीवन जगताना कोणते मानवी हकक जन्मतः मिळालेले आहेत व भारतीय संविधानाने कोणते मूलभूत हक्क बहाल केलेले आहेत. यांची ओळख व्हावी या हेतूने हा विषय एम. ए. भाग-२ साठी निश्चित करण्यात आलेला आहे.

या विषयामध्ये प्रामुख्याने एकूण ४ प्रकरणे आहेत. पहिल्या प्रकरणामध्ये मानवी हक्कांविषयी ऐतिहासिक पार्श्वभूमी, हक्कांबरोबर कर्तव्ये कोणती आहेत. मानवी हक्कांची समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून सैद्धांतिक पार्श्वभूमी ही समजावून घेण्यात येणार आहे. सर्व सामान्यपणे मानवी हक्कांचे तत्त्वज्ञान काय सांगते याबद्दलही या प्रकरणात ओळख करून घ्यावयाची आहे.

प्रकरण २ मध्ये मानवी हक्क आणि आंतरराष्ट्रीय करारनामा, जागतिक जाहिरनामा आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा करारनामा. १९६६, नागरी आणि राजकीय हक्कांवरील आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६. आंतरराष्ट्रीय पातळीवरील मानवी हक्कांची अंमलबजावणी. या घटकांवर चर्चा करण्यात आली आहे.

प्रकरण ३ मध्ये भारतीय संमिश्र संस्कृतीचे मूल्यमापन, विविध धर्माचे योगदान, १९ व्या व २० व्या शतकातील सामाजिक चळवळी, स्वातंत्र्य चळवळी, गांधी, नेहरू, आंबेडकरांचे योगदान. मानवी कल्याणाची संकल्पना, हक्क व कर्तव्ये, विश्वाच्या उत्पत्तीचे व घटनेचे शास्त्र आणि मानवी मुल्यांचा संदर्भ, त्याचबरोबर समकालीन मानवी हक्क व कर्तव्ये, कायदा, राजकीय आणि समाज या विषयावर भर देण्यात आला आहे.

प्रकरण ४ मध्ये मानवी हक्कांचा संविधानिक आराखडा याबद्दल विश्लेषण केले आहे. मूलभूत हक्क आणि कर्तव्ये, त्यातील आंतर संबंध, मानवी हक्कांबद्दल विशेष कायदे आणि मानवी हक्क आयोग यावर सविस्तर मांडणी या शेवटच्या प्रकरणात केली आहे.

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर आपल्या आसपास मानवी हक्कांची संस्कृती तयार करणे आवश्यक आहे. चारी प्रकरणामध्ये काही प्रश्न उत्तरासह देण्यात आले आहेत. मानवी हक्क या विषयात आवड असणाऱ्या तसेच आपल्या अवती भोवती मानवी हक्कांविषयी आस्था असणाऱ्या अशा सर्वांसाठी हे पुस्तक उपयोगी सिद्ध होईल.

सदर पुस्तक लेखनास सहकार्य केल्याबद्दल समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व अभ्यास मंडळाचे सर्व सदस्य, यामध्ये लेखन करणारे सर्व सहकारी प्राध्यापक तसेच दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक आणि केंद्रातील कर्मचारी यांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. उषा बाहुबली पाटील**
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**समाज आणि मानवी हक्क**
**एम. ए. भाग–२ : समाजशास्त्र**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–३ घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. डॉ. उषा बाहुबली पाटील**<br>महावीर महाविद्यालय, कोल्हापूर | १ |
| **प्रा. अशोक चव्हाण**<br>विजयसिंह यादव कॉलेज, पेठवडगांव | २, ४ |
| **प्रा. बबन रणजित पाटोळे**<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३, ४ |

■ **संपादक** ■

**प्रा. डॉ. उषा बाहुबली पाटील**
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | मानव अधिकार आणि कर्तव्ये : दृष्टीकोन | १ |
| २. | मानवी हक्क आणि आंतरराष्ट्रीय संदर्भ | ३८ |
| ३. | भारतातील मानवाधिकार आणि कर्तव्ये | ५९ |
| ४. | मानवाधिकार आणि भारतीय संविधान | ९३ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक – १

# मानवी हक्क आणि कर्तव्ये : दृष्टीकोन

**अ) ऐतिहासिक आणि दार्शनिक परिप्रेक्ष्य**

**ब) मानवाधिकार आणि कर्तव्यांच्या व्याख्या : अर्थ, व्याख्या आणि प्रकार**

**क) मानवाधिकार सिद्धांत : १) नैसर्गिक हक्क सिद्धांत, २) उदारमतवादी सिद्धांत, ३) मार्क्सवादी सिद्धांत, ४) समाजशास्त्रीय सिद्धांत**

**अनुक्रमणिका :**


१.० प्रस्तावना

१.१ उद्दिष्टे

१.२ विषय विवेचन

    १.२.१ हक्क म्हणजे काय ?

    १.२.२ मानवी हक्कांच्या ऐतिहासिक दृष्टिकोन आणि मानवी हक्कांचे तत्त्वज्ञान

    १.२.३ मानवी अधिकारातील हक्क व कर्तव्ये

    १.२.४ हक्कांचे सिद्धांत

१.३ सारांश

१.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न.

१.५ स्वयंअध्ययनाची उत्तरे.

१.६ स्वाध्याय

१.७ संदर्भ.


## १.० प्रस्तावना :

विसाव्या शतकापासून मानवी हक्कांचा किंवा मानवाधिकारांचा जोरदार पुरस्कार केला जाऊ लागला आहे. मानवी हक्क आणि विकास यांचे जवळचे नाते आहे. सामान्य लोकांमध्ये मानवी हक्कांबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी व विकासाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहणे हे आजच्या काळात आवश्यक आहे. समाजातील सर्व घटकांमध्ये स्वत:च्या हक्कांविषयी जाणीव निर्माण करणे यामध्ये विशेषत: स्त्री-पुरुष, विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक, सर्वसामान्य नागरिक, शासन कर्ते, युवक, कामगार अशा सर्व समावेशक दृष्टीकोनातून मानव अधिकार समजून घेणे यासाठी या प्रकरणात विचार केला जाणार आहे.

मानवी हक्कांबद्दल संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेपासूनच विशेष महत्त्व देण्यात येऊन लागले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनद मध्ये 'मानवी हक्क' व 'मुलभूत स्वातंत्र' यांचा आग्रह धरण्यात आला असून त्याच्या स्थापनेसाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यामुळे मानवी हक्कांचे महत्त्व अधोरेखित होण्यास खूप मदत झाली आहे. मानवी हक्क हे मानवाच्या जीवनाचे अविभाज्य भाग आहेत. प्रत्येक व्यक्तीला 'मनुष्यप्राणी' या नात्याने हे हक्क नैसर्गिकरित्या प्राप्त झाले आहेत. म्हणून मानवी हक्काशिवाय कोणत्याही व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घेणे शक्य होणार नाही. इतकेच नव्हे तर हक्काशिवाय व्यक्तीला चांगल्या प्रकारचे जीवन जगणेही शक्य होणार नाही. अशा सर्व गोष्टींचा विचार करून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने १० डिसेंमर १९४८ ला मानवी अधिकारांचा जाहिरनामा घोषित केला.

## १.१ उद्दिष्ट्ये (Objectives) :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

१) मानवाधिकारांचा नेमका अर्थ सांगता येईल.

२) मानवी हक्कांचे तत्त्वज्ञान समजून घेण्यास मदत होईल.

३) मानवी हक्कांची ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात येईल.

४) मानवी हक्कांबरोबर कर्तव्येही कोणतीही आहेत यांचेही आकलन होईल.

५) मानवी हक्क समजून घेण्यासाठी जे सिद्धांत आहेत याबाबत चर्चा करता येईल.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ हक्क म्हणजे काय ?

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मानवी हक्कांची चर्चा करताना समाजातील सर्वसामान्य व्यक्तीच्या दृष्टिने मानवी हक्कांना महत्त्व का दिले जाते? हे जाणून घेणे जास्त गरजेचे आहे. समाजशास्त्रात हे मान्यच केले आहे की, मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. तो समाजाचा एक घटक या नात्यानेच आपले सामाजिक जीवन जगत असतो. मानवी जीवनाच्या विविध गरजा या परस्परांवलंबी असतात. व्यक्तीला समाजात राहूनच या गरजांची पुर्तता करणे शक्य होते. मानवाच्या समाजातील वास्तव्यामुळे त्याच्या व्यक्तीमत्त्वाची जडणघडण होत असते. म्हणजेच मानवाचे एका जैविक प्राण्यापासून सामाजिक प्राण्यात रुपांतर होण्याचे कार्य त्याच्या समाजातील अस्तित्वामुळेच साध्य होत असते. यासाठी समाजशास्त्रातील सामाजिकरणाची प्रक्रिया फार महत्त्वाची मानली जाते.

समाजीकरणाच्या प्रक्रियेमुळेच मानव समाजशील व्यक्ती बनतो. सामाजिक जीवन जगताना समाज व्यक्तीला स्वैर जीवन जगण्याची परवानगी देत नाही. सामाजिक जीवनाच्या काही अटी व नियम असताना

त्यांचे पालन करणे ही समाजातील सर्वच व्यक्तींची जबाबदारी आहे. मानवला आपल्या प्राथमिक किंवा जीवनावश्यक गरजांची पुर्तता करता यावी; यासाठी निसर्गानेच त्याला काही सामर्थ्य दिले आहे. परंतु सामाजिक जीवन जगताना मनुष्य आपल्या नैसर्गिक सामर्थ्याचा वापर स्वत:च्या मनाप्रमाणे करू शकत नाही. समाजात अनेक व्यक्ती एकत्र रहात असतात. प्रत्येकानेच आपआपल्या मनाप्रमाणे रहायचे ठरविले तर समाजात मोठ्या प्रमाणात अराजकता निर्माण होईल. यासाठी सामाजिक जीवन जगताना व्यक्तींच्या वर्तनावर काही प्रमाणात नियंत्रण ठेवणे अपरिहार्य ठरते. अशा प्रकारच्या नियंत्रणांना 'सामाजिक नियमने' म्हणतात. समाजात वास्तव्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सामाजिक नियमानांचे पालन करणे किंवा अशा नियमनांच्या बंधनात राहणे भाग पडते. सामाजिक जीवनात व्यक्तीला प्राप्त झालेल्या अशा संधी किंवा सवलती म्हणजेच 'हक्क' होय.

### ❖ मानवी हक्कांची व्याख्या :

१) प्रा. एच. जे. लास्की यांच्या मते, ''हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय की, ज्याशिवाय व्यक्तीला सामान्यत: स्वत:चा सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होत नाही.''

२) प्रा. बोझांके यांच्या मते, ''आपण ज्या समाजाचे घटक असतो त्या समाजाचा सर्वोच्य कल्याणाच्या दिशेने आपल्या जीवनाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी साधने म्हणजे हक्क होत.''

३) टी.एच्. ग्रीन यांनी असे म्हटले आहे की, ''मानवाच्या आंतरिक विकासासाठी आवश्यक असलेली बाह्य परिस्थिती म्हणजे हक्क होय.'' तसेच त्याचे असेही म्हणणे आहे की, ''मानवी जागृती स्वातंत्र्याची मागणी करते, स्वातंत्र्यासाठी हक्कांची गरज भासते आणि हक्कांच्या रक्षणासाठी राज्य आवश्यक असते.''

४) डी.डी. बसू, यांच्या मते, ''प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही भेदभावाशिवाय आणि जन्मत:च राज्याविरुद्ध प्राप्त झालेले किमान अधिकार म्हणजे मानवाधिकार होय.''

५) संयुक्त राष्ट्र संघटनेचे मानवाधिकार केंद्र, व्यक्तीला निसर्गाकडून प्राप्त झालेले असे अधिकार की ज्याशिवाय माणूस म्हणून जगणे अशक्य आहे.

६) रिचर्ड बॅसरस्ट्रॉम यांच्या मते, ''व्यक्तीला माणूस म्हणून जगण्याकरता आवश्यक क्षमतांचा विकास करण्यासाठी आवश्यक अधिकार म्हणजे मानवाधिकार होय.''

७) आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायमुर्ती नागेंद्र सिंग यांच्या मते, ''प्रत्येक स्त्री आणि पुरुषाला रंग, लिंग, वंश इत्यादी भेदभावांशिवाय केवळ मनुष्य म्हणून मिळालेले अधिकार म्हणजे मानवाधिकार होय.

८) रॅडम हाऊस विश्वकोश: मानवाधिकार म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार की जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक आहे.

९) मॅकफरलोन, ''मानवाधिकार हे असे नैतिक अधिकार आहेत की जे प्रत्येक स्त्री आणि पुरुषाला

केवळ माणूस या नात्याने प्राप्त झालेले आहेत.'

१०) डवार किल यांच्या मते, ''मानवाधिकार हे मानवाला प्राप्तत झालेले असे अधिकार आहे की ज्याचे सार्वजनिक हितासाठी देखील राज्याकडून उल्लंघन होऊ शकत नाही. आणि राष्ट्रीय कायद्याशिवाय देखील हे अधिकार उपभोगता येऊ शकतात.

या व्याख्यंवरून मानवाधिकाराचा अर्थ खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१) मानवाधिकार हे नैसर्गिक अधिकाराचे आधुनिक आणि धर्मनिरपेक्ष रूप आहे.

२) मानवाधिकार म्हणजे असे अधिकार की, जे व्यक्तीला माणूस म्हणून जन्मानेच प्राप्त झालेले आहेत.

३) हे अधिकार व्यक्तीला सन्मानपूर्वक जगण्यासाठी आणि त्याच्या व्यक्तीमत्त्वाच्या विकासासाठी अपरिवहार्य आहेत.

४) हे अधिकार उपभोगण्यासाठी विशिष्ट सामाजिक परिस्थितीच्या निर्मितीची आवश्यकता आहे.

५) या अधिकारांचा संबंध व्यक्तीच्या मूलभूत गरजांच्या पूर्ततेशी असल्यामुळे त्यांचा समावेश राज्यांनी आपल्या राज्यघटनांमध्ये करणे अपेक्षित आहे.

६) या अधिकारांचे स्वरूप वैश्विक, मूलभूत आणि निरंकूश आहे. हे अधिकार वैश्विक (Universal) आहेत. कारण ते या विश्वातील प्रत्येक व्यक्तीला जात, धर्म, वंश, भाषा, राष्ट्र या कृत्रिम बंधनाशिवाय प्राप्त झालले आहेत. ते मूलभूत आहेत. कारण ते कोणत्याही परिस्थितीमध्ये राज्याला हिरावून घेता येणार नाहीत. व्यक्तीला आपल्या अस्तित्वासाठी आणि सन्मानपूर्वक जगण्यासाठी हे आवश्यक असल्यामुळे त्यांचे स्वरूप निरंकुश आहे. या अधिकारांची इतर कोणत्याही अधिकारांशी तुलना किंवा बरोबरी होऊ शकत नाही.

७) मावाधिकार हे व्यक्तीला इतर व्यक्तीपासून तसेच राज्यांच्या सत्तेपासून, हिंसाचारापासून संरक्षणाचे कवच आहे. व्यक्तीला आपल्या संरक्षणासाठी हे अधिकार व्यक्ती किंवा समाजाकडून प्राप्त झालेले नाहीत. तर ते त्याला जन्मानेच प्राप्त झालेले आहेत. हे अधिकार व्यक्तीचे नैतिक दृष्ट्या रक्षण करतात.

८) हे अधिकार व्यक्तीला राज्याविरुद्ध प्राप्त झालेले आहेत. आणि प्रत्येक राज्याने या अधिकारांचा आदर केला पाहिजे.

९) मानवाधिकारांवर इतर अधिकारांची मर्यादा नसते. ते स्थळ, कालपरत्वे बदलत नाहीत. सामूहिक हितासाठी देखील या हक्कांचे उल्लंघन करता येणार नाही.

१०) मानवाधिकार नैसर्गिक आहेत. समाज किंवा राज्य त्यांना निर्माण करीत नाहीत. राज्याकडून या अधिकारांना केवळ वैधानिक मान्यता प्राप्त होते.

❖ **मानवी अधिकारांची वैशिष्ट्ये :**

मानवी अधिकारांची काही ठळक वैशिष्ट्ये आहेत. या वैशिष्ट्यांमुळेच मानवी अधिकार इतर अधिकारांपेक्षा वेगळे मानले जातात. ही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –

**१) वैश्विकता** (Universality) **:**

मानवी अधिकार हे वैशिष्ट्य व्यक्ती किंवा समाजापुरते मर्यादित नसून ते या विश्वातील प्रत्येक व्यक्तीला माणूस या नात्याने प्राप्त झालेले आहेत. हे अधिकार व्यक्तीला राज्याने किंवा समाजाने बहाल केलेले नाहीत तर ते व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले आहेत. सर्व काळ आणि सर्व प्रकारच्या परिस्थितीमध्ये सर्वांनाच प्राप्त झालेले असे हे अधिकार आहेत. म्हणजे थोडक्यात Rights of all people at all times in all situations यावरून या अधिकारांची वैश्विकता स्पष्ट होते.

**२) व्यक्तीनिषठता** (Individualistic) :

मानवी अधिकार हे व्यक्तीनिष्ठ अधिकार आहेत. कारण हे अधिकार व्यक्ती स्वातंत्र्य, विचार, भाषण स्वातंत्र्यावर आधारीत आहेत. प्रत्येक व्यक्ती ही जन्माने स्वतंत्र आहे. आणि तिला स्वतंत्रपणे विचार करण्याचा निर्णय घेण्याचा सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकर आहे हे स्वातंत्र्य मानवी अधिकारांमध्ये अंतर्भूत आहे. ज्या ठिकाणी ही स्वातंत्र्ये व्यक्तीला नाकारली जातात तेथे मानवी मूल्यांचे अवमूल्यन होते. मानवी अधिकारांमध्ये अंतर्भूत असणारी ही स्वातंत्र्ये व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्व विकासासाठी अपरिहार्य आहेत. म्हणूनच मानवी अधिकारांचे स्वरूप व्यक्तीनिष्ठ बनले आहे.

**३) परमोच्च** (Parmountacy) :

व्यक्तीला जगण्यासाठी मानवी अधिकार आवश्यक आहेत. त्याशिवाय व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास अशक्य आहे. म्हणूनच या अधिकारांची तुलना इतर कोणत्याही अधिकारांशी करता येत नाही. मानवी अधिकार हे परमोच्च अधिकार आहेत. जोपर्यंत व्यक्तीकडून देशातील प्रस्थापित कायद्याचा भंग होत नाही तोपर्यंत हे अधिकार काढून घेण्याचा शासनाला अधिकार नाही. मानवी अधिकार हे परमोच्च आणि पवित्र असणारे असे स्वातंत्र्य आहे की, ज्याची पायमल्ली करण्याचा किंवा अवमूल्यन करण्याचा शासनाला अधिकार नाही.

**४) व्यावहारिक** (Practically) :

मानवी अधिकार हे व्यावहारिक आहेत. कारण हे अधिकार व्यक्तीला उपभोगण्यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे शासनासाठी कठीण नाही. शासन सार्वजनिक हितासाठी कायदे करून देखील व्यक्ती स्वातंत्र्य देऊ शकते. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक आणि सामाजिक गरजा पूर्ण करणे जरी शासनाला शक्य नसले तरी व्यक्तीला जगण्यासाठी आवश्यक किमान सुविधा शासन निश्चित पुरवू शकते. या अधिकारांचे स्वरूप व्यावहारिक असल्यामुळे त्यांना संरक्षण देणे शासनाला अवघड नाही.

**५) अंमलबजावणी** (Enforcement) :

मानवी अधिकार हे व्यक्तीला इतर व्यक्ती पासून राज्याच्या अधिकारांपासून, हिंसाचारापासून स्वत:चे

रक्षण करण्यासाठी प्राप्त झालेले संरक्षण कवच (Protective Shield) आहे. हे अधिकार अंमलात आणण्यासाठी राज्यामध्ये कायद्याचे अधिराज्य (Rule of law) प्रस्थापित होणे आवश्यक आहे. देशाची कायदे व्यवस्था ही मानवी अधिकारांना संरक्षण देणारी आणि हे अधिकार व्यक्तीला उपभोगण्यासाठी आवश्यक सुविधा पुरविणारी असायला हवी. त्यामुळे कायद्याचे अधिराज्य आवश्यक आहे. कायद्याच्या अधिराज्याशिवाय मानवी अधिकाराचे फायदे व्यक्तीला आपल्या विकासासाठी करून घेता येणार नाहीत.

❖ **मानवी अधिकारांचे स्वरूप :** (Nature of Human Right)

**१) जन्माने प्राप्त झालेले अधिकार :**

मानवी अधिकार हे प्रत्येक व्यक्तीस मनुष्य या नात्याने जन्मानेच प्राप्त झालेले असतात. व्यक्तीचा जन्म कोणत्या राष्ट्रामध्ये किंवा भौगोलिक क्षेत्रामध्ये झालेला आहे हा प्रश्न मानवाधिकाराच्या दृष्टीने गौण मानला जातो. याचे मनुष्यत्व हाच मानवाधिकारांचा आधार आहे. मानवाधिकारांच्या वैश्विकतेमधून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे मानवाधिकारांच्या अंमलबजावणीसाठी विशिष्ट राष्ट्र किंवा संस्थेपूरती मर्यादित नसून सर्व राष्ट्रांचे सामूहिक प्रयत्न यासाठी आवश्यक आहेत. हे अधिकार व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले असल्यामुळे ते काढून घेण्याचा अधिकार कोणत्याही राज्याला किंवा संस्थेला नाही. व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत हे अधिकार आबाधित राहतात.

**२) मानवाधिकारांचे स्वरूप इतर अधिकारांपेक्षा वेगळे आहे :**

मानवाधिकारांचे स्वरूप हे इतर अधिकारांपेक्षा वेगळे आहे. इतर अधिकारात मध्ये व्यक्तीला ते मिळवावे लागतात. त्यासाठी राज्याविरुद्ध संघर्ष करावा लागतो. मानवाधिकार व्यक्तीला मिळवावे लागत नाहीत. जे जन्मत:च व्यक्तीला मिळतात. प्रत्येक व्यक्तीला हे अधिकार निसर्गाने बहाल केलेले आहेत हे अधिकार व्यक्तीला कोणीही दिलेले नाहीत. त्यामुळे काढून घेण्याचा अधिकार ही कोणाला नाही. मानवाधिकारांचे हस्तांतरण करता येत नाही. या अधिकारांचे स्वरूप वैश्विक असल्यामुळे व्यक्ती मरण पावल्यानंतरच ते संपतात. उदा. युद्ध कैद्यांना, युद्धामुळे निर्वासित झालेल्या लोकांना नागरिकत्वामुळे प्राप्त होणाऱ्या अधिकारांपासून जरी वंचित व्हावे लागत असले; तरी इतर राष्ट्रांना त्यांना अमानुषपणे वागवता येत नाही. त्यांना माणूस म्हणून जे अधिकार जन्माने मिळालेले आहेत त्यांचा आदर हा प्रत्येक राष्ट्राने राखलाच पाहिजे.

**३) मानवाधिकार हे स्वातंत्र्य, समता आणि न्यायाचा पाया आहेत :**

मानवाधिकाराकडे स्वातंत्र्य आणि न्यायाच्या मूल्यांचा पाया म्हणून बघितले जाते. स्वातंत्र्य आणि न्यायाचे मूल्य मानवाधिकाराच्या संकल्पनेत समाविष्ट आहे. राष्ट्र, वंश, जात, धर्म, भाषा, लिंग इत्यादी कोणत्याही भेदाशिवाय मानवाधिकार व्यक्तीला मिळालेले आहेत. समता मानवाधिकारात अंतर्भूत आहे. बेकायदेशीर आणि अमानुष वागणूकीपासून स्वातंत्र्य मानवाधिकारात अपेक्षित आहे. कायद्यासमोर सर्वजण समान आहेत. गरीब, श्रीमंत, मालक-कामगार, नेता कार्यकर्ता अशा प्रकारची अनेक उदाहरणे देता येतील. समाजातील सर्वच लोकांना समानतेच्या भावनेने जगू द्यावे हे मानवाधिकारामध्ये अपेक्षित आहे.

**४) मानवाधिकारांची गतिमानता :**

मानवाधिकारांचा गेल्या अनेक शतकांपासून विकास होतो आहे. विकासाच्या विविध टप्प्यांवर हे अधिकार विविध नावानी ओळखले जातात. उदा. दैवी अधिकार, नैसर्गिक अधिकार, मूलभूत अधिकार इ. मानवाधिकारांच्या विकासाच्या प्रक्रियेत लोकांना आप आपल्या अनुभवानुसार अणि आवश्यकतेनुसार जे अधिकार महत्त्वाचे वाटले त्याचा समावेश मानवाधिकारांच्या यादीत होत गेला. सतराव्या–अठराव शतकापर्यंत संपत्तीचा अधिकार, स्वातंत्र्याचा आणि जगण्याचा अधिकार यांना नैसर्गिक अधिकार असे मानले जाऊ लागले. कालपरत्वे या यादीत वाढ होत गेली. विसाव्या शतकामध्ये ज्या नवीन अधिकारांची मानवाधिकारांमध्ये भर पडली ते अधिकार 'तिसऱ्या पिढीतील अधिकार म्हणून ओळखले जातात. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेचा अधिकार, प्रदूषण मुक्त पर्यावरणाचा अधिकार, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्प संख्यांकांचे अधिकार इ. अधिकारांचा समावेश होतो.

**५) शांततेसाठी मानवाधिकार :**

समता, स्वातंत्र्य आणि न्यायाबरोबरच शांतता ही देखील मानवाधिकारांचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. व्यक्ती विकासाबरोबरच आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करणे हा मानवाधिकारांच्या संरक्षणामुळे शक्य आहे. शांततेसाठी मानवाधिकार या कल्पनेला दुसऱ्या महायुद्धानंतर गती प्राप्त झाली. संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना हा या प्रयत्नाचा पहिला उपक्रम होता. मानवाधिकार आणि शांतता हे दोन्ही घटक परस्पर पूरक आहेत. शांततेशिवाय मानवाधिकारांचे संरक्षण अवघड असून मानवाधिकारांच्या संरक्षणाशिवाय शांततेची निर्मिती अशक्य आहे. सर्व राष्ट्रांच्या सामूहिक प्रयत्नांमधून मानवाधिकारांचे संरक्षण आणि आंतरराष्ट्रीय शांततेची निर्मिती शक्य आहे.

**६) मानवी संस्कृतीच्या रक्षणासाठी मानवाधिकार :**

विसाव्या शतकात मानवाधिकारांकडे मानवी संस्कृतीच्या रक्षणाचे साधन म्हणून पाहिजले जात आहे. याचे कारण पाहिल्यास आपणास असे लक्षात येईल की, विसाव्या शतकात जगाला दोन महायुद्धांचा सामना करावा लागला होता. ज्यामध्ये लक्षावधी लोक मारले गेले होते. अणुबाँबचा शोध आणि त्यांचे भीषण परिणाम याची साक्ष जगाला सन १९४५ साली जेव्हा अमेरिकेने जपानविरुद्ध अनुबाँबचा वापर केला त्यावेळी पटली होती.आज जगातील अनेक दिग्गज राष्ट्रांकडे पृथ्वीवरील मानवी संस्कृती क्षणात बेचिराख होऊ शकेल अशी शस्त्रास्त्रे आहेत. शस्त्रास्त्रांच्या या स्पर्धेत या जीवघेण्या परिणामांपासून मानवी संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी मानवाधिकार हा महत्त्वाचा मार्ग आहे. शस्त्रास्त्र स्पर्धेशिवाय वंशिक संघर्ष, आंतरराष्ट्रीय दहशतवाद, यादवी युद्ध, पर्यावरणाचे प्रदूषण, लोकसंख्येचा विस्फोट इत्यादी सारख्या समस्यांना मानवी संस्कृतींने आव्हान दिले आहे. या समस्यांमुळे मानवाधिकार देखील धोक्यात आले आहेत. मानवाधिकारांविषयीची जागतिक पातळीवरील संवेदनशीलता आणि या अधिकारांचा आदर या समस्यांवर उपाय ठरू शकतो. मानवाधिकारांच्या रक्षणासाठी राष्ट्रांनी राजकीय इच्छाशक्ती दाखविली तर मानवी संस्कृतीला आव्हान देणाऱ्या या समस्यांवर तोडगा निघू शकेल.

### ७) मानवाधिकार आणि सामजिक न्याय :

मानवाधिकार आणि सामाजिक न्यायाचा अतिशय जवळचा संबंध आहे. या दोन्ही संकल्पना परस्पर पूरक आहेत. मानवाधिकाराच्या रक्षणासाठी समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित करणे गरजेचे असते. तसेच प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही भेदभावाशिवाय विकासाचा अधिकार दिल्याशिवाय सामाजिक न्यायाचे तत्त्व अस्तित्वात येणार नाही. सामाजिक न्याय ही एक सर्वसमावेशक संकलपना आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत गरजा पूर्ण करण्याचा अधिकार आहे. त्यासाठी हा अधिकार जात, धर्म, वंश, लिंग अशा कोणत्याही भेदभावाशिवाय व्यक्तीला मिळायला हवा. मूलभूत गरजांच्या पुर्ततेचा अधिकार व्यक्तीला मानवाधिकार आहे. समाजातील प्रत्येक घटकाला विकासाची समान संधी मिळायला हवी. स्त्रियांना सर्व क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळायला पाहिजे. व्यक्तीला मूलभूत मानवाधिकार मिळवून देणे हे सामाजिक न्यायाचे मुख्य उद्दिष्ट आहे. तर सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे मानवाधिकार हे साधन आहे. भारतासारख्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विषमतेवर अधारीत समाजामध्ये सामाजिक न्याय प्रस्थापित होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण याशिवाय दलित, पिडीत, वंचित आणि महिलांना त्यांचे मानवाधिकार आणि विकासाच्या संधी मिळणार नाहीत. भारतीय समाजातील ही वस्तुस्थिती ओळखूनच घटना कर्त्यांनी सामाजिक न्यायाच्या तत्त्वाला भारतीय राज्यघटनेचा मूलभूत अधिकार बनविला आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सामाजिक आणि आर्थिक विकासाचे लाभ पोहोचायला पाहिजेत. हे सामाजिक न्यायाचे आणि भारतीय राज्यघटनेचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी विकेंद्रीकरणावर आधारीत संस्थात्मक रचना निर्माण झाल्या पाहिजेत. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी भारतामध्ये आरक्षणाचा साधन म्हणून वापर होताना दिसतो.

### ८) मानवाधिकारांसाठी कल्याणकारी राज्याची आवश्यकता :

मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी कल्याणकारी राज्य प्रस्थापित होणे गरजेचे आहे. कल्याणकारी राज्यांची कल्पना ही खऱ्या लोकशाही मूल्यांवर आधारीत आहे. कल्याणकारी राज्य सामूहिक हितसंबंधांच्या पूर्ततेवर आधारीत आहे. सामाजिक कल्याण कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट आहे. कल्याणकारी राज्यामध्ये व्यक्तीला मानवाधिकार उपभोगता यावेत म्हणून आवश्यक परिस्थिती निर्माण करू दिली जाते. लोकांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत गरजा पूर्ण करता येतात. कल्याणकारी राज्यामध्ये शोषणाला स्थान नसते. लोकशाही शासन प्रणाली, नियंत्रित, आर्थिक व्यवस्था, समता, न्याय आणि सहकार्य या तत्त्वांच्या आधारे कल्याणकारी राज्य सामूहिक कल्याणांच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी प्रयत्नशील असतात. भारतामध्ये कल्याणकारी राज्य प्रस्थापित करणे हा भारतीय राज्य घटनेचा प्रमुख उद्देश आहे.

### ९) मानवी हक्क आणि कर्तव्य :

मानवी हक्क व कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जो एका व्यक्तीचा अधिकार किंवा हक्क आहे ते दूसऱ्या व्यक्तीचे कर्तव्य आहे. जोपर्यंत व्यक्ती इतरांच्या हक्कांचा आदर करण्याचे कर्तव्य

पार पाडणार नाही; तोपर्यंत व्यक्तीला आपले अधिकार संरक्षित करता येणार नाहीत. आपल्या अधिकारांवर इतरांनी आक्रमण करू नये, असे जर व्यक्तीला वाटत असेल तर त्या व्यक्तीने इतरांचा आदर करणे आवश्यक आहे. आपण जसे माणूस आहेत तसे इतरही आहेत आणि आपल्याला जसे अधिकार आहेत तसे इतरांनाही आहेत. हे प्रथम व्यक्तीने मान्य करणे आवश्यक आहे आणि हाच त्याच्या कर्तव्याचा भाग आहे. अशाप्रकारे हक्क आणि कर्तव्ये यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. जर प्रत्येक व्यक्तीने इतरांच्या अधिकारांचा आदर केला किंवा त्याविषयी संवेदनशीलता दाखविली तर मानवाधिकारांच्या उल्लंघनाचा प्रसंग उद्भवनार नाही.

**१०) मानव मुक्तीसाठी मनवाधिकार :**

मानवाधिकारासाठीच लढा हा मानवी मुक्तीसाठी, स्वातंत्र्यासाठीचा लढा आहे. सत्तेच्या अमर्यादा आणि निरंकुश वापराविरुद्ध हा लढा आहे. निरंकुश सत्तेला लगाम घालण्याचे काम मानवाधिकारांनी केले आहे. आर.एस्. मॅकआयव्हर या विचारवंताने आपल्या 'ग्रेट एक्सप्रेशन्स ऑफ ह्युमनराईटस्' या ग्रंथामध्ये मानवी मुक्तीसाठी, सवतंत्र्यासाठी, मानवाधिकार चळवळ कशी प्रेरित होत गेली. यावर प्रकाश टाकला आहे. मॅकआयव्हर यांच्या मते, गेल्या दोन हजार वर्षामधील मानव संस्कृतीच्या इतिहासावर नजर टाकली तर प्रत्येक कालखंडामध्ये बहुतांश लोकांना समाजातील शक्तीशाली गटाकडून होणाऱ्या अत्याचाराला आणि शोषणाला तोंड द्यावे लागले आहे. या शक्तीशाली गटाकडून मूलभूत मानवाधिकाराचा संकोच होत आला आहे. अशा अन्यायाविरुद्ध अनेक ठिकाणी उठाव झाले आहेत. मानवाधिकार चळवळी उभ्या राहिल्या आहेत. अन्याय अतिशोषणाविरुद्धचा हा लढा मानवी मुक्तीचा आणि मूलभूत मानवाधिकारांच्या रक्षणासाठीचा लढा होता.

**❖ मानवाधिकारांचे वर्गीकरण :**

मानवाधिकारांची संकल्पना सातत्याने उत्क्रांत होत आहे. प्रत्येक कालखंडामध्ये काही नवीन अधिकारांची भर मानवाधिकारांमध्ये होत आहे. सोळाव्या-सतराव्या शतकामध्ये संपत्तीचा, जगण्याचा आणि स्वातंत्र्याच्या अधिकारांना मूलभूत, नैसर्गिक अधिकार म्हणून संबोधले जात असे. मानवाधिकारांचा संबंध हा व्यक्तीच्या जगण्याशी, त्याच्या व्यक्तीमत्त्वाच्या विकासाशी निगडीत असल्यामुळे अशा सर्व हक्कांचा समावेश मानवाधिकारांमध्ये करण्यात येऊ लागला आहे. व्यक्तीच्या मानवाधिकारांबरोबरच समूहांच्या मानवाधिकारांना देखील अलिकडच्या काळात महत्त्व प्राप्त झाले आहे. मानवाधिकार म्हणून गृहित धरल्या जाणाऱ्या सर्व व्यक्ती आणि समूहांच्या अधिकारांचे चार गटामध्ये वर्गीकरण करता येईल.

१) जीवन जगण्याचा अधिकार.

२) नागरी स्वातंत्र्य आणि लोकशाही अधिकार

३) संपत्तीचा अधिकार

४) सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अधिकार.

**१) जीवन जगण्याचा अधिकार :**

जीवन जगण्याचा अधिकार हा सर्वात महत्त्वाचा अधिकार मानला जातो. जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या इच्छेप्रमाणे जीवन जगण्याचा अधिकार आहे. व्यक्ती जगलाच नाही तर तो अधिकारांचा उपभोग कसा घेणार ? हा महत्त्वाचा मुद्दा आहे. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकारांच्या प्रकरणातील कलम २१ नुसार जीवन जगण्याचा अधिकार व्यक्तीला बहाल करण्यात आला आहे. या कलमानुसार असे स्पष्ट करण्यात आले आहे की, कोणत्याही व्यक्तीचे जीवन किंवा त्याचे व्यक्तीगत स्वातंत्र्य कायद्याने सांगितलेल्या पद्धती किंवा अधिकाराशिवाय हिरावून घेता येणार नाही. जीवन जगण्याच्या अधिकारामध्ये केवळ जगणेच नाही तर सन्मानाने जगणे अभिप्रेत आहे. सन्मानाने जगण्यासाठी व्यक्तीला आवश्यक असणाऱ्या सर्व संधी आणि अधिकार मिळाले पाहिजेत. म्हणूनच शिक्षणाचा अधिकार, आरोग्य सुविधा, प्रदूषणमुक्त वातावरण, पिण्याचे शुद्ध पाणी या सर्व अधिकारांचा जीवन जगण्याच्या अधिकारात समावेश केला गेला आहे. या अधिकारानुसार कोणत्याही व्यक्तीला बेकायदेशीर तुरुंगात डांबून ठेवणे, त्याचा छळ करणे किंवा त्याची हत्या करणे हे जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन आहे.

**२) नागरी स्वातंत्र्य आणि लोकशाही अधिकार :**

या अधिकार प्रकारांमध्ये खालील दोन अधिकारांचा समावेश होतो.

i) **स्वातंत्र्याचा अधिकार :** स्वातंत्र्य म्हणजे प्रत्येक व्यक्तीला आपल्या मर्जीप्रमाणे वागण्याचा अधिकार होय. उदा. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी स्वातंत्र्याच्या अधिकारात जन्मसिद्ध अधिकार म्हणून संबोधले होते. व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्त्वाच्या विकासासाठी विचारांचे आणि कृतीचे स्वातंत्र्य आवश्यक आहे. कृती स्वातंत्र्याशिवाय विचारांचे स्वातंत्र्य निरर्थक आहे तर विचारांच्या स्वातंत्र्याशिवाय कृती स्वातंत्र्याचा उपयोग अशक्य आहे. थॉमस पेन या विचारवंतांने आपल्या ''माणसाचे अधिकार'' या ग्रंथात स्वातंत्र्याच्या अधिकाराला केंद्रस्थानी मानलेले आहे. सर्व माणसे जन्मत:च समान आहेत. आणि त्यांना समान नैसर्गिक अधिकार आहेत. हा विचार फ्रेंच राज्यक्रांतीला प्रभावित करणारा ठरला. जॉन लॉक या विचारवंताने नैसर्गिक स्वातंत्र्याच्या अधिकाराला नैसर्गिक अधिकार म्हणून संबोधले आहे.

ii) **समतेचा अधिकार :** जगातील सर्व माणसे जन्मत: समान आहेत आणि जात, धर्म, वंश, लिंग, भाषा इ. च्या आधारावर भेदभाव करता कामा नये, हे तत्त्व समतेच्या अधिकारामध्ये अपेक्षित आहे. त्याचबरोबर ''कायद्यापुढे प्रत्येक व्यक्ती समान आहे. आणि कायद्याचे सर्वांना समान संरक्षण आहे.'' या तत्त्वाचा समावेश देखील समतेच्या अधिकारामध्ये होतो. भारतीय राज्य घटनेमधील मूलभूत अधिकारांच्या प्रकरणाची सुरूवातच समतेच्या अधिकारापासून होते. हे मूलभूत अधिकार सर्व भारतीयांना कोणत्याही भेदभावाशिवाय बहाल करण्यात आले आहे. त्याच बरोबर शासन जात, धर्म, वंश, भाषा आधारावर भेदभाव करणार नाही असे मूलभूत अधिकारांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहेत. संयुक्त राष्ट्रसंघटनेने १० डिसेंबर १९४८ साली मानवाधिकारांचा जो जाहीरनामा घोषित केला. त्यामध्ये समतेच्या तत्त्वाला महत्त्वाचे स्थान

आहे. या जाहीरनाम्याच्या सुरूवातीलाच स्पष्ट करण्यात आले आहे की, हे अधिकार कोणत्याही भेदभावाशिवाय प्रत्येक व्यक्तीला बहाल करण्यात आले आहे.

**३) संपत्तीचा अधिकार :**

संपत्तीच्या अधिकाराला मूलभूत मानवाधिकार म्हणून मान्यता देण्यात आली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकारांच्या जाहिरनाम्यात संपत्तीच्या अधिकाराला स्थान देण्यात आले आहे. त्याचबरोबर संयुक्त राष्ट्रसंघटनेमार्फत आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा जो आंतरराष्ट्रीय करारनामा करण्यात आला आहे. त्यामध्ये संपत्तीच्या अधिकाराचा समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक व्यक्तीला अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी संपत्ती मिळविण्याचा आणि आपल्या इच्छेनुसार ती संपत्ती खर्च करण्याचा अधिकार आहे.

**४) सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक अधिकार :**

सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्वरूपाच्या मानवाधिकारांमध्ये रोजगाराचा अधिकार, कोणत्याही भेदभावाशिवाय समान वेतनाचा अधिकार, व्यक्तीला स्वत:साठी आणि आपल्या कुटुंबासाठी सन्मानपूर्वक जीवनस्तर मिळविण्याचा अधिकार, विश्रांतीच्या, मनोरंजनाचा अधिकार, कामगार संघटना स्थापन करण्याचा आणि शांततापूर्ण मार्गाने एकत्र येण्याचा अधिकार, भूकेपासून मुक्तीचा अधिकार, मूलभूत आरोग्यसेवा मिळविण्याचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा अधिकार इ. महत्त्वपूर्ण अधिकारांचा समावेश होतो. हे व्यक्तीचे मूलभूत मानवाधिकार असून व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्त्व विकासासाठी हे अधिकार आवश्यक आहेत.

**❖ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १**

**अ) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

१) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ ला मानवी अधिकारांचा जाहिरनामा घोषित केला.

२) मानवी हक्क हे व्यक्तीला जन्माने प्राप्त होत नाहीत.

३) मानवी हक्क हे नैसर्गिक अधिकारांचे आधुनिक आणि धर्मनिरपेक्ष रूप आहे.

४) मानवाधिकार हे परमोच्च अधिकार नाहीत.

५) मानवी संस्कृतीच्या रक्षणासाठी मानवाधिकारांचा वापर होत नाही.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) मानवाधिकार म्हणजे काय ?

२) मानवाधिकारांची कोणतीही दोन वैशिष्ट्ये सांगा.

❖ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे.**

**अ)** १) - बरोबर, २) चूक, ३) बरोबर, ४) चूक, ५) चूक

**ब)** १) व्यक्तीला निसर्गाकडून जन्मतः प्राप्त झालेले असे अधिकार की, ज्याशिवाय माणूस म्हणून जगणे अशक्य आहे.

२) वैश्विकता आणि व्यक्तिनिष्ठता.

### १.२.२ मानवी हक्कांच्या ऐतिहासिक दृष्टिकोन आणि मानवी हक्कांचे तत्त्वज्ञान :

मानवी हक्कांची संकल्पना जरी आजच्या आधुनिक काळातील असली तरी तिची पाळे-मुळे ही मानव जातीच्या इतिहासामध्ये सापडतात. हक्कांच्या संकल्पनेस वेगवेगळ्या युगांतील विविध शतकांमध्ये मान्यता देण्यात आलेली होती, आणि या संकल्पनेची रचना करण्यात आली होती. गुलामगिरी विरोधी चळवळ आणि युद्धा संबंधीच्या गुन्ह्यांविरुद्ध असणाऱ्या चळवळी अशा विविध चळवळींनी मानवी हक्कांच्या उत्क्रांतीमध्ये योगदान दिले आहे. युद्धाच्या काळात मानवी हक्कांची होणारी पायमल्ली ते आद्योगीक क्रांतीनंतरच्या कालखंडात कामगारांचे होणारे शोषण अशा संवेदनशील प्रश्नांवर मानवी हक्कांच्या अनुशंगाने उहापेह करण्यात आलेला आहे. मानवी हक्कांच्या ऐतिहासिक वाटचालीमध्ये अगदी अलिकडच्या काळातील महिला आणि बाल कामगार विरोधी गुन्हे तसेच जातीय गुन्हे यासारख्या प्रश्नांवरही गांभीर्याने चर्चा होत आहे. मानवी हक्कांमध्ये वैयक्तिक पातळीवर सन्मानाने जगणे व इतरांनाही जगू देणे या मुलभूत विचारावर आधारीत वाटचाल असलेली आढळते.

हक्कांच्या विधेयकामध्ये जनतेच्या मूलभूत स्वातंत्र्याचे वर्तन करण्यात आलेले आहे. या विधेयकांमुळे प्रत्येकाचे वर्णन करण्यात आले आहे. या विधेयकांमुळे प्रत्येकास अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य आणि भाषण व वृत्तपत्र स्वातंत्र्य, तसेच सभेच्या हक्कांचे स्वातंत्र्य इत्यादींची हमी मिळते. प्रत्येक व्यक्तीस जन्मतः काही हक्क प्राप्त होतात.

मॅग्ना कार्टा, सुंयक्त राष्ट्र संघाचा मानवी हक्कां संदर्भातील जागतिक जाहीरनामा आणि मानवी हक्कांवरील फ्रेंच जाहीरनामा, या सारख्या दस्तऐवजामध्ये मानवी हक्कांच्या मान्यते संबंधीचे आणि पूरस्कारासंबंधीचे बरेचसे प्रसंग आढळून येतात.

'मॅग्ना कार्टा' हा लॅटीन शब्द आहे. या शब्दाचा अर्थ 'श्रेष्ठ सनद' असा आहे. इंग्लंडचे राजे जॉन यांनी दि. १५ जून १२१५ रोजी मॅग्ना कार्टा लागू केले. पोप आणि इंग्रजी जहागीरदार मंडळीने ही लिखित सनद त्यांच्यावर लादली. यामध्ये काही हक्क जाहीर करण्याची व काही कायदेशीर पद्धतीचा आदर राखण्याची आवश्यकता होती.

मॅग्ना कार्टामध्ये ६३ कलमांचा समावेश आहे. त्यापैकी बहुतेक कलमांमध्ये सरंजामी कायदा कायम करण्यासाठी राजाला वचनबद्ध करण्यात आले. मॅग्ना कार्टामधून हक्कांचे अभिवचन देण्यात आले. हे हक्क

मुख्यत: उच्च वर्गातील लोकांसाठी होते. सर्वसामान्य लोकांना त्यातून फारच थोडा लाभ झाला. मॅग्ना कार्टाने सर्व लोकांना व्यक्तीगत स्वातंत्र्याची हमी दिली नव्हती. तरीसुद्धा या लिखित नियमांमुळे इंग्लंडमध्ये सनदशीर शासकीय विकास साधण्यासाठी उल्लेखनीय अशी पावले टाकली गेली. लोकशाही शासनासाठी आग्रह धरणाऱ्यांना मॅग्ना कार्टा पथदर्शक ठरली. राज्याच्या निरंकूश सत्तेवर पहिला निर्बंध मॅग्ना कार्टाच्या स्वरूपात पुढे आला.

सरंजामी वर्गासाठी लागू असलेली त्यातील काही कलमे नंतर सर्वांसाठी महत्त्वपूर्ण बनली. उदा. सनदेमध्ये असे नमूद करण्यात आले होते की, राज्यातील सर्व महत्त्वपूर्ण प्रश्नासंबधी जहागीरदारांचा सल्ला आणि संमती घेतली पाहिजे. त्यातील काही कलम आधुनिक न्यायासाठी महत्त्वाचा पाया बनले. त्यापैकी एका कलमामध्ये अशी तरतुद करण्यात आली आहे की, कोणत्याही मुक्त व्यक्तीस सरदारांच्या (समतुल्य) कायदेशीर न्यायनिर्णयाशिवाय किंवा स्थानिक कायद्याशिवाय कैद करू नये. संपत्तीपासून वंचित ठेऊ नये. देशाबाहेर हाकलू नये किंवा त्याचा शिरछेद करू नये या कलमामध्ये न्याय साहाय्यकाच्या न्याय्य चौकशीचा समावेश असणाऱ्या रितसर कायदेशीर प्रक्रियेची कल्पना विकसित झाली.

सन १५०० च्या दरम्यान मॅग्ना कार्टाकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाले. परंतु संसदेच्या सदस्यांनी सन १६०० च्या दरम्यान मॅग्ना कार्टाचे पूनरुज्जवन केले. संसदेच्या सदस्यांनी राज्यसत्तेवरील घटनात्मक पडताळणी म्हणून सदरची सनद सर्वांच्या समोर आणली. सन १७०० मध्ये विल्यम ब्लॅकस्टीन या एका सुप्रसिद्ध वकीलांने इंग्लंडच्या कायद्यावरील केलेल्या लोकप्रिय समालोचनामध्ये लोकांचे कायदेशीर अधिकार म्हणून हे आदर्श पुढे मांडले. सन १७०० मध्ये वसाहतकारांनी कायदेशीर आणि राजकीय हक्कांवरील ही इंग्रजी आदर्शे अमेरिकेमध्ये नेली. त्यामुळे ही आदर्श संयुक्त संस्थानांच्या घटनात्मक चौकटीचा एक भाग बनली.

नंतरच्या शतकांमध्ये त्याचा फायदा बहुतेक शेष जणांना झाला. कारण बऱ्याचशा अन्य लोकसत्ताक राष्ट्रांनी आपले स्वयं-शासन निर्माण करण्यासाठी इंग्रजी कायद्याचा अवलंब केला. या देशांमध्ये संयुक्त राष्ट्रे आणि कॅनडा यांचा समावेश आहे.

अशा विविध पार्श्वभूमीवर इतिहासकालीन मानवी हक्कांची जाणीव होऊ लगली. अनेक मानवी संस्कृतीना विविध स्वरूपांमध्ये हक्कांच्या संकल्पनेचे आकलन झाले आणि त्या संकल्पनांचा अर्थ लावण्यात आला. हक्कांविषयीच्या संकल्पनांचा बायबल, प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतीमध्ये विकास झाला. हम्मुराबी संहिता नियमावल्लींचा खुलासा करते. त्याचबरोबर असे नियम मोडल्यास देण्यात येणाऱ्या शिक्षेचा देखील खुलासा करते. यामध्ये महिला हक्क, बालहक्क आणि गुलामांच्या हक्कासह अन्य विविध हक्कांचा अंतर्भाव केलेला आहे.

तीन शतकानंतर प्राचीन भारतातील मौर्य साम्राज्याने ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकातील सम्राट अशोकच्या राजवटीमध्ये नागरी हक्कांची अभूतपूर्व तत्त्वे प्रस्थापित केली. सम्राट अशोकाने ख्रिस्तपूर्व २६५ मध्ये कलिंगवर स्वारी करून पाशवी विजय मिळविला. त्या विजयामुळे आनंद होण्याऐवजी सम्राट अशोकला आपण केलेल्या कृत्याबद्दल अतिशय पश्चाताप झाला आणि त्याचा परिणाम म्हणून त्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्या

क्षणापासून ‘क्रूर अशोक’ हा ‘पवित्र अशोक’ या नावाने ओळखला जाऊ लागला. आपल्या राजवटीमध्ये त्याने अहिंसेचे धोरण अधिकृतपणे राबविले. प्राणीमात्रावर दया, कैद्यांवर दया दाखविली. सामान्य नागरिकांस विद्यापीठांमधून विनामूल्य शिक्षण देऊ केले. सम्राट अशोकने अहिंसेचे पालन करणे, सर्व पंथ आणि धर्मांची सहिष्णूता राखणे, पालकांच्या आज्ञेचे पालन करणे, गुरुजनांचा आदर राखणे, मित्रांशी मैत्रीपूर्ण राहणे, नोकरवर्गास माणूसकीने वागविणे, सर्वांशी प्रेमाने वागणे अशी मुख्य तत्त्वे लागू केली.

अशा तऱ्हेने प्राचीन काळी हक्क आणि कर्तव्ये बहुधा धार्मिक तत्त्वावर पार पाडली जात असत.

पाश्चात्य विचारसरणीतील अभिजात परंपरांचा उगम ग्रीक आणि रोमन संस्कृतीमधून शोधून काढता येऊ शकतो. या दोन परंपरांमधील विचारवंतांनी प्रथमच योग्य मार्गाने हक्कांची संकल्पना साकारण्याचा प्रयत्न केला.

**❖ ग्रीक परंपरा :**

स्टॉईक्स या ग्रीक-रोमन तत्त्ववेत्याने मांडलेल्या नैसर्गिक कायद्याच्या सिद्धांतामध्ये मानवी हक्कांच्या आधुनिक विचारांचे बीज सापडते. स्वाभाविक कायदा हा सर्व मानवांना समानतेने लागू असून तो वैश्विक विधीग्राह्य नैतिक तत्त्वांचा मुख्य भाग आहे असे स्टॉईक्सला आढळून आले. मानवी हक्कांना नैसर्गिक हक्का इतके महत्त्व प्राप्त झाले.

ॲथेन्स कायदे म्हणून लोकप्रिय असलेल्या प्राचीन ग्रीकांच्या कायदेशीर पद्धतीवर स्टॉईक्सच्या विचारांचा प्रभाव पडला. स्टॉईक्सच्या संप्रदायाने असा निर्णय घेतला की, मानवी वर्तनास नैसर्गिक कायद्यानुसार न्याय दिला पाहिजे आणि मानवी वर्तनाचा नैसर्गिक कायद्याबरोबर मेळ घातला पाहिजे. प्लेटोच्या वैश्विक सत्य आणि सद्‌गुण यांच्या कल्पनेतून हक्कांची वैश्विक संकल्पना साकार झाली. प्लेटोच्या मतानुसार सद्‌गुण हे हक्क आणि कर्तव्य यांच्याशी जोडले गेलेले आहेत. प्लेटोवादानुसार मानवी जीवनामध्ये तीन प्रमुख घटकांचा समावेश आहे. ते तीन घटक म्हणजे (१) कारण (२) हिंमत किंवा धैर्य आणि (३) भूक. या घटकांनुसार पुढील तीन वर्गाची रचना करण्यात आली. (१) तत्त्वज्ञानी वर्ग (२) सैनिक वर्ग आणि (३) उत्पादक वर्ग या रचनेमुळे त्यातील प्रमुख सद्‌गुणांनुसार प्रत्येक वर्गाचे वेगवेगळे हक्क आणि कर्तव्ये आहेत.

**❖ रोमन परंपरा :**

रोमन लोकांनी न्याय व्यवस्थेसाठी कायदेशीर नियमावलींच्या स्वरूपातील स्वाभाविक कायद्यासंबंधीच्या स्टॉइक्स सुत्ररूप रचनेचा वापर केला. प्राचीन रोममध्ये नैसर्गिक हक्कांची कल्पना पुढे चालू राहिली. रोमचा सर्वात मोठा वारसा म्हणजे त्यांची न्यायव्यवस्था होय.

रोमन कायदा पद्धतीमध्ये मार्कस् तुलुस सिसेरो यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. सिसेरो हा एक मुत्सद्दी वकील, विद्वान आणि लेखक होता. ख्रिस्तपूर्व ६३ मध्ये त्याने रोमन अधिकारपद भूषविले. सिसेरोचा उल्लेख त्याच्या कायद्यासंबंधीच्या मतासह केला जातो. त्याच्या मते नागरिकांनी चांगले वर्तन ठेवावे. यासाठी

राष्ट्राला आज्ञा देणे, प्रतिबंध करणे आणि फर्मावणे इ. अधिकारांचा वापर करता येतो. याची खरी जाणीव आपल्याला झाली पाहिजे. परंतु हा अधिकार मुळात प्रत्येक व्यक्तीस अपकृत्यापासून परावृत्त करण्यासंबंधीचा आहे. सिसेरोने विशेषत: असे सिद्ध केलेले आहे की, हा अधिकार राष्ट्रांच्या अस्तित्वाहून अधिक पुरातन आहे. जो स्वर्ग आणि पृथ्वीचे संरक्षण आणि पालन करतो अशा परमेश्वरासह हा अधिकार अस्तित्वात आलेला आहे. या संकल्पनेमुळे मानवी जीवनाची सुरक्षा, शांती आणि सुख यासाठी कायदा अस्तित्वात आलेला आहे, असे सिद्ध होते.

रोमन कायद्याचे आणखी एक मुख्य वैशिष्ट्य म्हणजे या कायद्यामद्ये कुटुंबाला प्रथम स्थान देण्यात आलेले आहे. आणि नंतर अन्य कर्तव्ये जरी नागरी राजकीय आणि सैनिकी कर्तव्ये यांना महत्त्व देण्यात आलेले आहे. कुटुंब ही एक नैतिकता जपणारी संस्था आहे. रोमन कुटुंब संस्थेस आरोग्य, दृढ नातेसंबंध आणि प्रमाणिकपणा व आत्मनिग्रह यामुळे बळकटी प्राप्त झाली. कुटुंब हा रोमन नागरी कायद्याचा पाया होता.

जरी १७ व्या शतकामध्ये हक्कांचे आधुनिक सिद्धांत आकार घेऊ लागले, तरी त्यांच्यामध्ये १६ व्या शतकाच्या अखेरीस प्रगती झाली. सामाजिक संविदात्मक विचारवंतांनी नैसर्गिक व्यक्तीगत हक्कांच्या कल्पनेला हातभार लावला आणि बऱ्याचशा अन्य पाश्चात्य विचारवंतांनी वेगवेगळ्या सिद्धांताद्वारे मानवी हक्कांच्या उत्क्रांतीस हातभार लावला.

**१) ह्युगो ग्रॉशियस :**

हॉलंडचा ह्युगो दि ग्रुट (१५८३-१६४५) हा ग्रॉशियस या त्यांच्या लॅटीन नावाने अधिक प्रसिद्ध होता. ग्रॉशियसने स्वाभाविक कायद्याच्या त्याचप्रमाणे आधुनिक आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्त्वांचा नवीन पाया घालण्यासाठी उत्कृष्ठ रचना केली. मानवी प्राणी स्वभावत: समंजस आणि समाजप्रिय आहे. त्याला शांततेने आणि एकोप्याने जीवन जगण्याची इच्छा असते यावर त्याने भर दिला. मानवाच्या चंचल स्वभावामुळे मानवी समाज परिपूर्ण 'ऐक्य आणि एकोपा' प्राप्त करील असे त्याला वाटले नाही. परंतू त्याने या ध्येयाच्या आदर्शाची रचना केली.

१७ व्या शतकाच्या प्रारंभी ग्रॉशियसने प्रत्येक व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांच्या आधुनिक कल्पनेची ओळख करून दिली. ग्रॉशियसच्या मते, ''स्वत:चा जीव वाचविण्याच्या उद्देशाने प्रत्येकास स्वाभाविक हक्क असतात. लोक आपल्या स्वत:च्या अधिकारक्षेत्रामध्ये आत्माधीन आहेत. मानवास मनुष्यप्राणी म्हणून काही हक्क प्राप्त झालेले आहेत. म्हणून प्रत्येकाने हे मान्य केले पाहिजे की, प्रत्येक व्यक्ती स्वत:चे जीवन वाचविण्यासाठी प्रयत्न करण्यास हक्कदार आहे.

**२) थॉमस हॉब्ज :**

थॉमस हॉब्ज हा पहिला आधुनिक तत्त्ववेत्ता होता. हॉब्जने मानवी हक्कांसाठी युक्तीवाद केला. परंतु हा युक्तीवाद त्याने अतिशय मर्यादित संज्ञेमध्ये केला. हॉब्जच्या मते, मानवी हक्क म्हणजे व्यक्तीच्या

जीविताच्या विशेष सुरक्षितता होय. त्यांच्या मते, हा हक्क अन्य कोणत्याही हक्कांपेक्षा मूलभूत स्वरूपाचा आहे. हॉब्जने राज्याचे अधिकार परिपूर्ण करणाऱ्या आणि केंद्रीभूत करणाऱ्या कल्पना स्वाधीन केलेल्या होत्या. हॉब्जने जरी आपल्या सिद्धांतामध्ये अधिकारयुक्त राज्य सुचविलेले होते. तरी काही मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी, म्हणजेच आपल्या स्व-हितासाठी प्रत्येकाने राज्याची निर्मिती केलेली असते. ही कल्पना मानवी हक्कांच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण आणि क्रांतीकारक होती.

**३) जॉन लॉक (१६३२-१७०४) :**

जॉन लॉक हा आणखी एक महत्त्वाचा ब्रिटीश तत्वज्ञ होऊन गेला. त्याने सामाजिक करार सिद्धांताचा विस्तार केला. जॉन लॉकने त्याच्या नागरी शासनावरील दोन प्रबंधामध्ये स्वयं-शासन आणि सामाजिक करार सिद्धांताचा विकास केलेला आहे. त्याच्यामते मनुष्यप्राणी हा मुळात मुक्त समान आणि स्वतंत्र आहे. म्हणून शांतता सदिच्छा आणि परस्परसहकार्य या स्वाभाविक स्थितीच्या अटी होत्या. लॉकच्या मते जीवन, स्वातंत्र्य आणि मालमत्ता यांचे हक्क हे प्रत्येक व्यक्तीचे मुलभूत हक्क आहेत. या हक्कांच्या संरक्षणासाठी प्रत्येक व्यक्तीने परस्परांमध्ये करार केला आणि त्यातूनच राज्याची निर्मिती झाली. म्हणून कोणत्याही व्यक्तीस त्याच्या स्वत:च्या संमतीशिवाय त्याच्या स्वत:च्या संपत्तीतून कोणीही बाहेर काढू शकत नाही, परंतु हे अन्य राजकीय शक्तीवर अवलंबून आहे. स्वयंशासन आणि सामाजिक करारावरील लॉकचा सिद्धांत तत्त्वज्ञानविषयक पाया बनला.

जॉन लॉकने प्रत्येक व्यक्तीस केंद्रस्थानी ठेवले आणि त्याला नैसर्गिक हक्क दिले. त्यामध्ये खाजगी मालमत्तेच्या हक्कास प्रमुख प्राधान्य देण्यात आले. कोणत्याही व्यक्तीने अन्य व्यक्तींच्या जीवन, आरोग्य, स्वतंत्रता किंवा कब्जा यामध्ये ढवळाढवळ करता कामा नये. अशा प्रकारे व्यक्तीगत नैसर्गिक अधिकारांव्यतिरिक्त स्वाभाविक कायद्याच्या पाठींब्यावर प्रत्येक व्यक्तीचे आचरण व्यक्त किंवा कायदेशीर कारणासंबंधी, अंमलबजावणी करण्यासंबधी अणि निर्णय देण्यासंबंधी त्याच्यावर आणि संस्थेवर नियम करण्याची मिळविलेली संमती हे लॉकने दिलेले महत्त्वपूर्ण योगदान होते. या कल्पना आधुनिक लोकशाही सरकारच्या आणि हक्कांच्या मूलभूत कल्पना बनलेल्या आहेत.

**४) जीन जॅक रुसो (१७१२-१७७८)**

रुसो हा एक फ्रेंच तत्त्वज्ञ होता. त्याने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संकल्पनांना महत्त्व दिले. रुसोने सामान्यपणे समाजाच्या आणि प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. त्याने स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की, प्रत्येक व्यक्तीस त्याच्या अस्तित्वासाठी ज्या गोष्टींची गरज असते, अशा सर्व गोष्टी मिळविण्याचा नैसर्गिक हक्क आहे. रुसोने आपल्या सामाजिक करार किंवा राजकीय अधिकारांची तत्त्वे या दोन प्रभावी प्रबंधांमध्ये लोकमान्य, सार्वभौमत्वाच्या संकल्पनांवर आधारित करार सिद्धांताच्या विविध बाजूंची रुपरेषा आखली. त्याने लोकमान्य सार्वभौमत्वाची अविभाज्य आणि नैसर्गिक सार्वभौमत अशी व्याख्या केली. रुसोच्या सिद्धांताचे व्यक्तीगत लॉकवादी उदारमतवादी परंपरांशी बरेचसे साम्य आहे. परंतु त्यामध्ये बऱ्याचशा

महत्त्वाच्या मुद्यांचे उल्लंघन झालेले आहे. त्याच्या लोकमान्य सार्वभौमत्त्वाच्या सिद्धांतामध्ये 'सामान्य इच्छे'चा समावेश आहे. ही संकल्पना काही अंशी व्यक्तीपेक्षा सामुदयिक आहे. असे वाटते की, त्याच्या वैयक्तिक हितामुळे सामुदायिक हितांची पायमल्ली होईल.

रुसो हा संभवत: पहिला मुख्य पाश्चात्य तत्त्वज्ञानी होता. ज्याने असे ठासून सांगितले की, अस्तित्व राखण्यासाठी आवश्यक असणाऱ्या किमान सर्व गोष्टींची हमी देणे ही समाजाची सामुदायिक जबाबदारी आहे. त्याच्या मते लोकमान्य सार्वभौमत्वातून प्राप्त झालेले सर्व नागरी अधिकार नैसर्गिक अधिकार आहेत. रुसोच्या मते, कायदे आणि अधिकार 'सामान्य इच्छेतून' जन्म घेतात. शासनाचा कायदा केवळ सामान्य इच्छा व्यक्त करतो. सर्वसामान्य इच्छा ही नेहमीच बरोबर असते आणि संपूर्ण समाजासाठी कल्याणकारी असते. त्याच्या सिद्धांताचा १७८९ च्या फ्रेच राज्यक्रांतीवर आणि त्यानंतर समाजवादी चळवळीच्या निर्मितीवर प्रभाव पडतो. या सिद्धांतास 'स्वभावाची स्थिती' किंवा 'नैसर्गिक स्थिती' अशी संज्ञा दिलेली आहे. विविध मार्गानी या सिद्धांताने असे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे की, सामाजिक संरचनेची निर्मिती करून तजवीज केलेल्या लाभाची प्राप्ती करून घेणे, त्या उद्देशाने स्वाभाविक स्थितीनुसार कृती करणे आणि प्रत्येकाने आपले स्वातंत्र्य स्वेच्छेने मिळविणे, यामुळे प्रत्येक व्यक्तीचे स्वहित साधले जाऊ शकते. म्हणून सामाजिक करार सिद्धांतानी केवळ नैसर्गिक अधिकारावर आणि वैयक्तिक संमतीवर आधारलेल्या लोकशाही संस्थेच्या संकल्पना प्रस्थापित केलेल्या आहेत. असे नाही तर त्यांनी हक्कांसाठी परसपरांचा आदर राखण्याच्या गरजेला देखील महत्त्व दिलेले आहे.

**५) मॉन्टेस्क्यु (१६८९-१७५५) :**

मॉन्टेस्क्यू हा प्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ होता. त्याच्या स्वातंत्र्याच्या संस्थेविषयक लिखाणातील तत्त्वासाठी तो प्रसिद्ध आहे. 'मुक्तीवाद्यांची वैशिष्ट्ये' मध्ये त्याने नैसर्गिक कायद्याच्या तत्त्वासह आणि कांही अंशी नैसर्गिक हक्कांच्या अविकसित तत्त्वासह स्वातंत्र्याच्या दृष्टीकोनास पाठींबा दिलेला आहे. मॉन्टेस्क्युचा स्वाभाविक कायदा आणि हक्कांवर विश्वास आहे. मनुष्यप्राण्याने वैश्विक नैसर्गिक कायदे जाणून घेतले पाहिजे आणि या कायद्याचे अनुसरण केले पाहिजे.

मॉन्टेस्क्युने आनंदाचा पाया म्हणून स्वातंत्र्याकडे पाहिले. त्याला विश्वास होता की, राजकीय स्वातंत्र्य हे व्यक्ती, संस्था आणि सामाजिक वर्ग यांच्यातील सत्ता विभाजनावर अवलंबून आहे. संस्थात्मक पातळीवर सुद्धा व्यक्तीगत स्वातंत्र्याची हमी मिळविण्यासाठी वैधानिक, कार्यकारी आणि न्यायिक प्रक्रियेमध्ये सत्तेचे विभाजन होणे आवश्यक आहे. यावर त्याने भर दिला.

पाश्चात्य देशांमध्ये मानवी जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने अनेक क्रांत्या झाल्या. अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध, फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांती असे बदल घडवून आणणाऱ्या घटना घडत होत्या. विशेषत: फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी फ्रान्समध्ये असलेली अनियंत्रित राजेशाहीमुळे तेथील लोकांनी एकत्र येऊन समांतरशाहीचा पाडाव केला. लोकशक्तीचा असा अविष्कार जगाच्या इतिहासात पहिल्यांदाच

झाला. आज जगभर अनेक राष्ट्रांनी जी लोकशाही शासनपद्धती स्वीकारलेली दिसते, तिचा प्रसार या राज्यक्रांतीपासून झाला.

फ्रान्समधील राज्यकर्ते विलासी बनले होते. बाहेरच्या जगातील घडामोडीकडे त्यांचे लक्ष नव्हते. प्रजेच्या कल्याणासाठी ते काहीही करत नव्हते. आर्थिक, दिवाळखोरी माजली होती. त्यामुळे जनतेची राजाविषयची निष्ठा कमी होऊ लागली.

या काळात फ्रान्समध्ये सामाजिक विषमता तीव्र झाली होती. फ्रेंच समाजात तीन वर्ग होते. पहिला वर्ग वरिष्ठ धर्मगुरुंचा व दूसरा वर्ग अमीर उमरावांचा होता. या दोन वर्गाचे संख्याबल फ्रान्सच्या लोकसंख्येत नगण्य होते. पण देशाच्या जमिनीपैकी सुमारे ऐंशी टक्के जमीन त्याच्या मालकीची होती. याशिवाय त्यांना अनेक सवलती असत. हे वर्ग ऐषारामी जीवन जगत होते. तिसऱ्या वर्गात व्यापारी, वकील, डॉक्टर, शिक्षक, शेतकरी, कामकरी, भूदास इत्यादींचा समावेश होता. त्या वर्गातील लोकांचे उत्पन्न कमी असूनही कराचा सर्व बोजा त्यांच्यावरच होता. वरिष्ठ वर्ग व सामान्य लोक यांच्यात मोठी सामाजिक व आर्थिक विषमता निर्माण झालेली होती. या विषमतेला सुरुंग लावण्याचे काम तिसऱ्या वर्गाने केले.

फ्रान्समध्ये मॉन्टेस्क्यू व रुसो या विचारवंतांनी नवे विचार मांडले. कायदेमंडळ कार्यकारीमंडळ आणि न्याय मंडळ हे शासनयंत्रणेचे घटक एकमेकांपासून स्वतंत्र असावेत. हा सत्ताविभाजनाचा सिद्धांत मॉन्टेस्क्यूने मांडला. रुसोने 'सामाजिक करार' या ग्रंथातून जनतेच्या सार्वभौमत्वाचा सिद्धांत मांडला. मानव हा जन्मत: स्वतंत्र असतो. समाजाचा गाडा सुरळीत चालावा म्हणून जनता स्वत:वर काही बंधने लादून घेते. यांच्या अंमल बजावणीसाठी राज्य व्यवस्था निर्माण करते. ती ईश्वरदत्त नसून एका सामाजिक करारातून निर्माण झालेली असते. जर राज्यसंस्थेने कराराचा भंग केला तर ती राज्यव्यवस्था उलथून टाकण्याचा नैसर्गिक व नैतिक अधिकार समाजाला असतो. त्याच्या या विचारांमुळे रुसो हा फ्रेंच राज्यक्रांतीचा उद्‌गाता मानला जातो. फ्रान्स मधील विचारवंतांनी व्यक्तीस्वातंत्र्याला महत्त्व दिले. अंध:श्रद्धांना विरोध केला.

**❖ स्वयं-अध्ययनासाठी काही प्रश्न -२**

**अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१) इंग्लंडचे राजे जॉन यांनी ................ रोजी मॅग्ना कार्टा लागू केले.

अ) १५ जून १२१५ ब) १५ जून १२१७ क) १५ जून १२१९ ड) १५ जून १२२१

२) रोमन कायदा पद्धतीमध्ये .............. यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

अ) ॲरिस्टॉटल ब) सिसेरो क) ग्रॉशियस ड) हॉब्ज

३) रुसो यांने मानवी हक्कासाठी .............. याला महत्त्व दिले.

अ) शाश्वत शांतता ब) समान आदर क) सामाजिक करार ड) स्वयं-शासन

४) फ्रेंच राज्यक्रांतीचा ........... हा उद्गाता मानला जातो.

अ) रुसो ब) मॉन्टेस्क्यु क) हॉब्ज ड) लॉक

५) मॉन्टेस्क्युने आनंदाचा पाया म्हणून ............. कडे पाहिले आहे.

अ) अधिकारांकडे ब) स्वातंत्र्याकडे क) हक्कांकडे ड) व्यक्तींकडे

**ब) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

१) मानव प्राणी स्वभावत: समंजस आणि समाजप्रिय आहे. असे ह्युगो ग्रॉशियस ने सांगितले.

२) थॉमस हॉब्ज हा १५ व्या शतकातील तत्त्ववेत्ता होता.

३) लॉकच्या मते जीवन, स्वातंत्र्य आणि मालमत्ता यांचे हक्क हे प्रत्येक व्यक्तीचे मूलभूत हक्क आहेत.

४) रुसोच्या मते मानवी हक्कांमध्ये वैयक्तिक हक्क महत्त्वाचे असतात.

५) मनुष्य प्राण्याने वैश्विक नैसर्गिक कायदे जाणून घेतले पाहिजे आणि या कायद्याचे अनुसरण केले पाहिजे.

**क) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) ग्रीक आणि रोमन हक्कांविषयक संकल्पनांचे स्वरूप स्पष्ट करा.

२) रुसोचा सामाजिक करार सिद्धांत यावर चर्चा करा.

३) हक्कंच्या उत्क्रांतीमधील मॅग्ना कार्टाचे महत्त्व विशद करा.

**❖ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न २ ची उत्तरे.**

**अ)** १) १५ जून १२१५ २) सिसेरो ३) सामाजिक करार ४) मॉन्टेस्क्यु ५) स्वातंत्र्य

**ब)** १) बरोबर २) चूक ३) बरोबर ४) चूक ५) बरोबर.

## १.२.३ मानवी अधिकारातील हक्क व कर्तव्ये :

व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासासाठी हक्कांची आवश्यकता असते. काही मूलभूत हक्क नसतील तर कोणतीही व्यक्ती आपली प्रगती करू शकणार नाही. भारतीय राज्यघटनेने व्यक्तीच्या प्रगतीसाठी काही मूलभूत हक्क प्रदान केले आहेत.

### ❖ हक्क – अर्थ व स्वरूप :

हक्क म्हणजे आपल्या विकासासाठी आपण केलेल्या मागण्या असतात. या मागण्यांना जेव्हा समाज व राज्याची मान्यता मिळते तेव्हा त्याचे हक्कांत रूपांतर होते.

प्रा. हेरॉल्ड लास्की यांच्या मते, ''हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती की, ज्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला स्वत:ची जास्तीत जास्त प्रगती घडवून आणता येत नाही.

समाजाचा एक सन्माननीय सदस्य या नात्याने व्यक्तीला हक्क प्राप्त होतात. परंतु हक्क अनिर्बंध नसतात. सार्वजनिक हितासाठी व्यक्तीच्या हक्कांवर बंधने असावी लागतात. समाज बदलतो तसे हक्कांचे स्वरूप ही बदलते. लोक नवनवीन मागण्या करू लागतात व त्यातून नवे हक्क अस्तित्वात येतात. उदा. प्रशासनात पारदर्शकता आणावी या स्वरूपाच्या मागणीतून माहितीच्या हक्कांची निर्मिती झाली आहे. भारतीयांना 'माहितीचा हक्क' मिळाला आहे.

व्यक्तीच्या विकासाव्यतिरिक्त हक्कांमुळे इतरही अनेक उद्दिष्टे साध्य होतात. हक्कांमुळे सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना विकासाची संधी मिळते. सर्वप्रकारच्या अल्पसंख्यांकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होते.

**❖ भारतीय राज्यघटनेतील हक्कविषयक तरतुदी :**

१) समतेचा हक्क

२) स्वातंत्र्याचा हक्क

३) शोषणाविरुद्धचा हक्क

४) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क

५) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क

६) घटनात्मक उपाययोजनांचा हक्क

भारताच्या राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात नागरिकांच्या मूलभूत हक्कांविषयी तरतुदी आहेत. या हक्कांचे सविस्तर स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) समतेचा हक्क :**

सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करणे हे या हक्काचे उद्दिष्ट आहे. समतेच्या हक्कानुसार धर्म, वंश, जात, लिंग व जन्मस्थान, प्रदेश इत्यादी कारणांवरून राज्याला नागरिकांमध्ये भेद करता येत नाही. कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान असतात. रोजगाराच्या संधी सर्वांना समान रितीने उपलब्ध करून दिल्या जातात. अस्पृश्यता कायद्याने नष्ट करण्यात आली आहे. या अनिष्ठ रूढीचे पालन हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा ठरविण्यात आला आहे. ब्रिटीश राजवटीत विषमता निर्माण करणाऱ्या पदव्या व त्याबरोबर काही सवलती दिल्या जात असत. ही प्रथा नष्ट करण्यात आली आहे. व्यक्तींमध्ये भेद करणाऱ्या पदव्या सरकार देत नाही.

**२) स्वातंत्र्याचा हक्क :**

सर्वांगीण व्यक्ती विकासासाठी आवश्यक अशा सहा स्वातंत्र्यांचा समावेश या हक्कांत होतो. ते हक्क पुढीलप्रमाणे –

१) भाषण व विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य.

२) नि:शस्त्र व शांततापूर्वक एकत्र येण्याचे स्वातंत्र्य.

३) संस्था आणि संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य.

४) भारताच्या कोणत्याही प्रदेशात मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य.

५) भारताच्या कोणत्याही प्रदेशात वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य.

६) कोणताही व्यवसाय, उद्योग किंवा व्यापार करण्याचे स्वातंत्र्य.

याच हक्कातील तरतुदीनुसार प्रत्येक व्यक्तीला जीविताचा आणि व्यक्तीगत स्वातंत्र्याचा हक्क आहे. त्यानुसार कोणत्याही व्यक्तीचे जीवित आणि तिचे व्यक्तीगत स्वातंत्र्य कायद्याने केलेल्या तरतुदीशिवाय हिरावून घेता येत नाही. कोणत्याही व्यक्तीला विनाकारण अटक करून तुरुंगात डांबता येत नाही. स्वातंत्र्याच्या हक्काविषयी असणाऱ्या या तरतुदींमध्ये एक नव्या हक्काची अलिकडेच भर घालाण्यात आली आहे. त्यानुसार 'शिक्षणाचा हक्क' आणखीन हक्क म्हणजे 'आरोग्याचा हक्क' हा नागरिकांचा मुलभूत हक्क मानण्यात आला आहे. सहा ते चौदा वयोगटातील बालकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्यासाठी राज्यांने प्रयत्न करावेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

**३) शोषणाविरुद्धचा हक्क :**

या हक्कानुसार माणसांची खरेदी विक्री करण्याला तसेच त्यांना वेठबिगारी आणि सक्तीची मजूरी करायला लावण्याऱ्या प्रथांना कायद्याने बंदी केली आहे. चौदा वर्षाखाली मुला मुलींना धोक्याच्या ठिकाणी अथवा कारखान्यात किंवा खाणीत काम करावयास भाग पाडणे यास प्रतिबंध करण्यात आला आहे. कौटुंबिक स्तरावर स्त्रियांचे शोषण थांबविण्याच्या दृष्टिने स्त्रियांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण करणारा कायदा शासनाने २००५ साली मंजूर केला. सर्वांनाच सन्मानाने जगता यावे या दृष्टीने ही तरतूद महत्त्वाची आहे.

**४) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क :**

भारत हे एक धर्मनिरपेक्ष राज्य आहे. या देशात अनेक धर्म आहेत. परंतु कोणत्याही एका धर्माला राज्याचा धर्म मानले जात नाही. सर्व धर्मांना समान मानले जाते. नागरिकांना आपल्या बुद्धीला पटेल त्या धर्माचा अवलंब करण्याचे स्वातंत्र्य आहे. धार्मिक बाबतीत राज्य हस्तक्षेप करीत नाही.

**५) सांस्कृतिक व शैक्षणिक घटक :**

भारतात विविध भाषा व संस्कृती असणारे लोक राहतात. आपल्या भाषेचे व संस्कृतीचे जतन करावे, तिचा विकास व्हावा असे सर्वांना वाटते. म्हणूनच नागरिकांना सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क देण्यात आले आहेत. त्यानुसार लोकांना आपली वैशिष्ट्यपूर्ण भाषा व संस्कृती जोपासण्याचा व त्यासाठी शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

**६) घटनात्मक उपाययोजनांचा हक्क :**

नागरिकांच्या मुलभूत हक्कांवर अतिक्रमण होऊ नये व हक्कांपासून त्यांना वंचित करण्यता येऊ नये म्हणून घटनात्मक उपाययोजनांचा हक्क देण्यात आला आहे. या हक्कांमुळे मुलभूत हक्कांवरील अतिक्रमण न्यायालयाकडे दाद मागून दूर करता येते. मूलभूत हक्कांचा भंग करणाऱ्या कोणत्याही कृतीविरुद्ध न्यायालयात जाण्याचा अधिकार प्राप्त होतो.

## ❖ मानवी हक्कांची सनद :

१० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रे या संघटनेने 'मानवी हक्कांची सनद' स्विकारली. राज्य घटनेत मूलभूत हक्कांविषयक तरतुदींचा समावेश करताना भारताच्या घटना समितीने मानवी हक्कांची सनद विचारात घेतली. या सनदेत मानवी हक्कांचा उल्लेख करण्यात आला आहे. मानवी हक्कांच्या सनदेनुसार प्रत्येक व्यक्ती जन्म:ता स्वतंत्र असते. प्रतिष्ठा व हक्क याबाबत सर्व व्यक्ती समान असतात. प्रत्येक व्यक्तीला जीविताचा, स्वातंत्र्याचा आणि सुरक्षिततेचा अधिकार असतो. मानवी हक्क व्यक्तीला जन्मत: प्राप्त होतात. म्हणूनच ते नाकारण्याचा अधिकार कोणाला नसतो. शासनाने या हक्कांना संरक्षण द्यावे, तसेच संयुक्त राष्ट्रांच्या मदतीने मानवी हक्कांविषयीचा आदर वृद्धींगत करावा, असेही मानवी हक्क सनदेत नमूद करण्यात आले आहे.

मानवी हक्कांच्या सनदेतील विविध हक्कांचा स्वीकार जगातील सर्व राष्ट्रांनी करावा असा संयुक्त राष्ट्रांचा आग्रह आहे. मानवी हक्कांबाबत जागरूकता वाढावी म्हणून १० डिसेंबर हा दिवस संपूर्ण जगभर ''मानवी हक्क दिन'' म्हणून साजरा केला जातो.

## ❖ भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्ये :

समाजाचा घटक या नात्याने व्यक्तीला जसे हक्क प्राप्त होतात. त्याचप्रमाणे त्या व्यक्तीने समाजासाठी काही जबाबदाऱ्या पार पाडणे ही अपेक्षित असते. लोकशाहीत लोकांनी केवळ हक्कांचीच मागणी करू नये, तर कर्तव्यांबाबतही त्यांनी दक्ष असावे लागते. भारतीयांमध्ये कर्तव्यांची जाणीव निर्माण व्हावी म्हणून राज्यघटनेने नागरिकांची काही मूलभूत कर्तव्ये स्पष्ट केली आहेत. ती पुढीलप्रमाणे -

१) राज्यघटना, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व राष्ट्रचिन्हांचा आदर करणे.

२) आपल्या स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणाऱ्या अहिंसा, लोकशाही व धर्मनिरपेक्षता या मूल्यांचा अवलंब करणे.

३) भारताचे सार्वभौमत्व, एकता व एकात्मता यांचे रक्षण करणे.

४) राष्ट्रांचे संरक्षण करणे व राष्ट्रांच्या सेवेस सदैव सज्ज असणे.

५) सर्व भारतीयांमध्ये बंधूभाव वाढीस लावणे आणि स्त्रियांच्या प्रतिष्ठेआड येणाऱ्या चालीरितींचा त्याग करणे.

६) आपल्या संमिश्र व बहुविध संस्कृतीचा समृद्ध वारसा जतन करणे.

७) पर्यावरण, जंगले, नद्या व वन्य जीवन यांचे संरक्षण व संवर्धन करणे.

८) वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद शोधक बुद्धी आणि सुधारणा यांना प्रोत्साहन देणे.

९) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

१०) व्यक्तीगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात श्रेष्ठत्व किंवा उच्च गुणवत्ता मिळविण्यासाठी परिश्रम करणे व देश प्रगतिपथावर नेणे.

११) सहा ते चौदा वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे.

❖ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**अ) प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) हक्क म्हणजे काय ?

२) हक्क का आवश्यक असतात ?

३) भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या प्रकरणांत मूलभूत हक्कांची नोंद आहे?

**२) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

१) १० डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन म्हणून साजरा केला जातो.

२) हक्कांवर मर्यादा नसतात.

३) भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य आहे.

❖ **स्वयं अध्यन प्रश्नांची उत्तरे**

**अ)** १) हक्क म्हणजे आपल्या विकासासाठी अपाण केलेल्या मागण्या असतात. या मागण्यांना जेव्हा समाज व राज्याची मान्यता मिळते तेव्हा त्यांचे हक्कांत रुपांतर होते.

२) व्यक्तींच्या व्यक्तीमत्व विकासासाठी हक्कांची आवश्यकता असते.

३) भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या प्रकरणांत मूलभूत हक्कांची नोंद आहे.

**ब)** १) बरोबर, २) चूक, ३) बरोबर.

### १.२.४ हक्कांचे सिद्धांत :

१) नैसर्गिक हक्क सिद्धांत

२) उदारमतवादी सिद्धांत

३) मार्क्सवादी सिद्धांत

४) समाजशास्त्रीय सिद्धांत

मानवी संस्कृतीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर मानवास जगण्याकरिता आवश्यक असणाऱ्या हक्कांसाठी निरनिराळ्या संज्ञा वापरल्या आहेत. उदा. नैसर्गिक हक्क, प्राथमिक हक्क, मूलभूत हक्क, मानवी हक्क, नैतिक हक्क, घटनात्मक हक्क अशा काही संज्ञा आहेत. 'मानवी हक्क' हे संबोधन जरी नवीन वाटत असले, तरी त्याची पाळेमुळे नैसर्गिक हक्क या प्राचीन तत्त्वात आढळतात. मानवी हक्क ही संज्ञा अचानक निर्माण झालेली नसून ती अनेक वर्षात विकसित झालेली आहे. मानवी हक्क म्हणजे अनेक पिढ्यांचे योगदान, दुर्दम्य इच्छा आणि अनुभवाचा परिपाक होय.

मानवी हक्कांमध्ये अंतर्भूत होणारे हक्क म्हणजे जगण्याचा हक्क, अन्न, वस्त्र, निवारा, अभिव्यक्ती, स्वातंत्र्य, हिंसेपासून मुक्तता, धार्मिक स्वातंत्र्य इत्यादी हे सर्व हक्क आपले दैनंदिन जीवन जगण्याचाच एक भाग आहेत. स्वतंत्रपणे किंवा समुदायाने जगण्या संबंधीची चर्चा हे हक्क करतात. हे हक्क आपणा सर्वांना प्राप्त झालेले आहेत. मानवी हक्क हे माणसांशी निगडीत असतात. आपले जीवन किमान सुखाने व आनंददायीपणे जगण्याचा आपल्याला नैतिक हक्क आहे.

**१) नैसर्गिक हक्क सिद्धांत :**

मानवी हक्कांच्या अभ्यासकांच्या मते मानवी हक्कांची संकल्पना प्राचीन काळातील ग्रीक नगरराज्याइतकीच जूनी आहे. ग्रीक नगरराज्यांतील काही विचारवंतांनी मानवी हक्कांचा पुरस्कार केला होता. हे आपण या प्रकरणाच्या पहिल्या भागात पाहिले आहे. त्यांनी नैसर्गिक हक्कांसंबंधी काही मूलभूत स्वरूपाचे विचार मांडले होते. त्यांच्या मते हक्क म्हणजे माणवाला निसर्गाकडून मिळालेली देणगी होय. म्हणून हक्क हे निसर्गदत्त आहेत.

स्टॉईक तत्त्ववेत्यांकडून नैसर्गिक हक्कांचा पुरस्कार करण्यात आला. त्यांनी असे प्रतिपादन केले की, प्रत्येक व्यक्तीला मनुष्यप्राणी या नात्याने काही गोष्टी निसर्गत:च प्राप्त झालेल्या असतात. त्या गोष्टी म्हणजे नैसर्गिक हक्क होय. त्यांचे नैसर्गिक हक्कांसंबंधीचे विचार नैसर्गिक कायद्यांवर आधारीत आहेत. स्टॉईक तत्त्ववेत्यांच्या मते नैसर्गिक कायद्यांतून नैसर्गिक हक्कांचा स्वाभाविकरित्या उगम झाला आहे. त्याच्या पुढील काळात रोमन तत्त्ववेत्ता सिसेरी यांनेही नैसर्गिक हक्कांचे समर्थन केले आहे. मानवाला निसर्गत:च असे हक्क लाभले आहेत असे त्यांचे म्हणणे होते.

सामाजिक करार सिद्धांताच्या पुरस्कर्त्यांनी सोळाव्या व सतराव्या शतकात नैसर्गिक हक्कांच्या प्रश्नाला पुन्हा एकदा चालना दिली. थॉमस हॉब्ज, जॉन लॉक व रूसो हे विचारवंत सामाजिक करार सिद्धांताचे प्रमुख पुरस्कर्ते होते. त्यांच्या एकंदर प्रतिपादनाचा थोडक्यात मतितार्थ असा की, राज्य ही कराराद्वारे निर्माण झालेली संस्था आहे. राज्याची निर्मिती ज्या कराराद्वारे झाली त्या कराराला त्यांनी 'सामाजिक करार' असे म्हटले आहे. अशा प्रकारचा सामाजिक करार होण्यापूर्वी राज्य अस्तित्वात नव्हते. त्या अवस्थेला त्यांनी 'नैसर्गावस्था' असे संबोधले आहे. ही निसर्गावस्था कशी होती याविषयी हॉब्ज, जॉन लॉक व रुसो यांनी वेगवेगळी मते मांडली होती. परंतु निसर्गावस्थेतील मानवाला काही हक्क लाभले होते या विषयी त्यांच्यात एकमत आहे. या हक्कांनाच त्यांनी 'नैसर्गिक हक्क' असे म्हटले आहे.

❖ **नैसर्गिक हक्क सिद्धांत :**

हक्क विषयक सिद्धांतापैकी एक महत्त्वाचा सिद्धांत म्हणून नैसर्गिक हक्क सिद्धांताकडे पाहिले जाते. या सिद्धांतासंबंधी स्पष्टीकरण करताना नैसर्गिक हक्क सिद्धांताचे पुरस्कर्ते असे सांगतात की, हक्क म्हणजे मानवाला निसर्गाकडून मिळालेली देणगी होय. हक्क हे निसर्गदत्त असल्याने ते मानवापासून हिरावून घेतले जाऊ शकत नाहीत. मनुष्यप्राणी या नात्यानेच प्रत्येक मानवाला हक्कांचाही लाभ झाला आहे. म्हणून हक्क मानवाच्या व्यक्तीमत्त्वाचे व जीवनाचे अविभाज्य भाग आहेत. तसेच हक्क सर्व व्यक्तींना समतेने लाभले आहते. त्यामुळे हक्कांच्या बाबतीत व्यक्ती व्यक्तीमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव संभवत नाही.

मानवी हक्कांना नैसर्गिक हक्कांचे आधुनिक रूप मानले जाते. याच नैसर्गिक अधिकारांना दैवी अधिकार म्हणूनही ओळखले जाते. या अधिकारांची निर्मिती समाज आणि राज्याच्या निर्मितीपूर्वी झाली होती. असे मानले जात असले तरी व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले अधिकार हे कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. हेही आपण यापूर्वी केलेल्या विवेचनात पाहिले आहे. नैसर्गिक अधिकार व्यक्तीला जगण्यासाठी व त्याच्या व्यक्तीमत्त्व विकासासाठी आवश्यक आहेत. नैसर्गिक अधिकारांशिवाय व्यक्तीच्या अस्तित्वाची कल्पना करणे अशक्य आहे. जॉन लॉक यासारख्या विचारवंतांनी नैसर्गिक अधिकारांना समाज व राज्य निर्मितीचा आधार मानले आहे. पुढे अठराव्या आणि एकोणीसाव्या शतकामध्ये या नैसर्गिक अधिकारांना अनेक राज्यांच्या राज्यघटनेमध्ये स्थान प्राप्त झाले. आणि त्याच्या संरक्षणाची जबाबदारी शासनावर टाकण्यात आली. अशाप्रकारे नैसर्गिक अधिकारांना कायदेशीर अधिकारांचे रूप प्राप्त होऊन ते घटनात्मक अधिकार म्हणून ओळखले जातात. याच घटनात्मक अधिकारांना नागरी स्वातंत्र्य म्हणूनही ओळखले जाते.

माणसे परस्परांपासून भिन्न असतात. परंतू मानवी हक्कांच्या संकल्पनेनुसार मनुष्य कुठल्याही धर्म, जात, जमात, वर्ण, लिंग, भाषा, वंश व जन्मस्थळाचा असला तरी तो कायद्यासमोर समान मानला जातो. जगण्याचा हक्क हा नैसर्गिक हक्क आहे, मात्र सन्मानपूर्वक जीवन जगणे हा मूलभूत हक्क आहे. प्रत्येक व्यक्तीला सन्मानपूर्वक जीवन जगण्याची हमी देण्याच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संघटनांच्या उद्दिष्ट्यांमधून मानवी हक्कांची संख्या व व्याप्ती यात सातत्याने वाढ होत आहे.

**२) उदारमतवादी सिद्धांत :**

उदारमतवाद हे स्वातंत्र्य आणि समता ह्यांवर आधारीत एक राजकीय तत्त्वज्ञान किंवा जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन आहे. उदारमतवादी लोक ह्या तत्त्वांचा आपआपल्या आकलन क्षमतेनुसार याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतात. पण सर्व सामान्यपणे ते मुक्त आणि प्रामाणिक निवडणूका, नागरी अधिकार, प्रसार माध्यमांचे स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य, मुक्त व्यापार आणि खाजगी मालमत्ता ह्या सारख्या विचारांचे समर्थन करतात.

समाजाच्या किंवा राज्याच्या कोणत्याही नागरीकाला किंवा सर्वसामान्य व्यक्तीना त्यांच्या वैयक्तिक पातळीवर स्वातंत्र्याचा हक्क मिळाला पाहिजे व त्याकरिता राज्य व सार्वजनिक संस्थांचे धोरण व व्यवहार

व्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्काला बाधा येणार नाही अशा पद्धतीने स्वातंत्र्याच्या हक्कांची अंमलबजावणी झाली पाहिजे असा दृष्टीकोन म्हणजे उदारमतवाद होय.

स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुत्व आणि आत्मसन्मान या पाच मूलभूत तत्त्वांपैकी मानवाधिकार आवश्यक आहे. व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा विकास मानवाधिकारांच्या रक्षणावर अवलंबून आहे. व्यक्ती विकासातून समाजविकास आणि समाजविकासातून राष्ट्रविकास शक्य असल्यामुळे कोणत्याही राष्ट्राचा विकास हा देखील त्या राष्ट्रातील लोकांच्या मानवाधिकार रक्षणावर आधारलला आहे. मानवाधिकार हे व्यक्तीला समाज किंवा राज्याने बहल केलेले नाहीत. ते व्यक्तीला जन्मापासून निसर्गाकडून प्राप्त झालेले आहेत. या अधिकारांचे अस्तित्व राज्यांकडून प्राप्त होणाऱ्या संरक्षणावर अवलंबून आहेत. मानवाधिकारांना संरक्षण देणे हे प्रत्येक राज्याचे मूलभूत कर्तव्य आहे.

मानवाधिकारांच्या रक्षणाची जाणीव वैश्विक बनली असून विविध विभागीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था, संघटना या अधिकारांच्या रक्षणासाठी त्याच्या प्रसारासाठी त्या विषयी जागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटनेमध्ये मानवाधिकारांच्या रक्षणाच्या उद्दिष्टाला प्राधान्य देण्यात आले आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी आणि महायुद्धा दरम्यान मानवाधिकारांच्या उल्लंघनाच्या असंख्य घटना घडल्या होत्या. जर्मनीमध्ये लष्करी हुकूमशहा ॲडॉल्फ हिटलर यांच्याकडून लक्षावधी निरपराध लोकांच्या ज्या हत्या झाल्या त्या हत्या मन हेलावून टाकणाऱ्या होत्या. मानवाधिकारांचे अशा प्रकारे उल्लंघन जगाच्या इतिहासात दुसरीकडे सापडणार नाही. हे हत्याकांड जरी जर्मनीच्या आत घडले होते. तरी त्याचे पडसाद आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटले. कोणत्याही राष्ट्राचा नागरिक हा नागरिक होण्यापूर्वी एक व्यक्ती आहे आणि व्यक्ती या नात्याने त्याला जन्मापासून काही मूलभूत अधिकार निसर्गाने दिले आहेत.

हिटलर कडून ज्यू लोकांच्या जगण्याच्या अधिकारांचे उल्लंघन झाले. त्याच बरोबर महायुद्धा दरम्यान देखील हजारो निष्पाप नागरिक मारले गेले. या सर्व घटनांचा परिणाम असा झाला की, मानवाधिकांच्या उल्लंघनाविरुद्ध आंतरराष्ट्रीय जनमत तयार व्हायला लागले. असे उल्लंघन थांबायला हवे, यासाठी एक विशेष मानवाधिकार कायदा केला जावा अशी मागणी जोर धरू लागली. महायुद्ध चालू असतानाच सन १९४१ साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष फ्रॅंकलिन रुझवेल्ट यांनी चार मूलभूत हक्कांची आणि स्वातंत्र्याची घोषणा केली. त्यांनी मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायास आवाहन केले. राष्ट्राध्यक्ष रुझवेल्टने खालील चार मूलभूत स्वातंत्र्य घोषित केले.

१) अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क.

२) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क

३) भूकेपासून मुक्ततेचा हक्क

४) भीतीपासून मुक्ततेचा हक्क

आपले जीवन गौरवपूर्ण आणि प्रतिष्ठापूर्वक व्यतीत करण्यासाठी हे चार हक्क प्रत्येक व्यक्तीचे मूलभूत हक्क आहेत. राष्ट्राध्यक्ष रुझवेल्टने या हक्कांची घोषणा केल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याचा प्रसार झाला आणि या हक्कांबद्दल आदरभाव निर्माण झाला. अशा सर्व पार्श्वभूमीवर आपण जेव्हा उदारमतवादी दृष्टिकोनातून मानवाधिकारांचा विचार करतो तेव्हा असे आढळून येते की, संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना ही दोन उद्दिष्टांसाठी करण्यात आली. एक म्हणजे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविणे आणि दूसरे म्हणजे मानवाधिकारांचे संरक्षण करणे, त्याचे उल्लंघन करणाऱ्या राष्ट्रांविरुद्ध योग्य ती कारवाई करणे. व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्त्वाच्या जपणूकीसाठी, व्यक्तीमत्त्वाच्या विकासासाठी काही मूलभूत अधिकार असायला पाहिजे आणि अशा अधिकारांच्या संरक्षणाची हमी प्रत्येक राज्याच्या राज्यघटनेने द्यायला पाहिजे.

उदारमतवाद हे स्वातंत्र्य आणि समता ह्यांवर आधारित राजकीय तत्त्वज्ञान किंवा जगाकडे पाहण्याचा एक दृष्टीकोन आहे. समाजाच्या किंवा राज्याच्या कोणत्याही नागरिकाला व्यक्तीश: स्वातंत्र्याचा हक्क मिळाला पाहिजे व त्याकरीता राज्य व सार्वजनिक संस्था यांचे धोरण व व्यवहार व्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्काला बाधा येणार नाहीत. अशा पद्धतीने व धोरणाने चालले पाहिजे. असा दृष्टीकोन म्हणजे उदारमतवाद होय. व्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीच्या अनिर्बंध अविष्कार हे मुख्य मुल्य उदारमतवादात मानले जाते. स्वत:स व समाजास उपयुक्त असेल असा आत्माविष्कार करण्याची पात्रता माणसात असते. ज्या संस्था व राजकीय धोरणे अशा आत्मविष्काराचे व स्वातंत्र्यावरील निष्ठेचे संवर्धन करतात. त्याची स्थापना किंवा पुरस्कार म्हणजे प्रोत्साहन देतात हे योग्यच आहे हा उदारमतवादाचा आशय आहे.

ह्या आशयास अनुसरून उदारमतवादी विचारसरणी व व्यवहार पुढील दोन मूलभूत गोष्टींवर भर देतात. १) स्वेच्छा तंत्र सत्ताधारीत्वाची नापसंती व २) व्यक्तींचा अनिर्बंध आविष्कार, धर्मसंस्थांच्या व परंपरावादी सत्ताधाऱ्यांच्या अनियंत्रित सत्तेला उदारमतवादी विरोध करीत आले आहेत. धर्मश्रद्धेऐवजी बुद्धिवादाचा आश्रय करून वैचारिक प्रचार स्वातंत्र्याला त्यांनी महत्त्व दिले आहे. सामाजिक व राजकीय नियंत्रण व्यक्तीनिरपेक्ष असावे. संपत्ती व सामाजिक दर्जा यावर व्यक्तींच्या व्यवहाराचे नियंत्रण करणारे नियम आधारित असू नयेत. व्यक्तींना समान वागणूक मिळावी. कायद्याचे राज्य असावे व देशादेशांत अनिर्बंध व्यापार चालावा.

माणूस हा जन्मत:च विचारक्षम असल्याने त्याचे हित आणि अहित कशात आहे हे तो बुद्धीच्या सहाय्याने जाणू शकतो. त्यामुळे त्याला निवड स्वातंत्र्य आणि निर्णय स्वातंत्र्य असले पाहिजे. असे उदारमतवादाने स्पष्ट केले. पारंपारिक समाज रचनेमध्ये धर्म, रूढी, परंपरा, चाली रिती याची अनेक बंधने सर्व सामान्य माणसांवर होती. शिवाय राजे, सरंजाम, वतनदार, धर्मगुरु यांची सत्ता ही माणसांवर मोठ्या प्रमाणात होती. या सर्व निर्बंधामुळे आणि नियंत्रणामुळे माणसाचे स्वातंत्र्यच नष्ट झाले होते. स्वातंत्र्य नसल्याने बुद्धीचा वापर करून आपले प्रश्न आपल्या हिंमतीवर सोडविण्याचे माणसाचे प्रयत्न थांबले होते. परिणामत: आपले खाजगी व सार्वजनिक जीवन स्वत:च्या संकल्पानुसार व स्वत:च्या प्रयत्नांतून घडविण्याची माणसाची इच्छाच मेली होती. या पार्श्वभूमीवर उदारमतवादाने सर्व प्रकारच्या निर्बंधांतून माणसाला मोकळे करणे म्हणजेच

स्वातंत्र्य असा स्वातंत्र्याचा अर्थ स्पष्ट केला. यातूनच राज्य संस्थेची सत्ता नियंत्रित असायला हवी. हा विचार रुजत गेला. राज्यसंस्थाही सर्वोच्च सत्ता धारण करीत असली तरी त्या सत्तेचा वापर मनमानी पद्धतीने होता कामा नये. हा विचार मनमानी पद्धतीने होता कामा नये. हा विचार बळावला. राज्यसंस्थेच्या सत्तेवर मर्यादा घालण्यासाठी कायद्याचे राज्य, घटनात्मक शासनपद्धती, प्रातिनिधीक व जबाबदार शासन पद्धती, नागरिकांच्या मूलभूत हक्क यासारख्या संकल्पना उदयास आल्या. कार्ल व्हिल्हेम, वॉन हम्बोल्ट या प्रशियन अद्भूत रम्यतावादी, दि लिमिटस् ऑफ स्टेट ॲक्शन (१७१२) मधून तर जोसेफ मॅझिनीने प्रजासत्ताक वादाचा पुरस्कार करीत एका बाजूला व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. तर दूसऱ्या बाजूला राज्य संस्थेवरील मर्यादांचे समर्थन केले. जॉन स्टुअर्ट, मिल, जेरेमी बेन्टॉम या सारख्या तत्त्व चिंतकांनी माणूस हा सुखार्थी जीव असून सुखप्राप्तीसाठी तो सदैव धडपडत असतो.

व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या सर्व उदारमतवादी चिंतकांनी माणसाचा त्याच्या विकारवशते सहित आणि विवेकक्षमते सहित स्विकारले आहे. माणूस काम-क्रोध-लोभ-मोह-मत्सर या विकारांसहित त्याचे मनुष्यत्व जगत असतो. पण या विकारांना बुद्धीच्या साहाय्याने योग्य दिशा देता येते. विचाराने त्यांच्यावर मात करता येते. विचारांचे हे अद्भूत सामर्थ्य माणसाकडे आहे. किंबहूना त्यातच त्याचे मनुष्यत्व आहे असे उदारमतवादी विचाराने स्पष्ट केले आहे. यातूनच व्यक्ती स्वातंत्र्याचा व विचार स्वातंत्र्याचा आग्रह उदारमतवाद्यांनी धरला. इतकेच नव्हे तर चुका करण्याचेही स्वातंत्र्य माणसाला असले पाहिजे, कारण माणूस चुकत चुकत शिकत असतो. अशी उदारमतवाद्यांची धारणा आहे. ज्या कृतीने इतरांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येणर नाही. इतरांना उपद्रव पोहोचणार नाही व सार्वजनिक हितास बाधा पोहोचणार नाही, अशी कोणतीही कृती करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य माणसाला असले पाहिजे, असे उदारमतवादाने सांगितले. माणसे जन्मत:च समान असल्याने हे स्वातंत्र्य वंश, धर्म, जात, भाषा लिंग इ. तत्त्वावर माणसामाणसांत भेद न करता सर्वांनाच स्वातंत्र्य असले पाहिजे, असेही उदारमतवादाने सांगितले.

अर्थकारणाच्या क्षेत्रातही हे स्वातंत्र्य माणसाला अधिकाधिक दिले पाहिजे. या मताचा पुरस्कार उदारमतवादाने केला. यातूनच करार स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य, उत्पादन स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य या स्वातंत्र्यांचा आग्रह धरला गेला. उत्पादन व्यवस्था, बाजारपेठ या क्षेत्रांत राज्य संस्थेने हस्तक्षेप करता कामा नये. असा मुक्त अर्थव्यवस्थेचा विचार उदारमतवादाने आग्रहाने मांडला. व्यापार, आयात-निर्यात, बाजारभाव इ. संदर्भातील सर्व नियंत्रणे जितकी कमीत कमी होतील तितक्या प्रमाणात माणूस आपली भौतिक प्रगती करेल. असे या उदारमतवाद्यांचे म्हणणे होते. अभिजात उदारमतवादाने धर्मनिरपेक्ष, जबाबदार पण 'मर्यादित' शासन संस्थेचा पुरस्कार केला. अभिजात उदारमतवादाची ही तत्त्वे आजच्या खाजगीकरणाच्या युगाला खूपच पोषक आणि पुरक आहेत. आणि म्हणूनच उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणामुळे आपण पुन्हा एकदा उदारमतवादाकडे चालण्याचा आपल्याला भास होतो.

इतकेच नव्हे तर आजचा आपला राज्यकर्ता वर्ग आपली तशी समजूतही करून देत आहे. म्हणूनच तो आजच्या आपल्या राजकीय विचारसरणीला 'नव उदारमतवादी' विचार असे संबोधतो. पण अभिजात

उदारमतवाद आणि नव उदारमतवाद यात फरक आहे. त्यांचे संदर्भ वेगळे आहेत व आशयही वेगळा आहे. तो समजून घेण्यापूर्वी प्रथम 'मर्यादित शासनाचा' पुरस्कार करणारा उदारमतवाद कल्याणकारी राज्याकडे कसा वळला व कल्याणकारी राज्याचा पुरस्कार करता करता तो सर्वकष राज्यसंस्थेचा टोटल स्टेट (Total State) पुरस्कर्ता असा झाला ते पहावे लागेल. त्यासाठी अभिजात उदारमतवादाकडून आधुनिक उदारमतवादाकडे उदारमतवादाचा प्रवास कसा झाला हे पाहणे गरजेचे आहे.

इंग्लंडमध्ये उदारमतवादाचा सिद्धांत व राजकीय कार्यक्रम १६८८-१८६७ च्या कालावधीत मांडला गेला. व्यक्तीचे हक्क आबाधित राखले व त्या हक्कांच्या रक्षणार्थ संविधानात्मक तरतुदी करणे, हे उदारमतवादाचे प्राथमिक रूप होते. धार्मिक सहिष्णुता व स्वातंत्र्य, संविधानता व राजकीय हक्क ह्या गोष्टी त्यात नमूद केल्या गेल्या. १६८८ साली उदारमतवादी क्रांती झाली. त्यामुळे राज्यांची सर्वकष हुकूमत व परंपरावाद ह्यातून सुटका झाली. अमेरिकेने राजकीय स्वातंत्र्य जाहीर केले. त्यानंतर उदारमतवादाचा दूसरा कालखंड सुरू झाला. या कालखंडात आर्थिक व्यवहाराचे स्वातंत्र्य किंवा खुल्या व्यापाराचा सिद्धांत कार्यान्वित झाला. त्यामुळे नोकरशाहीची अर्थ व्यवहारातील नियंत्रण उठली. व्यापारी दर्यावर्दी, दळणवळण करणारी लोक व श्रमिक ह्यांच्यावरील बंधने शिथील झाली.

इंग्लंडमध्ये उदारमतवादाचे समर्थन व विवरण करणारे लॉक, ॲडम स्मिथ, जेरोगी, बॅथॅम, जॉन, स्टुयुअर्म मिल इ. तत्त्वज्ञ उदयास आले. त्यांनी खुल्या व्यापाराचे अर्थशास्त्र, व्यक्ती स्वातंत्र्याचे राज्यशास्त्र व उपयुक्तवादी नितिशास्त्र ही निर्माण केले. विचारवंतांच्या प्रभावामुळे मतदानाच्या हक्काची प्राप्ती व विस्तार झाला. उदारमतवाद राजकीय लोकाशाही पद्धतीला पोषक असतो. हे जरी खरे असले तरी तो राजेशाहीत किंवा उमरावशाहीत किंवा अन्य राजवटीत कार्यान्वित करता येतो. म्हणून लोकसत्तावादाहून उदारमतवाद वेगळा आहे असे म्हणता येईल. युरोपात मॉटेस्क्यू, बेंजामिन कॉस्ता, गटे व हेर्डर हे तत्त्वज्ञ उदारमतवादाचे पुरस्कर्ते हाते.

उदारमतवादाच्या वातावरणात भांडवलशाही समाज निर्माण होऊन आर्थिक व सांस्कृतिक क्रांती झाली. परंतु बहुजन समाजाचे जीवन कष्टाचेच राहिले. उदारमतवादात व्यक्तीवरील बंधनांचा निरास हे निषेधात्मक तत्त्व अस्तित्वात आले. परंतु तेवढ्याने सामान्य लोकांना संपन्न आर्थिक व सासंकृतिक जीवन लाभले नाही. तशा जीवनाकरिता आवश्यक असलेली विधायक तत्त्वे सांगणारा क्रांतीकारक समाजवादी विचार एकोणीसाव्या शतकात वाढून प्रभावी होऊ लागला. उदरमतवादाचा प्रभाव कमी होऊन उदारमतवादी पक्षांच्या व व्यक्तींच्या हातातील राजकीय सत्तेची सुत्रे एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस सैल होऊ लागली व तशा पक्षांचा पराभव होऊ लागला. ह्यानंतर उदारमतवाचा संपूर्ण त्याग करणारा समाजवाद पुढे आला. समाजवादात समाजहिताकरीता उभ्या राहावयाच्या संस्थांनी नवीन बंधने निर्माण होणार हे दिसून आल्यावर उदारमतवादाचे रूपांतर लोकशाही प्रधान समाजवादात झाले. त्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे ब्रिटन मधील मजूरपक्षांशी सहानुभूती असलेल्या विचारवंतांचा व मजूरपक्षीय नेत्यांचा फेबीयन समाजवाद होय.

## ३) मार्क्सवादी सिद्धांत :

सन १८४८ मध्ये कार्ल मार्क्स आणि फेडरिक एंगेल्स या दोन समाजवादी तत्त्व चिंतकानी 'दि कम्युनिष्ट मेनिफेस्टो' हे छोटे खानी पुस्तक प्रसिद्ध केले. सॉसीमॉ, फुरिदा किंवा रॉबर्ट ओवेन यांनी समाजवादावर भाष्य केले होते. पण त्यांनी वर्णन केलेला समाजवाद कसा स्वप्नाळू आणि भावनामय आहे, हे मार्क्सने कम्युनिष्ट मेनिफेस्टो' मध्ये सांगितले. समाज विकासाच्या शास्त्रीय तत्त्वावर आधारलेली समाजवादाची दिशा मार्क्सने 'कम्युनिस्ट मेनिफेस्टो' मध्ये स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच मार्क्सने स्पष्ट केलेल्या समाजवादाचे वर्णन 'शास्त्रीय समाजवाद' असे केले जाते. कारण समाजवादाचाच एक अविष्कार म्हणून ''शास्त्रीय समाजवाद'' किंवा मार्क्सवाद हे एक स्वयंपूर्ण, समग्र आणि अतिशय क्रांतीकारी समाजपरिर्वनाचे स्वतंत्र्य दर्शन आहे. जागतिकीकरणाच्या आजच्या संदर्भात साम्यवाद किंवा मार्क्सवाद संपल्याची हाकाटी जरी पिटली जात असली, तरी भांडवलशाहीची गतितत्त्व आणि अंतरंग पूर्णत: समजून घेण्यासाठी आज मार्क्सवादाचे समग्र आकलन झाल्याशिवाय या बाबी उलगडणार नाहीत. त्या दृष्टीने मार्क्सवाद हा आजही एक महत्त्वाचा विचार ठरतो.

शास्त्रीय समाजवादाचे स्पष्ट दर्शन हे 'कम्युनिस्ट मेनिफेस्टो' मधून प्रथमच ठळकपणे पुढे आले असले तरी ते पुस्तक म्हणजे मार्क्सची पहिलीच विचारकृती नव्हे. पण या पुस्तकामध्ये मार्क्सने प्रथमच आपल्या समाज मीमांसेला शास्त्रीयतेचा आधार असल्याचे आग्रहाने सांगितले आणि आपल्या समाजवादी विचारांनी स्पष्टीकरण मांडले. समाजवादी तत्त्वचिंतनाच्या विकासाला त्यामुळे एक वेगळेच क्रांतीकारी वळण मिळाले. त्या दृष्टीनेही शास्त्रीय समाजवाद हा समाजवादी तत्त्व चिंतनशील एक मोठी झेप होती. त्याच्या उदयाचे सामाजिक, ऐतिहासिक संदर्भ लक्षात घेणे जरूरीचे आहे.

भांडवलशाही व्यवस्थेशी असहकार पुकारत रॉबर्ट ओवेन सारख्या समाजवाद्याने उत्पादकाच्या सहकार्यावर आधारित उत्पादक-सहकारी संस्थांच्या माध्यमातून जी समाजरचना निर्माण करण्याचा प्रयत्न केला त्यास फारसे यश आले नाही. ओवेनच्या नंतर त्याचे अनेक सहकारी व अनुयायी हे सार्वत्रिक पुरुष मताधिकाराचा आग्रह धरणाऱ्या 'चार्टिस्ट' चळवळीत सामील झाले. पण चार्टिस्ट चळवळी १८४८ च्या सुमारास अस्त झाल्यावर समाजवाद आणि कामगार वर्गाच्या चळवळीतील एक अंत: संबंध जवळपास संपला.

१८४८ मधील युरोपीय देशातील क्रांतीकारी उठावांच्या अपयशानंतर समाजवादी चळवळीच्या बांधणीस एक जबरदस्त धक्का बसला. मार्क्स या सर्व घडामोडींचा चिकित्सकपणे विचार करीत होता. शोषण आणि दमनाच्या विरोधात लोक कितीही मोठ्या प्रमाणात सर्व शक्तीनिशी आणि मुक्तीच्या व स्वातंत्र्याच्या प्रेरणेने लढायला तयार असले आणि त्याचे उत्स्फूर्त उठाव क्रांतीकारी ऊर्जा निर्माण करीत असली तरी; जोवर या क्रांतीकारी उठावांना शास्त्रीय क्रांतीकारी तत्त्वज्ञानाचा पाया लाभत नाही, तोवर हे उठाव क्रांतीच्या यशाची हमी देऊ शकत नाहीत. या निष्कर्षापर्यंत मार्क्स आला होता. आणि त्या दृष्टीनेच त्यांने समाजवादी दर्शनाचे सिद्धांत विकसित केले. औद्योगिक दृष्ट्या फारशा विकसित नसलेल्या जर्मनीमध्ये दलित / शोषित वर्गाची जाणीव जागृती करून समाजवादाचे भवितत्व आश्वस्त होणार नसून इंग्लंड सारख्या औद्योगिकीकरणाच्या

शिखरावर पोहोचलेल्या देशांचे भांडवली अर्थकारण कशा प्रकारे समाज जीवनामध्ये बदल घडवित आहे व भांडवली शोषणाचे जगभरच्या श्रमिक वर्गावर त्याचे काय परिणाम होत आहेत याचा बारकाईने अभ्यास केल्याशिवाय समाजवादी विचारसरणी लक्षात घेता येणार नाही. हे फ्रेडरिक एंगल्सने मार्क्सला पटवून दिले. 'द कंडिशन ऑफ वर्किंग क्लास इन इंग्लंड' हे एंगेल्सचे पुस्तक १८४४ मध्ये प्रसिद्ध झाले होते. १८४८ मध्ये मार्क्स इंग्लंडला कायमस्वरूपी वास्तव्यासाठी आला व याच काळात भांडवली अर्थकारणाचा त्याने सखोल अभ्यास केला. 'दास कॅपीटल' हा त्याचा त्रिखंडात्मक ग्रंथ याच काळात तयार झाला. मार्क्स इंग्लंड मध्ये आला, त्यावेळी चार्टिस्ट चळवळ अस्तंगत होत चालली होती. आणि इंग्लंड पुरतेच बोलायचे, तर कामगार वर्ग आणि समाजवादी विचार यातील तत्त्वज्ञानात्मक सांधा क्षीण होत चालला होता, पण इंग्लंड आणि विशेषत: लंडन हे लोकशाही स्वातंत्र्याची मायभूमी असल्याने इतर युरोपीय देशांतील विचार स्वातंत्र्यावरील निर्बंध इंग्लंड मध्ये नव्हते. परिणामत: युरोपीयन देशांतून परागंदा झालेले अनेक समाजवादी, अराज्यवादी क्रांतीकारक लंडन मध्ये जमा झाले होते. मार्क्स आणि एंगेल्स हे त्यांचेच सहचर होते. या सर्वांच्या प्रयत्नातून सन १८६४ मध्ये 'इंटरनॅशनल वर्किंग मेन्स असोसिएशन'ची स्थापना झाली. हिलाच पुढे 'द फस्ट इंटरनॅशनल' म्हणून ओळखले गेले. 'फस्ट इंटरनॅशनल किंवा 'पहिली जागतिक कामगार परिषद' हे मुख्यत्वे जगभर म्हणजे युरोपमध्ये पसरलेल्या विविध कामगार संघटनांच्या प्रतिनिधींचे व्यासपीठ होते. या परिषदेत विविध पैलूंचे समाजवादी क्रांतीकारक विचार मांडले गेले. हे विचार समाजवादी क्रांतीकारक जसे होते. तसेच ते अराज्यवादी ही होते. मार्क्सने या 'इंटरनॅशनल वर्किंग मेन्स असोसिएशन'च्या बांधणीत सक्रिय सहभाग घेतला त्याचे सचिवपद ही भूषविले. विविध देशांतील कामगार चळवळी व संघटनांना धोरणात्मक व सैद्धांतिक दिशा देण्याचे काम या संघटनेतर्फे मोठ्या प्रमाणात सुरू झाले. सर्वांची किमान सहमती होईल असा 'संसदीय समाजवादाचा' मार्ग या संघटनेने पुरस्कारिला असे असले तरी मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादाचा प्रभाव आता ब्रिटन वगळता एकूण समाजवादी चिंतनावर स्पष्टपणे दिसू लागला होता. १८६० च्या मध्यावर जर्मनी मध्ये मार्क्सच्याच जर्मन अनुयायांनी 'जर्मन सोशल डेमॉक्रॅटिक पार्टी'ची स्थापना केली होती. या काळात मार्क्सवादी स्वत:ला 'सोशल डेमॉक्रेट्स' म्हणून घेत जर्मनीतील सोशल डेमॉक्रॅटिक पार्टी ही त्यावेळची जगातील सर्वात मोठी पार्टी होती. याच धर्तीवर फ्रेंच समाजवादी ही एम्. एफ्. आय. ओ. (सेक्सन फ्रॅकाई दि. ल., इंटरनॅशनल ओव्हरिला) या संघटनेखाली संघटित झाले. आणि त्यांनी मार्क्सवादी समाजवादाचा अधिकृत स्वीकार केला. रशियामध्ये ही रशियन सोशल डेमॉक्राटिक पार्टी स्थापन झाली. मार्क्सवादाचा प्रभाव आता निर्विवादपणे स्पष्ट दिसत होता. मार्क्सवादी समाजवादाने समाजवादी दर्शन हे वैश्विक दर्शन बनले. व समाजवादी चळवळ ही खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय बनली. 'जगातील कामगारांनी एक व्हा, तुम्हाला तुमच्या गुलामगिरीच्या शृंखला शिवाय काही गमवावे लागणार नाही.' या मार्क्सच्या समाजवादी मंत्राची मोहनी सर्व दूरपर्यंत पोहोचली होती. मार्क्सच्या मृत्यूनंतर स्थापन झालेल्या १८८९ च्या 'सेकंड इंटरनॅशनल वर मार्क्सवादीची मोहर स्पष्ट उमटली होती. आंतरराष्ट्रीय समाजवादी चळवळीत तात्विक व डावपेचात्मक तसेच व्यूहरचनात्मक आणि धोरणात्मक मतभेद सारे संपले होते असे नव्हे, मार्क्स प्रणित समाजवादी मार्गाशी असहमती दर्शविणारे एडवर्ड

बर्नस्टाईनचे लिखाण प्रसिद्ध होतच होते. बर्नस्टाईनने इव्होल्युशनरी सोशॉलिझम (१८९९) या आपल्या पुस्तकात 'उत्क्रांतीवादी समाजवादाचा' पुरस्कार केला होता. पण बर्नस्टार्सन ला फारसे यश आले नाही. प्रभाव कायम राहिला तो मार्क्सवादाचा.

भांडवलशाही उत्पादन व्यवस्थेने माणसाची उत्पादन शक्ती प्रचंड प्रमाणात वाढली. धन निर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ लागली. उत्पादनात वाढ होऊन भौतिक समृद्धीच्या वाटा मोकळ्या झाल्या. औद्योगिकीकरण आणि शहरीकरणास गती आली. पण याच बरोबर भांडवलशाहीचे सामाजिक दुष्परीणाम ही स्पष्ट होऊ लागले. समृद्धी वाढली. पण ती मूठभर भांडवलदार वर्गाच्या हातात एकवटली गेली. शहरीकरणाबरोबर बकालीकरण ही वाढले. बेकारीची समस्या गंभीर होत गेली. कामगारांचे शोषण, दैन्य व दारिद्र्य वाढतच गेले. या सर्व दुष्परिणामांमुळे युरोपीय समाजातील अनेक विचारी व संवेदनशील मंडळी अस्वस्थ झाली. भांडवलशाहीतून येणाऱ्या या दूष्परिणामांवर कायम उपाय असू शकतो याचा विचार सुरू झाला आणि यातून समाजवादी विचारांचा उदय झाला.

कार्ल मार्क्स व त्यांचे सहकारी फ्रेडरिक एंगेल्स या दोघांनी विचारप्रवर्तन व अत्यंत परिणामी असे लिखाण केल्यामुळे संघटित कामगारांच्या क्रांतीकारी चळवढीचा पाया घातला गेला. मानवी जीवनाचा विकास हा योगायोगावर किंवा कोणत्या दैवी शक्तीवर अवलंबून नसतो. या दृढ श्रद्धेतून मार्क्सने भौतिकवादी इतिहासमीमांसेचे विवेचन केले. समाज जीवनाच्या विकासात आर्थिक पायावर आधारलेल्या वर्गवारीलाच खरे महत्त्व आहे. असे स्पष्ट करून मार्क्सने समाजव्यवस्थेचा पाया वर्गव्यवस्थेत आढळतो. असे प्रस्थापित केले. मनुष्याची विचारसरणी त्याच्या आर्थिक परिस्थितीशी संबंधीत असते. समान आर्थिक परिस्थिती व म्हरून समान विचारसरणी असणाऱ्या व्यक्तींचा समावेश एका वर्गात होतो. त्यामुळे त्याचे विचार, तत्त्वज्ञान, हितसंबंध हे इतर वर्गाच्या हितसंबंधाशी संपूर्णपणे विरोधी असतात. वर्ग-वर्गातील हितसंबंध परस्पर विरोधी असल्याने वर्गा-वर्गातील परस्पर संघर्षाचे व वर्गविग्रहाचे असतात. मानवजातीच्या सुरूवातीच्या काळापासून आढावा घेऊन मार्क्सने असा निष्कर्ष काढला की, ''मानवसमाजाचा आजपर्यंतचा इतिहास म्हणजे वर्ग लढ्याचाच इतिहास आहे.'' सरंजामकाळातील जमीनदार, त्यांचे मांडलीक व त्यांची कुळे यांच्यातील लढा व औद्योगिक क्रांतीनंतर भांडवलदार व मजूर यांच्यातील लढा यांची ही उदाहरणे आहेत. वर्गव्यवस्थेचे स्वरूप बदलले. पिळवणीकीच्या मार्गातही बदल घडून आले, परंतु पिळवणूक संपली नाही. त्यामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेतही वर्गलढा चालूच राहिला. ऐतिहासिक प्रेरणांच्या प्रभावामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे रुपांतर समाजवादी अर्थव्यवस्थेत निश्चितपणे होईल असा दृढ विश्वास कार्ल मार्क्सला वाटत होता. त्यासाठी सध्याच्या समाजरचनेची बंधने झुगारून देण्यासाठी श्रमिकांनी संघटित झाले पाहिजे. कामगार वर्गाचे या वर्गसंघर्षात कोणतेच नुकसान होणार नाही. कारण त्यांच्या बंधनाव्यतिरिक्त गमावण्याजोगे त्यांच्या जवळ काहीच नसते. उलटक्रांतीला सामोरे गेलेल्या कामगाराला बरेच काही जिंकता येईल. म्हणून 'साऱ्या जगातील कामगारांनो, एकत्र या' अशी घोषणा करून सर्व कामगारांना क्रांतीचे आवाहन केले. क्रांतीच्या मार्गानेच प्रचलित अर्थव्यवस्था बदलणे हेच कामगार संघटनेचे ध्येय आहे. कामगारांचे आर्थिक हितसंबंध सुरक्षित ठेवणे हे कार्ल मार्क्सच्या दृष्टीने कामगार-संघटनांचे अत्यंत मर्यादित ध्येय होते. साम्यवादी क्रांतीसाठी

कामगारांना एकत्र आणणे हे कामगार संघटनेचे ध्येय आहे.

गेल्या २०० वर्षातील आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीचा आधार मार्क्सचे हेच तत्त्वज्ञान होते. क्रांतीचे ध्येय निश्चित करून कामगार संघटनांनी लढाऊ स्वरूपाची कार्ये हाती घेतली पाहिजेत. असे मार्क्सचे म्हणणे होते. कामगारांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे निराकरण करण्यासाठी कामगार संघटना असणे आवश्यक आहे. आधुनिक उत्पादन-पद्धतीत कामगारांचा लाभ अगदीच कमी असल्याने असंतुष्ट व विफल झालेल्या कामगारांना कामगार-संघटनेच्या मदतीची गरज असते.

मार्क्सच्या मताने समाज हा दोन वर्गात विभागला गेला आहे. गरीब व श्रीमंत, शोषक व शोषित या दोन वर्गात किंवा गटात परस्परांबद्दल प्रेम किंवा परस्परांत सहकार्य करण्याची भावना निर्माण होण्याची शक्यता नाही. भांडवलदार व कामगार यात मात्र समेटाची शक्यता जवळ-जवळ नसते. ''सर्व जगातील इतिहासांचे स्पष्टीकरण करण्याची गुरुकिल्ली म्हणजे मार्क्सने तयार केलेला वर्ग संघर्षाचा सिद्धांत होय.''

सरंजामशाहीवर आधारीत समाज व्यवस्थेच्या विनाशातून आकाराला आलेल्या आधुनिक मध्यमवर्गीय समाज व्यवस्थेला सुद्धा वर्ग विरोधापासून दूर जाता आले नाही. आपले युग की जे मध्यमवर्गीयांचे युग आहे. हे सुद्धा वर्ग विरोधाला टाळू शकत नाही. उद्योजक हे आपल्या गिरणीतील कामगारांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला देत नसत. कामाचे तास, आठवडी रजा, वेतन किंवा मजूरी, वैद्यकीय सवलती, अपघाती विमा, कामगारांचे वय, भविष्य निर्वाह निधी इ. बाबतीत त्या काळात कोणताच नियम नव्हता. ''हम करे सो कायदा'' ही असंख्य लोकांची नीती होती. अधिक उत्पादन अधिक नफा म्हणून कामगारांचे अधिक शोषण हे तत्त्व त्या काळात होते. प्रत्येक व्यक्तीच्या अन्याय सहन करण्याच्या व आपले शोषण होऊ देण्याच्या काही मर्यादा असतात. या मर्यादा जर ओलांडल्या गेल्या तर प्रतिकार होतो. श्रमिकांवर व कामगारांवर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी आपण संघटित झाले पाहिजे. ही जाणिव या श्रमिक कामगारांत निर्माण झाली व त्यातूनच कामगारांच्या किंवा श्रमिकांच्या विविध संघटना स्थापन झाल्यात. या कामगार संघटनांनी आपले कारखानदारांकडून होणाऱ्या शोषणाविरुद्ध आवाज उठविण्यास सुरूवात केली व हीच वर्ग संघर्षाची ठिणगी ठरली.

श्रमशक्ती विकत घेण्याच्या संदर्भात मार्क्स म्हणतो की, भांडवलदारांच्या डोक्यात पैशाचे भूत सवार होते की, जे कामगारांच्या किंवा श्रमिकांच्या रक्ताचे शोषण करते. कारखाना उत्पादन पद्धतीमुळे उत्पादनात भरमसाठ वाढ होते. उत्पादनात बेसुमार वाढ झाली की, मालाचा उठाव व्हावा म्हणून भांडवलदारांना आपल्या उत्पादित मालाच्या किंमती कमी कराव्या लागतात. ज्या वेळेला किंमती कमी केल्या जातात. तेव्हा त्याची भरपाई व्हावी म्हणून कामगारांचे वेतनही जाणून बुजून कमी केले जाते. कामगारांचे वेतन कमी झाले की, त्यांची खरेदीची शक्ती पण कमी होते. हे कामगार ही कारखान्यात उत्पादन होणाऱ्या मालाचे खरेदीदार असतात. त्यांची खरेदी शक्ती कमी झाल्याने ते जीवनावश्यक वस्तू खरेदी करू शकत नाहीत. अशा प्रकारे अधिक उत्पादनाच्या व अधिक नफा मिळविण्याच्या धुंदीत कारखानदार कामगारांचे वेतन कमी करतात व कामगारांचे शोषण करतात. यालाच वर्ग संघर्ष ही संज्ञा दिली जाते.

कार्ल मार्क्स पुढे म्हणतो की, फक्त कामगारांचे कारखानदारांविरुद्धचे लढे म्हणजे केवल वर्ग संघर्ष नव्हे तर त्यात शेतात मजूरांचे जमीनदारांविरुद्ध, सर्व सामान्य प्रजेचे जुलमी राज्यकर्त्यांविरुद्ध गुलामांचे मालकांविरुद्ध होणारे लढे इ. सर्व संघर्षात मोडतात.

भारतीय संविधानामध्ये काही मूलभूत हक्क सांगितले आहेत. त्यापैकी एक शोषणाविरुदध हक्क सांगितला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने खालील गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

१) माणसांचा अपव्यापार आणि बिगार व त्या सारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे. आणि या तरतुदंचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

२) सार्वजनिक प्रयोजना करीता सेवा करायला लावल्यास राज्याला अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टींमुळे प्रतिबंध होणार नाही व अशी सेवा करावयास लावताना केवळ धर्म, वंश, जात, किंवा वर्ग या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्य कोणताही भेदभाव करणार नाही.

३) चौदा वर्षे वयाखालील कोणत्याही बालकास कोणत्याही कारखान्यात किंवा खाणीत काम करण्यासाठी नोकरीस ठेवले जाणार नाही अथवा अन्य कोणत्याही धोक्याच्या कामावर त्यास लावले जाणार नाही.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना आणि संयुक्त राष्ट्रसंघ यासारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांची निर्मिती हा हक्कांच्या उत्क्रांतीमधील एक महत्त्वाचा टप्पा होता. समाजामध्ये शांतता राखण्यासाठी सामाजिक न्याय हा आवश्यक घटक आहे. या घटकावर आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO) संघटनेची सन १९१९ मध्ये निर्मिती झाली. या संघटनेने कामगारांच्या हक्कांचा जाहिरनामा तयार केला. तसेच या संघटनेने कर्मचारी वर्गास त्याच्या कामाच्या प्रमाणानुसार वेतन देणे, कामकाजाचे तास, कामगार स्वास्थ या विषयांचे प्रश्न, महिला आणि बाल कामगारांशी संबंधीत समस्या सोडविणे, भांडवलदार वर्गाकडून कर्मचारी वर्गाची पिळवणूक सोडविणे, भांडवलदार वर्गाकडून कर्मचारी वर्गाची पिळवणूक थांबविणे यासाठी लेखी नियमदेखील बनविले.

फिलाडेल्फिया येथील आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या जाहिरनाम्यामध्ये (सन १९४४) असे नमूद करण्यात आलेले आहे. (१) कामगार हा विक्रीकरण्याची वस्तू नाही, (२) अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सभेचे, एकत्र येण्याचे, संघटना बांधण्याचे स्वातंत्र्य अविरत प्रगतीसाठी उपयुक्त आहे. (३) सर्व मनुष्य प्राण्यांना स्वातंत्र्य, प्रतिष्ठा, आर्थिक सुरक्षा आणि समान संधी या अटींसह आपला शारीरिक आणि आत्मिक विकास साधण्याचा हक्क आहे. मानवी हक्कांच्या विकासामध्ये राष्ट्रसंघ हा आणखी एक महत्त्वाचा संघटनात्मक टप्पा आहे.

आर्थिक आणि सामाजिक शोषणातून जनतेला मुक्त करून त्यांच्या मूलभूत सामाजिक आणि आर्थिक अधिकारांना संरक्षण प्राप्त करून देणे ही साम्यवादी क्रांती मागची प्रेरणा होती. कार्ल मार्क्सच्या शोषणमुक्त समाजाच्या कल्पनेने प्रभावित झालेल्या मानवाधिकारांच्या विकासाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

### ४) **समाजशास्त्रीय सिद्धांत** (Sociological Theory)

१९ व्या शतकापेक्षा २० व्या शतकात अनेक क्षेत्रातील शास्त्रज्ञांचे लक्ष मानवी हक्कांच्या अध्ययनाकडे वळले. नैसर्गिक शास्त्राप्रमाणेच सामाजिक शास्त्रातही लोक त्याची संस्कृती, त्यांच्यातील संघर्ष, त्यांचे हितसंबंध इ. विषयीच्या अध्ययनाला आणि समजून घेण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. सामाजिक शास्त्रांमध्ये विशेषतः मानवशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र आणि इतर सामाजिक शास्त्रे यांनी अतिशय सूक्ष्म दृष्टिने मानवी हक्कांची संकल्पना कायदेशास्त्राच्या दृष्टिने समजून घेण्याचा प्रयत्न केला. सर्वच सामाजिक शास्त्रे विकसित होण्याच्या टप्प्यावर असल्यामुळे न्यायतत्त्वशास्त्रात समाजशास्त्रीय संप्रदायाचा विकास झाला. अनेक विजोड किंवा विषम सिद्धांत या काळात उत्क्रांत झाले होते, ज्यांचा हेतू समाजातील मानवी जीवनात कायद्याचे महत्त्व स्पष्ट करू शकतात. समाजशास्त्रीय न्यायतत्त्वशास्त्राचे विश्लेषणात्मक प्रकारचे सिद्धांत हे मानवी हक्कांशी जोडण्याचा प्रयत्न यामध्ये केला जातो. मानवी हक्कांचा विचार करता समाज आणि कायदा या दोन घटकांच्या वर्णनात्मक पैलूंकडे समाजशास्त्रीय सिद्धांत आपले लक्ष वेधतो. मानवी हक्कांच्या संदर्भात विचार करता हा दृष्टिकोन मानवी हक्क व्यवस्थेचे प्रायोगिक अंगभूत घटक, सामाजिक प्रक्रियेच्या संदर्भात समजून घेणे आवश्यक ठरणार आहे.

समाजशास्त्रीय संप्रदायाचे प्राथमिक स्वरूपाचे योगदान असे आहे की, त्यात प्रचलित नैतिक भावना आणि प्रचलित असलेली सामाजिक-आर्थिक परिस्थिती यातील हितसंबंधात संतुलन प्राप्त करण्यावर भर दिला आहे. या दृष्टिकोनाची बांधणी विलीयम जेम्स यांनी मांडलेल्या व्यावहारिक तत्त्वावर आधारित आहे. त्यांच्या तत्त्वानुसार, ''वस्तूचा आवश्यक गुणधर्म हा केवळ मागणीचे समाधान किंवा पूर्तता करण्यातच आहे.'' हा दृष्टिकोन २० व्या शतकातील समाजातील विविध गरजांच्या वाढत्या मागणीच्या विकासाशी संबंधित आहे. या मागण्या अभिजात, नागरी आणि राजकीय स्वातंत्र्याच्या पलीकडच्या असून त्या बेरोजगारांना, अपंगांना, विशेषाधिकारांपासून वंचित असलेल्यांना, अल्पसंख्यांना व समाजातील अन्य मूलभूत तत्त्वांना मदत करण्यासाठी केल्या आहेत.

समाजात पूर्णपणे मानवी हक्कांचे काटेकोरपणे पालन होते असे पाहायला मिळत नाही. उलट मानवी हक्कांची पायमल्लचि होताना बऱ्याचदा आढळून येते. समाजात ज्या काही समस्या आढळून येतात, त्यामधून असेच पाहायला मिळते की मानवी हक्कांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणात होत आहे.

रॉस्को पाउन्ड हे एक अमेरिकेतील प्रसिद्ध विधीज्ञ होते. त्यांनी आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनातून कायद्याविषयी आपले मत मांडले आहे. त्यांच्या मते कायदा हा सामाजिक नियंत्रणासाठी आवश्यक आहे. कायद्याचा कृतीशील दृष्टिकोन यावर त्यांनी भर दिला. ते स्वतः जेष्ठ विधीज्ञ असल्यामुळे मानवी हक्कांची होणारी पायमल्ली किंवा मानवी हक्कांचे होणारे उल्लंघन हे ते जवळून पाहात होते. तेव्हा त्यांना असे आढळून आले की, १८ व्या शतकातील कालखंडात कायद्याच्या इतिहासाचे लेखन हे मोठ्या प्रमाणात मानव हक्कांना मिळणाऱ्या वाढत्या मान्यतेशी संबंधित आहे. परंतु २० व्या शतकातील कायद्याचा इतिहास हा मात्र मानवी गरजा, मानवी मागण्या आणि सामाजिक हितसंबंध यांच्याशी संबंधित आहे. पाउन्ड यांनी

वैयक्तिक, सार्वजनिक आणि सामाजिक हितसंबंधाची एक यादी तयार केली होती. या हितसंबंधांमध्ये त्यांनी मूल्याला प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला नाही. या संदर्भात पाऊन्ड यांचे 'सामाजिक अभियांत्रिकी' हे मार्गदर्शक तत्त्व होते. त्यानुसार त्यांनी राजकीय संघटित समाजाच्या माध्यमातून मानवी संबंधाची यादी तयार करताना सर्व हितसंबंधाच्या संरक्षणाला प्राधान्य दिले होते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनावर टीका करणारे टीकाकार असे म्हणतात की, या दृष्टिकोनामध्ये केवळ मानव मागण्यांची यादी तयार केलेली आहे. पण मानवी हक्क हे कसे परस्पर संबंधित आहेत किंवा त्याचे घटक कोणते असावेत यावर प्रकाशझोत टाकण्यात ते अपयशी ठरले आहेत. त्याचप्रमाणे टीकाकारांच्या मते समाजशास्त्रीय संप्रदाय हा हक्कासंबंधीचे प्रमाणात्मक निष्कर्ष हे तर्कशास्त्रीय कसोटीवर तपासून प्रयोगाच्या माध्यमातून हितसंबंधांच्या वास्तवतेद्वारे सिद्ध करता येतील का? या प्रश्नांचे उत्तर देण्यास असमर्थ ठरला आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनाने मानवी हक्कांच्या अध्ययनासाठी उपयोगी अशा अभ्यासपद्धतीची तरतूद केली आहे, पण या अभ्यासपद्धतीची तत्त्वज्ञानशास्त्रीय किंवा सैद्धांतिक बैठक कच्ची आहे असे असले तरी या अभ्यासपद्धतीने मागणीच्या पूर्ततेसाठी आवश्यक त्या हितसंबंधाचे संख्यात्मक अध्ययन केले होते. या संप्रदायाने सहभागी मूल्यांची समज व ते साध्य करण्याची धोरणे या संबंधीचे ज्ञान मर्मभेदक केले आहे.

**❖ स्वयं अध्ययन प्रश्न –१**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) नैसर्गिक हक्क म्हणजे काय ?

२) उदारमतवादी सिद्धांताचे आधार कोणते ?

३) उदारमतवादाची विचारसरणी कोणत्या दोन मूलभूत गोष्टींवर भर देते.

४) मार्क्सवादी सिद्धांतामध्ये कशाला महत्त्व दिले गेले आहे.

५) मार्क्सवादी विचारांमध्ये मार्क्सने कोणत्या घटकावर लक्ष केंद्रित केले आहे.

**ब) चूक की बरोबर ते लिहा.**

१) नैसर्गिक हक्क म्हणजे मानवाला निसर्गाकडून मिळालेली देणगी होय.

२) उदारमतवाद हा स्वातंत्र्य व समता यावर आधारीत नाही.

३) आत्माविष्कार आणि स्वातंत्र्यावरील निष्ठेचे संवर्धन हा उदारमतवादाचा आशय आहे.

४) मार्क्सने स्पष्ट केलेल्या समाजवादाचे वर्णन ''शास्त्रीय समाजवाद'' असे केले जाते.

५) कार्ल मार्क्स व फ्रेडरिक एंगेल्स यांच्यामध्ये समानवादावरून मतभेद होते.

❖ **स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे.**

**अ)** १) नैसर्गिक हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तील मनुष्यप्राणी या नात्याने काही गोष्टी निसर्गत:च प्राप्त झालेले असतात.

२) राष्ट्रातील लोकांच्या मानवाधिकार रक्षणावर उदारमतवाद आधारलेला आहे.

३) उदारमतवादाची विचारसरणी पुढील दोन मुलभूत गोष्टींवर भर देतात. (१) स्वेच्छा मंत्र सत्ताधारीत्वाची नापसंती व (२) व्यक्तींचा अनिर्बंध आविष्कार.

४) मार्क्सवादी सिद्धांतामध्ये शास्त्रीय समाजवादाला महत्त्व दिले आहे.

५) मार्क्सवादी विचारांमध्ये मार्क्स ने कामगार व शोषित घटकांवर लक्ष केंद्रित केलेआहे.

**ब)** १) बरोबर, २) चूक, ३) बरोबर, ४) बरोबर ५) चूक

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके / लेख :


१. डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, भारताचे संविधान, प्रकाशक, डॉ. आंबेडकर साहित्य प्रचार मंडळ, समता सैनिक दल, गिट्टी खदान, नागपूर, सातवी आवृत्ती, २००८

2. Roy A.N. Human Rights Tasks, Duties and Function, Aavishkar Publishers, Distributers, Jaipur 302003 (Raj) India 2007.

3. J. Chaudhary, A Text Book of Human Rights, New Delhi, Dominant Publishers, 2000.

4. Sonajaba Navrean, Human Rights Principles, Practices and Abuses, New Delhi, Omson, Publications, 1994.

5) B. P. Singh Senegal, Human Rights in India; Problems and Perspectives, New Delhi, Deep and Deep Publication, 1995.

६. डॉ. यशवंत सुमंत यांचे लेख.


❑❑❑

## घटक – २

# मानवी हक्क आणि आंतरराष्ट्रीय संदर्भ

## (Human Rights and International Concerns)

**अनुक्रमणिका :**

२.१ प्रस्तावना

२.२ उद्दिष्टे

२.३ विषय विवेचन

२.३.१ संयुक्त राष्ट्रांची सनद (Uited Nations Charter)

२.३.२ मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा १९४८ (Universal Declaration of Human Rights 1948)

२.३.३ संयुक्त राष्ट्रांची आमसभा / महासभा (UN General Assembly)

२.३.४ आर्थिक आणि सामाजिक परिषद (Economic and Social Council) आणि संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोग (UN Human Rights Commission)

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.४ सारांश

२.५ स्वयंअध्ययनाची उत्तरे.

२.६ स्वाध्याय

२.७ संदर्भ

### २.१ प्रस्तावना :

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली. मानवजातीच्या दृष्टीने युद्धाचे परिणाम किती गंभीर व भयानक होऊ शकतात. याचा प्रत्यय दूसऱ्या महायुद्धाच्या काळात सर्वांनाच आला होता. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगतीमुळे मानवाच्या हाती अत्यंत विनाशकारी शस्त्रास्त्रे लागली; त्यामुळे युद्धाला आणखी विध्वंसक स्वरूप प्राप्त झाले. त्यातून मानवजातीच्या अस्तित्वालाच धोका उत्पन्न झाला. म्हणून दूसरे महायुद्ध सुरू असल्याच्या काळातच जगाला व मानवजातीला युद्धाच्या धोक्यापासून मुक्त करण्यासाठी एखादी आंतर राष्ट्रीय संघटना स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले होते. या प्रयत्नांचे फलीत म्हणजे 'संयुक्त राष्ट्रसंघाची' स्थापना होय.

मानवाधिकारांच्या संकल्पनेला वैश्विक रूप दूसऱ्या महायुद्धानंतर प्राप्त झाले. मनवाधिकारांच्या रक्षणासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न झाले पाहिजेत अशी जाणीव दुसऱ्या महायुद्धानंतर आकाराला येऊ लागली. दूसरे महायुद्धापूर्वी आणि महायुद्धादरम्यान मानवाधिकारांची मोठ्या प्रमाणात पायमल्ली झाली. जर्मनीमध्ये नाझी राजवटी अंतर्गत लक्षावधी ज्यू लोकांचा झालेला वंशसंहार महायुद्धा दरम्यान हजारो निरपराध लोकांच्या झालेल्या हत्या यासारख्या घटनांनी आंतरराषट्रीय समुदायाला हादरवून टाकले. व्यक्तीच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण व्हायला हवे; अशी मागणी महायुद्ध चालू असतानाच मोठ्या नेत्यांकडून व्हायला सुरूवात झाली. महायुद्धाच्या समाप्तीनंतर स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्याबरोबर मानवाधिकारांच्या संरक्षणाच्या उद्दिष्टाला प्राधान्य दिले.

या पार्श्वभूमीवर मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करावी व मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक तरतुदींचा समावेश व्हावा अशा स्वरूपाच्या उद्दिष्टांची मागणी अनेक राष्ट्रांनी केली. त्यानुसार १९४६ ला संयुक्त राष्ट्र स्थापन केलेल्या मानवी हक्क आयोगाने मानवी हक्कांची सर्व समावेशक यादी तयार केली. या हक्कांच्या अंमलबजावणीसाठी भविष्यात स्वतंत्र करारनामे तयार करून ते सदस्य राष्ट्रांनी स्विकारावेत असे ठरविण्यता आले. त्यानुसार 'मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा १९४८' स्विकारण्यात आला. तथापी, हा जाहीरनामा सदस्य राष्ट्रातील करारनामा नसल्याने तो सदस्य राष्ट्रावर कायद्याने बंधनकारक नव्हता. त्यासाठी १९६६ ला दोन करारनामे स्विकारण्यात आले. हे करारनामे स्वाक्षरी करणाऱ्या देशावर बंधनकारक होते. हे दोन करारनामे म्हणजे, आर्थिम, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा करारनामा १९६६' व 'नागरी आणि राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' हे होत.

आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता व मानवी हक्कांच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवरील संयुक्त राष्ट्रांची सनद, १९४८ चा जागतिक जाहीरनामा व १९६६ चे दोन करारनामे यातील तरतुदी व मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीय पातळीवर अंमलबजावणी व संरक्षणाची यंत्रणा अभ्यासणे आवश्यक ठरते.

## २.० **उद्दिष्ट्ये** (Objectives) :

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास –

१) मानवी हक्कांच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय संदर्भ समजावून घेता येतील.

२) संयुक्त राष्ट्रांची सनद १९४५ ची भूमिका व त्यातील तरतुदी अभ्यासता येतील.

३) मानवी हक्कांचा जागतिक जाहरिनाम १९४८ ची भूमिका व तरतुदी जाणून घेता येतील.

४) आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६ समजावून घेता येईल.

५) नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६ अभ्यासता येईल.

६) आंतरराष्ट्रीय पातळीवरील मानवी हक्कांची अंमलबजावणी व संरक्षणसंबंधी व्यवस्था अभ्यासता येतील.

## २.३ विषय विवेचन :

संयुक्त राष्ट्रसंघाने युद्धाच्या भयानक आपत्तीपासून भावी पिढ्यांचे संरक्षण करणे हे आपले मुख्य ध्येय असल्याचे घोषित केले होते. त्या दृष्टीने अगदी सुरूवातीपासून वाटचाल सुरू ठेवली होती. मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्ये यांची हमी मिळाल्याखेरीज आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यांचे रक्षण करणे शक्य होणार नाही म्हणून त्यांनी मानवी हक्क व मानवी हक्कांचे रक्षण करून मानवी प्रतिष्ठा आबाधित राखण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला होता.

### २.३.१ संयुक्त राष्ट्रसंघाची सनद (United Nations Charter) :

संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्याच्या उद्देशाने २५ एप्रिल, १९४५ ते २६ जून १९४५ दरम्यान अमेरिकेतील 'सॅन फ्रान्सिस्को' येथे एका परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. सॅन फ्रान्सिस्को परिषदेत जगातील पन्नास राष्ट्रांच्या प्रतनिधींनी भाग घेतला होता. या परिषदेने २५ जून १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदेला मंजूरी दिली. या सनदेत एकूण १९ प्रकरणे असून त्यात १११ कलमांचा समावेश करण्यात आला आहे.

**कलम १ :** संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदेच्या पहिल्या कलमात असे म्हटले आहे की, वंश, लिंग, भाषा किंवा धर्म या आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्वांकरिता मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्ये वृद्धींगत करणे व त्यांना सन्मान प्राप्त करून देणे यासाठी आंतर राष्ट्रीय सहकार्य मिळविणे हे संयुक्त उद्दिष्ट असेल.

**कलम १३ :** वंश, लिंग, भाषा किंवा धर्म या आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्वांना मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्ये यांचा लाभ मिळवून देण्यासाठी यासंबंधीच्या अध्ययनाला चालना देण्याची आणि शिफारशी करण्याची जबाबदारी या कलमान्वये संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेवर टाकण्यात आली आहे.

**कलम ५५ :** या कालमात असे म्हटले आहे की, वंश, लिंग, जात भाषा किंवा धर्म या आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्वांकरिता मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्ये यांचे संरक्षण करणे आणि त्याबाबत सार्वत्रिक आदर वृद्धींगत करणे हे संयुक्तराष्ट्र संघाचे कर्तव्य असेल.

**कलम ५६ :** या कलमात असे म्हटले आहे की, संयुक्त राष्ट्रसंघाची सर्व सदस्य राष्ट्रे कलम ५५ मध्ये सांगितलेले उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी संघटनेच्या सहकार्याने एकत्रितपणे व स्वतंत्रपणे कृती करतील.

**कलम ६२ :** या कलमान्वये संयुक्त राष्ट्रसंघाची आर्थिक व सामाजिक समिती सर्वांकरिता मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्ये यांचा सन्मान वृद्धिंगत करण्यासाठी तसेच त्यांचे पालन केले जाण्यासाठी शिफारसी सुचवेल अशी तरतूद करण्यात आली आहे.

**कलम ७३ :** या कलमान्वये स्वयंशाषित नसलेल्या प्रदेशातील लोकांच्या मानवी हक्कांचे रक्षण करण्याची आणि सर्वबाबतीत त्यांना न्याय्य वागणूक देण्याची जबाबदारी त्या प्रदेशांच्या प्रशासनांचे कार्य अंगावर घेतलेल्या सदस्य राष्ट्रांवर सोपविण्यात आली आहे.

**कलम ७५ :** या कलमान्वये विश्वस्त प्रदेशातील लोकांच्या मानवी हक्कांचे रक्षण करण्याची आणि ते प्रदेश राजकीयदृष्ट्या स्वतंत्र होण्याची क्षमता प्राप्त करतील; या दृष्टीने त्याचा विकास घडवून आणण्याची जबाबदारी विश्वस्त समितीवर सोपविण्यात आली आहे. अर्थात, विश्वस्त समितीने या विषयाची आपली जबाबदारी जवळपास पूर्णत्वास आणली असल्यामुळे तिला आता फारसे कार्य राहिले आहे.

❖ **संयुक्त राष्ट्रांच्या सनदेचा उद्देश/भूमिका/संकल्पना :**

१) युद्धांच्या गंभीर परिणामामुळे आमच्या जीवनकाळात दोन वेळा मानवजातीला संकटात टाकले त्यापासून भावी पिढ्यांचे रक्षण करणे.

२) मूलभूत मानवी हक्क, प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा व महत्त्व यांच्या संरक्षण, संवर्धनासाठी आणि पुरुष स्त्रीया तसेच लहान व मोठी राष्ट्रे यांच्या समान अधिकाराप्रती आस्था राखणे व ते बळकट करणे.

३) आंतरराष्ट्रीय करार व कायदे यामध्ये अंतर्भूत दायित्वाच्या संदर्भात न्याय व आदराची भावना निर्माण व्हावी अशी परिस्थिती निर्माण करणे.

४) व्यापक स्वरूपातील स्वातंत्र्यासाठी सामाजिक प्रगती साधणे व जीवनमानाचा स्तर वाढवणे.

५) **संकल्प :** उपरोक्त उद्देशपूर्तीकरीता सहनशक्तीच्या आदर्शाचा स्विकार, शेजारी राष्ट्राबरोबर शांततामय संबंध आणि आंतर राष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेसाठी एकत्र येऊन सामान्याच्या हितसंबंधाच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी शस्त्रास्त्राचा वापर किंवा सशस्त्र शक्तीचा उपयोग केला जाणार नाही व सर्व व्यक्तींच्या आर्थिक व सामाजिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय तंत्राचा उफयोग केला जाईल व हे सर्व साध्य करण्यासाठी आम्ही सर्वजण एकत्रित येऊन परस्पर सहकार्याने प्रयत्न करू.

❖ **संयुक्त राष्ट्रांची सनद व मानवी हक्क** (United Nations Charter and Human Right's) :

मुख्यत: आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांची निर्मिती झाली. त्याचवेळी मानवी हक्कामध्ये जागतिक पातळीवर समानता आणण्याच्या प्रक्रियेस प्रारंभ झाला. कारण जगातील प्रत्येक व्यक्तीला त्याच्या जीवन विकासासाठी व सुरक्षिततेसाठी ज्या हक्कांची आवश्यकता आहे ते हक्क देणे व त्यांचे संरक्षण करणे हे ही एक उद्दिष्ट संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेमागे होते. म्हणूनच संयुक्त राष्ट्रांची सनद हे मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेतील पहिले पाऊल ठरले. कारण,

यापूर्वी जगभरातील प्रत्येक राष्ट्रांची मानवी हक्कांच्या संदर्भात स्वत:ची अशी एक विचारधारा होती. त्यानुसार प्रत्येक राष्ट्र मानवी हक्कांची निश्चिती करत होते. त्यामुळे राष्ट्रा-राष्ट्रांतील मानवी हक्कांच्यामध्ये समानता नव्हती. यामध्ये समानता आणण्याची सुरूवात संयुक्त राष्ट्रांच्या सनदेने केली. या सनदेमध्ये मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या संर्भातील बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

**१) संयुक्त राष्ट्रांच्या सनदेच्या प्रसतावनेतील मानवी हक्क संबध बाबी :**

या सनदेच्या प्रसतावनेतच, 'मूलभूत मानवी हक्क, प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा व महत्त्व यांच्या संरक्षण,

संवर्धनासाठी आणि पुरुष व स्त्रिया तसेच लहान व मोठी राष्ट्रे यांच्या समान अधिकाराप्रती आस्था राखत ते बळकट करण्याचे उद्दिष्ट स्पष्ट केले आहे.

**२) संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत समाविष्ट संयुक्त राष्ट्रांची मानवी हक्काबाबतची उद्दिष्ट्ये :**

१) कलम १(३) मध्ये स्पष्ट केले आहे की, 'संयुक्त राष्ट्रांनी वंश, लिंग, भाषा व धर्म यांच्या आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्वांच्या मूलभूत स्वातंत्र्य व मानवी हक्कासाठी परस्परातील आदराची भावना वाढीस लावणे व मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्यासाठी प्रोत्साहन देणे.

२) कलम ५५ मध्ये हे स्पष्ट करण्यात आले की, व्यक्तींचे समान अधिकार किंवा हक्कांच्या तत्त्वावर आधारीत राष्ट्रा-राष्ट्रांत शांततामय व मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित होण्यासाठी आवश्यक स्थिरता व कल्याणकारी स्थितीच्या स्थापनेसाठी संयुक्त राष्ट्र मानवी हक्कासंर्भात पुढील बाबींचा पुरस्कार करेल.

अ) कलम ५५(क) मध्ये स्पष्ट केले की, जीवनमानच्या उत्तमस्तर सर्वांना रोजगार व आर्थिक आणि सामाजिक प्रगती तसेच विकासमय परिस्थिती निर्माण करणे.

ब) कलम ५५(ख) मध्ये स्पष्ट केले आहे की, आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक, आरोग्य यांच्याशी संबधीत समस्यावरील उपाय तसेच आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक व शैक्षणिक सहयोग निर्माण करणे.

क) कलम ५५(ग) मध्ये असे उद्दिष्ट स्पष्ट केले आहे की, मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य यामध्ये वंश, लिंग, भाषा व धर्म यानूसार कोणताही भेदभाव न करता मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्याचा आदर करणे व त्यांचे पालन करणे.

**३) संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत मानवी हक्कांच्या संरक्षण व प्रसारासाठीची संघटनात्मक व्यवस्था किंवा जबाबदारी :**

मानवी हक्काबाबत असणाऱ्या चुकीच्या कल्पना व यासंबंधी असणाऱ्या माहितीचा अभाव किंवा अज्ञान या जागतिक पातळीवरील मानवी हक्कांच्या संरक्षणातील अडथळे होते. हे अडथळे दूर करणे व मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन करणे महत्त्वाचे होते. संयुक्त राष्ट्र संघाने हे कार्य किंवा जबाबदारी पुढील तीन संघटनांकडे आपल्या सनदेतून सोपवली.

१) संयुक्त राष्ट्रांची आमसभा / महासभा.

२) आर्थिक व सामाजिक परिषद.

३) संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोग.

**१) संयुक्त राष्ट्रांची आमसभा / महासभा :** संयुक्त राष्ट्रांच्या सनदेतील प्रकरण चार मध्ये आमसभेची कार्ये व अधिकार स्पष्ट केले आहेत. कलम १३ मध्ये हे स्पष्ट केले आहे की, महासभा पुढील बाबींच्या अध्ययनाची व्यवस्था करेल व त्यासंबंधी शिफारसी करील त्या बाबी म्हणजे

**कलम १३ (१-क)** राजकीय क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवणे व आंतरराष्ट्रीय कायद्यांचा विकास व त्यांचे संहितीकरणाला प्रोत्साहन देणे.

**कलम १३ (१-ख)** आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवणे व वंश, लिंग, भाषा व धर्म यांच्या आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्वांना मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य प्राप्त व्हावे यासाठी योगदान देणे.

**कलम १३(२)** मध्ये स्पष्ट केले आहे की, कलम १३(१-ख) मध्ये उल्लेख केलेल्या बाबी संबंधी महासभेची जी इतर कार्ये व जबाबदाऱ्या आहेत. कलम ५५ मध्ये संयुक्त राष्ट्रांची मानवी हक्कांबाबतची उद्दिष्टे स्पष्ट केली आहेत. ती आपण वरती क्रमांक दोनच्या मुद्यामध्ये पाहिली आहेत.

**कलम ५६** मध्ये स्पष्ट केले आहे की, कलम ५५ मध्ये स्पष्ट केलेली उद्दिष्ट्यांच्या प्राप्तीसाठी प्रत्येक सदस्य राष्ट्र संयुक्त राष्ट्र सहकार्याने अथवा स्वतंत्रपणे कार्यवाही करेल.

**कलम ५९** मध्ये हे स्पष्ट केले आहे की, मानवी हक्काच्या संदर्भात जी उद्दिष्टे कलम ५५ मध्ये स्पष्ट केली आहेत. त्यांच्या प्राप्तीसाठी नवीन संस्था, संघटनेच्या स्थापनेची आवश्यकता भासल्यास संयुक्त राष्ट्र जेथे कोठे योग्य समजेल तेथे संबंधीत राष्ट्रांशी चर्चेला सुरूवात करेल.

**२) आर्थिक व सामाजिक परिषद :**

मानवाधिकारांच्या संरक्षणात संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. सन १९५६ साली परिषदेने सर्व सदस्य राष्ट्रांना दर तीन वर्षांनी आपल्या राष्ट्रातील मानवाधिकारांच्या परिस्थिती संबंधी अहवाल सादर करायला सांगितले आहे. यामध्ये मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी राष्ट्राने उपलब्ध करून दिलेल्या सुविधा, मानवाधिकार उल्लंघनाच्या घटना यांचा लेखाजोखा अहवालामध्ये नमूद करणे राष्ट्रांसाठी बंधनकारक होते. आर्थिक आणि सामाजिक परिषदेच्या या पुढाकारांमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवाधिकारांच्या संरक्षणाविषयी पोषक परिस्थिती निर्मण होऊन या प्रश्नाविषयी राष्ट्रे संवेदनशील बनली.

संयुक्त राष्ट्रांच्या सनदेतील प्रकरण दहा मध्ये कलम ६२ ते ६६ ही आर्थिक व सामाजिक परिषदेची कार्ये व अधिकार स्पष्ट केलेले असून त्यामधील,

**कलम ६२(१)** मध्ये हे स्पष्ट केले आहे की, परिषद आंतरराष्ट्रीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व आरोग्य संबधात अध्ययन करून अहवाल तयार करू शकते व या संदर्भात महासभेला, सदस्यांना व इतर संघटनांना सल्ला देऊ शकते.

**कलम ६२(२)** मध्ये हे स्पष्ट केले आहे की, ही परिषद मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्ये यांचे पालन करणे संदभार्त व त्यांचा सन्मान राखण्यासंर्भात संयुक्त राष्ट्रांच्या शिफारशी करू शकते.

**कलम ६८** मध्ये हे स्पष्ट केले आहे की, सामाजिक क्षेत्रात मानवी हक्कांना व्यापक रूप देणेसाठी व त्यांच्या प्रचार-प्रसारासाठी आर्थिक व सामाजिक परिषद 'आयोगा'ची स्थापना करेल.

### ३) संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोग :

सन १९४६ मध्ये स्थापन झालेल्या 'मानवी हक्क आयोगा'ची महत्त्वाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे -

१) संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रांत मानवी हक्क संरक्षणाच्या स्थितीचा आढावा घेणे.

२) मानवी हक्काबाबत जाणीव जागृती व संरक्षण.

३) अल्पसंख्यांक, महिला, बालक व युद्धकैदि यांच्या हक्कासंदर्भात जाणीव-जागृती करणे.

याच बरोबर मानवी हक्क आयोगाकडे पुढील महत्त्वाची कार्ये सोपवण्यात आली.

१) मानवी हक्कांची यादी तयार करणे.

२) नागरी व राजकीय हक्क या करारनाम्याचा मसुदा तयार करणे.

३) आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क या करारनाम्याचा मसुदा तयार करणे.

४) अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी विशेष तरतुदी कणे.

५) वंश, धर्म, भाषा, लिंग इ. आधारावरील भेदभाव नष्ट करणेसाठी प्रयत्न करणे.

## २.३.२ मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा १९४८ :

सन १९४५ ला संयुक्त राष्ट्राने स्विकारलेली 'संयुक्त राष्ट्रांची सनद' हे मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेतील पहिले पाऊल होते. हे जरी खरे असले तरी या सनदेमध्ये मानवी हक्क स्पष्ट करताना त्यामध्ये सुस्पष्टता व नेमकेपणा यांचा अभाव होता. तसेच, मानवी हक्क म्हणजे नेमके काय? मानवी हक्कामध्ये नेमक्या कोण-कोणत्या हक्कांचा समेवाश होतो? या प्रश्नांची नेमकी उत्तरे मिळत नाहीत. यामुळे अनेक समस्या राष्ट्रांनी दोन गोष्टींची मागणी केली. ती म्हणजे, मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी व दुसरे म्हणजे मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक तरतुदी करणे. सदस्य राष्ट्रांच्या या मागण्या मान्य करत मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करण्याची जबाबदारी संयुक्त राष्ट्रांने १९४६ ला स्थापन केलेल्या 'मानवी हक्क आयोगा'कडे सोपवण्यात आली. यानुसार अयोगाने 'मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा' तयार केला. संयुक्त राष्ट्र आमसभे/महासभेने १० डिसेंबर १९४८ ला हा जाहीरनामा स्वीकारून तो घोषित केला. म्हणूनच मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेतील हा जाहिरनामा म्हणजे महत्त्वाचा दस्तऐवज होय. या जाहीरनाम्याचा उद्देश व भूमिका तसेच या जाहीरनाम्यातील मानवी हक्कांची यादी पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

या जाहिरनाम्याच्या प्रस्तावनेत असे म्हटले आहे की, सर्व मानवांना समान हक्क मिळणे आणि त्यांच्या प्रतिष्ठेचे रक्षण होणे हा जगातील स्वातंत्र्य, न्याय व शांतता यांचा पाया होय. तसेच मानवी हक्कांचे उल्लंघन व त्याचा अनादर यातून निर्माण होणारी रानटी कृत्ये हा मानवजातीच्या सद्सद्विवेकबुद्धीवर झालेला आघात होय. म्हणून मानवी हक्कांचे रक्षण होण्यासाठी त्याचे स्वरूप समजावून घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

त्याकरीता आमसभेने मानवी हक्कांचा जाहिरनामा प्रसिद्ध करून मानवी हक्कांचे मापदंड किंवा मानके निश्ति केले आहेत. जगातील सर्व मानवांना आणि सर्व राष्ट्रांना मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यातील तत्त्वांचा लाभ घेता येईल या दृष्टिने सर्व स्तरांवर प्रयत्न केले जावेत असेही या जाहीरनाम्यात म्हटले आहे.

### ❖ जाहिरनाम्याची भूमिका व उद्देश :

**१) मुख्य उद्दिष्ट :** मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करून त्यास आंतरराष्ट्रीय समुदायाची राजकीय मान्यता प्राप्त करून घेणे.

२) जगातील प्रत्येक व्यक्तीला त्यांची जन्मजात प्रतिष्ठा व त्याच्या समान, मूलभूत हक्कांना मान्यता देणे. याकरीता जगात स्वातंत्र्य, न्याय व शांतता यांच्या प्रस्थापणेकरीता प्रयत्न करणे.

३) प्रत्येक व्यक्तीला भाषण, श्रद्धा इत्यादी स्वातंत्र्याची प्राप्ती झाली पाहिजे व भिती अभावग्रस्ततेपासून मुक्त असे जग साकार व्हावे ही लेकांची सर्वोच्च आकांक्षा पूर्ण करणे.

४) मानवी हक्कांना कायदेशीर संरक्षण प्राप्त करून देणे.

५) राष्ट्रा राष्ट्रांना मित्रत्वाच्या नात्याचे संवर्धन करणे.

६) अधिकाधिक मुक्त वातावरणात सामाजिक प्रगती आणि चांगल्या दर्जाच्या जीवनमानाचे संवर्धन करणे.

७) संयुक्त राष्ट्राच्या सहकार्याने मानवी हक्कांचा आणि मूलभूत स्वातंत्र्याचा सार्वत्रिक सन्मान व आचरण यांचे संवर्धन करणे.

यासाठी हा जाहीरनामा व सर्व राष्ट्रांसाठी ध्येयसिद्धीचा एक समान आदर्श म्हणून उद्घोषित करीत आहे.

### ❖ मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा :

**प्रस्तावना :** प्रत्येक व्यक्ती व समाजातील प्रत्येक घटकाच्या अंतिम सिद्धीसाठी सर्व लोकांकरीता व सर्व राष्ट्रांकरीता एक सामाईक दर्जा संपादित करण्यासाठी हा मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा असून हा जाहीरनामा विचारात घेऊन, अध्यापन व शिक्षण याद्वारे या हक्काबद्दल व स्वातंत्र्याबद्दल आदर वृद्धिंगत करण्यासाठी आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय, प्रागतिक उपाययोजना करून, सदस्य राष्ट्रांच्या लोकांमध्ये व त्याच्या अधिकारक्षेत्रातील राज्यक्षेत्रांच्या लोकांमध्ये यांना वैश्विक व परिणामकारक मान्यता मिळविण्याची व त्यांचे अनुपानल करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करण्यात येईल.

१० डिसेंबर १९४८ ला संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने स्विकारलेला व घोषित केलेल्या जाहीरनाम्यात एकूण ३० कलमे आहेत. यातून मानवी हक्कांबाबत आश्वासन, राजकीय व नागरी हक्क व आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क स्पष्ट केले आहेत. त्यांची संक्षिप्त माहिती पुढीलप्रमाणे –

**कलम १ –** सर्व मानवी व्यक्ती जन्मत: स्वतंत्र आहेत. सर्वांनाच समान अधिकार व समान प्रतिष्ठा आहे.

**कलम २ –** या जाहीरनाम्यातील सर्व हक्क व स्वातंत्र्य प्रत्येकास आहेत. वंश, लिंग, धर्म... इ. कोणत्याही आधारे कोणताही भेदभाव केला जाणार नाही. जाहीरनाम्यातील उपरोक्त दोन कलमे अशाप्रकारे मानवी हक्कांबाबतचे आश्वासन सर्वांना देतात.

**कलम ३ –** प्रत्येकाला जीविताचा, स्वातंत्र्याचा व शारीरिक सुरक्षेचा हक्क आहे.

**कलम ४ –** सर्व प्रकारच्या गुलामगिरीस व गुलामांच्या व्यापारांस प्रतिबंध केला जाईल.

**कलम ५ –** कोणालाही अमानुष, अपमानास्पद वागणूक दिली जाणार नाही. छळ केला जाणार नाही.

**कलम ६ –** जगातील सर्व कायद्यासमोर माणूस म्हणून मान्यता मिळण्याचा प्रत्येकाला हक्क आहे.

**कलम ७ –** कायद्यासमोर सर्व समान व सर्वांना कायद्याच्या समान संरक्षणाचा हक्क आहे.

**कलम ८ –** मूलभूत हक्क जे कायद्याने प्राप्त आहेत. त्यांच्या भंगाच्या विरोधात सक्षम राष्ट्रीय न्यायव्यवस्थेद्वारे उपाययोजनेचा हक्क आहे.

**कलम ९ –** कोणालाही मनमानी पद्धतीने अटक, स्थानबद्ध किंवा हद्दपार केले जाणार नाही.

**कलम १० –** प्रत्येकाला त्याचे हक्क, जबाबदाऱ्या व दंडनीय आरोप याबाबत निर्णयासाठी स्वतंत्र व नि:पक्षपाती न्याय व जाहीर सुनावणीचा हक्क आहे.

**कलम ११ –** आरोप सिद्ध होईपर्यंत आरोपीस निरपराध गृहित धरणेचा हक्क, एखाद्याने ज्यावेळी जे कृत्य केले ते त्यावेळच्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कायद्याने गुन्हा ठरत नसेल तर तो दोषी धरता कामा नये. व तरतुदीपेक्षा जास्त कडक शिक्षा करता येणार नाही.

**कलम १२ –** कोणाच्याही खाजगी जीवनात हस्तक्षेप केला जाता कामा नये. यासाठी कायद्याचे संरक्षण मिळवण्याचा हक्क आहे.

**कलम १३ –** प्रत्येकाला देशाच्या सरहद्दीत कोठेही संचार व वास्तव्य करण्याचा हक्क आहे.

**कलम १४ –** छळापासून मुक्तता करून घेण्याचा इतर देशात आश्रय मिळवण्याचा हक्क आहे.

**कलम १५ –** प्रत्येकास राष्ट्रीयत्व मिळवण्याचा हक्क; कोणाचे राष्ट्रीयत्व मनमानीपणे हिरावून घेता येणार नाही. तसेच राष्ट्रीयत्व बदलण्याचा हक्क नाकारता येणार नाही.

**कलम १६ –** सज्ञान स्त्री-पुरुषांना कोणत्याही बंधनाशिवाय विवाह करण्याचा हक्क, वैवाहिक जीवनाबाबत, विवाह विच्छेदनाबाबत समान अधिकार आहे. विवाहास परस्पर संमती आवश्यक. तसेच कुटुंबाला समाज व शासनाकडून संरक्षण मिळवण्याचा हक्क आहे.

**कलम १७ –** मालमत्तेवर मालकी असण्याचा हक्क व बळजबरीने कुणाची संपत्ती हिरावून घेतली जाणार नाही हे संरक्षण.

**कलम १८ –** प्रत्येकाला आपल्या धर्मानुसार आचरणाचे स्वातत्र्य व धर्म, श्रद्धा बाळगण्याचा हक्क.

**कलम १९ –** प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा व माहिती मिळवण्याचा हक्क आहे.

**कलम २० –** प्रत्येकाला संघटना स्थापन करण्याचा व शांततापूर्वक सभा घेण्याचा हक्क आहे. कोणत्याही संघटनेचा सदस्य होण्याची सक्ती केली जाऊ नये.

**कलम २१ –** प्रत्येकास शासनात व मुक्त मतदानात सहभागी होण्याचा हक्क व प्रत्येकाला सार्वजनिक सेवेत सहभाग घेण्याची समान संधी आहे.

अशाप्रकारे मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्यात कलम तीन ते एकवीस अशी एकोणीस कलमे नागरी व राजकीय हक्क स्पष्ट करतात.

**कलम २२ –** प्रत्येक सामाजिक सुरक्षिततेचा व आपली प्रतिष्ठा, व्यक्तीमत्त्व यांच्या मुक्त विकासास आवश्यक आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार संपादन करण्याचा हक्क.

**कलम २३ –** प्रत्येकाला इच्छेनुसार कामाची निवड करण्याचा, समान कामास समान वेतन मिळवण्याचा, व्यापारी संघ बनवण्याचा किंवा त्यात सहभागी होण्याचा हक्क आहे.

**कलम २४ –** प्रत्येकास कामामधून विश्रांतीसाठी वेळ मिळवण्याचा हक्क आहे.

**कलम २५ –** आपण आपल्या कुटुंबास आरोग्य व कल्याणासाठी आवश्यक जीवनमान प्राप्त करण्याचा हक्क तसेच सर्व मूलांना सारखेच संरक्षण प्राप्त झाले पाहिजे.

**कलम २६ –** हे कलम शिक्षणविषयक विविध हक्कासंदर्भात असून प्रत्येकाला शिक्षणाचा हक्क स्पष्ट करते.

**कलम २७ –** प्रत्येकास समाजाच्या सांस्कृतिक जीवनात तसेच वैज्ञानिक प्रगतीतून मिळणाऱ्या लाभात सहभागाचा हक्क.

**कलम २८ –** जाहीरनाम्यातील हक्क, स्वातंत्र्य प्राप्त होणेसाठी सामाजिक व आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा प्रत्येकास हक्क आहे.

**कलम २९ –** समाजाप्रती व्यक्तीचे कर्तव्ये या संदर्भात हे कलम मार्गदर्शन करते.

**कलम ३० –** वरीलपैकी कोणत्याही हक्कात ढवळाढवळीस ते नष्ट करण्यास प्रतिबंध.

या हक्कांचा आणि स्वातंत्र्याचा आदर राखला जाण्यासाठी प्रत्येक व्यक्ती व समाजातील प्रत्येक घटक हा जाहिरनामा सतत डोळ्यांपुढे ठेवून अध्यापन व शिक्षणाच्या माध्यमातून, राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय पूरोगामी उपाययोजनाद्वारे स्वत: सदस्य राष्ट्रांच्या लोकांमध्ये आणि त्यांच्या अखत्यारीतील प्रदेशांमधील लोकांमध्ये या

हक्क व स्वातंत्र्याना सार्वत्रिक मान्यता मिळवून देण्यासाठी व त्यांचे परिणामकारक पालन केले जाण्याची खातरजमा करण्यासाठी निकराचे प्रयत्न करतील.

अशाप्रकारे कलम बावीस ते तीस मानवी हक्कांच्या सनदेतील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क स्पष्ट करतात.

**२.३.३ संयुक्त राष्ट्रांची आमसभा / महासभा** (UN General Assembly) :

"Town meeting of the whole world" म्हणून उल्लेखलेल्या व संयुक्त राष्ट्रांचे Deliberative Body (विचारविमर्श मंडळ) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या पाच मुख्य घटकांपैकी एक असणाऱ्या आमसभा / महासभेचे स्वरूप, रचना, अधिकार व कार्ये याबाबतचे विवेचन संयुक्त राष्ट्रांच्या सनदेतील चौथ्या प्रकरणात कलम ०९ ते २२ मध्ये प्रामुख्याने केलेले आहे. अशा या आमसभेचे स्वरूप, रचना व कार्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

❖ **आमसभेचे स्वरूप / वैशिष्ट्ये :**

१) संयुक्त राष्ट्रांच्या प्रमुख पाच घटकांपैकी एक असणारी आमसभा सर्वात मोठा घटक म्हणून ओळखला जातो.

२) संयुक्त राष्ट्रांच्या मधील सर्व सदस्य देशांना प्रतिनिधीत्व प्राप्ती असणारा महासभा हा एकमेव घटक आहे.

३) संयुक्त राष्ट्रांच्या सर्व सदस्य राष्ट्रांच्या सामुहिक हितसंबंधी प्रश्नांवर जागतिक पातळीवरील विचारविनिमय व वाटाघाटी करण्यासाठीचे जागतिक स्तरावरील 'मध्यवर्ती व्यासपीठ' म्हणून आमसभेस ओळखतात.

४) जागतिक स्वरूपाच्या अशा समस्या किंवा प्रश्न की जे आंतरराष्ट्रीय समुदायाशी संबंधीत आहेत. त्या प्रश्नांवर विचारविनिमयाद्वारे सर्वमान्य असा तोडगा अथवा सहमती निर्माण करण्याची जबाबदारी पार पाडणारा संयुक्त राष्ट्रांचा प्रमुख घटक म्हणजे आमसभा होय.

५) संयुक्त राष्ट्रातील प्रत्येक सदस्य राष्ट्राला एखाद्या विषयावरील आपले विचार अथवा तक्रारी मांडण्याचे तसेच दोन सदस्य राष्ट्रातील एखादा विषय जागतिक स्तरावर नेण्यासाठीचा महत्त्वाचा मार्ग अथवा व्यासपीठ म्हणजे आमसभा.

६) आमसभेस 'संयुक्त राष्ट्रांचे कायदेमंडळ' म्हणून ओळखले जाते. कारण अंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेच्या प्रश्नाशिवाय इतर सर्व विषयाबाबतचे धोरण ठरविण्याचा अधिकार आमसभेस आहे.

७) आज अस्तित्वात असणाऱ्या अनेक आंतरराष्ट्रीय करारांचा पाया वेळोवेळी आमसभेने संमत केलेल्या ठरावांनी घातला गेला आहे.

❖ **आमसभेची रचना :**

**मुख्यालय –** न्यूयॉर्क

**सदस्यत्व –** संयुक्त राष्ट्रांच्या सर्व सदस्य राष्ट्रे ही आमसभेचे सदस्य असतात. त्याचवेळी कोणत्याही सदस्य देशाची पाचपेक्षा अधिक प्रतिनिधी असणार नाहीत हे बंधन असते.

**अध्यक्ष –** (१) महासभेच्या वार्षिक बैठकीवेळी अध्यक्षाची निवड केली जाते.

२) महासभेचे सदस्य गुप्त मतदान पद्धतीने अध्यक्षाची निवड करतात.

३) अध्यक्षाचा कार्यकाळ एक वर्षाचा असतो.

४) महासभेचे कामकाज चालवणे, शिस्त व कामकाजाविषयक नियमांचे पालन यावर लक्ष ठेवणे इ. महत्त्वाची कार्ये अध्यक्षांची आहेत.

**उपाध्यक्ष :** महासभेतील विविध क्षेत्राचे कामकाज पाहण्यासाठी २१ उपाध्यक्षांची निवड केली जाते. आप-आपल्या क्षेत्राशी संबंधीत कार्ये संबंधीत उपाध्यक्षास पार पाडावी लागतात.

❖ **महासभेची बैठक –**

१) प्रत्येक वर्षी वर्षातून एकवेळ सप्टेंबर महिन्यात बैठक पार पडते.

२) बैठक महासभेचे मुख्यालय न्यूयॉर्क येथे होते.

३) उपरोक्त वार्षिक बैठकीव्यतिरिक्त आवश्यकता भासल्यास 'विशेष बैठक' संयुक्त राष्ट्राचे महासचिवांच्या अधिकारात बोलावली जाऊ शकते.

४) १९५० पासून आवश्यकता भासल्यास 'आणीबाणी बैठक' बोलवण्याची परंपरा सुरू झाली.

**महासभेच्या समित्या :** महासभा आपले कार्य पुढील प्रमुख सहा समित्यामार्फत पार पाडते.

१) राजकीय व संरक्षण समिती.

२) आर्थिक व वित्तीय समिती.

३) सामाजिक, मानवतावादी व सांस्कृतिकवादी समिती.

४) प्रशासकीय आणि अर्थसंकल्प समिती.

५) विश्वस्त राष्ट्रासंबंधी समिती.

६) कायदेशीर प्रश्नासंबंधी समिती.

❖ **महासभेचे कार्य, अधिकार :**

**१) चर्चा व शिफारशी :** संयुक्त राष्ट्रांच्या सनदेतील कोणत्याही विषयावर खुली चर्चा महासभेत होते.

तसेच सुरक्षा परिषदेच्या वार्षिक अहवालावरही चर्चा होते. साहजिकच संयुक्त राष्ट्रांच्या सामुहिक हिताशी संबंधीत व सर्वच मानव जातीच्या हिताशी संबंधित मानवी हक्क, पर्यावरण, दहशतवाद, वंशवाद, अण्वस्त्रांचा प्रसार इ. अनेक विषयावर चर्चा होऊन ठराव केले जातात. यातील अनेक विषय व त्यावरील ठराव प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या मानवी हक्कांच्या संरक्षण व संवर्धनासाठी सहाय्यकारी ठरतात. व त्यांना जागतिक राजमान्यताही लाभते. त्यामुळे महासभेत होणारी चर्चा व ठराव हे मानवी हक्कांच्या संदर्भात जागतिक पातळीवरील महत्त्वाचा दस्तऐवज ठरतो.

**२) आर्थिक अधिकार :** यामध्ये महासभेच्या अर्थसंकल्पाला मंजूरी देणे, नियंत्रण ठेवणे, यासंदर्भात चर्चा घडवून आणणे, खर्चावर नियंत्रण, निधीबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार महासभेस आहे.

**३) निर्वाचन अधिकारी :** सुरक्षा परिषदेतील दहा हंगामी सदस्य, आर्थिक व सामाजिक समिती सदस्य, आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधिश व सुरक्षा परिषदेच्या शिफारशीनुसार महासचिवांची नेमणूक करण्याचा अधिकार महासभेस आहे.

**४) घटना दुरुस्ती अधिकार :** महासभेला आहे घटना दुरुस्ती करीता सुरक्षा परिषदेच्या पाच कायम सदस्यांची अनुमती व महासभेचे २/३ बहुमत लागते.

**५) पर्यवेक्षी कार्ये :** संयुक्त राष्ट्रांच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांकडून अहवाल घेणे, त्यांच्या कार्यावर देखरेख ठेवणे, अहवालावर चर्चा करून शिफारशी करणे, येथील नोकरभरती संबंधी कार्य विविध संस्थात समन्वयाचे कार्य करते.

❖ **महासभा व मानवी हक्क :**

१) जे विषय संयुक्त राष्ट्रांच्या सनदेमध्ये अंतर्भूत आहेत. अशा कोणत्याही विषयावर महासभेत सखोल चर्चा होते. ही चर्चा जागतिक स्तरावरील व सर्व सदस्यराष्ट्रांच्या प्रतिनिधीसमोर होते. त्यानंतर त्या संबंधी ठराव होतात. यामध्ये मानवी हक्कासंदर्भातही सातत्याने प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष चर्चा होते व ठराव होतात. त्यातूनच पुढे मानवी हक्कांशी संबंधीत विविध करारनामे होतात. त्यातून मानवी हक्कांना जागतिक पातळीवर कायदेशीर मान्यता मिळते.

२) संयुक्त राष्ट्रांची महासभा आपल्या 'आर्थिक व सामाजिक समिती'च्या माध्यमातून इतर समित्यांच्या सहकार्याने सदस्य राष्ट्रांच्या विकासासाठी विविध कार्यक्रम, उपक्रम राबवते. यापैकी अनेक उपक्रम व कार्यक्रम मानवी हक्कांच्या संरक्षण, संवर्धनासाठी असतात.

३) महासभेच्या 'सामाजिक, मानवतावादी व सांस्कृतिक प्रश्नासंबधी समिती' मार्फत सदस्य देशात मानवी हक्कांची प्रस्थापना जतन व संवर्धन यासंबंधी भरीव कार्य चालते. ही समिती आमसभेच्या माध्यमातून 'मानवी हक्क व सदस्य राष्ट्रे' या संदर्भातील वस्तुस्थिती पुढे आणतात. त्यावर चर्चा होते व ठराव होऊ शकतो. त्यामुळे सदस्य राष्ट्रे आपल्या राष्ट्रात मानवी हक्कांचा भंग होणार नाही याबाबत काळजी घेतात.

**२.३.४ (१) आर्थिक व सामाजिक परिषद** (Economic and Social Council) :

संयुक्त राष्ट्रांची स्थापना मुख्यत: आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेसाठी झाली असली तरी व्यक्तीगत जीवन विकासासाठी आवश्यक मानवी हक्कांचे संरक्षण करणे हा ही एक संयुक्त राष्ट्रांच्या सनदेतील कलम १(३) मध्ये तो स्पष्ट केला आहे. कारण राष्ट्र असो किंवा जागतिक सर्व राष्ट्रे असोत जोपर्यंत तेथे आर्थिक आणि सामाजिक प्रगती होत नाही; तोपर्यंत शांतता व सुरक्षिततेचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. अर्थात अशा प्रकारच्या प्रगतीसाठी राष्ट्रा-राष्ट्रांत सहकार्य असणे खूप आवश्यक असते. म्हणूनच सदस्य राष्ट्रांत सहकार्य निर्माण करून प्रगती साधण्यासाठी संयुक्त राष्ट्राने ''आर्थिक व सामाजिक परिषद'' स्थापन केली.

❖ **आर्थिक व सामाजिक परिषदेची उद्दिष्टे :**

संयुक्त राष्ट्रांच्या सनदेतील प्रकरण नऊ मधील कलम ५५ मध्ये या परिषदेच्या स्थापनेमागील तीन उद्दीष्टे स्पष्ट केली आहेत ती पुढीलप्रमाणे -

१) कलम ५५ (क) नुसार, राहणीमानाचा उच्च जीवनस्तर, संपूर्ण रोजगार आणि आर्थिक व सामाजिक प्रगती साधणेसाठी.

२) कलम ५५(ख) नुसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील आर्थिक, सामाजिक आणि आरोग्य संबधी समस्या सोडवणे व सांस्कृतिक व शिक्षण क्षेत्रात प्रगतीसाठी सदस्य राष्ट्रात सहकार्य साधणे.

३) कलम ५५(ग) नुसार, मानवी हक्क तसेच मूलभूत स्वातंत्र्य यासाठी जात, लिंग, भाषा किंवा धर्म इ. भेदभाव न करता मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्याविषयी आदर निर्माण करणे व त्याचे पालन करणेसाठी.

❖ **रचना :**

**सदस्यत्व :** संयुक्त राष्ट्रातील सदस्य राष्ट्रांना निवडणूक घेऊन यामध्ये सदस्यत्व प्राप्त होते.

संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेवेळी सदस्य संख्या १८ होती. सध्या ही संख्या ५४ आहे. या सदस्यांची निवड आमसभेकडून केली जाते.

प्रत्येक सदस्याचा कार्यकाल तीन वर्षाचा असतो. पण सदस्यांना पुर्ननियुक्तीची सुविधा आहे.

**अध्यक्ष :** या परिषदेच्या अध्यक्षांची निवड परिषदेतील सदस्यातून एकाची बहुमताने केली जाते. कार्यकाल एक वर्ष.

**बैठका :** परिषदेच्या वर्षातून दोन बैठका 'विशेष बैठक' बोलावली जाऊ शकते.

**परिषदेचे आयोग :** आर्थिक व सामाजिक परिषदेच्या अधिपत्याखाली दोन प्रकारचे आयोग कार्यरत असतात.

**१) कार्यकारी आयोग :** यामध्ये वित्तीय व रोजगार आयोग, मानव अधिकार सभा, लोकसंख्या आयोग, महिला आयोग हे येतात.

**२) विभागीय आयोग :** यामध्ये युरोप, आशिया, लॅटिन, अमेरीका या भौगोलिक विभागासाठीचे आर्थिक आयोग येतात.

❖ **आर्थिक व सामाजिक परिषदेची कार्ये :**

१) आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठी विविध आयोगाची स्थापना करून त्या माध्यमातून या संबंधीच्या प्रगतीचा प्रयत्न करणे.

२) आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य इ. तील प्रगतीसाठी अध्ययन व संशोधन करणे. या संदर्भातील समस्यांवर उपाययोजना शोधणे व त्या उपाययोजना करण्यासाठी महासभेला अहवाल सादर करणे.

३) आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करणे व त्यामाध्यमातून आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य संबंधी समस्यावर चर्चा घडवून आणणे. विचार मंथन करणे.

४) आर्थिक, सामाजिक इ. च्या विकास प्रक्रियेतील प्रश्नांसंबंधी आवश्यक त्या शिफारशी आमसभेला व संयुक्त राष्ट्रा अंतर्गत कार्यकरणाऱ्या विविध संस्था, संघटनाना देणे.

५) मानवी हक्कांच्या प्रसारासाठी, मानवी हक्कांविषयी आदर वाढावा यासाठी प्रयत्न करणे. त्यासाठी एका आयोगाची स्थापना करणे. तसेच यासंबंधी शिफारशी करणे.

६) संयुक्त राष्ट्रांच्या 'सुरक्षा परिषदेला' आवश्यक ती माहिती आवश्यक तेव्हा पुरवण्याचे कार्य.

७) आर्थिक व सामाजिक परिषदेच्या अधिपत्याखाली कार्य करणाऱ्या संस्थामध्ये समन्वय राखणे व त्यांच्याकडून त्यांच्या कार्याचा अहवाल प्राप्त करून घेणे.

८) आमसभेला आपला वार्षिक अहवाल सादर करणे व आमसभेकडून विचारण्यात आलेली माहिती वेळोवेळी त्यांना देणे.

९) आमसभेने याशिवाय टाकलेल्या अतिरिक्त जबाबदाऱ्या किंवा कार्य करणे.

❖ **आर्थिक व सामाजिक परिषदेचे मानवी हक्क, संरक्षण संवर्धनातील कार्य :**

आर्थिक व सामाजिक परिषदेची उपरोक्त ०९ कार्ये ही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मानवी अधिकारांचे जतन व संवर्धन करतात. याच कार्यक्षेत्रातून या परिषदेकडून घडलेली काही महत्त्वाची मानवी हक्क संदर्भातील कार्ये पुढीलप्रमाणे -

१०) १९६० ते १९७० च्या दशकात आशिया व आफ्रिका खंडातील गरीब देशातील अर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आयोग्यविषयक समस्यांचे अध्ययन, संशोधन करून त्यावर उपाय योजना करण्यास प्रारंभ केला.

११) अविकसित व गरीब राष्ट्रातील महिला व बालकांचे प्रश्न यावर लक्ष केंद्रित करून महिला व बालकल्याणासाठी विशेष आयोग स्थापन केले.

१२) उपासमार, कुपोषण यावरती उपाययोजनेसाठी आयोग स्थापन करून प्रयत्न करण्यात आले.

१३) बेरोजगारी, गुन्हेगारी, व्यसनाधिनता, शहरीकरणातील समस्या, वाढती लोकसंख्या यांच्या अध्ययन, संशोधनासाठी व उपाययोजनेसाठी प्रयत्न केले. आयोग स्थापन केले.

१४) आशिया, आफ्रिका, उत्तरपूर्व आशिया, लॅटिन अमेरिका सारख्या भौगोलिक विभागांच्या आर्थिक विकासासाठी ''प्रादेशिक आर्थिक आयोग'' स्थापन करून त्यासंबंधी कार्य.

**२.३.४ (२) संयुक्त राष्ट्रांचे मानवी हक्क आयोग** (Human Rights Commission and UN Human Rights Commission)

**अ) मानवी हक्क आयोग :**

संयुक्त राष्ट्राकडून स्विकारण्यात आलेल्या १९४५ च्या 'संयुक्त राष्ट्रांच्या सनदे'तील प्रस्तावनेतच संयुक्त राष्ट्रांचा जे उद्देश स्पष्ट केले आहेत; त्यापैकी एक म्हणजे, 'मूलभूत मानवी हक्क, प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा व महत्त्व यांच्या संरक्षण, संवर्धनासाठी आणि पुरुष व स्त्रिया तसेच लहान व मोठी राष्ट्रे यांच्या समान अधिकाराप्रती आस्था राखणे व ती बळकट करणे हा एक उद्देश होता. तथापी संयुक्त राष्ट्रासमोर मानवी हक्कासंबधी कार्य करताना दोन आव्हाने होती ती म्हणजे,

१) मानवी हक्काचा अर्थ व आशय स्पष्ट करून मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करणे.

२) मानवी हक्कांच्या रक्षणासाठी आवश्यक तरतुदी करून त्या सदस्य राष्ट्रांना बंधनकारक करण्यासाठी आंतरराष्ट्रीय करारनामे करणे या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संयुक्त राष्ट्रांने १९४६ ला एका स्वतंत्र 'मानवी हक्क आयोगाची' स्थापना केली. या आयोगाची माहिती व मानवी हक्कांबाबतचे कार्य पुढीलप्रमाणे -

स्थापना - १९४६

मुख्यालय - जिनिव्हा

सदस्य - ५३

कार्यकाल - ३ वर्षे

सदस्यत्व - एका राष्ट्रास एकावेळी एकच सदस्यत्व

❖ **उद्देश :**

**१) मुख्य उद्देश :** मानवी हक्कामध्ये सुस्पष्टता, एक वाक्यता आणत त्यांचे संरक्षण, संवर्दनासाठी कार्य करणे.

२) संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रातील मानवी हक्काबाबतच्या परिस्थितीवर देखरेख ठेवणे.

३) मानवी हक्कांच्या संदर्भात जागृती करून त्यांचे संरक्षण करणे.

४) महिला, बालके, अल्पसंख्यांक व युद्ध कैदि यांच्या हक्कांबाबत आंतरराष्ट्रीय समुदायास संवेदनशील

बनवून या घटकांच्या मानवी हक्कांचे रक्षण करणे.

❖ **भूमिका, जबाबदाऱ्या :**

संयुक्त राष्ट्रांने या आयोगाकडे पुढील प्रमुख चार भूमिका, जबाबदाऱ्या सोपवल्या.

१) मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी बनवून ती संहिताबद्ध करणे.

२) आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपाच्या हक्काबाबत तसेच नागरी व राजकीय हक्काबाबत आंतरराष्ट्रीय कराराचे मुसदे तयार करणे.

३) अल्पसंख्यांकाच्या हक्कांचे रक्षण करण्याकरीता विशेष तरतुदी करणे.

४) वंश, धर्म, भाषा व लिंग इत्यादी आधारावर केला जाणारा भेदभाव नष्ट करणे.

❖ **कार्ये :**

१) मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करून 'मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा १९४८' तयार केला. त्यातून,

२) मानवी हक्क म्हणजे नेमके काय ? कोणत्याही हक्कांना मानवी हक्क म्हणून संबोधण्यात यावे हे स्पष्ट करण्यात आले. तसेच,

३) मानवी हक्कांसंबंधी असणारे गैरसमज, विवाद व विसंगती आंतरराष्ट्रीय पातळीवरून दूर करण्यात आल्या. यामुळे.

४) मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेतील पहिले पाऊल या माध्यमातून 'मानवी हक्क आयोगा'च्या माध्यमातून संयुक्त राष्ट्रांनी टाकले हे महत्त्वाचे कार्य केले.

५) 'आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' चा मसुदा तयार करून आमसभेपुढे ठेवण्यात आला. तो स्विकारण्यात आला.

६) 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' चा मसुदा तयार करून आमसभेपुढे ठेवला. तो स्विकारण्यात आला.

७) 'नागरी व राजकीय हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्यासंबंधी पर्यायी मसुदा' तयार केला.

८) 'नागरी व राजकीय हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्यातील दुसरा पर्यायी मसुदा' देहदंडाच्या निर्मूलनाच्या उद्देशाने तयार केला तो १५ डिसेंबर १९८९ ला स्वीकारला व ११ जूलै १९९१ अंमलात आणला.

९) संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य देशांना 'मानवी हक्कांचा' संदर्भात असणारी वास्तव स्थितीवर देखरेख ठेवून मानवी हक्काबाबत जागृतीचे कार्य आयोग करत आहे.

१०) महिला, बालके, अल्पसंख्यांक, युद्धकैदी यांच्या हक्कांबाबत आंतरराष्ट्रीय समुदायाला जागरूक बनवून या हक्कांचे रक्षण करण्याचा प्रयत्न आयोग करत आहे.

११) वंश, धर्म, जात, लिंग, भाषा व वर्ण इत्यादी आधारावर होणारा भेदभाव नष्ट करून सर्वांना मानव म्हणून प्राप्त 'मानवी हक्क' प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**ब) संयुक्त राष्ट्रांचे मानव अधिकार उच्चायुक्त** (High Comissioner for Human Rights) :

विविध राष्ट्रात राष्ट्रांतर्गत विविध स्वरूपाचे संघर्ष व भेदभाव तसेच राष्ट्रधोरणाचा परिणाम म्हणून मानवी हक्कातील व्यक्तीगत स्वरुपच्या मानवी हक्कांचे उल्लंघन वाढते आहे या बाबीकडे १९९३ च्या 'व्हिएन्ना मानव अधिकार परिषदेत' आंतर राष्ट्रीय समुदायाचे लक्ष वेधण्यात आले व 'व्यक्तीगत मानव अधिकारावर' व्यपाक चर्चा झाली व यासाठीच १९९३ 'मानव अधिकार उच्चायुक्त' पद निर्माण करण्यात आले. त्याबाबतची आर्थिक माहिती पुढीलप्रमाणे -

पद निर्मिती - १९९३

मुख्यालय - न्यूयॉर्क

कार्यकाल - ०४ वर्षे

उच्चायुक्तावर नियंत्रण - महासचिव व आमसभेचे संयुक्तपणे.

❖ **कार्ये :**

१) सर्व व्यक्तींच्या मानवीहक्कांचे संरक्षण व संवर्धनासाठी कार्यरत राहणे.

२) ज्या यंत्रणा जागतिक स्तरावर कार्य करणाऱ्या यंत्रणामध्ये योग्य तो समन्वय राखणे.

३) ज्या राष्ट्रात मानवी हक्क उल्लंघनाच्या गंभीर घटना घडल्या आहेत; त्या घटनांची माहिती घेणे, चौकशी करणे.

४) आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्या विविध संस्था, आयोग, संघटना, मानवी हक्काच्या संरक्षण, संवर्धनासाठी कार्यरत आहेत. त्यांनी यासंबंधी ज्या योजना, उपक्रम, कार्यक्रम हाती घेतले आहेत त्या व्यवस्थित कार्य करतात का यावर लक्ष ठेवणे.

५) ज्या राष्ट्रात मानवीहक्क भंगाच्या गंभीर घटना घडल्या आहेत, घडत आहेत त्यासंबंधीचे अहवाल आमसभेला देणे.

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१**

**रिक्त जागा भरा.**

१) संयुक्त राष्ट्रांच्या .......... घटकास संयुक्त राष्ट्रांचे 'विचारविमर्श मंडळ' म्हणून ओळखतात.

२) संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेचे मुख्यालय ............. येथे आहे.

३) आर्थिक व सामाजिक परिषदेची उद्दिष्टे संयुक्त राष्ट्रांच्या सनदेतील .......... व्या कलमात स्पष्ट केली आहेत.

४) संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्क आयोगातील सदस्यत्वाचा कार्यकाल .......... वर्ष असतो.

५) संयुक्त राष्ट्रांचे मानव अधिकार उच्चायुक्त हे पद .............. साली निर्माण करण्यात आले.

★ **स्वयं: अध्ययनासाठी प्रश्न–२**

**पुढील विधाने सत्य की असत्य सांगा.**

१) संयुक्त राष्ट्रांच्या सनदेवर न्यूयॉर्क येथे सदस्य राष्ट्रांच्या स्वाक्षऱ्या झाल्या.

२) मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा संयुक्त राष्ट्राने १० डिसेंबर १९४८ ला घोषित केला.

३) संयुक्त राष्ट्रांच्या सनदेतील प्रकरण १० मध्ये कलम ६२ ते ६६ ही 'आर्थिक व सामाजिक परिषदे' संदर्भात आहेत.

४) संयुक्त राष्ट्रासंघाने १० डिसेंबर १९४८ ला 'मानवी हक्क आयोगा'ची स्थापना केली.

५) संयुक्त राष्ट्रांच्या 'आर्थिक व सामाजिक परिषदेत' सर्व सदस्य राष्ट्रांना प्रतिनिधीत्व दिलेले आहे.

६) मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्यातील कलम १ ते ३ मध्ये विवाह विषयक हक्कांचा समावेश केला आहे.

७) मानवी हक्कांच्या 'नागरी व राजकीय हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्यात' एकूण ५३ कलमांचा समावेश आहे.

८) 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा' १९६६ साली अंमलात आला.

९) 'आर्थिक व सामजिक परिषदेची' सदस्य संख्या स्थापनेवेळी १८ होती.

१०) मानवी हक्क आयोगाचे मुख्यालय जिनिव्हा येथे आहे.

## २.४ सारांश :

जागतिक शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करणे यासाठी व्यक्तीस्वातंत्र्य व मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीयकरण करणे आवश्यक होते. यातून १९४५ संयुक्त राष्ट्रांची स्थापना झाली. संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत मानवी हक्क व स्वातंत्र्याच्या आंतर राष्ट्रीयकरणाची सुरूवात झाली. १९४६ ला संयुक्त राष्ट्रांनी 'मानवी हक्क व आयोगा'ची स्थापना केली. या आयोगाने 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' व 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' चा मसुदा तयार केला. हे दोन्ही करार १९७६ ला अंमलात आले. तसेच सुंयक्त राष्ट्रांच्या सनदेत मानवी हक्कांच्या संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी 'आमसभा', 'आर्थिक व सामाजिक परिषद', 'मानवी हक्क आयोग' याच्याकडे सोपवली होती. त्यांचे यासंर्भातील कार्य चालू आहे. १९९३ मानवी हक्कासाठी उच्चायुक्त पद निर्माण

करण्यात आले. अशा पद्धतीने मानवी हक्कांच्या संरक्षण व संवर्धनाकरीता आंतरराष्ट्रीय पातळीवरून १९४५ पासून योजनाबद्ध प्रयत्न सुरू आहेत.

## २.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयंअध्यन प्रश्न १ ची उत्तरे**

१) आमसभा २) न्यूयॉर्क ३) ५५ व्या कलमात

४) ०३ वर्षे ५) १९९२

**स्वयं अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे**

१) असत्य २) सत्य ३) सत्य ४) सत्य ५) असत्य

६) असत्य ७) सत्य ८) असत्य ९) सत्य १०) सत्य

## २.६ स्वाध्याय

**अ) पुढील टिपा लिहा / पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या.**

१) संयक्त राष्ट्रांच्या सनदेतील मानवी हक्काबबातची उद्दिष्टे.

२) संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोगाची कार्ये.

३) मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनाम्याची भूमिका व उद्देश.

४) आर्थिक व सामाजिक परिषदेची कार्ये.

५) संयुक्त राष्ट्रांचे मानव अधिकार उच्चायुक्त.

**ब) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) मानवी हक्कांच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रांची सनद विशद करा.

२) मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा स्पष्ट करा.

३) आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा स्पष्ट करा.

४) संयुक्त राष्ट्रांची आमसभा - चर्चा करा.

## २.७ संदर्भ


१) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, 'संयुक्त राष्ट्रे', प्रतिमा प्रकाशन, पुणे २००८

२) प्रा. उज्वला साखळकर, 'मानवी हक्कांची ऐतिहासिक वाटचाल', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक २००९.

३) Vijapur, A. P. Kumar Suresh, (ed), 1999, 'Prespectives on Human Rights', New Delhi, Manak Pub. 1999.

४) Roskin, Berry, 'International Relations', The New world of international Relations, New Delhi, Prentice Hall, 2002.


♦ ♦ ♦

## घटक – ३

# भारतातील मानवाधिकार आणि कर्तव्ये

**प्रस्तावना**

३.१ उद्दिष्ट्ये

१) भारतीय नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये जाणून घेणे.

२) भारतातील विविध धर्मातील मानवाधिकाराचे योगदान समजून घेणे.

३) विविध धर्मातील तत्त्वज्ञान समजून घेणे.

३.२ विषय विवेचन

३.३ मानवाधिकारात विविध धर्मांचे योगदान

३.४ १९ व्या आणि २० व्या शतकातील मानवाधिकार चळवळींचे योगदान

३.५ स्वातंत्र्य चळवळींचे योगदान : गांधी आणि नेहरू

३.६ मानवाधिकारासाठी डॉ. बी. आर. आंबेडकरांचे योगदान

३.७ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.८ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

३.९ स्वाध्यायासाठी गृहपाठ

३.१० अधिक वाचनासाठी पुस्तके

**प्रस्तावना :**

मानव अधिकाराचा उगम ग्रीक व रोमन इतिहासात दिसून येतो. प्लेटो, ॲरिस्टॉटल, राजा जॉनने दिलेल्या मॉग्नाकार्टा सनदेत आणि मध्ययुगात विचारवंतानी मानव अधिकाराचे समर्थन केलेले दिसते. इंग्लंडमध्ये लोकशाहीचा विकास होत असतांना बिल ऑफ राईट, पीटीशन ऑफ राईट इ. कायद्यांनी मानव अधिकारांच्या विकासात मोलाची भर घातली. फ्रेंच राज्यक्रांती आणि अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनाम्यानंतर मानव अधिकार संकल्पना जनसामान्य माणसामध्ये रूजण्यास सुरुवात झाली. जॉन लॉक, रूसो, जॉन मिल, थॉमस पेन इत्यादी विचारवंतांनी या संकल्पनेचा विकास केला. २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्तराष्ट्र संघटनेची स्थापना झाली. संयुक्त राष्ट्र संघाच्या स्थापनेनंतर मानव अधिकाराला वैशिक मान्यता मिळाली. संयुक्त राष्ट्र संघटनेने स्थापन केलेल्या एलिनार रूजवेल्ट आयोगाने केलेल्या शिफारसीनुसार १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्काचा जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्यात ३० मानवी हक्कांचा समावेश होता. युनोच्या घोषणापत्रानुसार प्रत्येक राष्ट्राने मानव अधिकाराचे रक्षण करण्यासाठी मानव अधिकार आयोगाची

स्थापना करावी, अशी विनंती केली.

**मूलभूत कर्तव्ये :**

हक्क आणि कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हक्काइतकेच कर्तव्याला महत्त्व आहे. घटनेत सुरुवातीला मुलभूत कर्तव्याचा समावेश नव्हता. हक्काबरोबर कर्तव्ये गृहित धरलेली होती. पण स्वातंत्र्यानंतर लोक कर्तव्य विसरले. सर्वत्र हक्कांचा उदोउदो झाला. त्यामुळे सरकारने १९७६ मध्ये ४२ वी घटनादुरुस्ती करून घटनेच्या चौथ्या भागात ५१ अ कलमात १० मूलभूत कर्तव्याचा समावेश केला. ती कर्तव्ये पुढीलप्रमाणे–

१) घटनेचे पालन करून तिच्यातील आदर्श, राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज यांचा सन्माान करणे.

२) भारताचे सार्वभौमत्त्व एकता व अखंडता यांचा पुरस्कार आणि रक्षण करणे.

३) आपल्या राष्ट्रीय लढ्याला प्रेरक ठरलेल्या उदात्त आदर्शाचे जतन करणे व आचरणात आणणे.

४) राष्ट्रांचे संरक्षण आणि गरजेनुसार राष्ट्रीय सेवा करणे.

५) भारतात वर्गरहित आणि भेदाभेदरहित बंधूत्वाची भावना तयार करणे आणि स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधक प्रथा नष्ट करणे.

६) आपल्या देशातील एकात्म संस्कृती आणि गौरवशाली परंपरेचे रक्षण करणे.

७) जंगले, सरोवरे, नद्या, पशू पक्षी या नैसर्गिक संपत्तीचे रक्षण करणे व सजीव प्राण्यांबद्दल भूतदया दाखवणे.

८) वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद, ज्ञानार्जन आणि प्रगतीच्या भावनेचा विकास करणे.

९) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचारापासून दूर राहणे.

१०) व्यक्तिगत आणि सामुदायिक उत्कर्षाकडे वाटचाल करणे. जेणेकरून राष्ट्राची प्रगती होईल असाच प्रयत्न करणे. याचबरोबर, मार्गदर्शक तत्त्वे, आर्थिक तत्त्वे घटनेच्या ३८, ३९, ४१, ४२, ४३ आणि ४८ कलमाशी संबंधीत आहेत. सामाजिक तत्त्वे घटनेच्या ४०, ४४ आणि ५० कलमात राजकीय स्वरूपाची आहेत. या तत्त्वाबरोबर मुलभूत हक्काचा समावेश करण्यात आला आहे.

यामध्ये समतेचा हक्क

अ) १) समतेचा हक्क – १४ ते १७ कलम

अ) कायद्यासमोर सर्व समान

ब) भेदभावाचा अभाव

क) असपृश्यता निवारण

ड) पदव्यांचे समाप्तीकरण

२) स्वातंत्र्याचा हक्क - १९ ते २२ कलम

अ) भाषण व मतप्रदर्शन स्वातंत्र्य

ब) निशस्त्रपणे सभा भरविणे

क) संघटन स्वातंत्र्य

ड) संचार स्वातंत्र्य

इ) वास्तव स्वातंत्र्य

फ) व्यवसाय स्वातंत्र्य

ग) व्यक्ती स्वातंत्र्याची हमी कलम २० ते २२

ह्व ३) शोषणाविरुद्ध वा पिळवणूकीविरुद्ध हक्क

अ) धार्मिक स्वातंत्र्य - २५ ते २८ कलम

ब) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क

४) घटनात्मक उपाययोजनेचा हक्क कलम ३२

अ) बंदीप्रत्यक्षीकरण

ब) परमादेश

क) अधिकार पृच्छा

ड) प्रतिषेध

इ) उत्प्रेषण यांचा समावेश होतो

इत्यादी हक्काचा समावेश होतो.

**३.३ विविध धर्माचे मानवाधिकारातील योगदान** Contribution of various Religion to Human rights

**प्रस्तावना :**

भारत एक धर्मनिरपेक्ष असा देश आहे. या देशात अनेक धर्म, जाती, वंशाचे लोक राहतात. विविध प्रथा परंपरांचे वास्तव असलेला जगाच्या पाठीवरचा भारत हा एकमेव असा देश आहे. अशा या देशात विविध धर्माचे लोक राहतात. हिंदू, मुस्लीम, शिख, इसाई (ख्रिश्चन), जैन, पारसी इत्यादी. प्रत्येक धर्म हा माणसाला माणूस म्हणून जगण्याची शिकवण देतो. प्रत्येक धर्मात मानवतावादी मुल्याची जोपासना केलेली असते. धर्माची शिकवण ही व्यापक असून त्यामध्ये भुतदया, मानवता, नैतिकता, शिष्टाचार,

समता, बंधूता, या वैश्वीक मुल्याची शिकवण दिलेली असते. व्यक्तीचे नैतिक वर्तन नियंत्रीत होण्यासाठी नियम सांगितलेले असतात. कारण व्यक्ती जर स्वैराचारी वर्तन करत असेल तर विध्वंस होईल यासाठी व्यक्तीचे वर्तन नियंत्रित होण्यासाठी धर्माची निर्मिती झालेली आहे. जी व्यक्तीच्या अंतरिक बाह्य वर्तनावर नियंत्रण ठेवते. भारत देशात हिंदू धर्म, जैन, बौद्ध तसेच शिख धर्म या धर्माचे उगमस्थान आहे. प्रत्येक नागरिक हा या प्रचंड अशा देशात कोणत्या ना कोणत्या धर्माचा सदस्य आहे. भारताची लोकसंख्या ७९.८% हिंदू धर्माची आहे. इस्लाम १४.२३%, बौद्ध ०.७०%, ईसाई २.३% तर शिख धर्म १.७२%.

पश्चिम आणि मध्य आशियात निर्माण झालेल्या धर्मामध्ये सर्वात प्राचीन ज्यु धर्म, नंतर झरथ्रुण्द्राचा धर्म नंतर कित्येक शतकानंतर स्थापन झालेले ख्रिश्चन आणि इस्लाम. आठ धर्म हेच आजच्या जगभरातील मानवांचे महत्त्वाचे धर्म आहेत. विशेष म्हणजे हे आठही धर्म पुरुषांनीच स्थापन केलेले आहेत. या आठांपैकी फक्त भारतात निर्माण झालेले जैन व बौद्ध हे दोन धर्म मुलतः ईश्वर न मानणारे धर्म असून त्यांच्या व्यतीरीक्त उरलेल्या धर्मात माणसाने मानसिक आधारासाठी कसला तरी ईश्वर मानलेला, कल्पिलेला आहे. ईश्वर मानणाऱ्या सर्व धर्मात ईश्वर पुरुषच आहे, स्त्री नव्हे आणि धर्म सर्वार्थाने पुरुष ईश्वराधारीतच आहेत. याचे कारण रानटी अवस्थेपासून माणसांची टोळी वगैरे जी काही समाजव्यवस्था असेल त्यात शिकार मिळवण्यासाठी पुरुषाचे शरीर बळ जास्त उपयोगी पडत असावे. त्यातून पुरुषप्रधानता आली असावी.

## १. हिन्दू धर्म :

या धर्माचे अनुयायी मुख्यता भारत, नेपाळ, मॉरीशस या देशात अधिकांश आहेत. या धर्माला प्राचीन धर्म मानले जाते. हिंदू धर्मात वेदाना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. त्याची निर्मिती ५००० वर्षापूर्वी झाली. ऋग्वेद हा सर्वात प्राचीन वेद आहे. त्यानंतर अथर्ववेद, यजुर्वेद, सामवेद या धर्माचा कोणीही संस्थापक नाही. या धर्माला वैदिक धर्म की सनातन धर्म पण म्हटले जाते. कर्म, पुनर्जन्म, मोक्ष यावर विश्वास ठेवतो. या धर्मात आत्म्याचे अस्तित्व, पाप पुण्य याचे अस्तित्व मानतो. हिंदू धर्मात चार संप्रदाय आहेत. वैष्णव जो विष्णू यांचे अस्तित्व मानणारा शिव, शंकराचे अस्तित्व मानणारा, शाक्त जे देवीला सर्वोच्च शक्ती मानणारा. भारतीय संस्कृतीत एकत्रित नांदणाऱ्या वैविध्यपूर्ण पंथाना, संप्रदाय समाजांना आणि जीवन पद्धतीना एकत्रितपणे हिंदू धर्म असे म्हणतात. हजारे वर्षाच्या काळात या समाजाने एक संस्कृती, जीवनदृष्टी व त्यावर आधारित एक जीवनपद्धती निर्माण केली. हिंदुत्व ही संकल्पना जीवनाकडे पाहण्याचा एक दृष्टीकोन आहे. मूल्याच्या आदर्शाची जपणूक ही सुद्धा या संस्कृतीचे ठळक वैशिष्ट्य आहे. नंतरच्या काळात या धर्माने जैन व बौद्ध धर्मातील काही मूल्ये स्वीकारलेली आहेत. ज्या मुल्यात समता, मानवता, बंधूता यांचा समावेश आहे. हा धर्म मूर्तीपूजक आहे. एवढेच नाही तर मूर्तीपूजेमुळेच हिंदू धर्मिय ओळखले जातात. हा धर्म ईश्वर चराचरात अधिवास करतो असे मानतो. प्रामाण्यासोबतच व्यक्तीची व्यक्तीगत श्रद्धा आणि मूल्ये यांवर आधार देतो. सोबतच मोक्ष प्राप्तीच्या हेतूने चार ऋणांतून मुक्तता, पितृ, मातृ, आणि गुरुजनांच्या आज्ञांचे पालन करणे, आदी जीवन पद्धतीतून समतोल साधणे म्हणजेच धर्म अशी विचारधारा आढळते.

## २. बौद्ध धर्म

ख्रिश्चन आणि इस्लाम धर्माच्या आधी बौद्ध धर्माची स्थापना झाली होती. या दोन धर्मानंतर बौद्ध धर्म जगातील तिसरा मोठा धर्म आहे. चीन, जपान, कोरीया, थायलंड, कंबोडिया, नेपाळ, श्रीलंका, भुतान व भारत या देशात बौद्ध धर्माचे अनुयायी मोठ्या प्रमाणात आहेत. बौद्ध हा नास्तिकांचा धर्म आहे. कर्मामुळेच जीवनात सुख व दुःख येते. त्यामुळे सर्व कर्मातून मुक्त होणे म्हणजेच मोक्ष मिळवणे अशी बौद्ध धर्माची शिकवण आहे. कर्मातून मुक्त होण्यासाठी आणि ज्ञान प्राप्त करण्यासाठी चार आर्य सत्य समजून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी आष्टांग मार्गांचा अभ्यास केला पाहिजे. त्याद्वारेच मोक्ष मिळू शकेल असे धर्म सांगतो.

बौद्ध धर्मात हिनयान व महायान हे दोन संप्रदाय आहेत. वैशाख महिन्यातील पौर्णिमेला बुद्ध जयंती असते. बौद्ध धर्मियांची प्रमुख चार तीर्थस्थळे आहेत. लुबिनी, बोधगया, सारनाथ आणि कुशीनगर, बौद्ध धर्मग्रंथाला त्रिपिटक असे म्हटले जाते. बुद्धाला गौतम, सिद्धार्थ, तथागत व बोधिसत्व या नावाने ओळखले जाते. बुद्धाचे वडील शध्दोधन हे होते. आई महामाया देवी. बुद्धाच्या पत्नीचे नाव यशोधरा तर मुलाचे नाव राहूल हे होते. बुद्धाचा जन्म नेपाळमधील लुबिनी येथे इसवी सन पूर्व ५६३ मध्ये झाला. याच दिवशी इसवी सन ५२८ ला बोधगया येथे त्यांना सत्याची प्राप्ती झाली. याच दिवशी इसवी सन ४८३ ला ८० व्या वर्षी कुशीनगर येथे त्यांचे निर्वाण झाले. बुद्धाला ज्या दिवशी सत्याची प्राप्ती झाली, त्याच दिवशी ते काशीजवळील सारनाथ येथे गेले. तेथे त्यांनी पहिल्यांदा उपदेश केला. त्यात लोकांना मध्यम मार्गाचा अवलंब करावा असा सल्ला त्यांनी दिला. दुःख, त्याची कारणे निवारणासाठी आष्टांग मार्ग अवलंबिण्यास सांगितला अहिंसेचा पुरस्कार केला. यज्ञ, कर्मकांड, पशुबळी या विरोधात स्पष्टीकरण दिले. बौद्ध धर्म जातीवर आधारीत नसून संपूर्ण मानव जातीत बंधूभाव व प्रेम निर्माण करतो. बौद्धाची शिकवण ही सत्य व कारणमीमांसेवर अवलंबून आहे. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेकडकरांनी बौद्ध धर्मात घेऊन बौद्ध धर्माला पुनरुज्जीवित केले. बुद्धांनी जे तत्त्वज्ञान दिले ते जसेच्या तसे स्वीकारू नका. त्यात बदल करून ते स्वीकारा, असे बुद्ध म्हणत असत. यावरून विज्ञानावर आधारित या तत्त्वज्ञानावर आधारीत आहे. पूर्वी बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा विरोध होता. परंतु कालांतराने हेच तत्त्वज्ञान योग्य आहे, असे वाटत असल्याने त्याचा स्वीकार केला जात आहे. तेच तत्त्वज्ञान आज जगाला शांती देऊ शकते, अशी धारणा निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक देशानी बौद्ध धर्म स्वीकारला आहे. भारतातील नालंदा विद्यापीठात बौद्ध धर्मासोबत अन्य धर्मावरही खूप सखोल चर्चा केली जात असे. याच विद्यापीठातून पुढे बौद्ध धर्माचा प्रसार आणि प्रचार झाला. म्हणूनच भारतात निर्माण झालेल्या तत्त्वज्ञानाची माहिती भारतीयाना असणे महत्त्वाचे वाटते.

## ३. इस्लाम धर्म :

इस्लाम ऐकेश्वरवादी धर्म हे आहे. जो कुराण इस्लाम धर्माचा मुख्य धर्म ग्रंथ आहेत तर महंमद पैगंबर इस्लाम धर्माचे प्रेषित आहेत. शिया आणि सुन्नी हे इस्लाम धर्मातील दोन संप्रदाय आहेत. सुन्नी मुस्लीमांचे ५ वेळ नमाज पठण करणे हे त्याचे कर्तव्य आहे. ज्याला इस्लामाचे ५ स्तंभ असे संबोधले जाते. शिया

सुन्नी परस्पराशी मिळते जुळते पंथ आहेत. सऊदी अरबमधील मक्का शहरातील कांबा हे इस्लाम धर्मातील पवित्र स्थान आहे. इस्लाम धर्म ही मानवता, सत्य शिष्टाचार, नैतिकता या मुल्याची शिकवण देतो. इस्लाम धर्म ही हिन्दू धर्माप्रमाणे कर्म, पाप, पुण्याचा आधार यावर विश्वास ठेरते. महंमद पैगंबर हे धर्माचे संस्थापक आहेत त्याना प्रेषित मानले जाते. त्यांना थेट परमेश्वराकडून (अल्ला) संदेश मिळाले. जगात ख्रिश्चन धर्मानंतर सर्वात जास्त अनुयायी मुस्लीम धर्माचे आहेत मुस्लीम या शब्दाचे दोन अर्थ आहेत, शांती व शरण जाणे. रमजान ईद हा धर्मातील सर्वात मोठा सण आहे.

**मुस्लीम धर्माची वैशिष्ट्ये :**

१) ईश्वर एकच आहे. मुस्लीम धर्माच्या अनुयायाने दुसऱ्या देवाची पूजा अमान्य. ईश्वर कसा अहे हे कुणालाच माहित नाही. त्यामुळे या धर्मात देवाला सगुण स्वरूपात पूजले जात नाही.

रसालत - देवाच्या दूताने (प्रेषित) जे काही सांगितले आहे त्याप्रमाणे वागणे. कुराण या पवित्र धर्मग्रंथाला मानणे.

भाग्याला मानणे :

* नमाज पठणे - प्रत्येक मुस्लीमाने दिवसातून किमान पाच वेळा नमाज पठण केले पाहिजे.
* रमजान महिन्याचा उपवास ठेवणे.
* दानधर्म (जकात) करणे
* आयुष्यात एकदा तरी मक्केला जाणे.

**४. जैन धर्म :**

जैन धर्म जगातील प्रमुख धर्म आहे. हा बुद्ध धर्माप्रमाणे अहिंसा या तत्त्वाचा पुरस्कार करतो. हा प्राचीन धर्म असून भारतीय धर्म असून त्याचे पुनरुज्जीवन या युगात प्रथम तीर्थंकर रीषभ देवांनी केले. लोकसंख्येच्यादृष्टीने हा भारतातील सहाव्या क्रमांकाचा धर्म आहे.

जीव - जैन धर्मानुसार जीव हा चैतन्यमय आहे. जो अविनाशी आहे. जीव हा देव, मनुष्य, पक्षी, पशू इ. विविध रूपात जन्म घेतो.

अजीव - अजीवाचे धर्म, अधर्म, आकाश, काल, पुदगल पाच प्रकार आहेत. अजीव चैतन्य रहित आहे. जीव व पाच द्रव्ये मिळून सहा द्रव्ये तयार होतात. जैनांच्या मते कोणत्याही द्रव्याची तीन अंगे असतात. पाप, पुण्य म्हणजे जीवाशी संबंध असलेला व जीवाला स्वर्ग, ऐश्वर्य इ. चांगले फळ मिळवून देणारा कर्म समुदाय. पाप म्हणजे पुण्याच्या विपरीत असा कर्मसमुदाय त्याची ८२ कारणे आहेत. त्यांनाच आश्रव असे नाव आहे.

ज्ञान - जैन तत्त्वानुसार ज्ञान दोन प्रकारचे असते परोक्ष व अपरोक्ष. अपरोक्ष ज्ञान. आत्मा कर्मबंधनातून

मुक्त झाल्यावर प्राप्त होते. परोक्ष ज्ञान मन किंवा इंद्रियाद्वारा वस्तूचे प्राप्त होणारे ज्ञान. अहिंसा परमोधर्म हा मुख्य नियम या धर्मात मानला जातो.

पंच महाव्रते -

* सत्य - सत्य म्हणजे नेहमी खरे बोलावे.
* अहिंसा - अहिंसा म्हणजे कोणत्याही जीवाची मन, वचन अथवा कायेद्वारे हत्या करू नये.
* अस्तेय - अस्तेय म्हणजे चोरी करू नये.
* अपरिग्रह - अपरिग्रह म्हणजे द्रव्यसंग्रह करू नये, स्वार्थी वृत्तीचा त्याग करावा.
* ब्रह्मचर्य - मनामध्ये कामवासना बाळगू नये/भोगवादी न होणे.

विश्वातील सर्व प्राणीमात्रांचे कल्याण होत आहे की नाही याची काळजी घेणे हे या धर्माचे मुख्य सार आहे. जैन असे मानतात की, मनुष्य, प्राणी व वनस्पती या सर्व सजीवांमध्ये आत्मा आहे. या प्रत्येकाला समान वागणूक दिली पाहिजे. त्याला मान दिला पाहिजे. या धर्माचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. या धर्माच्या मते देव किंवा धार्मीक कर्मकांडे मनुष्याला फारशी मदत करणारी नाहीत. त्याऐवजी श्रद्धा, योग्य ज्ञान व योग्य वर्तणूक ही तत्त्वे महत्त्वाची आहेत. हा धर्म आपल्या विचारप्रणालीच्या व जीवन पद्धतीच्या विकासकार्यात कोणत्याही संकुचित दृष्टीला कधी बळी पडला नाही. त्याची भूमिका राष्ट्रीय दृष्टीने नेहमीच उदार व उदात्त राहीली आहे. हा धर्म माणसाच्या कल्याणासाठी विकसीत रूप घेऊन पुढे आला. या धर्मात शांत, दयाळू, इंद्रियजयी, त्यागी आणि कोणताही अभिनिवेश धारण न करणारे व आत्मकल्याणाची कास धरणारे होते.

### ५. इसाई धर्म (ख्रिश्चन धर्म) :

ख्रिस्ती धर्म हा लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील सर्वात मोठा धर्म असून त्याला जवळ जवळ दोन हजार वर्षाचा इतिहास आहे. पॅलेस्टाईन येथे ख्रिस्ती धर्माचा प्रारंभ झाला. येशू ख्रिस्त हा या धर्माचा संस्थापक मानला जातो. येशू ख्रिस्त ही एकमेव अद्वितीय व्यक्ती व परमेश्वराचा पुत्र असून त्याच्या द्वारेच मानवाला तारणप्राप्ती होऊ शकते. तो देव व मानव यांच्यातील एकमेव मध्यस्त आहे असे मानले जाते.

**मानवी जीवन :** परमेश्वराबद्दल व आपल्या सहकाऱ्याबद्दल प्रेम जोपासून जीवन व्यतीत करण्याचा ख्रिस्ती मनुष्य प्रयत्न करतो, म्हणजेच ख्रिस्ताच्या आदर्श जीवनाप्रमाणे आपले जीवन व्यतीत करण्याचा ख्रिस्ती व्यक्ती प्रयत्न करते. हा धर्म दया व क्षमा याची शिकवण देणारा धर्म आहे. हा एकेश्वरवादी धर्म आहे. ख्रिस्ती धर्म तीन मुख्य प्रकारात आढळतो, रोमन कॅथलीक, प्रोटेस्टंट आणि पूर्वत्तर रूढीवादी ख्रिस्ती लोकांचा असा विश्वास आहे की येशू हा देवाचा पुत्र आहे तो, ईश्वर असून मनुष्य झाला, मानवतेचा तो रक्षक, तारण करता व मसिहा आहे.

## ६. शिख धर्म :

कबीराने हिंदूंचे वेद, कर्मकांड, जातीपाती व मूर्तीपूजा नाकारल्या, पण ईश्वर शरणतेवर भर दिला तसेच हिंदू आणि मुस्लीम या दोन धर्मीय जनतेत सामंजस्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कबीराच्या नंतर काही दशकांनी आलेल्या गुरूनानक यांनी सुद्धा अशाच प्रकारचे धर्मसमन्वयाचे कार्य उत्तर भारतात केले. गुरू नानक इ.स. १४६९ ते १५३९ पंजाब प्रांतात जिथे मुसलमानांतील सुफी संत विचारांचा प्रभाव निर्माण झाला होता, तिथे काही लोक अंतर्मूख होऊन, दोन्ही धर्मातील आचारविचारांवर एकत्रित मनन करू लागले होते. त्यापैकीच एक असलेल्या नानक या आदर्श आचरणाच्या चिंतनशील माणसाने, मुसलमानांचा एकेश्वरवाद आणि हिंदूंचे कर्म विपाक व पुनर्जन्म हे सिद्धांत एकत्र करून पण चातुर्वण्याला व मुर्तीपूजेला विरोध करून, समतेवर आधारीत शीख हा धर्म स्थापन केला या धर्माचे सुमारे दीड कोटी अनुयायी मुख्यत्वे भारतात व अलिकडच्या काळात जगात इतरत्र आहेत.

गुरूनानक हा शीख धर्माचा पहिला गुरू आणि गुरुगोविंद सिंह हा दहावा व शेवटचा गुरू होय. या दहा गुरूंची आणि नामदेवादी इतर संतांची वचने एकत्र करून त्यांच्या गुरू ग्रंथसाहित्याची रचना झालेली आहे. हा ग्रंथ गुरूमुखी, मुलतान, पर्शियन, प्राकृत, हिंदी व मराठी अशा सहा भागात असून त्यात शीखेतर संताची वचने आहेत. हाच त्याचा धर्म ग्रंथ. शीख धर्मात स्त्रियांना समान वागणूक सांगितलेली आहे. जी कुठल्याही धर्मात सांगितलेली नाही. न्याय व सत्यासाठी शिखानी मरणाला नेहमी तयार असावे अशी धर्माची आज्ञा आहे. ''प्रत्येकाने 'श्रम' करून उदर निर्वाह करावा अशी गुरूनानाक यांची शिकवण आहे. राम, कृष्ण, अल्ला ही सर्व एकाच इश्वराची वेगवेगळी नावे आहेत असे गुरूनानक म्हणत. या धर्मात बसवेश्वरांच्या धर्माप्रमाणे श्रमाला प्रतिष्ठेचे स्थान आहे. काही लोक शीख धर्माला इस्लामचा काहीसा प्रभाव असलेली पण ती हिंदू धर्म सुधारणेचीच चळवळ आहे असे मानतात.

शीख धर्म तत्त्वे खालीलप्रमाणे

१) एकेश्वरवादावर भर, २) हा एकमेव सर्व शक्तीमान ईश्वर जगाचा निर्माता, सांभाळकर्ता व नाशकर्ता आहे. या धर्मात ब्रह्मा, विष्णू, महेश आहेत. पण ते ईश्वर निर्मित आहेत. स्वयंभू नव्हेत. या जगाचा निर्माता ईश्वर नसून त्यांच्या पलिकडे उरलेला आहे. ४) ईश्वर, जग व त्यातील बदल हे सर्व सत्य आहेत. ईश्वर सर्व गुणाचा सागर आहे. म्हणजे ईश्वर जगाहून श्रेष्ठ आहे. त्याला कशाचीही कमतरता नाही व तो अवतार घेत नाही. ५) मनुष्याने संन्यास न घेता, शिस्तबद्ध संसारी (ऐहिक) जीवन जगावे. ६) मानवी मन व आत्मा अध्यात्मिक व श्रेष्ठ असून ते स्वार्थाने मलिन होतात. हा दृष्ट स्वार्थ टाकून तुम्ही शुद्ध व्हा. ७) पुनर्जन्म आहेत पण ते कर्मातून (चांगल्या) प्राप्त होतात. ८) मनापासून केलेले नामस्मरण, भजन व कीर्तन ही आवश्यक सत्कृत्ये होत. ९) मुक्तीसाठी ईश्वरकृपा आवश्यक व त्यासाठी गुरूचे मार्गदर्शन १० मानवी दुख हे आज्ञान, मोह यामुळे उत्पन्न होते. दुखाला ईश्वर कारण नाही. ईश्वर कधीकधी भल्यासाठी दुःख देतो. ११) शीख धर्मात मुर्तीपूजा, जातीभेद, उच्चनीचता, तीर्थयात्रा आणि बाह्य दांभीक उपचार यांना कडाडून विरोध आहे.

**सारांश :**

भारतीय संविधानाचे भारत एक धर्म निरपेक्ष राष्ट्र घोषित केले आहे. ज्यामध्ये प्रत्येक नागरीकांना धर्माचे रक्षण व जपणूक करण्याचा हक्क दिलेला आहे. भारतीय संविधानात मूलभूत अधिकार बहाल केला आहे. धर्मामुळे मानसाच्या वर्तनावर नियंत्रण प्रस्थापित होते. त्याचबरोबर बंधूता, कायदा, सदाचार, मानवता, नैतिकता विज्ञानवाद या मुल्याची ओळख व जोपासना होते. म्हणून धर्म निर्माण झाले असावेत. धर्म म्हणजे धारण करणे. याचे मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. जगातील प्रत्येक नागरिक हा कोणत्या ना कोणत्या धर्माचा सदस्य असतोच. कारण धर्म हा व्यक्तीच्या आयुष्यातील अविभाज्य भाग असतो.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१) भारतीय घटनेच्या चौथ्या भागात ५१ अ या कलमान्वये किती कर्तव्याचा समावेश केला आहे?

२) मानवाधिकार संकल्पना जनसामान्याच्या मनात रुजण्यास केव्हा सुरुवात झाली?

३) कोणत्या प्रमुख विचारवंतानी मानवाधिकार संकल्पनेचा विकास केला?

४) मानवी हक्काचा जाहिरनामा केव्हा प्रसिद्ध केला गेला?

५) भारतात एकूण किती धर्माचे उगमस्थान आहे?

६) कोणत्या धर्माचा संस्थापक नाही?

७) हिनयान आणि महायान हे दोन संप्रदाय कोणत्या धर्मातील आहेत?

८) इस्लाम धर्मात प्रेषित कोणाला मानले जाते?

९) शिख धर्माचा पहिला गुरू कोण?

१०) संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना केव्हा झाली?

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) दहा कर्तव्याचा समावेश करण्यात आला आहे.

२) फ्रेंच राज्यक्रांती आणि अमेरिकन जाहिरनाम्यानंतर मानवाधिकार संकल्पना जनसामान्यांच्या मनात रूजण्यास सुरुवात झाली.

३) जॉन लॉक, रूसो, जॉनमिल, थॉमस पेन इत्यादी वचिारवंतांनी मानवाधिकार संकल्पनेचा विकास केला.

४) १० डिसेंबर, १९४८ रोजी मानवी हक्काचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला.

५) भारत एकूण चार धर्माचे उगमस्थान आहे. हिंदू, शीख, जैन, बौद्ध.

६) हिंदू धर्माला संस्थापक नाही.

७) हिनयान आणि महाया हे बौद्ध धर्मातील सांप्रदाय आहेत.

८) महंमद पैगंबराना इस्लाम धर्मात प्रेषित मानतात.

९) शिख धर्माचा पहिला गुरू गुरुनानक होय.

१०) २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली.

**स्वाध्याय/गृहपाठ**

अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) शिख व बौद्ध धर्माची माहिती लिहा.

२) मानवाधिकार व कर्तव्याची चर्चा करा.

ब) टिपा लिहा.

१) मूलभूत कर्तव्य व हक्क

**अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)**

1) Dr. B. R. Ambedkar's Perception of Human Rights : Methods and approaches. Dr. Ravindra D. Gadkar, Journal of Humanities and Social Science Volume-23 issue10 ver. 9 Oct, 2018- ISSN - 2279-0837, P-ISSN-2279-0845.

2) http://en.m.wikipedia.org

3) Singhvi L. M.: Human Rights, the issue of Constitutional Governance, Pashramal Singhavi Memorial Lecture 2002.

4) Prasad M. G. : Basics of Hinduism (Sanatana Dharm) Through Q & a Maplewood, New Jersey.

5) अहमदिया मुस्लीम मिशन, पवित्र कुराणातील आयत (वचनाचा) निवडक संग्रह, इस्लाम इंटरनॅशनल पब्लीकेशन, इस्लामाबाद, पु. १७.

## घटक – ३.४

## १९ व्या आणि २० व्या शतकातील मानवाधिकार आंदोलनाचे योगदान

## (Contribution of Social movement in 19th and 20th Centuries for human Rights)

**प्रास्ताविक :**

**उद्दिष्ट्ये :**

१) मानवाधिकाराच्या विविध आंदोलनाचा आढावा घेणे.

२) समाजाच्या सर्वांगिण उद्धारासाठी मानवतावाद्याचे कार्य अभ्यासणे.

३) अस्पृश्यांच्या उद्धारासाठी व त्याच्या शिक्षणप्रसारासाठीचे मानवतावादी विचारप्रवाहाचे कार्य समजून घेणे.

**विषय विवेचन :**

१) राजाराम मोहन रॉय

२) महात्मा जोतिबा फुले

३) सावित्रीबाई फुले

४) लोकराजा शाहू महाराज

५) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

६) महर्षी धोंडोकेशव कर्वे

७) गाडगे महाराज

सारांश

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

स्वाध्याय/गृहपाठ

अधिक वाचनासाठी पुस्तके

**प्रास्ताविक :**

१९ वे शतक हे प्रबोधनाचे शतक मानले जाते. कारण या शतकात एका नव्या मानवतावादी पर्वाला सुरुवात झाली. त्यामुळे हे शतक महत्त्वपूर्ण ठरले. त्यावेळेचा समाज जातीसंस्थेत, श्रेष्ठ कनिष्ठ, असमानता, सतीप्रथा, केशवपण, अशा अनेक रूढी, परंपरानी ग्रासलेला होता. या प्रथापरंपरेने माणसाचे मुलहक्क आणि जगण्याचा अधिकार हिरावून घेतला होता. व्यक्तीचे आयुष्य ग्रासीत व बरबटलेल्या

पारंपारीक गुलामगीरीत अडकले होते. पण याच काळात समाजाला समतेचा नवा साक्षात्कार झाला. त्यातच इंग्रजी राजवटीमुळे नव्या आगमनाने देशात विज्ञानवादी वारे वाहू लागले. १९ व्या व २० व्या शतकातील सुधारकानी समाजासाठी व व्यक्तीच्या हक्कासाठी लढा उभारला. हा लढा स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, मानवतावाद, उदारमतवाद या मुल्याच्या आधारावर लढला गेला व सर्व सामान्य मानसाला त्याच्या जगण्याचा अधिकार मिळवून दिला. त्या मानवतावादी आंदोलने हाती घेणाऱ्या सुधारकापैकी छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरीयार नारायन स्वामी, राजाराम मोहन रॉय, महात्मा गांधी, विठ्ठल रामजी शिंदे, आगरकर, रानडे अशा सुधारकांचा समावेश होता. यापैकी सुधारकांनी समाजात पाश्चात्त्य शिकवण समाजाला करून दिली. समाजातील प्रत्येक नागरीकास त्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी या मानवतावादी विचारवंतानी आत्मपरिक्षण आणि चिकीत्सक दृष्टीकोनातून समाजातील परिस्थितीचे आकलन करून लढा उभारून तो यशस्वी केला. या मानवतावाद्यानी त्यांचे आयुष्य लोक कल्याणासाठी समर्पीत केले. त्यांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. हिंदू धर्मातील अनिष्ठ चालीरीती बंद करण्याचा प्रयत्न केला. विधवा विवाहास प्रोत्साहन दिले. जातीभेद नष्ट करून समतेचा पुरस्कार केला.

### १. राजाराम मोहन रॉय

समाजसुधारणेचे आद्यकार्य राजाराम मोहन रॉय यांनी केले. म्हणून त्यांना आधुनिक भारताचे जनक असे म्हटले जाते. त्यात मिशनऱ्यांच्या धर्मांतर प्रयत्नास आळा बसावा म्हणून ब्राह्मोसमाजाची स्थापना २० ऑगस्ट १८२८ रोजी केली. त्यांनी जातीभेद अस्पृश्यतेचा कडाडून निषेध केला. त्यांना ब्राह्मोसमाजाच्या रूपाने हिंदू धर्मातील मूर्तीपूजा, बहूदेववाद, अनिष्ट रूढी व परंपरा यावर कठोर आघात केला. त्यांनी ग्रामीण भागात धर्म प्रचारक पाठवले व सुशिक्षितांमध्ये ब्राह्मोसमाजाचा प्रचार करण्यासाठी 'तत्त्वबोधीनी पत्रिका' हे मासीक सुरू केले. राजाराम मोहन राय यांचे कार्य मानवतावादी होते. बालविवाह, सतिप्रथा यांसारख्या जाचक बंधनातून भारतीय स्त्रीला मुक्त करण्यासाठी त्यांनी आंदोलन उभारले. ज्ञानप्रसाराचा आणि उदारमतवादाचा आधुनिक सुधारणांचा अग्रणी पाया रचला. २२ मे १७७२ साली पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील राधानगरी गावी त्यांचा जन्म झाला. त्यांनी श्रुती, स्मृती, पुराणांचा, कुराणांचा आणि बायबलचा अभ्यास केला. भारतीय स्त्रियांची दयनीयता पाहून त्यांनी विल्यम बेटीक या अधिकाऱ्याच्या मदतीने ४ डिसेंबर १८२९ साली सती प्रथेला मुठमाती दिली. समाज त्यांना हिंदू धर्म विरोधक मानू लागला व टिकाही केली. त्यानी स्त्रियांचे खून पाडणारी प्रथा कायदेशीर बंद केली. त्यांना दिल्लीच्या बादशहाने 'राजा' हा किताब दिला.

### २. महात्मा जोतीबा फुले

जोतीराव गोविंदराव फुले जन्म ११ एप्रिल १८२७, मुळगाव-कटगुण, ता. खटाव, जि. सातारा. जोतीबाच्या यात्रे दिवशी जन्म झाला म्हणून त्याना जोतीराव नाव दिले. खरे आडनाव गोऱ्हे. त्यांच्या आजोबांचा फुलांचा व्यवसाय असल्याने त्याना फुले आडनाव मिळाले. आई-चिमणाबाई वडील गोविंदराव. फुल्यानी भारतीय माजातील खालच्या थरातील शुद्र, अतिशूद्र व स्त्रियांना गुलाम करणाऱ्या धर्म व्यवस्थेविरुद्ध बेडरपणे झुंज दिली. अनिष्ठ रूढी, परंपरा, अंधश्रद्धेच्या विळख्यातून समाजाला बाहेर

काढण्यासाठी त्यांनी धारधार लेखनी चालविली. बालविवाह आणि विधवा विवाह या त्या काळातील अतिशय संवेदनशील अशा सामाजिक प्रश्नावर गव्हर्नर जनरल आणि जोतीबा फुले यांच्यात पत्रव्यवहार झाला होता. त्यांनी सत्यशोधक विवाहाचा मार्ग समाजाला देऊन पुरोहिताकडून होणारी लूट यापासून समाजाचा बचाव केला. फुले जन्मजात उच्च-नीचतेच्या व चातुर्वण्याच्या विरूद्ध होते. ते धर्म-संस्कृती व ज्ञानक्षेत्रातील मक्तेदारीचे समर्थक असलेल्या ब्राह्मणांच्या विरुद्ध होते. स्त्री-शूद्र-अतिशूद्रांवर लादण्यात आलेल्या गुलामगिरीच्या विरुद्ध त्यानी सर्वंकष युद्ध पुकारले होते. ते सुधारणावादी नव्हे, तर सर्वंकष क्रांतीवादी होते. तसेच फुले मुलतः सर्वंकष मानवतावादी होते. त्यांना कोणत्याही प्रकारचा स्वजात्याभिमान, वर्णाभिमान व इतरांबद्दलचा तिरस्कार, जातिद्वेष यात फुल्यांच्या मुळ प्रेरणेत-शिकवणीत यत्किंचितही अवसर नव्हता. त्यांची प्रेरणा व शिकवण समतेची, बंधुभावाची, विश्वकुटुंबवादाची होती. इथे भेदाभेदीला वाव नव्हता.

**स्त्री उद्धाराचे कार्य :** १९ व्या शतकात स्त्रियांची दयनीय अवस्था पाहून त्यांनी स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले. तिला दुय्यम स्थान होते, उपभोग्य वस्तू म्हणून पाहिले जायचे. तिचे चूल-मूल एवढेच कार्य मानले जायचे. ती सर्वांगी वंचित होती तिला शिक्षीत करण्याचे काम फुलेंनी केले.

मुलींसाठी पहिली शाळा १ जानेवारी, १८४८ रोजी पुण्यात बुधवार पेठेतील भिडेंच्या वाड्यात उभी केली. त्यांनी अस्पृश्य स्त्रियांसाठी सुद्धा शिक्षणाची कवाडे खुली केली व स्त्री शिक्षणाचा पाया घातला. ३ जुलै १८५१ रोजी जोतीबांनी पुण्यातच चिपळूणकर यांच्या वाड्यात मुलींची दुसरी शाळा उभी केली. १८५२ साली पुण्यातील रास्ता पेठेत मुलींची तिसरी शाळा काढली. १८५२ सालीच अस्पृश्यांसाठीच पुण्यात वेताळपेठेत चौथी शाळा सुरू केली. जोतीबांचे कार्य पाहून सरकारने त्यांचा १६ नोव्हेंबर, १८५२ मध्ये विश्रामबाग वाड्यात सत्कार केला.

**विधवा पुनर्विवाह :** याबरोबर जरठ-बालविवाह, विषम विवाह यांच्यावरही फुल्यांनी कार्य केले. त्यांनी बालहत्या प्रतिबंधक ग्रहाची स्थापना केली व समाजाला नवा माणवतेचा मार्ग दाखवून दिला. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ठ चालीरीती, उच्चवर्णीयांच्या गुलामगिरीतून मुक्तता केली. सामाजिक व धार्मिक गुलामगीरी नष्ट करण्यासाठीचे त्यांचे उद्दिष्ट होते त्यासाठी त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील कनिष्ठ वर्गाला त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी समाजातील विषमता नष्ट केली पाहिजे हे जोतीबा जाणून होते.

## ३. सावित्रीबाई फुले १८३१-१८९३

आद्य भारतीय शिक्षिका व मुख्याध्यापीका, स्त्री मुक्ती आंदोलनाची महाराष्ट्रापील पहिली अग्रणी. त्यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. महिला शिक्षण आणि समाजसुधारणेचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. स्त्री शिक्षणासाठी समाजातील सर्वात मोठा विरोध त्यांनी घेतला. सावित्रीबाईनी स्वतःच्या घरी एक वसतीगृह चालवले होते. पुण्यातील सुशिक्षीत बाया, पंडिता रमाबाई, डॉ. आनंदीबाई जोशी व रमाबाई रानडे त्यांच्या भेटीस येत. सत्यशोधक समाजाने पुरोहित नाकारून

साध्या पद्धतीने, हुंड्याशिवाय, कमी खर्चातले विवाह लावायचा कार्यक्रम हाती घेतला. पहिला विवाह २५ डिसेंबर १८७३ रोजी लावला. शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे गरजेचे आहे, स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे हे सावित्रीबाईनी ओळखले होते. इ.स. १८९६ सालातल्या दुष्काळात सावित्रीबाईनी समाजाला सत्कार्याचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीरविक्रय करणाऱ्या बाया-बापड्याना दुष्टांच्या तावडीतून सोडवून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबात आश्रयास पाठविले. त्यांच्या कार्याला हातभार म्हणून पंडिता रमाबाई, गायकवाड सरकार अशा लोकाना मदतीचा हात पुढे केला. सावित्रीबाईनी जोतिबांच्या सर्व कार्यात हिरीरीने भाग घेतला. 'स्त्रियांनी शिकावे' हे त्यांचे ब्रीद वाक्य होते. अनाथांना आश्रय मिळावा हेही त्यांचे कार्यक्षेत्र होते. १८७६-७७ च्या दुष्काळात त्यांनी खूप कष्ट केले. पुढे १८९७ मध्ये प्लेगची भयंकर साथ आली असताना त्यांनी आपल्या स्वतःच्या प्रकृतीचीही पर्वा न करता प्लेगची लागण झालेल्यांसाठी काम केले. दुर्दैवाने त्या स्वतःच प्लेगच्या भीषण रोगाच्या बळी ठरल्या.

## ४. लोकराजा शाहू महाराज १८७४-१९२२

राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूर या संस्थानाचे अधिपती होते. प्रजावत्सल, दलितबंधू, समतेचा पुरस्कर्ते, सर्वांगीण दृष्टी असलेले निधड्या वृत्तीचे कर्ते समाजसुधारक होते. त्यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथे झाला. वडिलांचे नाव जयसिंगराव घाटगे, आईचे नाव राधाबाई, त्यांचे बालपणीचे नाव यशवंतराव होते. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व इतर क्षेत्रातील कार्य आणि विशेषतः सामाजिक आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाच्या विकासासाठी केलेले कार्य अनन्यसाधारण आहे. त्यांनी स्त्री शिक्षणाला चालना दिली. त्यांनी राजाराम कॉलेजात स्त्रियांना शिक्षणात सवलत दिली. विविध जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतीगृहाची स्थापना केली. १९०१ व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग, दिगंबर जैन बोर्डींग.

१९०६ वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतीगृह, मुस्लीम बोर्डिंग

१९०८ मिस क्लार्क होस्टेल, दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग

१९११ श्री नामदेव बोर्डिंग, पांचाळ ब्राह्मण वसतीगृह

१९१५ श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह, इंडियन ख्रिश्चन होस्टेल, रावबहादूर सबनीस प्रभू बोर्डिंग.

१९१९ ढोर चांभार बोर्डिंग

१९२० श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस शिवाजी वैदिक विद्यालय.

१९२१ सुतार बोर्डिंग, नाभिक विद्यार्थी वसतीगृह, सोमवंशीय आर्य क्षत्रिय बोर्डिंग, देवाग बोर्डिंग

शाहूनी शिक्षणाची पहिली शाळा चिपरी येथे सुरू केली. मोफत शिक्षणाचा आराखडा त्यांनी १९१३-१४ मध्ये तयार केला. १९४८ मध्ये कोल्हापूर संस्थानातील पन्हाळा, आळते, शिरोळ येथे मराठी शाळा स्थापन केल्या. १९०० मध्ये आपल्या राजवाड्यात राहण्याची व जेवणाची सोय केली. गंगाराम कांबळे

या नोकरास 'सत्य सुधारक' हॉटेल कोल्हापुरात रहदारीतील रस्त्यावर काढून दिले. अस्पृश्यांनी त्यांना पैलवान बनविले. त्यांना ते जाट पैलवान म्हणत. चांभाराना सरदार, भंग्यांना पंडीत तर अस्पृश्यांना सुर्यवंशी म्हणून संबोधत. त्यांनी कोल्हापूर राज्यात जोगत्या-मुरळ्या प्रतिबंधक कायदा केला. शाहू महाराजांनी सामाजिक स्तरावर असामान्य कार्य करून सक्तीचे प्राथमिक शिक्षण. अस्पृश्यांना स्वयंरोजगार निर्माण केले. सामान्य जनतेच्या जीवनाशी, त्यांनी स्वतःच्या उद्धारासाठी चालविलेल्या झगड्याशी समरस होऊन त्यांच्यामध्ये वावरणारा असा राजा त्यांच्या वेळेच्या संस्थानिकांत त्यांच्यासारखा दुसरा होणे नाही. जातीभेद मोडने हे महाराजाचे खरे ध्येय होते. १९१८ साली आंतरजातीय विवाह कायदेशीर ठरविण्यासाठी जे विधेयक आणले, त्यालाही लोकमान्य टिळकांनी विरोध केला. हे विधेयक विठ्ठलभाई पटेल यांनी आणले होते. परंतु महाराजानी या विधेयकास पाठिंबा दिला. इतकेच नव्हे तर आपल्या संस्थानात पुनर्विवाहाचा व आंतरजातीय विवाहाचा कायदा त्यांनी संमत केला.

### ५. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे १८७३-१९४४

कर्मवीर वि. रा. शिंदे यांचा जन्म कर्नाटकातील जमखंडी येथे जहागीरदार घराण्यात झाला. त्यांनी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना केली.

१) मिशनचे कार्य : अस्पृश्यांत शिक्षणाची आस्था निर्माण करणे, शाळा, उद्योग शाळा, वसतिगृहे काढणे.

२) अस्पृश्य समाजाचे परिवर्तन करणे, अस्पृश्यता निवारण्यासाठी समाजाचा पाठिंबा घेणे.

३) अस्पृश्याना नोकऱ्या मिळविणे.

४) सार्वजनिक धर्माची शिकवण देणे.

५) अस्पृश्यांच्या अडचणीचे निवारण करणे.

१९१७ डॉ. ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली कॉंग्रेस अधिवेशनात शिंदे यांच्या प्रयत्नामुळे अस्पृश्यता विरोधी ठराव पास केला.

१९२४ वायकोम (केरळ) येथे अस्पृश्य मंदिर प्रवेशात सहभाग. १९२८ पुढे येथे शेतकरी परिषद, मद्यपान, देवदासी पद्धत, मुरळी, शिमग्याच्या सणातील बीभत्स प्रकार थांबवण्यासाठी प्रयत्न केले. पंढरपुरात रावजी भोसले यांच्या मदतीने अनाथाश्रम. २ जानेवारी १९४४ या निष्काम कर्मयोग्याचा मृत्यू. ग्रंथसंपदा- भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, माझ्या आठवणी व अनुभव, संस्था-डिप्रेस्ट क्लासेस मिशन, आखिल भारतीय दलित संघ, आहिल्याश्रम, भारतीय युवक कृषक समाज, ऑल इंडिया एज्युकेशन कॉन्फरन्स

### ६. महर्षि धोंडो केशव कर्वे १८५८-१९६२

आधुनिक भारतातील एक श्रेष्ठ व कर्ते समाजसुधारक होते. विधवा विवाह या बाबतीत कर्व्यांनी ज्या कार्याने, चिकाटीने व ध्येयवादाने एक अपूर्व आदर्श निर्माण केला. त्यावर एक अनुबोधपट सरकारने काढला.

विधवा पुनर्विवाहाच्या प्रश्नासंबंधी लोकात जागृती करण्यासाठी कर्व्यानी महाराष्ट्रात व्याख्यानाचे दौरे काढले. ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ या संस्थेमार्फत खेड्यात शाळा काढल्या. अनाथ बालिकाश्रम व महिला विद्यापीठ या दोन संस्था उभारण्यासाठी व आर्थिक स्थैर्यासाठी कर्व्यानी आयुष्यभर स्वदेशात व परदेशात (१९२९-३२) मिशनरी बाण्याने वणवण केली. कर्वेनी ग्रामीण शिक्षणासाठी महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ-१९३६, जातिभेद व अस्पृश्यता यांच्या निर्मूलनाच्या उद्दिष्टाने काढलेला समता-संघ १९४४ या संस्था स्थापन केल्या. १८९३ साली त्यांनी विधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळ काढले आणि पुनर्विवाहितांचे कुटुंब-मेळेही भरविले. १८९९ सदाशिव पेठेत अनाथ बालिकाश्रम सुरू केले. १९०७ हिंगणे येथे महिला विद्यालय सुरू केले. स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हे अत्यंत पवित्र असे देशकार्य केले. १९१० साली स्त्रियांच्या उद्धारासाठी कार्य करणारे कार्यकर्ते निर्माण व्हावेत म्हणून निष्काम कर्मठ स्थापन केला. १९१६ महिला विद्यापीठ स्थापना केले. मातृ भाषेतून स्त्रियांच्या जीवनास पोषक असे शिक्षण. मुलीला प्रपंचशास्त्र, आरोग्यशास्त्र, पाककला, चित्रकला, गायन कला इ. विषयांचे शिक्षण मिळावे असा त्यांचा उद्देश होता.

### ७. गाडगे महाराज १८७६-१९५६

जन्म अमरावती जिल्ह्यात शेणगाव येथे. संपूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जाणोरकर. अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी परंपरा, देवधर्म या विषयीच्या खोट्या व भ्रामक समजूती दूर करण्यासाठी आयुष्यभर झगडले. त्यासाठी कीर्तन हे माध्यम निवडले. सामाजिक नैतिक मुल्ये, परोपकार व मानवता यांचे धडे त्यांनी आपल्या किर्तनातून दिले. माणसांनी एकमेकांशी प्रेमाणे व सद्भावनेने वागणे, एकमेकांच्या मदतीस धावून जाणे. अडल्या नडल्यांची, रंचल्या गांजल्यांची सेवा करणे म्हणजेच ईश्वराची सेवा करणे होय. अशी त्यांची विचारसरणी होती. अंगावर ठिगळं दिलेली गोधडी, व हातात गाडगे असा साधा वेश. त्यांना गोधडे/गाडगे महाराज म्हणून ओळखले जाई.

### सारांश :

१९ वे शतक हे प्रबोधनाचे मानले गेले. अनेक विचारवंतांनी त्यांच्या प्रयत्नातून समतेचा लढा उभा केला. समाजाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. स्वातंत्र्य, समता, बंधूता, मानवता, शिष्टाचार, या मुल्याची ओळख करून दिली. अनेक सुधारकांनी सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा याची आपेक्षा न करता निरपेक्ष भावनेने शिक्षणप्रसार, अस्पृश्यता निवारण, शेतकऱ्यांना सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी, मानवी मुल्याच्या जोपासनेसाठी, जुन्या अनिष्ठ रूढी-परंपरातून समाजाला मुक्त करण्यासाठी, जुन्या प्रथा समाप्त केल्या. त्यांनी आपल्या कार्यातून, लिखाणातून सामाजिक समता, ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

### स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१) कोणत्या शतकाला प्रबोधनाचे शतक म्हणून ओळखले जाते?

२) ब्राह्मोसमाजाची स्थापना कोणी केली?

३) तत्त्वबोधिनी पत्रिका हे मासीक कोणी सुरू केले?

४) दिल्लीच्या बादशाने राजा राममोहन राय यांना कोणता किताब दिला?

५) सत्यशोधक विवाहाचा मार्ग समाजाला कोणी दिला?

६) मुलीसाठी पहिली शाळा फुल्यानी केव्हा व कोठे सुरू केली?

७) बाल हत्या प्रतिबंधक ग्रहाची स्थापना कोणी केली?

८) आद्यभारतीय शिक्षिका व मुख्याध्यापिका कोण?

९) स्त्रियानी शिकावे हे ब्रीद वाक्य कोणाचे?

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे** (Answers to check your progress)

१) १९ वे शतक हे प्रबोधनाचे शतक मानले जाते.

२) राजाराम मोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केली.

३) राजाराम मोहन रॉय यांनी तत्त्वबोधीनी पत्रिका हे मासीक सुरू केले.

४) दिल्लीच्या बादशाने राजाराम मोहन रॉय यांना 'राजा' हा किताब दिला.

५) महात्मा फुल्यांनी सत्यशोधक विवाहाचा मार्ग समाजाला दिला.

६) मुलीसाठी पहिली शाळा फुल्यांनी पुण्यातील भिडेवाड्यात जानेवारी १८४८ रोजी सुरू केली.

७) बाल हत्या प्रतिबंधक ग्रहाची स्थापना फुल्यांनी केली.

८) आद्यशिक्षिका व मुख्याध्यापिका सावित्रीबाई फुले.

९) स्त्रियांनी शिकावे हे ब्रीद वाक्य सावित्रीबाई फुले यांचे.

**स्वाध्याय/गृहपाठ** (Exercise/Home Assignment)

१) एकोणिसाच्या आणि विसाव्या शतकातील मानवाधिकार आंदोलनाचे योगदानाची चर्चा करा.

**अधिक वाचनासाठी पुस्तके**


१) आचार्य जावडेकर श. द. आधुनिक भारत, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे (१९३८)

२) गायकवाड रा. ज्ञा. आणि इतर : महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १८७८.

३) कीर धनंजय : महात्मा जोतीराव फुले : आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८.

४) संपादक - नरके हरी, महात्मा फुले साहित्य आणि चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई, २००८ (प्रथमावृत्ती)

## घटक – ३.५
## स्वातंत्र्य चळवळीतील गांधी आणि नेहरू यांचे योगदान
## (Contribution to freedom movement Gandhi and Nehuru)

**प्रस्तावना**

**उद्दिष्ट्ये**

१) चंपारण्य सत्यागृह

२) असहकार आंदोलन

३) हिंद स्वराज्य

४) अहमदाबाद गिरणी कामगार संप

५) खेडा सत्यागृह

६) चौरीचौरा हत्याकांड

७) जालीयनवाला बाग हत्याकांड

८) स्वातंत्र्य आंदोलनातील नेहरू यांचे योगदान

९) सारांश

१०) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

११) स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

१२) स्वाध्याय/गृहपाठ

१३) अधिक वाचनासाठी पुस्तके

**प्रास्ताविक :**

स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधींचे काम उल्लेखनीय आहे. गांधींचा लढा हा त्यांच्या आयुष्यातील सत्य आणि अहिंसा या मुल्यांचा आहे. या तत्वासाठी त्यांनी त्यांचे आयुष्य सामाजिक कल्याणासाठी खर्च केले. त्यांनी स्वतंत्र चळवळीला सत्य व अहिंसा या मार्गाने नेले. जनतेच्या कल्याणासाठी अहोरात्र झटणारे विविध आंदोलनात सहभागी होणारे आपल्या अनुयायाना शांततेचा मार्ग अवलंबायला लावणारे महात्माजी युगपुरूष होते. म्हणून त्यांचा गौरव राष्ट्रपिता या नावाने केला जातो. महात्मा हा शब्द त्यांना सर्वप्रथम रविंद्रनाथ टागोर यांनी वापरला. त्यांचे राजकीय गुरू गोपाळकृष्ण गोखले होते. स्वातंत्र्य लढ्याचा उद्देश खऱ्या अर्थाने ब्रिटीशांचे जूलमी शासन उलथून पाडणे व भारतीय स्थानिक शासन प्रस्थापित करणे हा उद्देश होता. देशाला अहिंसात्मक मार्गाने स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी गांधीजींचे योगदान अतिशय मोलाचे आहे. सुभाषचंद्र बोस यांनी महात्मा गांधीजींना प्रथम १९४४ मध्ये राष्ट्रपिता म्हणून संबोधित केले. गांधी सविनय

सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक मानले जातात. अशा या मोहनचंद्र करमदास गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर येथील कढीयावाड येथे झाला. त्यांच्या आयुष्यातील २० वर्षे त्यांनी दक्षिण आफ्रिकेत व्यतीत केलीत. तेथे ते बॅरिस्टर झाले. आफ्रिकेतही त्यांनी भारतीयांना नागरीहक्क मिळवून देण्यासाठी लढा उभारला. नागरिकाला त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी मानवी मुल्याची जोपासना केली. आंदोलने, प्रवास व आपल्या नेतृत्वाच्या जोरावर त्यांनी मानवी हक्काचा लढा उभारला, शेतकरी स्त्रियांचे अधिकार, अस्पृश्यता निर्मूलन, असमानता, वंशभेद, सांप्रदायीकता यांचा समाजातून समुळ उच्चाटन होण्यासाठी ते सतत झटत राहिले. त्यांच्या जिव्हाळ्याचा केंद्रभूत विषय खेड्यांची स्वयंपूर्णता असा होतो. म्हणून त्यांनी 'खेड्याकडे चला हा उपदेश दिला. जनकल्याणाच्या हक्कासाठी त्यांनी अनेक वेळा मारहाण, तुरुंगवास सहन करावा लागला. गांधींच्या मुख्य आंदोलनाचा उद्देश देशातील नागरिकांचे ब्रिटीश सत्तेपासून होणारे आर्थिक, मानसिक व शारीरिक शोषण थांबवून नागरी स्वशासन प्रस्थापित करणे व परकीय सत्ता नष्ट करणे हे होते.

### ३.५.१ स्वातंत्र्य चळवळीतील आंदोलने

#### १) चंपारण्य सत्यागृह १९१७

बिहारमधील चंपारण्य सत्याग्रह एक यशस्वी आंदोलन होते. महात्मा गांधीनी चंपारण्यातील शेतकऱ्यांना निळीच्या पीकाला सक्तीने करण्यास भाग पाडणाऱ्या ब्रिटीश जमीनदाराना येथून सडेतोड प्रतीउत्तर दिले. शेतकऱ्याची होणारी पिळवणूक व निळीला मिळणारा मोबदला हा अतिशय तुटपुंजा येथील जमीनदार देत असत. चंपारणमध्ये अनेक आरोग्याचे प्रश्न उपस्थित झाले होते. व्यसनाधिनता, अस्पृश्यता, पडदा पद्धत या समस्या या गावामध्ये होत्या. या समस्यावर त्यांनी आवाज उठवला. येथील निळीचा भाव ठरवण्याचे स्वातंत्र्य तेथील शेतकऱ्यांना नव्हते ते ब्रिटीश जमीनदार ठरवत असत. या आंदोलनानंतर देशभरातील शेतकऱ्यांनी गांधीजींना त्यांच्या समस्या सोडवण्यास बोलवले. चंपारणमधल्या शेतकऱ्यांच्या मध्ये गांधीजीनी स्वच्छतेचे महत्त्व सांगून स्वच्छतेची कामे हाती घेतली. तसेच शाळा व रुग्णालयाची कामे याना प्रोत्साहन दिले. पण त्याच वेळी त्यांना शांतता भंगाच्या आरोपाखाली ब्रिटीश शासनाने अटक करून तो भाग सोडून जाण्यास सांगितले. त्यांच्या सुटकेसाठी हजारो लोकांनी रस्त्यावर उतरून निदर्शने केली. पोलीस स्टेशन, न्यायालये येथे मोर्चे काढले. परंतु जनप्रक्षोभापुढे शेवटी सरकारने त्यांच्या मागण्या मान्य केल्या. या आंदोलनानंतर शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीनुसार पीक घेण्याचे स्वातंत्र्य मिळाले. पिकाचा योग्य मोबदला मिळण्यास मोकळीक मिळाली, अन्यायकारक कर रद्द करण्यात आले, दुष्काळाच्या वेळी करात सुट मिळाली.

#### २) असहकार आंदोलन १९२०–२२

असहकार आंदोलन गांधींच्या आंदोलनातील राष्ट्रव्यापी आंदोलन होते. स्वातंत्र्य संग्रामातील या आंदोलनाने मुख्यता सरकारला असहाय्य करणे, सरकारला विरोध करणे. शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, शाळा, परदेशी माल, शासकीय कार्यालये, विद्यापीठे, नोकऱ्या, कोर्ट, निवडणुका यावर बहिष्कार टाकणे.

असहकार आंदोलन रौलट ॲक्ट, जालीयनवाला बाग हत्याकांड १९१९ ही सुद्धा कारणे होती. कारण या द्वारे इंग्रजांनी दडपशाहीचे राजकारण सुरू केले होते. त्यासाठी जनतेने इंग्रजांच्या दबावाला बळी पडू नये म्हणून गांधीजींनी या असहकार चळवळीचा आधार घेतला होता. लोकांनी सरकारशी ब्रिटीशांनी दिलेल्या पदव्या, मानसन्मान, यांचा त्याग करावा, सरकारी कार्यक्रमावर बहिष्कार घालावा. असे ठराव करण्यात आले. या सहकार चळवळी अंतर्गत स्वदेशीचा पुरस्कार करण्यात आला, खादीचा वापर, दारूबंदी प्रचार, हिंदू मुस्लीम ऐक्य, अस्पृश्यता निर्मूलन या प्रचारांना प्रोत्साहन देण्यात आले. यामध्ये रविंद्रनाथ टागोरानी सर या पदवीचा त्याग केला. नेताजी सुभषचंद्रानी आय. सी. एस. या पदवीचा त्याग केला. या चळवळीने समाजामध्ये सकारात्मक परिणाम झाले त्यामध्ये, चळवळ देशव्यापी बनली, राष्ट्रीय सभा कार्यशील झाली. सरकारी दडपण कमी झाले, स्वराज्य उद्दिष्ट बनले.

### ३) हिंदू स्वराज्य

हे महात्मा गांधीजींचे गुजराती भाषेतील पुस्तक होय. दक्षिण आफ्रिकेत भारतीयांना अधिकार मिळण्यासाठी ते अनेक अनुभवातून पुढे गेले होते. स्वातंत्र्याची त्याकाळात अनेक युवक स्वप्ने पाहात होती तेव्हा त्यांनी आफ्रिकेतून परतण्याचा १९०९ च्या दरम्यान हे छोटेसे पुस्तक लिहिले होते. स्वराज्याच्या अनुषंगाने त्यांचे असे मत होते की ''केवळ इथून इंग्रजाना हटवल्यानंतर आपल्या खऱ्या सभ्यतेचा विकास होईल किंवा इंग्रजांच्या सभ्यतेचा आदर्श करून विकास होईल ही चुकीची समजूत आहे. त्याने आपला उद्धार होणार नाही. आपण आपला आत्मा वाचवला पाहिजे. भारतातील काही हुशार लोक पाश्चिमात्त्य संस्कृतीच्या बळी पडले आहेत. काही लोक अशा सभ्यतेला बळी पडलेले नाहीत ते भारताच्या धर्मपरायण नैतिक सभ्यतेला मानतात. काही लोक आपल्या आत्मशक्तीचा उपयोग करण्याची पद्धत शिकवली तर किंवा सत्यमार्ग दाखवला तर ते सत्याग्रह करतील. म्हणजेच लोकांच्यामध्ये जागृती निर्माण झाली पाहिजे असे गांधीजींचे मत होते. गांधीजींच्या मते ब्रिटीशांच्या जुलूमशाहीचा नायनाट करण्यासाठी शस्त्रच पाहिजे असे नाही. ते म्हणतात विना शस्त्राचेच ते जगाला वाचवू शकतात. त्यासाठी ते आत्मशक्तीला केंद्रभूत मानतात. सत्य, अहिंसा त्यांच्या विचारातील दोन मूल्ये होत. असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग आणि सत्यागृह या नैतिक चळवळी आहेत.

### ४) अहमदाबाद गिरणी कामगार संप १९१८

अहमदाबाद गिरणी आंदोलन हे मालक आणि मजूर यांच्यातील पगार वाढीचे आंदोलन होते. यामध्ये मुख्य वाद हा प्लेग बोनस या संदर्भात होता. याच काळात अहमदाबाद एक कापड औद्योगिक शहर म्हणून विकसीत होण्याच्या मार्गावर होते. त्याच्या अगोदर म्हणजेच १९१७ ला कामगाराना मिळणारा बोनस कमी करण्याचा विचार असल्यामुळे हे आंदोलन झाले होते. तसेच दुसऱ्या महायुद्धामुळे महागाई वाढली होती. या दरम्यान गांधीजींनी कामगारांना संपावर जाण्यास सांगितले. कामगाराना ५०% पगार वाढावा ही अपेक्षा होती. परंतु गांधीजींनी मध्यस्थी केली, संपावर जाण्याचा इशारा दिला. काही दिवसातच परिस्थिती बिकट बनली. न्यायाधीकरणाने कामगाराना ३५% पगारवाढ जाहीर केली. असे कामगारांचे प्रश्न मिटविण्यासाठी

गांधीजींनी १९२० साली अहमदाबाद टेक्स्टाईल असोसिएशनची स्थापना केली. महात्मा गांधीजींच्या आयुष्यातील अहमदाबादमधील हे पहिले आंदोलन होते. या आंदोलनात गांधीजीनी उपोषण करून राजकीय दडपण आणून यशस्वी केले होते. आपले हक्क प्राप्त करण्यासाठी आत्मशुद्धी व आत्मक्लेश यांना पर्याय नाही असे त्यांचे मत होते. समाजातील व शिक्षीत वर्गाने त्यांच्या समस्या जाणून घ्याव्या असे त्याचे मत होते. 'धनाढ्यानी आपल्या जवळच्या संपत्तीचा आवश्यक व योग्य हिस्सा आपल्याकडे ठेवावा व अधिकच्या संपत्तीचा विश्वस्त निधी उभारून तो समाजासाठी म्हणजेच त्याच्यासाठी कष्ट करणाऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांच्या ऐहिक सुखासाठी खर्च करावा' अशा गांधींची विश्वस्तची संकल्पना होती.

### ५) खेडा सत्याग्रह १९१८

खेडा या गुजरातमधील जिल्ह्यात कर माफ करण्यासाठी आंदोलन केले होते. कारण १९ व्या शतकात गुजरातमध्ये प्रचंड दुष्काळ पडला होता. दुष्काळामुळे शेती उत्पन्नात घट झाली होती. त्यामुळे शेतकरी शेतसारा देण्यास असमर्थ होता. परंतु ब्रिटीश शासन ऐकून घेण्याच्या तयारीत नव्हते. ते शेतकऱ्यावर जबरदस्तीने शेतसारा वसूल करीत होते. गांधीनी चंपारण सत्यागृह यशस्वी केला होता. शेतकऱ्यांनी या आंदोलनात गांधीजींना साथ दिली. त्याचबरोबर सरदार वल्लभभाई पटेलानी आपली वकीली सोडून सत्यागृहात सामील झाले. शेतकऱ्यानी हे आंदोलन/सत्यागृह टिकवून धरून इंग्रज दमन व दडपशाहीला शह दिला. त्यामुळे शेतकऱ्यांत उत्साह व आत्मविश्वास निर्माण झाला.

### ६) चौरीचौरा हत्याकांड १९२२

उत्तर प्रदेशातील चौरी-चौरा या ठिकाणी ५ फेब्रुवारी १९२२ रोजी चौरी-चौरा या ठिकाणी असहकार आंदोलनाच्या दरम्यान ३००० शेतकऱ्यांनी एक पोलीस चौकी जाळली. त्यामध्ये २२ पोलीस जाळले गेले. त्याच दरम्यान इतरत्र त्याचे पडसाद उमटले व देशभर त्याचा हिंसक प्रसार झाल्यामुळे गांधींजींनी असहकार आंदोलन तहकूब केले. त्याचे तात्कालीन कारण म्हणजे पोलीसानी संतप्त जमावावर गोळीबार केला. तसेच आंदोलन करणाऱ्यावर त्याचबरोबर जनतेचा इंग्रजांविषयी आक्रोश कारणीभूत ठरला.

### ७) जालीयनवाला बाग हत्याकांड - १९१९

१३ एप्रिल सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास बैसाखी या सनानिमित्त ६००० लोक अमृतसर शहरातल्या जालियनवाला बाग येथे एकत्र आले होते. त्याच दरम्यान मॉंटेस्क्यू सुधारणा कायद्याची चर्चा चालू होती. याच दरम्यान रोलट ॲक्ट नावाचा कायदा करून लोकांचे व्यक्तीगत स्वातंत्र्य दडपण्याचा प्रयत्न इंग्रज सरकारने केला होता. या कायद्याला काळा कायदा म्हणून ओळखले जायचे. कारण कोणत्याही आंदोलन करणाऱ्याला या कायद्यान्वये अटक करत असत व तुरुंगात डांबत असत. निशस्त्र एकत्र जमलेल्या नागरीकांवर जनरल डायन या ब्रिटीशानी गोळीबार केला. त्यामध्ये ४०० पेक्षा अधिक लोकाना प्राणास मुकावे लागले. या घटनेनंतर संतप्त लोकांनी अनेक ठिकाणी देशभर निदर्शने झाली व महात्मा गांधींनी आपला राजकीय प्रवेश केला. यामध्ये महात्मा गांधी, मोहमद अली जीना, सैफुदीन

किचलू, डॉ. सत्यपाल, मोहमद बशीर या नेत्यानी आपला भाग नोंदवला.

**३.५.२ स्वातंत्र्य आंदोलनातील नेहरू यांचे योगदान**

स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली देशाने दिलेला लोकलढा नेहरूनी उभारला. नेहरू म्हणजे शांतिदूत, आदर्शवादी, स्वप्नाळू, विशेषतः त्यांचा पंचशील करार, अलिप्ततावाद म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणातील कार्य महत्त्वाचे आहे. त्याचे हे धोरण काळाच्या परिप्रेक्ष्याात राष्ट्रहिताचे होते. औद्योगिक दृष्टीने भारत बलाढ्य होण्यापेक्षा स्वावलंबी व्हावा असे विचार नेहरूंचे होते. स्वावलंबी भारत साधे सत्य आहे. नेहरूंची इच्छा नेमके हे घडविण्याची होती. अलिप्तता धोरण २५ वर्षांनी साकार होणाऱ्या समृद्ध, उद्योगप्रधान, अन्न स्वावलंबी आणि लष्करीदृष्ट्या बलवान अशा भारताची उभारणी करण्याचा नेहरूंचा प्रयत्न होता. तिबेट गिळंकृत करण्याच्या अँग्लो-अमेरिकन साम्राज्यवादाचे नेहरू साक्षीदार आहेत, असे चौ-एनलायचे १९५० साली म्हणणे होते. तर ब्रह्मदेशात कम्युनिस्टांचा बीमोड करण्यासाठी १९४९ साली भारताने बिनशर्त फौजा पाठविल्या होत्या. १९४९ सालीच चिनी क्रांतीचे स्वागत करताना नेहरूंनी एक मार्मीक वाक्य उच्चारले होते. ते म्हणाले होते, इतिहासात प्रथमच भारताला अडीच हजार मैलांची लष्करी सरहद्द प्राप्त होत आहे. याचे परिणाम समजून घेतले पाहिजेत. नेहरू चीन विषयी अत्यंत सावध होते. चीन सदैव विस्तारवादी आहे त्याचा भारताला धोका आहे, हे नेहरू जाणूनच होते. तरीही चीनबरोबर मैत्री ठेवली. तसेच चीनला युनोत घेण्याबद्दल आग्रह धरला. पंचशील करारात चीनला अडकविणे, चीनला सदैव शांततेच्या घोषणा करण्यास भाग पाडणे आणि जी उसंत मिळेल, तिचा फायदा औद्योगिकीकरणासाठी घेणे हा कार्यक्रम नेहरूंनी आखला. शांतिदूत नेहरू १९५३-५४ पासून सतत शस्त्रास्त्र निर्मितीचे कारखाने वाढवित होते. इंग्लंडच्या आणि अमेरिकेच्या अनिच्छा गुंडाळून अनुभट्ट्या नेहरूंनी उभारल्या. म्हणून १९९८ मध्ये पोखरण येथे अणुचाचण्या घेऊन भारत अण्वस्त्रधारी राष्ट्र बनला. नेहरूंनी विमान व रणगाडे तयार करण्यावर भर दिला. हे सत्य नजरेआड करता येत नाही. नेहरूंच्या शांतताप्रेमाचा उगम असा राष्ट्रीय गरजेत आहे. रशिया पासून चीन फोडणे व हे घडविण्यास अमेरिकेचे साहाय्य मिळविणे आणि मिळालेला उसंत औद्योगिकरणासाठी वापरणे ही नेहरूंची भूमिका होती. नेहरू शांतता तंत्र होतेच पण मुत्सद्दी कुटनीतिज्ञ होते. धर्मनिरपेक्ष राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करत होते. भारताच्या आधुनिकीकरणाचा ध्यास असणाऱ्या भाक्रा-नानंगल धरणाची उभारणी करून हरितक्रांती घडवून आणणाऱ्या पंतप्रधानावर जनतेचा विश्वास होता.

**सारांश :**

महात्मा गांधी व नेहरूंचे स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. गांधीजींनी अनेक आंदोलने यामधून सामाजिक न्यायहक्काचा लढा उभारला, मीठाचा सत्याग्रह, असहकार चळवळ, खेडा सत्याग्रह, अहमदाबाद गीरणी कामगारांचा संप, चंपारण्य सत्याग्रह अशा विविध आंदोलनातून त्यांनी सत्य व अहिंसा या तत्त्वावर संग्राम उभारला. शेतकरी, कामगार, शेतमजूर, अस्पृश्यता या आंदोलनातून सामाजिक न्याय हक्काची भूमिका स्पष्ट केली. त्याचबरोबर देशाला ब्रिटीशांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी

जनआंदोलनाची सुरुवात केली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यास गांधीजींचा फार मोठा सहभाग आहे. तर नेहरूनी गांधींच्या पावलावर पाय ठेवून देशाला लष्करीदृष्ट्या समृद्ध करण्यात मोठे योगदान दिले आहे. नेहरूनी महत्त्वपूर्ण अशी अनेक धोरणे राबविली आहेत. एकीकडे चीनशी संबंधाची जपणूक करून शत्रूला आपल्या मुत्सद्दी हेतूने चार हात लांब ठेवून चीनचा युनोच्या सदस्यत्वासाठी शिफारस करणे तर लष्करीदृष्ट्या मजबूत अशा रशिया व अमेरिका या देशाशी मैत्री करणे असे कार्य नेहरूनी केले आहे. वेळप्रसंगी त्यांना तुरुंगवास ही सोसावा लागला आहे. प्रत्यक्षात नेहरू आणि गांधी यांनीही देशाच्या योगदानात तुरुंगवास सहन केला आहे. भारताला स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न नेहरूंनी केला आहे. म्हणून आधुनिक भारत निर्माण करण्यात त्यांचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१) राष्ट्रपीता म्हणून कोणाला ओळखले जाते?

२) महात्मा गांधींना ‘महात्मा’ हा शब्द कोणी दिला?

३) महात्मा गांधींचे राजकीय गुरू कोण?

४) महात्माजींना राष्ट्रपीता म्हणून कोणी संबोधले?

५) गांधीजींनी कोणता उपदेश केला?

६) कोणते आंदोलन महात्मा गांधींच्या आयुष्यातील राष्ट्रव्यापी आंदोलन झाले?

७) औद्योगिकदृष्ट्या बलाढ्य होण्यापेक्षा स्वावलंबी झाले पाहिजे हे कोणाचे स्वप्न होते?

८) नेहरू कोणत्या देशाविषयी अतिशय सावध होते?

९) चीनशी युनोसाठी सदस्यत्वाची मागणी कोणी केली?

१०) नेहरू कोणत्या कालखंडात शस्त्रास्त्र निर्मितीचे कारखाने वाढवीत होते?

११) भारत अन्वस्त्र बनण्यात कोणाचे योगदान आहे?

१२) १९९८ साली भारतात कोणत्या ठिकाणी अनुचाचणी झाली?

**स्वयंअध्ययनासाठी उत्तरे**

१) महात्मा गांधी यांना राष्ट्रपीता म्हणून ओळखले जाते.

२) रविंद्रनाथ टागोरांनी महात्मा हा शब्द वापरला.

३) गोपाळकृष्ण गोखले हे महात्मा गांधींचे राजकीय गुरू होत.

४) सुभाषचंद्र बोसनी राष्ट्रपीता म्हणून ओळखले.

५) खेड्याकडे चला हा संदेश गांधीजींनी दिला.

६) असहकार आंदोलन हे राष्ट्रव्यापी आंदोलन ठरले.

७) पंडित नेहरू यांचे स्वप्न होते.

८) नेहरू चीन या देशाविषयी सावध होते.

९) नेहरूनी चीन देशाच्या सदस्यत्वाची मागणी केली.

१०) १९५३-५४ शस्त्रास्त्र निर्मितीचे कारखाने वाढवीत.

११) नेहरूंचे योगदान आहे.

१२) पोखरण येथे भारतातील अनुचाचणी झाली.

**स्वाध्याय / गृहपाठ**

१) स्वातंत्र्य चळवळीतील गांधींचे योगदान-चर्चा करा.

२) स्वातंत्र्य चळवळीतील नेहरूंचे योगदान-चर्चा करा.

## घटक – ३.६

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवाअधिकारातील योगदान

## (Contribution of Dr. B. R. Ambedkar to Human Rights)

**३.६.१ प्रस्तावना**

**उद्दिष्ट्ये :**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार समजून घेणे.

२) बाबासाहेबांचे संविधानातील योगदान समजून घेणे.

३) डॉ. आंबेडकरांचे मानवतावादी कार्य समजून घेणे.

**३.६.२ विषय विवेचन :**

१) डॉ. बाबासाहेबांचे मानवाधिकारातील योगदान

२) बाबासाहेबांचे विचार

३) डॉ. बाबासाहेबांचे भारतीय संविधानातील योगदान

४) डॉ. आंबेडकरांचे मानवता उद्धारक कार्य

५) जाती व्यवस्था निर्मूलनाचा प्रभावी मार्ग

६) स्त्रीमुक्ती विचार व कार्य

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कामगार चळवळ

८) स्त्री कामगारांचे प्रश्न

९) महाड सत्याग्रह

१०) काळाराम मंदीर प्रवेश

११) सारांश

१२) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१३) स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१४) स्वाध्याय गृहपाठ

१५) अधिक वाचनासाठी पुस्तके

**प्रास्ताविक :**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रीयत्वाचे प्रतीक आहेत. जाती, धर्म, पंथ व वंश यांच्या

विविधतेत आणि एकमेकांना असमान किंमहुना दर्जाचे उच्च निच्चतेचे श्रेष्ठत्व समजल्या जाणाऱ्या बहुभाषिक, बहुधर्मिय त्यातही जातीय विभागणी असणाऱ्या या देशात राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे हे अशक्यप्राय कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्ट्या विचारसरणीमुळे शक्य झाले. बाबासाहेब आंबेडकरांचा लढा हा मानवतेचा लढा होता. त्यांनी त्यांचे आयुष्य मानव मुक्तीच्या कल्याणासाठी अर्पण केले. बाबासाहेबांचे योगदान राष्ट्रबांधनीत अतिशय मोलाचे आहे. सामाजिक विषमता, अस्पृश्यता, अमानुषता, जातीयता, धर्मांधता तसेच प्रांतीक आणि भाषिक अहंभाव किंवा द्वेष हा समाज किंवा राष्ट्र विघटन करणाऱ्या प्रवृत्ती आहेत. या प्रवृत्तीवर सांविधानिक निर्बंध घालण्याचे काम हे राष्ट्रीय ऐक्याचे मानवतावादी काम आहे. ते राष्ट्रीय भावनेने आणि तटस्थ वृत्तीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले दिसून येते. डॉ. आंबेडकर म्हणतात आज राष्ट्राला कोणत्या गोष्टीची गरज असेल तर जनतेच्या मनात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याची, आपण प्रथम भारतीय आहोत, नंतर हिंदू, मुसलमान, सिंधी, कानडी या अलगपणाच्या भावना निर्माण करण्यापेक्षा आपण प्रथम भारतीय आहोत आणि नंतर ही भारतीयच आहोत. ही राष्ट्रीयत्वाची सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ भुमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली. राष्ट्रीय एकात्मता ही काही चिन्ह व्यवस्था नाही, तर ती सांघिक एकत्वाची सार्वजनिक सत्याची भावना आहे. या भावना निर्माण होण्यासाठी राष्ट्राचे कर्तव्य म्हणून देशात सामाजिक समता, न्याय, स्वातंत्र्य आणि बंधूभाव या नीती मुल्यांचा स्वीकार केलेला आहे. आणि या मुल्यांच्या पुनर्स्थापनेसाठीच्या तरतूदीही भारतीय संविधानात केल्या गेल्या आहेत. भारतीय संविधान सरनाम्यात त्याचे प्रत्यंतर आपणास पाहता येईल. हा सामाजिक न्यायाचा राष्ट्रीय एकतेचा, एकात्मतेचा दस्तऐवज डॉ. बाबासाहेबानी अथक परिश्रमातून आणि दृष्ट्या दृष्टिकोनातून तयार झाला आहे.

**बाबासाहेबांचे विचार :**

डॉ. आंबेडकर म्हणतात कोणतीही व्यक्ती जन्माने, जातीने अथवा धर्माने श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते ती कर्तृत्वाने ठरविली गेली पाहिजे. प्रत्येक व्यक्ती ही समान आहे. एक व्यक्ती एक मुल्य हे सुत्र बाबासाहेबांनी देशाला दिलेले आहे. जाती संस्थाही एकूणच मानवी विकासाच्या आड येणारी व्यवस्था आहे ती समाज निर्माण करू शकत नाही. ती राष्ट्रीय भावनेच्या विरोधी आहे. विषमता, धर्मांधता, जातीयता यांचे समर्थन हे राष्ट्रविरोधी कृत्य आहे. देशाचा अस्पृश्यता हा राष्ट्रीय प्रश्न बनला पाहिजे. देशाने अस्पृश्यता मुक्त करणे हा राष्ट्रीय प्रश्न मानला नाही हीच खरी शोकांतीका आहे. सत्य शोधण्याच्या कामात प्रत्येकाला स्वातंत्र्य दिले पाहिजे. तर्क चिकित्सा करण्याचा हक्क, आहे यातूनच राष्ट्रीयत्वाची भावना अधिक तीव्र होऊ शकते. डॉ. बाबासाहेबांच्या आयुष्यातील प्रत्येक आंदोलने ही मानवी अधिकार आणि हक्काचा लढा आहेत. काळाराम मंदिरप्रवेश नाशिक-१९३०, महाड सत्याग्रह-१९२७, खोतीपद्धत, हिंदू कोडबील इत्यादी-१९२४, बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापन केली १९३०-३२ राऊंड टेबल कॉन्फरन्सला मागासवर्गीयांचे प्रतिनिधी म्हणून इंग्लंडला गेले. १९३२ पुणे करारावर सही अस्पृश्याना स्वतंत्र मतदार संघ ऐवजी संयुक्त मतदार संघ मिळाले. १९३६ इंडिपेन्डन्ट लेबर पार्टी स्थापन, १९३७ जानेवारी मुंबई प्रांताच्या लेजिस्टेटीव्ह असेंब्लीवर सभासद म्हणून निवडून गेले. १९४२ एप्रिल ऑल इंडिया शेड्यूल्ड

कास्ट फेडरेशनची स्थापना.

अस्पृश्यता ही एक लोकांची लहर आहे. हे त्याचे सुभाषित भिक्षेने गुलामगीरी मिळते. स्वातंत्र्य नाही हे त्याचे सुभाषित त्यांनी दलितांना शिका, संघटित व्हा, संघर्ष करा ही त्रिसुत्री दिली. ''तिरस्कारणीय गुलामगिरी अन् अमानुष अन्यायाच्या गर्तेत पिचत पडलेल्या ज्या समाजात मी जन्माला आलो त्या समाजाची गुलामगीरी नष्ट करण्यात मी अपयशी ठरलो तर स्वतःला गोळी घालीन अशी त्यांनी प्रतिज्ञा केली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढले पाहिजे. हा त्यांनी संदेश दिला. स्त्री मुक्ती चळवळीला गतीमान करण्यासाठी त्यांनी भगवान बुद्ध, कबीर व महात्मा फुले यांना गुरू मानले. दलित वर्गाला प्रोटेस्टंट हिंदू किंवा नॉन कन्फॉर्मिस्ट म्हणा अशी मागणी डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत केली होती. दलिताचा मुक्तीदाता या शब्दात सयाजीराव गायकवाड यांनी त्याचा गौरव केला. आंबेडकरांच्या तोंडून बाहेर पडणारे शब्द म्हणजे पिस्तुलातून उडणारे बार आहेत असे डॉ. बेव्हरले निफोल्स यांनी त्यांचे वर्णन केले आहे. आंबेडकरांमध्ये तुम्हाला तुमचा उद्धारकर्ता लाभला आहे. ते तुमच्या बेड्या तोडून टाकतील याची मला खात्री आहे असे उद्‍गार छत्रपती शाहू महाराजांनी माणगाव परिषदेत केली होती.

**डॉ. बाबासाहेबांचे भारतीय संविधानातील मानवाधिकार साठीचे योगदान**

भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वाधिक मोठी लिखित घटना आहे. घटनेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी मानव मुक्तीचा खूप मोठा लढा यशस्वी केला आहे. अनेक पिढ्यांना सामाजिक आर्थिक व राजकीय न्यायाचे आश्वासन देणारी राज्यघटना स्वतंत्र भारतासाठी निर्माण करण्यात आली. कायद्यापुढे सर्वांची समानता याबरोबरच स्वातंत्र्य, समता, बंधूता आणि न्याय या वैश्वीक मूल्यावर आधारीत नवभारताची जडण-घडण करण्याची कामगिरी त्यातूनच साकारली गेली. त्यामुळेच डॉ. आंबेडकरांना संविधानाचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. बाबासाहेबांनी घटनेच्या माध्यमातून नागरीकाना पुढील अधिकार दिलेले आहेत.

**मुलभूत अधिकार :**

A) १) समतेचा अधिकार कलम १४ ते १८

२) स्वातंत्र्याचा अधिकार - १९ ते २२

३) शोषणाविरुद्धचा अधिकार कलम - २३ ते २४

४) धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार कलम २५ ते २८

५) सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार कलम २९ ते ३०

६) घटनात्मक उपाययोजनांचा अधिकार कलम ३२

७) संपत्तीचा अधिकार

B) १) मार्गदर्शक तत्त्वे (आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व परराष्ट्र धोरणविषयक)

२) मानव अधिकार संबंधित कायदे या बरोबरच लोकसभा राज्यसभेमध्ये आरक्षण - कलम ३३० आणि ३३२ शैक्षणिक संस्थेत प्रवेशात आरक्षण कलम १५ (४) आणि ४६ अनुसूचीत जाती, जमातीसाठी आरक्षण, कलम-राजकीय आरक्षण.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवता उद्धारक कार्य**

जाती व्यवस्थेला सुरुंग लावण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हा पहिला यशस्वी प्रयत्न होता. Caste in India Their Genisis Mechanism and Development अर्थात भारतातील जाती त्यांची उत्पत्ती, कार्यपद्धती आणि विकास या आपल्या संशोधनपूर्ण ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की विषमतावादी व विकासाची संधी नाकारणारी चातूर्वण्य अथवा वर्णश्रमव्यवस्था, जन्मावर आधारित व कधीही न मिटणारी बंदिस्त जातीव्यवस्था, चिकित्सा नाकारणारे ग्रंथ प्रामाण्य आणि परिवर्तन नाकारणारी तसेच धार्मिक भावना व श्रद्धा यांना अधिष्ठान मिळवून देणारी वेद शास्त्रे आणि हिंसेला प्रोत्साहन देणारे यज्ञ व कर्मकांड हे हिंदू धर्माचे मुख्य आधार आहेत.

**जाती व्यवस्था निर्मूलनाचा प्रभावी मार्ग**

जाती व्यवस्थेचे निर्मूलन आपल्या ग्रंथात डॉ. आंबेडकरांनी जुन्या व पारंपारिक मार्गांनी जातीप्रथा का नष्ट होऊ शकणार नाहीत याचे प्रथम विवेचन करतात आणि जाती व्यवस्थेतून बाहेर पडण्यासाठी अस्पृश्य बांधवांनी कोणता मार्ग स्विकारला पाहिजे याचेही स्पष्टीकरण देतात. जाती व्यवस्थेचे निर्मूलन करण्यासाठी ते म्हणतात की मुळात जातीभेद हा भावनांचा आणि श्रद्धांचा परिपाक आहे. त्यांना वेदाचे आणि धर्मशास्त्राचे आधिष्ठान आहे. प्रत्येक धर्मनिष्ठ हिंदूने वेदातील आणि स्मृतीतील अज्ञांचे पालन केलेच पाहिजे असे त्यात स्पष्टपणे बजावले आहे. एखादा वृद्धीवादी हिंदू स्वतःच्या विवेकाने वेदातील व स्मृतीतील ऋचाचा अर्थ लावू शकत नाही. आणि जी बाब त्यांच्या सद्सद्विवेक बुद्धीस पटली नसेल त्याला तो विरोध करू शकत नाही. आपली बुद्धी कोणत्याही परिस्थितीत गहाण टाकू नये असे धर्मशास्त्र धमकावत असल्यामुळे स्वातंत्र्य व धारीष्ट्य कोणताच धर्मनिष्ट हिंदू दाखविणार नाही म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते भारतातील जातीव्यवस्था नष्ट होणार नाहीत.

**डॉ. आंबेडकरांचे स्त्री मुक्ती संबंधी विचार व कार्य**

बाबासाहेबांची स्त्री विषयक भुमिका व्यापक होती, ती दलित स्त्री इतकी मर्यादित नव्हती. स्त्रीच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी अनेक घटनात्मक तरतूदी केल्या. त्यामध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक इत्यादी तरतूदीचा समावेश होता. त्यांनी स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक वैवाहिक हक्कासाठी हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून मांडला होता. हे बिल म्हणजे फक्त स्त्रियांना विवाह, घटस्फोट, दत्तक घेण्याचा अधिकार एवढेच अधिकार देणारे बिल नव्हते तर तो महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा तो एक देशव्यापी कृती कार्यक्रम होता. भारतीय परंपरेने हिरावून घेतलेले अधिकार परत मिळवण्याचे काम या बिलाच्या माध्यमातून झाले. बाबासाहेबांना स्त्री मुक्तीचा लढा समाजप्रगतीसाठी महत्त्वाचा वाटत होता. हैद्राबाद येथे सभेत बोलताना ते म्हणाले स्त्रियांनी पुरुषाबरोबर सार्वजनिक क्षेत्रात उतरले पाहिजे आणि स्त्रियांनी आता

पुरूषाच्या खांद्याला खांदा लावून लढले पाहिजे. म्हणजे आपले स्वातंत्र्य आपल्याला लवकरच मिळेल. स्त्रियांची प्रगती हा राष्ट्रीय प्रगतीचा पाया आहे. असे त्यांचे मत होते. तो राष्ट्रीय विकासाचा मुळ आधारस्तंभ आहे अशी त्यांची भुमिका होती. त्यांच्या मते स्त्रियांची प्रगती ज्याप्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो. स्त्रियांना संपत्तीत वारसा मिळावा हा त्यांचा आग्रह होतो व तो त्यांनी मिळवून दिला. जोवर स्त्रियांना संपत्तीचा वारसा मिळणार नाही तोवर त्यांची गुलामगिरी संपणार नाही. हिंदू कोड बिल म्हणजे बाबासाहेबांनी भारतीय स्त्रियांच्या आर्थिक सबलीकरणाबाबत घेतलेली अतिशय मुलगामी व समग्र भुमिका होती. त्यांच्या मते महिला केवळ देशाची सूत्रधार नसून ती लोकशाहीचा आधार आहे. महाड परिषदेत स्त्रीयांना उद्देशून ते म्हणाले होते. ''तुम्ही आपल्या मुलीनाही शिक्षण दिले पाहिजे. ज्ञान आणि विद्या या दोन गोष्टी फक्त पुरुषांसाठी आवश्यक आहेत असे नाही तर ते स्त्रियांसाठीही आवश्यक आहे. पुढची पिढी तुम्हाला सुधारायची असेल तर मुलीना शिक्षण द्या. या भाषणाचा समाजावर परिणाम होऊन मोठ्या प्रमाणात स्त्री शिक्षणास चालना मिळाली. स्त्रीया संमेलनात भाग घेऊ लागल्या. २५ डिसेंबर हा दिवस 'भारतीय स्त्री मुक्ती दिन' म्हणून साजरा करण्यात यावा अशी स्त्री संघटनेने मागणी केली. पारंपारीक अनिष्ठ प्रथेविषयी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य स्त्रीयांना नव्हते परंतु अशा अंधकारमय जीवनात स्त्रियांच्या आयुष्यात प्रकाशज्योत तेवण्याचे काम बाबासाहेबांनी केले. अनेक परिषदामधून स्त्रियांच्या कौटुंबिक समस्यांचा विचार केला. मजूर मंत्री असताना गिरण्या, कारखाने येथे काम करणाऱ्या स्त्रियांना पुरुषांबरोबरीने वेतन मिळावे, बाळंतपणाची रजा मिळावी, कामाठिकाणी पाळणाघर व्यवस्था असावी. मतदानाचा अधिकार अशा अनेक मागण्या त्यांनी पास करून घेतल्या. महिलांना समान हक्कासाठी, समान दर्जासाठी मनुस्मृती ग्रंथाचे दहन केले, मुलीसाठी शिष्यवृत्ती, फी माफी, आर्थिक सवलतीच्या योजना राबविल्या, वृत्तपत्रे, मासिके यामध्ये लेख लिहून जनजागृती केली. मुक्ततेचा आनंद घेऊन जगावे ही त्याची तळमळ आजचे वास्तव बनले आहे. स्त्रीला आत्मबल देण्याचे काम त्यांनी आपल्या विचारातून केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कामगार चळवळ**

महामानव आपल्या जीवनकार्यात 'माणूस' केंद्रस्थानी मानून, त्या अनुषंगाने आपले तत्त्वज्ञान तयार करून मनुष्यत्वाची प्रतिष्ठा निर्माण करण्यासाठी धडपडत असतो. त्यांचे जीवितकार्य अभावग्रस्त, दुर्लक्षित, वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी असते. बाबासाहेबांनी आपले संपूर्ण आयुष्यच विस्थापितांच्या न्याय हक्कासाठी खर्ची घातले. ते समग्र भारतीयांच्या उत्थानासाठी संघर्षशील आहेत. डॉ. आंबेडकरांनी दलिताच्या प्रश्नांचा मूलभूत विचार करून त्यांना त्याचे मानवी हक्क मिळवून दिलेतच. पण त्याचबरोबर समग्र, शोषित, पीडीत, वंचित, अभावग्रस्त घटक, अखंड भारतीय राष्ट्रांसाठी त्यांनी आपली बुद्धी, शक्ती प्रतिष्ठा पणाला लावली. शेतकरी, शेतमजूर, स्त्रीया कामगार आदिवासी, इतर मागास, भटके, विमुक्त यांच्या न्याय हक्कांसाठी लढा दिला. दुर्दैवाने वरील सर्व अभावग्रस्त घटकांनाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ दलितांचेच कैवारी वाटतात ही घटना निर्दयी नी दुर्दैवीही आहे. दोष महामानवाचा विचार कार्याचा नसतो. तो आपल्या निर्माण झालेल्या अनैसर्गिक जातीय अहंकारातून पूर्वगृह दृष्टीकोनाचा असतो. गरज

आहे सत्य समजून घेण्याची. १९२५ च्या दरम्यान डॉ. आंबेडकर इम्प्रुव्हमेंट चाळीत वास्तव होते. या चाळीत राहणारे कामगार, त्यांची जीवन, राहणीमान, त्यांच्या दैनंदिन जगण्यातील प्रश्न यांची डॉ. आंबेडकरांना जाणीव होते. कामगारांचे अनेक पातळ्यावर शोषण थांबावे. कामगार संघटीत होऊन आपल्यावरील अन्याय अत्याचाराविरुद्ध आवाज उठवावा ह्या मताचे बाबासाहेब होते. आपले हक्क मागून घ्यायचे याची जाणिव कामगाराना बाबासाहेबांच्या शिकवणीतूनच मिळते. संघर्षाला आपल्या जीवनात पर्याय नाही याची जाणीव बाबासाहेबांना होतीच. ती जाणीव त्यांनी कामगारांनाही करून दिली. कामगारांच्या आर्थिक शोषणाविरुद्ध त्यांचा संताप होता. त्यातूनच त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची घोषणा करून त्याप्रमाणे १९३६-३७ साली पक्षाची स्थापना केली. स्वतंत्र मजूर जाहिरनामा कामगार कल्याणासंदर्भात लिहिले आहे. ''आमचा पक्ष औद्योगिक कामगाराना नोकरीतून काढू नये व त्याना कारखान्यात योग्य ती बढती मिळावी. यासाठी कायदा घडविण्यासाठी प्रयत्न करील. त्याचबरोबर कामाचे कमी तास, योग्य पगार रजा अधिकात अधिक जिवनावश्यक सुखसोई तसेच कामगारांना बोनस, पेन्शन अथवा कामातून म्हातारपणामुळे वा असमर्थतेमुळे रिटायर होण्याच्या वेळी योग्य त्या जीवनाला पोषक अशा तरतुदी करण्यासंबंधीचे कायदे करण्याचे प्रयत्न करील. तसेच कामगारांना आजारीपणात बेकारीच्या काळात व अपघाताच्या परिस्थितीत संरक्षण देण्यासाठी Social Insurance नामक येजना मांडील. तसेच कामगारासाठी स्वच्छ व स्वस्त अशा निवासस्थानाची सोय करण्याचा आमचा पक्ष प्रयत्न करील.'' सुरुवातीपासून बाबासाहेबानी कामगार कल्याणाचा विचार आपल्या पक्षीय राजकारणातून सुरू केला. ब्रिटिश सरकारच्या व्हाईसरायच्या मंत्रीमंडळात डॉ. आंबेडकरांनी मजूर मंत्री म्हणून काम करताना त्यांनी कामगार कल्याणाचे धोरण स्विकारले व त्याची अंमलबजावणीही केली. त्या कामगारांच्या हितासंदर्भात अनेक चर्चा घडवून आणल्या. किमान वेतन कायदे, कामाचे तास, कामगारासाठी उपहारगृह, महागाई निर्देशांकानुसार महागाई भत्ते, रास्त भावातील धान्य, केंद्र प्रॉव्हीडंट फंडाची योजना, कामगारांचे सेवांतर्गत प्रशिक्षण, कामगारांच्या पाल्यांची शिक्षण विषयक सोय, आदी महत्त्वाच्या बाबींवर चर्चा घडवून आणून त्याच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न झाले. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचे फलित म्हणून सर्वच पातळ्यांवर काम करणाऱ्या कामगार, कर्मचाऱ्यांचे काम निश्चित झाले. किमान वेतनास मान्यता मिळाली. कामगारांमध्ये स्त्री-पुरुष असा भेद न करता समान वेतन हे सूत्र स्वीकारले गेले.

**स्त्री-कामगारांचे प्रश्न :**

बाबासाहेबांना स्त्री-पुरुष विषमतेची चीड होती. त्यांनी देशातील सर्व जाती जमातीच्या स्त्रियांचा विचार त्यांनी केला. विषमता संपवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केला. भारतीय समाज पातळीवर स्त्रिया ह्या 'गुलामांच्या गुलाम' आहेत. ह्या सर्व शोषित पीडीतापेक्षा जास्त पीडित आहेत. यांची त्यांना जाणीव होती. त्यासाठी त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. प्रसंगी मंत्री पदाचा राजीनामा दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या हक्कांसंदर्भात विचार मांडताना, स्त्री म्हणून त्यांना त्याचे हक्क मिळाले पाहिजेत यासाठी लढा दिला. प्रसुती पूर्वकाळात स्त्रियांना ठरावीक काळ विश्रांती व सोयी मिळाल्या पाहिजेत. असे सांगून राष्ट्रीय हितासाठी हे फार महत्त्वाचे असल्याचा प्रश्न आंबेडकरांनी मांडला.

लोककल्याणासाठी स्त्रीयांच्या विश्रांतीसाठी खात्रीलायक हमी देण्याचे सरकारचे कर्तव्य असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बजावले. १९२६ साली त्यांनी सुसंस्कृत जीवनासाठी लोकांच्या विश्रांतीच्या हक्काचाही पुरस्कार केला. ९ डिसेंबर १९४३ रोजी आंबेडकर आपल्या अधिकाऱ्यासोबत चहाच्या मळ्यास व धनबादला कोळसा खाणीत काम करणाऱ्या कामगारांच्या समस्या पाहण्यासाठी गेले. प्रत्यक्षात कामगार, स्त्री कामगारांशी चर्चा करून त्यांच्या समस्या समजावून घेतल्या. मंत्री म्हणून गरोदर स्त्री कामगाराना प्रसुती पूर्वी दहा आठवडे आणि प्रसूतीनंतर चार आठवडे भरपगारी रजा मिळावी यासाठी प्रयत्न करून तसा निर्णय घेतला. ८ फेब्रुवारी १९४६ रोजी भारतीय खाण कायदा सुधारणा विधेयक केंद्रीय विधीमंडळात मंजुरीसाठी मांडून ते मंजूर करून घेतले. त्यात आजारीपणाचा विमा, अपघाताची नुकसान भरपाई, कामगार स्त्रीयांच्या बाळंतपणातील रजेचे नियम, खाण कामगारासाठी सुधारणा आदी विशेष तरतूदी या कामगार कायद्यात स्त्री कामगारासाठी केल्या. त्यामुळे कामगार कायदा अस्तित्वात आला. कामगारांच्यामध्ये आत्मसन्मान नि हक्काची जाणीव निर्माण झाली.

**महाड सत्याग्रह**

२० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी रायगड जिल्ह्यातील महाड येथे पाण्यासाठी चवदार तळ्यावर सत्याग्रह केला होता. या पाण्यासाठीच्या लढ्यास महाडचा मुक्तिसंग्राम म्हणूनही ओळखले जाते. जाती व्यवस्थेमुळे अस्पृश्याना हिंदू समाजापासून दूर ठेवण्यात आले होते. तसेच त्याचा पाण्यावरील अधिकार नाकारण्यात आला होता. पाणी घेण्यास पिण्यास सक्ती केली होती. कोकणातील महाड हे शहर सत्याग्रहासाठी निवडले गेले. कारण, उच्चजातीय हिंदूंनी हे धोरण प्रत्यक्षात आणण्यासाठी तयारी दाखवली होती. त्यामध्ये अवचित्रे, गन, सहस्त्रबुद्धे, सुरेंद्रनाथ टिपनीस हे महाड पालीकेचे प्रमुख कर्मचारी होते. १९२७ साली सुरेंद्रनाथ टिपणीसांनी नगरपालिकेचे प्रमुख म्हणून सर्व सरकारी संपत्ती/ सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांसाठी खुली केली व त्या अनुषंगाने डॉ. आंबेडकरांना सभा घेण्यास सांगितले. सभेनंतर सर्वजण चवदार तळ्याकडे गेले. सर्वप्रथम आंबेडकरांनी पाणी पिले त्यानंतर सर्व लोकांनी पाणी पिले. त्यावेळी ५००० स्त्री-पुरूष होते. जरी महाड नगरपालिकेने सार्वजनिक संपत्ती व पाणवठे खुले केले असले तरी तसा कसलाही उल्लेख केला गेला नव्हता. त्यामुळे एवढ्या मोठ्या संख्येने अस्पृश्य जमा होऊनही त्यांनी आसपासच्या कोणत्याही पाणवठ्यावरून पिण्यासाठी पाणी घेण्याची हिंमत केली नाही. म्हणून या सभेसाठी ४० रुपये किंमतीचे पाणी उच्च जातीय हिंदूकडून विकत घेण्यात आले होते. कारण सभेच्या ठिकाणी अस्पृश्यांना आसपासच्या पाणवठ्यावरून पाणी घेण्यास मनाई होती. बाबासाहेब बोलू लागले. सत्याग्रही त्यांचा एक-एक शब्द साठवू लागले. ''सनातन्यानी अमानुषपणाचा कळस गाठला आहे. गुरा-ढोरांना जे पाणी मिळते त्याला स्पष्ट करण्याचा आम्हाला अधिकार नाही. ही अस्पृश्यता आता आपणच धुवून काढायची. खरतर चवदार तळ्याचे पाणी न प्यालाने आम्ही मरणार नाही. आजपर्यंत आमचे अडले नाही किंवा अडणारही नाही. ते पाणी पिऊन आम्हाला अमरत्व प्राप्त होईल असेही नाही. पण आम्हाला तिथे आटकाव घालण्यात येतो. तो अटकाव तोडायचा आहे. आमच्या मूलभूत अधिकारावर जी गदा आली ती घालवायची व हक्क बजावयाचा म्हणून हा प्रयत्न चालू आहे. आम्हाला माणूस म्हणून

वागणूक मिळावी, तळे आम्हास खुले करावे, समतेची सुरुवात व्हावी, भेदाभेद संपावा, हा उद्देश या मागील सत्याग्रहाचा होता.

चवदार तळ्याचे पाणी पिऊन आंबेडकर सभेपुरते राहत असलेल्या सरकारी बंगल्यावर परतले आणि इतर लोक सभेच्या मंडपात परत गेले. चवदार तळ्यावरून निघाल्यावर दोन तासातच महाडमध्ये अफवा उटली की तळ्यातील पाणी बाटवल्यानंतर आता जमलेला जमाव वीरेश्वराच्या मंदिरात जाऊन मंदिरही बाटवणार आहे. धर्म धोक्यात असल्याचे उच्च हिंदूंनी गावभर पसरवले. त्यातून एक हत्याराचा घोळका असलेला जमाव, लाठ्या-काठ्या घेऊन सभेच्या ठिकाणी आला. त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली. तसेच हाच घोळका सबंध महाड फिरून अस्पृश्यांना धमकावत होता. त्यामुळे अनेक टिकाणी अस्पृश्यांना हिंसेला सामोरे जावे लागले. परंतु अहिंसा हे तत्त्व मानणाऱ्या आंबेडकरांनी अस्पृश्य सत्याग्रहींना सनातनी हिंदू विरुद्ध हिंसा करू नका असा संदेश दिला. त्यामुळे एवढा आत्याचार होऊनही आणि प्रत्यक्षात स्थानिक लोकापेक्षा जास्त संख्येने असूनही काठीधारी अस्पृश्यांनी संयम ठेवला व त्याबद्दल गांधींनी सत्याग्रहींचे कौतुक केले. या सत्याग्रहींना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपदेश केला. की,

१) पारंपारीक व्यवसायातून बाहेर पडा.

२) मेलेल्या जनावराचे मांस भक्षण करू नका.

३) आणि स्वतःला हिन समजू नका. स्वतःला सन्माने जगण्यास शिका.

या घटनेनंतर सवर्ण हिंदूंनी तलाव शुद्धीसाठी चवदार तळ्यात गोमुत्र व शेण टाकून तलावाचे शुद्धीकरण केले. पुन्हा डॉ. आंबेडकरांनी सत्याग्रहाचे नियोजन केले. पुढे मुंबई हायकोर्टात जवळ जवळ दहा वर्षांनी ही लढाई बाबासाहेबांनी यशस्वी केली. शेवटी १७ डिसेंबर १९३७ रोजी चवदाळ तळे अस्पृश्यांसाठी खुले झाले. पाण्याचा अधिकार मिळाला.

**काळाराम मंदीर प्रवेश :**

काळाराम मंदीर सत्यागृह २ मार्च १९३० रोजी डॉ. आंबेडकरांच्याकडून अस्पृश्यांसाठी नाशिक येथील काळाराम मंदीरात प्रवेशासाठी त्यांच्या न्याय हक्कासाठी उभारलेला एक लढा होता. भारतीय समाजामध्ये चातूर्ण वर्ण व्यवस्था असल्यामुळे उच्च वर्णीय वर्गाकडून अस्पृश्यांना मंदीरात प्रवेश दिला जात नसे. या सम्याग्रहात १५ हजार दलितांचा समावेश होता. यामध्ये मांग, महार, चांभार समुदाय समाविष्ठ होते. या सत्याग्रहात महिलांची संख्या जास्त होती. हा लढा ५ वर्षे ११ महिने व ७ दिवस चालू राहिला. बाबासाहेब म्हणतात जर ईश्वर सर्वांसाठी आहे तर त्यांच्या मंदीरात त्यांना का प्रवेश मिळत नाही. या आंदोलनात आंबेडकरांसोबत दादासाहेब गायकवाड, सहस्त्रबुद्धे, देवराव नाईक, डी. व्ही. प्रधान, बालासाहेब खरे, याबरोबर स्वामी आनंद हेही होते. या संघर्षात त्यांनी दगडांचा माराही सहन केला. मात्र, मंदीर प्रवेश न मिळाल्याने डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्मत्यागाची घोषणा केली आणि देशाच्या इतिहासाला नवे वळण दिले. काळाराम मंदीरप्रवेश क्रांतीकारी घटना होती. यातून जाती व्यवस्थेला सुरुंग लावण्याचे

काम आंबेडकरांनी केले. काळाराम मंदीर सत्याग्रह करण्याआधी बहिष्कृत भारतमध्ये अग्रलेख लिहिला होता. त्यामध्ये त्यांनी म्हटले होते काळाराम मंदिरासाठी सत्याग्रह करणे अपरिहार्य झाले आहे. आपण लवकरच सत्याग्रह करू व आपण मंदीर प्रवेशाची चळवळ हाती घेणार आहोत तो आमचा अधिकार आहे. बाबासाहेब म्हणाले मी माझ्या लोकांना हक्क मिळवून देण्यासाठी लढा उभारला आहे, वाजवी तडजोड होत असल्यास आम्ही सत्याग्रह तहकूब करायला तयार आहोत. परंतु वेळेच्या आधीच रथ बाहेर घाईघाईन आणण्यास सुरुवात केली. सत्याग्रहींना चुकवून रथयात्रा काढण्याचे नियोजन होते. चरण पादूकाजवळ थांबलेल्या सत्याग्रहीच्या लक्षात येताच त्यांनी सर्व शक्ती एकवटून रथ अडविला. यावरून मिरवणूक बाजूला राहीली व मारामारी, दगडफेक झाली. तोवर बाबासाहेब घटनेच्या ठिकाणी पोहचले. दगडाचा वर्षाव चालू होता. इतक्यात पोलिसांचा कडा फोडून 'भास्कर कद्रे' नावाचा भीमसैनिक मंदीरात घुसला अन रक्ताने माखून बेशुद्ध पडला. उपस्थित सर्व सत्याग्रह्यांना व स्वतः बाबासाहेबांनाही लहान-सहान इजा झाल्या होत्या. अशाप्रकारे हा सत्याग्रह १९३५ पर्यंत चालला.

**सारांश :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या प्रश्नांचा मुलभूत विचार करून त्यांना त्यांचे मानवी हक्क मिळवून दिलेच पण त्याचबरोबर शेतकरी, कामगार, पीडीत, वंचीत, अभावग्रस्त घटक, अखंड भारतीय राष्ट्रासाठी त्यांनी आपली बुद्धी खर्च केली. स्त्री कामगार, आदिवासी, इतर भटके, विमुक्त यांच्या न्याय हक्कांसाठी लढा दिला व यशस्वी केला. हिंदू कोडबिलाच्या माध्यमातून स्त्रीचा उद्धार करण्याचे प्रयत्न बाबासाहेबांनी केला. सुरुवातीला अपयश आले परंतु नंतरच्या कालावधीनंतर एक एक कायदा भारत सरकारला संमत करावा लागला. एकूणच बाबासाहेबांनी देशातील प्रत्येक नागरीकाला घटनेच्या माध्यमातून मुलभूत अधिकार, कर्तव्ये बहाल करण्याबरोबर स्वच्छंदी जगण्याचा त्याची सर्वांगीण प्रगती करण्याचा हक्क बहाल केला. भारतीय राज्यघटना तर मानवी अधिकाराचे एक प्रारूपच आहे. सम्यक परिवर्तनाचा ध्यास असणाऱ्या डॉ. आंबेडकरांना समग्र परिवर्तन अपेक्षित होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मानवी हक्कासाठी लढत राहिले. डॉ. आंबेडकरांना जातीच्या, धर्माच्या, राज्याच्या सिमा नव्हत्या. तर ते या देशाच्या सर्व प्रश्नांनी सर्व चळवळीशी, सर्व आंदोलनाशी, सर्व समाजाशी एकरूप झालेले महान नेते आहेत.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न** (Check Your Progress)

**खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इन्डीपेंन्डेन्ट लेबर पार्टीची स्थापना केव्हा केली?

२) भिक्षेने गुलामगीरी मिळते स्वातंत्र्य नाही हा विचार कोणी व्यक्त केला?

३) डॉ. आंबेडकरानी कोणती त्रिसूत्री दिली आहे?

४) स्त्री मुक्ती चळवळीला गतीमान करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोणाला गुरू मानले?

५) कोणत्या करारान्वये अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ मिळाले?

६) दलितांचा मुक्तीदाता असा गौरव डॉ. आंबेडकरांचा कोणी केला?

७) आंबेडकरांच्या तोंडून बाहेर पडणारे शब्द म्हणजे पिस्तुलातून उडणारे बार आहेत असे कोणी वर्णन केले आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे** (Answers to Check your Progress)

१) १९३६ साली डॉ. आंबेडकरांनी इन्डीपेन्डन्ट लेबर पार्टीची स्थापना केली.

२) डॉ. बाबासाहेबांनी हा विचार व्यक्त केला.

३) शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा ही स्त्रिसुत्री दिली.

४) महात्मा फुले, भगवान बुद्ध, वसंत कबीर यांना स्त्रीमुक्ती चळवळीत गुरू मानले.

५) पुणे करारान्वये १९३२ अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ मिळाले.

६) सयाजीराव गायकवाडानी डॉ. बाबासाहेबांचा गौरव दलितांचा मुक्तीदाता असा केला.

७) डॉ. बेव्हरले निफोल्स यांनी त्यांचे वर्णन आंबेडकरांच्या तोंडून बाहेर पडणारे शब्द म्हणजे पिस्तुलातून उडणारे बार आहेत असे वर्णन केले आहे.

**स्वाध्याय/गृहपाठ** (Exercise/Home Assignment

अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवाधिकारातील योगदान

**अधिक वाचनासाठी पुस्तके**


१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे; खंड १८, भाग ३, पृ. २७७.

२) शंकरराव खरात (संपादन), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, इंद्रायणी प्रकाशन, पुणे, पृ. २२५.

३) धनंजय कीर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

४) शरण कुमार लिंबाळे - शतकातील दलित विचार.

५) Moon Vasant (Editor) Dr. Babasaheb Ambedkar writing and speeches Vol. 16, Publication - Education Department, Government of Maharashtra, 1998.

६) आंबेडकर भीमराव रामजी 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म अनुवाद - तळवटकर, चटणीस, रेगे, सिद्धार्थ प्रकाशन, मुंबई-१ आवृत्ती २१ वी, २००७ पृष्ठ ८९.


❑❑❑

### घटक – ४

# मानवाधिकार आणि भारतीय संविधान

## (Human Rights and Constitution of India)

**अनुक्रमणिका :**


४.१. प्रस्तावना

४.२. उद्दिष्टे

४.३. विषय विवेचन

४.३.१ संविधानिक चौकट

i) मूलभूत हक्क व कर्तव्ये

ii) राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

४.३.२ मानवी हक्कांचे कायदेशीर संरक्षण : विशेष कायदे

४.३.३ राष्ट्रीय मानवी हक्क आयोग : संरचना व कार्ये

स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

स्वयंअध्ययनासाठी उत्तरे

४.४. स्वयंअध्यनासाठी प्रश्न

४.५. सारांश

४.६. संदर्भ


### ४:१ प्रस्तावना :

भारतातील मानवी हक्काबाबतची प्रमाणित चौकट व अंमलबजावणी यांचा विचार करताना तो प्रामुख्याने भारताची राज्यघटना व तिच्यामध्ये अंतर्भूत मूलभूत हक्क व कर्तव्ये तसेच राज्याची मार्गदर्शक तत्त्वे यांच्या अनुषंगाने ही प्रमाणित चौकट अभ्यासावी लागते. भारतीय राज्यघटनेच्या समुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या मसुदा समितीने तयार केलेली, २६ नोव्हेंबर १९४९ ला घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी स्वाक्षरी केलेली व २६ जानेवारी १९५० ला अंमलात आलेली भारतीय राज्यघटना मानवी हक्कांच्या संदर्भातील केवळ भारतच नव्हे तर जगाच्या दृष्टीने महत्वाचा असा दस्तएवज

आहे. कारण अमेरिका व आर्यलंड या देशांच्या राज्यघटनेनंतर जगात समान कायदा असलेल्या देशातील व न्याय हक्कांचे विधेयक अंतर्भूत असणारी केवळ तिसरी लिखित राज्यघटना होती.

मानवी हक्कांच्या संदर्भातून राज्य घटनेचे महत्व अथवा प्रमाणितता घटनेच्या सरनाम्यातूनच स्पष्ट होते. त्याचबरोबर घटनेतील कलम १४ ते ३२ मध्ये स्पष्ट केलेले 'मूलभूत अधिकार' व कलम ५१ (क) मध्ये सांगितलेली 'मूलभूत कर्तव्ये' तसेच कलम ३६ ते ५१ मध्ये स्पष्ट केलेली 'मार्गदर्शक तत्वे' यातून मानवी हक्कांच्या संदर्भातील भारतातील घटनात्मक चौकट स्पष्ट होते.

भारतीय राज्यघटना या घटनात्मक कायद्याबरोबरच मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी भारतात वेळोवेळी अनेक कायदे पारित करण्यात आले आहेत. त्याचबरोबर 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोगा'ची स्थापना करून त्याच्या माध्यमातून ही भारतात मानवी हक्कांची जपणूक व संवर्धनाचा प्रयत्न होत आहे.

म्हणूनच भारतातील मानवी हक्कांच्या संदर्भातील प्रमाणित चौकट व अमलबजावणी यांचा अभ्यास करताना यासंदर्भातून घटनात्मक चौकट तिच्यातील मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्ये आणि त्यांच्यातील अंतरसंबध तसेच राज्याच्या मार्गदर्शक तत्वांचा अभ्यास करावा लागेल. त्याच बरोबर मानवी हक्कांच्या संरक्षणासाठीचे विशेष कायदे व मानवी हक्कांच्या अंमलबजावणीसाठीच्या राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचा अभ्यास करावा लागेल.

## ४:२ उद्दिष्टे (Objectives) :

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास -

- ❖ भारतीय राज्यसघटनेत समाविष्ट मूलभूत हक्क समजून घेता येतील.
- ❖ भारतीय राज्यघटनेत समाविष्ट नागरिकांची कर्तव्ये जाणून घेता येतील.
- ❖ मूलभूत हक्क व कर्तव्ये यांच्यातील अंतरसंबंध अभ्यासता येतील.
- ❖ राज्याची मार्गदर्शक तत्वे पाहता येतील.
- ❖ मानवी हक्कांच्या संरक्षणासाठीचे विशेष कायदे अभ्यासता येतील.
- ❖ भारतातील राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची रचना व कार्ये अभ्यासता येतील.

## ४:३.१ संविधानिक चौकट : मूलभूत हक्क व कर्तव्ये व त्यातील आंतरसंबंध :

(Constitutional Framework : Fundamemta Rights and Duties and their inter relationship)

**अ) मूलभूत हक्क** (Fundamental Rights)

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेतच घटनाकारांनी घटनेची व राजकीय व्यवस्थेची ध्येये व उद्दिष्टे निसंदिग्धपणे स्पष्ट केली आहेत. त्यानूसार सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय प्राप्त करून

देण्याचा तसेच विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र्य व दर्जाची व संधीची समानता प्राप्त करून देत व्यक्तीची प्रतिष्ठा निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा संकल्प, ध्येय स्पष्ट केले आहे. या सर्व बाबी प्रत्येक व्यक्तीला प्राप्त करून देण्यासाठी व्यक्तीला तीच्या व्यक्तीमत्वचा सर्वांगीण विकास साधण्यायोग्य परिस्थिती उपलब्ध करून द्यायची असेल तर प्रत्येक नागरिकास राज्यसंस्थेकडून काही अधिकार, हक्क प्राप्त झाले पाहिजेत. याच हक्कासाठी भारताचा स्वातंत्र्यलढा लढला गेला. म्हणूनच घटनाकारांनी घटनानिर्माणात मूलभूत हक्कांना विशेष महत्व दिले. त्यासाठी डिसेंबर १९४६ ला घटना समितीने मूलभूत हक्कांसंदर्भात विशेष समिती स्थापन केली. या समितीने शिफारस केलेल्या हक्कापैकी काही हक्क मूलभूत हक्क म्हणून प्रदान करण्यात आले तर उर्वरीत राज्याची मार्गदर्शक तत्वे म्हणून स्विकारण्यात आले.

घटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ ही मूलभूत हक्कांशी संबधीत आहेत. या मूलभूत हक्कांचे ध्येय कायद्याचे राज्य स्थान करणे असते. त्यामुळेच मूलभूत हक्कांना 'राज्यघटनेचा आत्मा' किंवा 'राज्यघटनेची सद्सद्विवेकबुद्धी' म्हटले जाते.

भारतातील मानवी हक्कांच्यासंबंधीची प्रमाणित चौकट व अमंलबजावणी संदर्भातून भारतील राज्यघटनेतील घटनात्मक चौकट पाहता त्यातील मूलभूत हक्कांचे स्थान किती महत्वाचे आहे हे पाहण्यासाठी याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत अभ्यासावे लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'भारताच्या राज्यघटनेतील मूलभूत हक्कांचे स्वरूप दुहेरी आहे. ते म्हणजे १) मूलभूत हक्कांवर नागरिकांना दावा करता यावा म्हणून त्यांना घटनेत स्थान देण्यात आले आहे. २) कोणत्याही प्रकारच्या सत्तेवर मूलभूत हक्कांचे बंधन असावे म्हणून मूलभूत हक्कांना घटनेत सामावून घेतले आहे.

अशा या मूलभूत हक्कांची सध्या सहा गटात विभागणी केली आहे. पूर्वी ही विभागणी सात गटात होती. तथापी ५५ व्या घटनादुरुस्तीनुसार 'संपत्तीचा हक्क' मूलभूत हक्कातून काढून तो वैधानिक हक्कामध्ये अंतर्भूत करण्यात आला. भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला आहे. त्याची विभागणी पुढील प्रमाणे.

कलम १२ मध्ये, 'राज्य' म्हणजे काय? हे स्पष्ट केले असून, राज्य म्हणजे भारत सरकारच्या ताब्यातील सर्व स्थानिक किंवा इतर अधिकृत संस्था' होय. राज्यालासुद्धा मूलभूत हक्कविरोधी कायदा करता येणार नाही हे स्पष्ट केले आहे.

*कलम १३ यामध्ये हे स्पष्ट करण्यात आले आहे की, मूलभूत हक्काविरुद्ध जाणारा कायदा मूलभूत हक्कांच्या संदर्भातच बेकायदेशीर ठरेल. यातून घटनात्मक कायदा हा श्रेष्ठ असेल हे स्पष्ट केले गेले.

भारतील राज्यघटनेतील मूलभूत हक्क

१) समतेचा हक्क (कलम १४ ते १८)

२) स्वातंत्र्याचा हक्क (कलम १९ ते २२)

३) शोषणाविरुद्धचा हक्क (कलम २३ व २४)

४) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (कलम २५ ते २८)

५) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (कलम २९ व ३०)

६) घटनात्मक उपाय योजनेचा हक्क

**१) समतेचा हक्क :–**

विविध धर्म, जाती, भाषा, भारतीय समाजात लोकशाही मूल्ये सक्षमपणे रुजवण्याकरीता, विविध भेदभावापासून दूर जात सर्वांना समानतेच्या तत्वात गुंफण्याकरीता समतेचा हक्क खूपच महत्वाचा आहे. कलम १४ मध्ये 'समते'चा या हक्काच्या संदर्भातील अर्थ स्पष्ट केला असून तो, 'समता म्हणजे कायद्यापुढील समता आणि कायद्याने संरक्षणाची समान संधी होय.' अशा या समतेच्या अधिकारात पुढील समतांचा समावेश होतो.

i) **कायद्यासमोर समानता (कलम १४) –**

या हक्कानुसार कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान आहेत. कोणत्याही भेदभावाशिवाय समान व्यक्तीसाठी समान कायदा तसेच त्या कायद्याची अंमलबजावणी सर्वांसाठी समान. राज्याची कायदे सर्वांना समानरित्या लागू असतील त्यामध्ये धर्म, जात, वंश, प्रांत इत्यादि आधारे भेदभाव केला जाणार नाही. तथापी घटनादुरुस्तीनुसार पंतप्रधान, सभापती, उपराष्ट्रपती इत्यादिंचे यासंदर्भात वेगळे स्थान मानण्यात आले आहे.

ii) **सार्वजनिक ठिकाणी प्रवेशाचा समान हक्क (कलम १५) –**

सार्वजनिक ठिकाणी प्रवेशांचा समान हक्क याद्वारे सर्वांना देण्यात आला. शाळा, मंदिरे, पाणवठे, विहिरी, उपहारगृहे, करमणूकगृहे, तलाव, घाट, दुकाने, रस्ते, मैदाने इत्यादि सार्वजनिक ठिकाणी प्रवेशास धर्म, जात, वंश, लिंग, वर्ग, जन्मस्थान इत्यादि भेदभाव करून प्रवेश नाकारता येणार नाही. अर्थात यालाही काही बाबतीत अपवाद आहेत. उदा :– महारोग, क्षयरोग इ. व्याधिग्रसतास सर्वाजनिक ठिकाणी प्रतिबंध करता येतो.

iii) **सार्वजनिक सेवात (नोकरी) समान संधी (कलम १६) –**

सार्वजनिक सेवात किंवा नोकरीत धर्म, जात, वंश, वर्ग, जन्मस्थान इत्यादि भेदभाव करून संधी किंवा प्रवेश नाकारला जाणार नाही. अपात्र ठरवले जाणार नाही. याबाबत सर्वांना समान संधीचा हक्क देण्यात आला. याला अपवाद म्हणजे विशिष्ट जाती, जमातींच्या विकासासाठी याबाबत खास सवलती व राखीव जागा इ. होय.

iv) **अस्पृश्यता नष्ट करणे (कलम १७) –**

समतेचा हक्क तोपर्यंत खऱ्या अर्थाने सर्वांना प्राप्त होणार नाही. जोपर्यंत अस्पृश्यता पाळली जाते. म्हणूनच कलम १७ नूसार अस्पृश्यता नष्ट करून, अस्पृश्यता पालनास बंदी करण्यात आली. अस्पृश्यता पालन हा फौजदारी गुन्हा समजून शिक्षेची तरतूद करण्यात आली. १९५५ च्या 'अस्पृश्यता निवारण कायद्याने' याला अधिक बळकटी प्राप्त झाली.

v) **पदव्यांचे संपुष्टीकरण (कलम १८) –**

कोणत्याही प्रकारचे किताब, पदव्या राज्यातर्फे दिल्या जाणार नाहीत. लष्करी व ज्ञानार्जनाचे क्षेत्र यास अपवाद असेल. पदव्यांच्यामुळे सामाजिक विषमता निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी भारतात किंवा परदेशाकडून भारत सरकारच्या परवानगीशिवाय पदवीचा स्वीकार करता येणार नाही. ब्रिटिशकाळात रावसाहेब, खानबहादूर इ. पदव्या देऊन भेद, विषमता निर्माण केली जात.

**२) स्वातंत्र्याचा हक्क (कलम १९ ते २२) :**

भारतीय घटनेने व्यक्तींच्या सर्वांगीण व्यक्तीमत्व विकासासाठी प्रथम सात प्रकारचे हक्क प्रदान केले. त्यापैकी 'संपत्तीचा हक्क' मूलभूत हक्कांतून वगळण्यात आल्याने सध्या सहा प्रकारचे मूलभूत हक्क व्यक्तीस प्राप्त आहेत. त्याचप्रमाणे प्रथम सात प्रकारची स्वांतत्र्याचे हक्क देण्यात आले त्यापैकी 'संपत्ती संपादन, धारण व तीची वासलात लावणे' हा हक्क वगळण्यात आल्याने सहध्या सहा प्रकारचे स्वांतत्र्याचे हक्क प्राप्त आहेत ते कलम १९ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहेत. ते पुढील प्रमाणे –

i) **भाषण, विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य –**

यानुसार प्रत्येक नागरिकाला, विचारांची देवाण–घेवाण मुक्त चर्चा, इ. साठी आपले विचार भाषणाद्वारे मांडण्याचा हक्क देण्यात आला आहे. त्याचबरोबर आपले विचार लेखन, मुद्रण, चित्रे, फलक, हावभाव, प्रतिके इत्यादिद्वारा अभिव्यक्त करण्याचा अधिकार देण्यात आल आहे. परंतु हे विचार सार्वजनिक हिताच्या दृष्टीने घातक असतील, राष्ट्राची सुरक्षितता धोक्यात आणणारे असतील तर त्यावर बंधने आणण्याची तरतूदही केली आहे. ही बंधने योग्य की अयोग्य हे याबाबतचा निर्णय देण्याचा अधिकार न्यायालयांना देण्यात आला आहे.

ii) **निःशस्त्र व शांततापूर्वक एकत्र येण्याचे स्वातंत्र्य –**

उपरोक्त भाषण, विचार व अभिव्यक्ती स्वांतत्र्याच्या हक्कांशी निगडीत हा हक्क असून तो लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी महत्वाचा आहे. राज्यातील विविध विषय, समस्या इ. बाबतीत विचारांचे आदान–प्रदान, परिणामकारक उपाययोजनासाठी, जनमत तयार करणेसाठी, जाणीव–जागृतीसाठी एकत्र येणे, मोर्चे, मिरवणूका काढणे, सभा घेणे याबाबत हा हक्क दिला आहे. परंतु या एकत्र येण्यात निःशस्त्रता व शंतता या पूर्वअटिंचा अंतर्भाव सार्वजनिक शांतता व सुरक्षिततेसाठी करण्यात आला आहे.

iii) **संघटना, संस्था स्थापणाचे स्वातंत्र्य –**

या स्वांतत्र्याच्या हक्कानुसार प्रत्येकाला सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, सांसकृतिक, औद्योगिक इ. संस्था, संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. तथापी देशविघातक कृत्य, दहशत वा भितीचे वातावरण तयार करणे अशा संघटनावर बंदी घालण्याचा अधिकार शासनाला आहे.

iv) **संचार स्वांतत्र्य –**

आपल्या खंडप्राय देशाची ओळख व्हावी, त्याची भव्यता पाहता यावी, व्यक्तीमत्वाचा विकास व्हावा, अनुभवाचा वारसा वाढावा याकरीता प्रत्येकाला भारतात कोठेही संचार करण्याचे, वास्तव्य करण्याचे स्वांतत्र्य या हक्कानुसार बहाल करण्यात आले आहे. तथापी जम्मू-काश्मीर सारख्या प्रांतात व देशाच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने महत्वाच्या भागात संचार व वास्तव्य याबाबत काही बंधने घालण्यात आली आहेत.

v) **देशाच्या कोणत्याही भागात वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य –**

नोकरी, व्यवसाय, व्यापार, शिक्षण, पर्यटन, सामाजिक कार्य, इ. कारणासाठी एका भागातील नारिकास दुसऱ्या भागात वास्तव्य करण्यास बंधन येऊ नये, त्याच्या व्यक्तीस्वातंत्र्याचा संकोच होऊ नये याकरीता प्रत्येक नागरीकाला देशाच्या कोणत्याही भागात वास्तव्य ते तात्पुरते किंवा कायमस्वरूपी करण्याचा हक्क या स्वातंत्र्याने दिला आहे.

vi) **व्यापार, व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य –**

या हक्कानुसार प्रत्येक नागरिकाला आपल्या आवडीनुसार, कौशल्यानुसार इच्छेनुसार, पात्रतेनुसार व्यापार व्यवसाय करण्याचा हक्क देण्यात आला आहे. भारतातील जातीप्रथा व त्यातून व्यवसाय निवडीवर आलेली बंधने, परिणामी व्यक्तीमत्व विकासाचा संकोच, दारिद्रय या पार्श्वभूमीवर देण्यात आलेला हा हक्क खूप महत्वाचा ठरतो.

या शिवाय पुढील काही स्वातंत्र्याचे हक्क देण्यात आले आहेत. ते व्यक्तीस्वातंत्र्याच्या उपरोक्त हक्कांचे संरक्षण करणारी व्यवस्था होय.

i) **अपराधी व्यक्तीस गुन्हासिद्धी संदर्भातील संरक्षण –**

घटनेच्या कलम २० नुसार हे संरक्षण देण्यात आले असुन यानुसार गुन्हा सिद्ध झाल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरविले जाऊ शकत नाही. तसेच एका गुन्ह्यासाठी एकापेक्षा अधिक वेळा शिक्षा किंवा कायद्याने निश्चित केलेल्या शिक्षेपेक्षा जास्त शिक्षा देता येणार नाही. याचबरोबर कोणालाही खोटी साक्ष देण्यासाठी सक्ती करता येणार नाही. तसेच ज्या व्यक्तीला अटक केली आहे त्यास अटकेची कारणे सांगणे आवश्यक असुन त्याबाबत व्यक्तीस आपल्या पसंतीच्या वकिलामार्फत आपली बाजू मांडण्याचा हक्क आहे. अटकेनंतर २४ तासांच्या आत न्यायालयासमोर हजर करावे लागते. अर्थात याला प्रतिबंधक स्थानबद्धता कायदा व मिसा कायदानुसार अटक अपवाद आहे.

ii) **जीविताचा आणि स्वातंत्र्याचा हक्क –**

कलम २१ मध्ये हा हक्क स्पष्ट केला असून त्यानुसार कायदेशीर कार्यपद्धतीव्यतिरिक्त इतर प्रकारे कोणाही व्यक्तीस तिच्या जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्यापासून वंचित केले जाणार नाही. तथापि जीवित व स्वातंत्र्याच्या हक्कात शारिरीक अस्तित्त्व नव्हे तर शारिरीक, मानसिक, भावनिक दृष्ट्या वाढीसाठी आवश्यक भयमुक्त

वातावरण व आवश्यक साधने मिळवण्याचा हक्क होय.

iii) **बेकायदेशीर अटक व कैदे विरुद्धचा हक्क अथवा संरक्षण –**

यामध्ये अटक केलेल्या व्यक्तिला त्याच्या अटकेची कारणे शक्य तितक्या लवकर सांगणे तसेच त्याला स्वतःच्या बचावासाठी आपल्या पसंतीनुसार वकिल निवडण्याची मुभा तसेच न्यायदंडाधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय २४ तासापेक्षा जास्त काळ अटकेत न ठेवणे असे संरक्षण देण्यात आले आहे. या हक्कांचा, संरक्षणाचा समावेश कलम २२ मध्ये करण्यात आला आहे.

**३) शोषणाविरुद्धचा हक्क (कलम २३ व २४) –**

कलम २३ व २४ मध्ये शोषणाविरुद्धचा अधिकार स्पष्ट केला आहे. कलम २३ मध्ये अनैतिक देहव्यापार, वेठबिगार, सक्तीने काम करवून घेणे, माणसाची खरेदी–विक्री, गुलामगिरीला प्रतिबंध करण्यात आला असून यापासून संरक्षण मिळवण्याचा हक्क प्रत्येकास देण्यात आला आहे. तसेच कलम २४ नुसार १४ वर्षाखालील मुलांना खाणी, रेल्वे व इतर अवजड, अवघड व धोब्याची कामे, धोब्याच्या ठिकाणी देता येणार नाहीत. समाजातील दुर्बल घटकांचे शोषण होऊ नये यासाठी हा संरक्षणाचा हक्क महत्त्वाचा ठरतो.

**४) धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार (कलम २५ ते २८) –**

४२ व्या घटनादुरुस्तीने भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य आहे हे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार विशिष्ट धर्म हा 'राष्ट्राचा धर्म' मानण्यात आलेला नाही. त्याचवेळी आपल्या राष्ट्राचा आधार 'धर्म' मानलेला नाही. तर धर्म ही प्रत्येक नागरीकांची खाजगी बाब मानण्यात आली असून त्यानुसार धार्मिक स्वातंत्र्याचे पुढील अधिकार प्रत्येकास देण्यात आले आहेत.

१. प्रत्येकाला आपल्या आवड व इच्छेनुसार कोणताही धर्म स्विकारण्याचा, मानण्याचा व त्यानुसार आचरण करण्याचा अधिकार.

२. एखाद्या विशिष्ट धर्माच्या प्रगतीसाठी कर भरण्यापासून संरक्षणाचा अधिकार.

३. शिक्षण संस्थातून धार्मिक शिक्षणास बंदी, पण एखाद्या धार्मिक संस्थेत धार्मिक कार्यक्रमास सहभागी होण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

**५) सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार (कलम २९, ३०) –**

भारतातील सर्व धर्माच्या, संप्रदायाच्या, वर्गाच्या नागरिकांना शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाची संधी प्राप्त व्हावी यासाठी घटनेतील कलम २९ व ३० नुसार प्रत्येकास सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार –

१. प्रत्येकाला त्याची स्वतःची भाषा, लिपी आणि संस्कृतीचे जतन करण्याचा अधिकार आहे.

२. कोणत्याही शासकीय अनुदानित शिक्षण संस्थेत धर्म, वंश, जात, वर्ग, असा भेदभाव करुन प्रवेश नाकारता येणार नाही.

३. प्रत्येकाला आपल्या व्यक्तिमत्त्व विकासास पोषक व आपल्या इच्छेनुसार हवे ते शिक्षण घेण्याचा अधिकार आहे.

४. धर्म किंवा भाषेवर आधारित सर्व अल्पसंख्याकांना आपल्या निवडीनुसार शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा व चालवण्याचा अधिकार आहे. अशा संस्थांना साहाय्य करताना राज्यातर्फे भेदभाव केला जाणार नाही.

**६) संविधानिक संरक्षण अथवा घटनात्मक उपायांचा अधिकार (कलम ३२) –**

नागरिकांना दिलेले घटनात्मक मुलभूत अधिकाऱ्याच्या संरक्षणाची व्यवस्था नसेल तर ते अधिकार खऱ्या अर्थाने प्राप्त होणार नाहीत, उपभोगता येणार नाहीत म्हणूनच घटनेच्या कलम ३२ नुसार मुलभूत अधिकाराच्या संरक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तीला मुलभूत हक्कांच्याबाबत घटनात्मक उपाय योजनाचा अधिकार दिला आहे. मुलभूत हक्कांवर अतिक्रमण झाल्यास न्यायालयाकडे दाद मागता येऊ शकते. याबाबत घटनात्मक उपाययोजनेचे पुढील मार्ग स्पष्ट करण्यात आले आहेत;

**१. बंदी प्रत्यक्षीकरण किंवा देहोपस्थिती –** यानुसार अटक केलेल्या व्यक्तीची अटक कायदेशीर आहे की नाही हे पाहण्यासाठी अटकेतील व्यक्तीस न्यायालयात हजर करा असा आदेश न्यायालय देऊ शकते.

**२. परमादेश किंवा महादेश –** यानुसार एखाद्या शासकीय अधिकाऱ्याने कर्तव्यात कसून केल्याने मुलभूत हक्काच्या उपभोगात अडचण येत असेल तर संबंधित अधिकाऱ्यास ते कर्तव्य पार पाडण्यासाठी आदेश न्यायालयातून मिळवता येतो.

**३. अधिकार पृच्छा –** एखादा अधिकारी जेव्हा एखाद्या विशिष्ट अधिकाराचा वापर करतो, प्रत्यक्षात तो अधिकार त्याला नसतोच. त्यामुळे मुलभूत हक्कावर आक्रमण होऊ शकते. त्यावेळी संबंधित अधिकाऱ्याला त्याने वापरलेल्या अधिकाराविषयी स्पष्टीकरण घेता येते.

**४. प्रतिषेध –** न्यायालयातील कामकाज चालत नसेल त्यामुळे न्याय मिळणे अवघड बनले असेल. न्यायालय आपले जुने निकाल फिरवीत असेल तर यासंबंधी दाद मागता येते.

**५. उत्प्रेक्षण –** कनिष्ठ न्यायालयातील खटला काही विशिष्ट कारणासाठी वरिष्ठ न्यायालयात चालवणे साठीचा अर्ज व्यक्तिस करता येतो.

**❖ मुलभूत कर्तव्ये –**

व्यक्ती असो किंवा संस्था, जेव्हा त्यांना काही हक्क, अधिकार दिले जातात, तेव्हा त्या अनुषंगाने त्यांना काही कर्तव्येही पार पाडावी लागतात. कारण व्यक्तीला एक व्यक्ती, नागरिक म्हणून, समाजाचा सदस्य म्हणून जोपर्यंत आपली काही कर्तव्ये आहेत आणि ती पार पाडलीच पाहिजेत हे ओळखता येणार नाही, तोपर्यंत कितीही अधिकार दिले तरी विकसित, शांततामय व सुरक्षित राष्ट्राची, खऱ्याखुऱ्या लोकशाहीची प्रस्थापना करण्याच्या

प्रक्रियेत अडचणी येतच राहतील. उलटपक्षी अधिकारांचा गैरवापर होण्याची शक्यताही नाकारता येणार नाही. म्हणूनच हक्क व कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. याविषयी महात्मा गांधी म्हणत की, 'हक्क हे कर्तव्याशिवाय पूर्ण होत नसतात. हक्क आणि जबाबदाऱ्या परस्परांना पूरक असतात. म्हणूनच भारतीय राज्यघटनेत नागरिकांची मुलभूत कर्तव्ये स्पष्ट केली आहेत.

प्रथम १९७६ ला ४२ व्या घटना दुरुस्तीने कलम ५१ (अ) मध्ये १० मुलभूत कर्तव्ये सांगितली. नंतर ८६ व्या घटनादुरुस्तीच्या माध्यमातून आणखी एका कर्तव्याचा समावेश करण्यात आला. अशी एकूण ११ मुलभूत कर्तव्ये घटनेत समाविष्ट करण्यात आली आहेत, ती पुढीलप्रमाणे;

१. राज्यघटनेचे शपथपूर्वक पालन करणे. त्याचे आदर्श आणि संस्था, राष्ट्रीय ध्वज आणि राष्ट्रीय गीत यांचा आदर करणे.

२. ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करुन त्यांचे अनुसरण करणे.

३. भारताची सार्वभौमत्व, एकात्मता आणि अखंडता मान्य करुन उन्नत करणे व त्यांचे संरक्षण करणे.

४. देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.

५. धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलिकडे जाऊन भारतातील सर्व जनतेत सामंजस्य व बंधुभाव वाढीस लावणे आणि स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणण्याच्या प्रथा सोडून देणे, बंद करणे.

६. आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे मोल जाणून ते जतन करणे.

७. वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी, यासह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करुन त्यामध्ये सुधारणा करणे आणि प्राणीमात्रांबद्दल दयाबुद्धी बाळगणे.

८. विज्ञाननिष्ठ दृष्टीकोण, मानवतावाद व शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

९. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

१०. व्यक्तिगत आणि सामुहिक उपक्रमांच्या सर्व क्षेत्रात सर्वोत्तम होण्यासाठी धडपडणे. त्यामुळे राष्ट्र प्रयत्न आणि उद्दिष्ट साध्याच्या कमाल मर्यादिकडे सतत वाटचाल करणे.

११. ८६ व्या घटनादुरुस्तीन्वये अंतर्भूत कर्तव्य ६ ते १४ वयोगटातील मुलामुलींना त्यांच्या पालकांनी शिक्षणाची संधी उपलब्ध करुन द्यावी.

### ❖ मुलभूत अधिकार व मुलभूत कर्तव्ये यांतील आंतरसंबंध –

१. मुलभूत अधिकार व मुलभूत कर्तव्ये या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कर्तव्य भावनेच्या जाणीवेशिवाय हक्क योग्य प्रकारे वापरता येणार नाहीत व हक्कच नसतील तर जबाबदाऱ्या योग्यप्रकारे पार पाडता

येणार नाहीत. म्हणूनच, 'हक्क हे कर्तव्याशिवाय पूर्ण होत नसतात. हक्क व जबाबदाऱ्या परस्परपूरक असतात.' असे महात्मा गांधीनी स्पष्ट केले आहे.

२. हक्कांना राज्यसत्तेकडून हमी व संरक्षण लाभावे लागते तर कर्तव्याचा जन्म व जाणीव नागरिकत्त्वाच्या आवश्यक मुल्यामधून बळकटी यावी लागते. तेव्हा या दोन्हीमुळेच व्यक्ती व राष्ट्रविकासाला गती प्राप्त होते.

३. नागरीकांचे हक्क व स्वातंत्र्य हे राज्यापासून सुरक्षित ठेवण्यासाठी मुलभूत हक्कांची आवश्यकता असते. तर मुलभूत हक्कांचा स्वैर व चूकीचा वापर होऊ नये, राज्याची शांतता, सुरक्षितता धोक्यात येऊ नये यासाठी मुलभूत कर्तव्यांची आवश्यकता असते.

**४:३.२ राज्यविषयक धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे** (Directive Principles of State Policy)

मानवाला मानव म्हणून जन्मतः काही हक्क प्राप्त होत असतात. ते नैसर्गिक व हिरावून न घेता येणारे असतात. व्यक्तीला जीवन जगण्यासाठी व आपल्या व्यक्तीमत्त्वाचा विकास साधण्यासाठी हे हक्क राज्यसंस्थेकडूनही प्राप्त होणे गरजेचे असते. कारण त्यामुळे या हक्कांना संरक्षण प्राप्त होत असते. भारताचा स्वातंत्र्यलढा तर याच हक्कांच्या प्राप्तीसाठी लढला गेला. कोणताही व्यक्ती व लोकशाही राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे हे मुलभूत हक्क असतात. म्हणूनच भारताच्या राज्यघटना निर्मिती प्रकियेवेळी डिसेंबर १९४६ ला मुलभूत हक्कांच्या संदर्भात घटना समितीने एक विशेष समिती स्थापन केली. या समितीने मुलभूत हक्काविषयी अहवाल सादर केला. परंतु यातील सर्वच हक्क देणे आवश्यक असले तरी ते देणे शक्य नव्हते. ते देण्यासाठी समस्या होत्या. सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे हे सर्व हक्क दिले तर त्यांची अंमलबजावणीसाठी आवश्यक साधने उपलब्ध नव्हती. आर्थिकदृष्ट्याही ते शक्य नव्हते. या समस्येवर विचार मंथन करुन या हक्कांमध्ये मुलभूत हक्क व राज्यविषयक धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे असा फरक करण्यात आला. व राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ३६ ते कलम ५१ मध्ये ही मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट करण्यात आली.

❖ **मानवी हक्कांच्या संदर्भात मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरुप व महत्त्व –**

प्रत्येक भारतीय नागरिकास मानवी हक्कांची हमी घटनेतील मूलभूत अधिकारातून प्राप्त होते. त्याचबरोबर यासंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे सुद्धा खूपच महत्त्वाची आहेत. कारण घटनेने नागरीकांना दिलेले जे मूलभूत अधिकार आहेत ते अधिकार अथवा हक्क वापरण्यासाठी अथवा उपभोगण्यासाठी आवश्यक ती सामाजिक, आर्थिक परिस्थिती तयार असणे खूप आवश्यक आहे. राज्याला आपले धोरण आखताना मानवी हक्कांना डोळ्यासमोर ठेवून त्यानुसार सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती निर्माण कशी करता येईल? यासंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे दिशादर्शन करतात. त्यानुसार राज्याने धोरण तयार करुन त्याची अंमलबजावणी केल्यास आवश्यक परिस्थिती तयार होईल. व प्रत्येकाला घटनेने प्राप्त हक्कांचा उपभोग घेता येईल.

दुसरे म्हणजे, घटनेने दिलेले मूलभूत अधिकार व राज्यविषयक धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे ही परस्परांना पूरक अशीच आहेत. कारण सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक समानता असणारी परिस्थिती निर्माण होत नाही तोपर्यंत प्रत्येक व्यक्तिला प्राप्त मूलभूत हक्क खऱ्या अर्थाने उपभोगता येत नाहीत.

त्याचबरोबर असे काही हक्क आहेत ज्यांचा मूलभूत हक्कांमध्ये समावेश नाही. परंतु व्यक्तिविकासासाठी ते आवश्यक आहेत. उदाः कामाचा हक्क इ. यासंदर्भात राज्याला दयावयाच्या सूचनांच्या स्वरुपात मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट करण्यात आली आहेत.

मार्गदर्शक तत्त्वांच्यामध्ये समाविष्ट केलेली तत्त्वे ही मानवी हक्कांना केवळ साहाय्यभूतच नाहीत तर ती तत्त्वे वेगळ्या स्वरुपातून व आशयातून मानवी हक्क, अधिकारच स्पष्ट करतात किंवा ते प्राप्त करुन देण्यासंदर्भात राज्याला मार्गदर्शन करतात.

बेकारी, वार्धक्य, विकलांगता इ. नी पिडीत व्यक्ती तिला मूलभूत अधिकार उपभोगता येतीलच असे नाही. ते त्यांना उपभोगता यावेत यासाठी अशा व्यक्तींना ‘लोकसाहाय्या’चा हक्क उपलब्ध करुन देण्याचे मार्गदर्शन तत्त्वे करतात तेव्हा एक प्रकारे मूलभूत अधिकार प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचवण्याचे कार्य मार्गदर्शक तत्त्वे करीत असतात.

❖ **मार्गदर्शक तत्त्वे –**

**कलम ३६** ‘राज्य’ या शब्दाच्या अर्थाबाबत स्पष्टीकरण देते.

कलम ३६ मध्ये हे स्पष्ट केले आहे की या तत्त्वामध्ये समाविष्ट तरतुदी कोणत्याही न्यायालयामार्फत अंमलबजावणी योग्य असणार नाहीत, पण तरीही ही तत्त्वे शासन व्यवहाराच्या दृष्टीने मूलभूत आहेत व कायदे करताना ती लागू करणे हे राज्याचे कर्तव्य असेल.

**कलम ३८** यामध्ये कलम ३८ (१) मध्ये हे स्पष्ट केले की राज्याने लोककल्याणाच्या संवर्धनासाठी आवश्यक सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाने युक्त समाजव्यवस्था प्रस्थापित करणे, तीचे जतन करणे, तर कलम ३८ (२) नुसार उत्पन्नाच्या बाबतीत असणारी विषमता व दर्जा, सुविधा, संधी याबाबतीतील विषमता नाहीशी करण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

**कलम ३९** मध्ये स्पष्ट केले की, राज्य पुढील गोष्टी साध्य करण्यासाठी आवश्यक धोरण आखील;

१. उपजीविकेचे पुरेसे साधन मिळवण्याचा स्त्री व पुरुष यांना समान हक्क.

२. समाजाच्या भौतिक साधनसंपत्तीची मालकी, नियंत्रणाची विभागणी सामुहिक हिताला साहाय्यभूत होईल अशी व्हावी.

३. पुरुष व स्त्रीयांना समान कामास समान वेतन मिळावे.

४. वय व ताकदिस न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पाडू नये.

५. बालक व युवकांना शोषणापासून संरक्षण द्यावे.

**कलम ३९ (क)** नुसार गरजेनुसार व्यक्तीस कायदेविषयक मोफत सहाय्य उपलब्ध करुन द्यावे.

**कलम** ४० हे ग्रामपंचायतींचे संघटन संदर्भात आहे.

**कलम ४१** कामाचा, शिक्षणाचा हक्क तसेच बेकार, वृद्ध, विकलांगता यांनी पिडीत असलेल्यांना 'लोक साहाय्याचा हक्क' प्राप्त करुन द्यावा.

**कलम ४२** नुसार राज्य हे कामाबाबत न्याय व मानवी परिस्थिती निर्माण करण्यासाठी व प्रसुतीविषयक साहाय्यासाठी तरतूद करील.

**कलम ४३** नुसार सर्व कामगारांना काम, निर्वाह वेतन, योग्य कामाची परिस्थिती निर्माण करुन देण्यास व ग्रामीण भागात कुटिरोद्योगांचे संवर्धन करण्यास प्रयत्नशील राहील.

**कलम ४३ (क)** उद्योगधंद्याच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग रहावा यासाठी प्रयत्न करेल.

**कलम ४४** नुसार राज्य, नागरीकांना एकरुप नागरी संहिता लाभावी यासाठी प्रयत्न करेल.

**कलम ४५** सहा वर्षाखालील बालकाचे संगोपन व शिक्षणाची तरतुद राज्य करील.

**कलम ४६** नुसार राज्य, दुर्बल घटकांचे, अनुसूचित जाती जमातीचे अन्याय व शोषणापासून रक्षण करेल व त्यांच्या हितसंवर्धनासाठी प्रयत्न करेल.

**कलम ४७** नागरीकांचे पोषणमान व राहणीमान उंचावणेसाठी आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य असेल.

**कलम ४८** कृषी व पशूसंवर्धन यांची सूसूत्र व्यवस्था लावत दुभत्या जनावरांचे जतन करणेसाठी उपाययोजना करील.

**कलम ४८ (क)** राज्य हे देशाच्या पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी आणि वने व वन्य जीवसृष्टी यांचे रक्षण करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

**कलम ४९** हे राष्ट्रीय स्मारके, स्थाने व वस्तू यांचे संरक्षण संदर्भातील राज्याची जबाबदारी स्पष्ट करते.

**कलम ५०** न्याययंत्रणा कार्यकारी यंत्रणेपासून अलग ठेवण्याकरिता राज्य उपाययोजना करील.

**कलम ५१** नुसार राज्य हे, आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षेच्या संवर्धनासाठी, राष्ट्रा-राष्ट्रांत न्याय व सन्मानपूर्ण संबंध राखणेसाठी, आंतरराष्ट्रीय तंटे लवादाद्वारे मिटवण्यास प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्नशील राहील.

अशा स्वरुपात व आशयात भारतीय राज्यघटनेत मानवी हक्कांना पूरक अशी मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट करण्यात आली आहेत.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. भारतीय राज्यघटनेच्या कलम ------ मध्ये मूलभूत कर्तव्ये स्पष्ट केलेली आहेत.

२. भारतीय राज्यघटनेतील कलम १७ हे ------- याच्याशी संबंधीत आहे.

३. सार्वजनिक ठिकाणी प्रवेशाचा समान हक्क दिला असला तरी त्याला अपवाद म्हणून ------ व्याधीग्रस्त व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी प्रतिबंध करता येतो.

४. भारतीय राज्यघटनेत कलम २५ ते २८ नुसार ------ चा अधिकार देण्यात आला आहे.

५. शासकीय अधिकाऱ्याने कर्तव्यात कसूर केल्याने मूलभूत हक्क उपभोगण्यास अडचण येत असल्यास संबंधित अधिकाऱ्यांस ते कर्तव्य पार पाडण्यासाठी न्यायालयातून जो आदेश मिळवता येतो, त्यास ------ म्हणतात.

**स्वयंअध्ययनासाठी उत्तरे**

१) कलम ५१ (क)    २) अस्पृश्यता नष्ट करणे

३) महारोग व क्षयरोग    ४) धार्मिक स्वातंत्र्याचा

५) परमादेश किंवा महादेश

**४:३.३ मानवी हक्कांना कायदेशीर संरक्षण : विशेष कायदे** (Statutory Protection of Human Rights : Special laws)

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या प्राथमिक गरजा आहेत. अलिकडे शिक्षण व आरोग्य या गरजाही प्राथमिक गरजा म्हणून मानल्या जातात. या गरजा तसेच याशिवाय इतर काही गरजा आहेत की ज्यांची पूर्तता होणे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असते. या सर्व गरजांचा विचार करता त्यांची विभागणी शारीरिक गरजा, मानसिक गरजा, सामाजिक गरजा व आर्थिक गरजा अशी करता येईल. या सर्व गरजा परस्पर सहकार्यातून, परस्परावलंबनातून व एकूणच समाजाकडून होणे अपेक्षित व आवश्यक असते. तो प्रत्येक व्यक्तीचा हक्क असतो. कारण प्रत्येक व्यक्तीला व्यक्ती म्हणून जन्मतः काही हक्क प्राप्त झालेले असतात. हेरॉल्ड लास्की म्हणतात, 'ज्या परिस्थितीच्या घटकांशिवाय व्यक्तीला आपली सर्वांगिण प्रगती साध्य करता येत नाही, त्या परिस्थितीच्या घटकांना मानवी हक्क असे म्हणतात.'

थोडक्यात सर्व व्यक्तींना व्यक्ती म्हणून मानवी हक्क प्राप्त असतात. परंतु लिंग, वय, धर्म, वंश, जात इत्यादी भेदभावामुळे प्राप्त मानवी हक्क सर्वजण उपभोगू शकत नाहीत. यामध्ये स्त्रिया, बालके, वृद्ध, कामगार, कैदी, अपंग व्यक्ती इत्यादींच्या प्रामुख्याने समावेश होतो. या घटकांच्या बाबतीत होणाऱ्या मानवी हक्क भंगाच्यामुळे त्यांना व्यक्ती म्हणून किमान जीवन जगता येत नाही. व्यक्ती म्हणून जगण्याचा, विकास पावण्याचा अधिकारच नाकारला जातो. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीला प्राप्त मानवी हक्क त्याला खरोखरीच उपभोगता यावयाचे असतील, त्या मानवी हक्कांचा भंग व्हावयाचा नसेल तर त्यांसाठी कायद्याची आवश्यकता भासते. कारण, कोणत्याही मानवी हक्काची प्रत्यक्ष अंमलबजावणी अथवा उपभोग क्षमता ही त्या हक्कांना कायद्यामध्ये विकसीत करण्यावर अवलंबून असते. म्हणूनच बेन्थम यांच्या मते, 'कायदद्याने मान्य केलेली, स्वीकृती दिलेली व्यक्तीची मागणी म्हणजे अधिकार होय.' म्हणूनच मानवी हक्कांना कायद्याचे संरक्षण, पाठबळ प्राप्त होणे आवश्यक असते.

म्हणूनच मानवी हक्कांच्या घटनात्मक संरक्षणासंबंधी भारतात विशेष कायदे करण्यात आले आहेत ते पुढीलप्रमाणे;

### ❖ मानवी हक्कांच्या घटनात्मक संरक्षणासंबंधी भारतातील विशेष कायदे –

भारतात मानवी हक्कांच्या घटनात्मक संरक्षणासंबंधी अनेक कायदे करण्यात आले आहेत. विशेषतः स्त्रीया, बालके, कामगार, अपंग, वृद्ध, अल्पसंख्यांक इत्यादी घटकांच्या हक्कांची पायमल्ली होण्याचे जास्त प्रमाण लक्षात घेता त्यासंदर्भात विविध कायदे करण्यात आले ते घटकानुसार पुढील प्रमाणे पाहाता येतील.

### अ) स्त्रियांच्या संदर्भातील विशेष कायदे –

केवळ भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावर स्त्री–पुरुष असा लिंगभेद करुन 'स्त्री' ला केवळ 'स्त्री' आहे म्हणून अनेक मानवी हक्कापासून वंचित ठेवले जाते. तिच्या मानवी हक्कांची पायमल्ली केली जाते. म्हणूनच भारतात यासंबंधी अनेक कायदे करण्यात आले आहेत. ते पुढीलप्रमाणे;

#### १. सतीप्रथा बंदी कायदा १८२९ :

सतीप्रथेने विधवा स्त्रीला जगण्याचाच अधिकार नाकारला होता. या अमानवी प्रथेविरुद्ध राजाराम मोहन रॉय यांनी जनआंदोलन सुरू केले. या प्रथेला धार्मिक आधार नसल्याचे सांगितले. ब्रिटिश शासनाचे या अमानवी प्रथेकडे लक्ष वेधले. लॉर्ड विल्यम बेंटिकने १८२९ ला सतीप्रथाबंदी कायदा प्रथम संमत केला. या कायद्यानुसार पती निधनानंतर त्याच्या पत्नीला म्हणजे विधवेस सती जाणे, तिला सती जाण्यास भाग पाडणे, सतीप्रथा चालू रहावी तसेच सती जाण्यास कोणत्याही प्रकारची मदत करणे, विधवेस सती जाण्यास प्रवृत्त करणे इत्यादी कृत्य बेकायदेशीर ठरवून ही प्रथा कायद्याने बंद केली.

#### २. हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा १८८६ :

हिंदू स्त्रीस पती निधनानंतर सती जाणे किंवा त्याची विधवा म्हणून उर्वरीत आयुष्य जाणे, तेही केशवपन करुन, त्याच बरोबर अनेक बंधने तिच्यावर लादली जात व त्या बंधनात आयुष्य जगणे क्रमप्राप्त ठरत. विधवेचे आयुष्य म्हणजे पदोपदी वेदना, अपमान, छळ इ. भरलेले असे. माणूस म्हणून जगण्याचा अधिकारच हिरावला जात असे. १८८६ ला 'हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा १८८६' नुसार विधवा स्त्री व तिच्या आई–वडीलांना विधवेच्या पुनर्विवाहासंबंधी काही अधिकार देण्यात आले.

या कायद्याने हिंदू विधवा स्त्रीस पुनर्विवाहाचा अधिकार प्राप्त झाला. यातून जन्मलेल्या संततीस कायदेशीर मान्यता देण्यात आली. स्त्री अज्ञानी व पहिल्या पतीबरोबर शारिरीक संबध आले नसतील तर पुनर्विवाहासाठी आई, वडिल इ. जवळच्या नातेवाईकांची संमती आवश्यक मानली गेली तर ती सज्ञान असेल व प्रथम पतीबरोबर शारिरीक संबंध आले असतील तर ती स्वइच्छेने इतरांच्या संमतीशिवाय पुनर्विवाह करू शकेल इत्यादी तरतुदी करण्यात आल्या.

#### ३. बालविवाह प्रतिबंधक कायदा १८७२, १९२१, १९२९, १९७८ :

भारतात बालविवाहाची प्रथा मोठ्या प्रमाणात होती. मुला–मुलींची सहाव्या, सातव्या वर्षातच नव्हे तर

अगदी पाळण्यातही विवाह लावले जात असत. या प्रथेचा विपरीत परिणाम स्त्रीच्या आरोग्यावर होत असे. म्हणून प्रथम १८७२ ला बालविवाह प्रतिबंधक कायदा करुन विवावाहाची वयोमर्यादा मुलीस १४ व मुलांस १८ वर्षे करण्यात आली. पुन्हा १९२१ ला ती १२ करण्यात आली. यावरती उमटलेल्या तीव्र प्रतिक्रिया मुळे पुन्हा ती १४ व १८ च कायम केली. १९२९ ला पुन्हा यासंबंधी कायदा करण्यात आला. नंतर १९७८ ला स्वतंत्र भारतात यासंबधीचा कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार मुलीचे १८ व मुलाचे २१ अशी वयोमर्यादा करण्यात आली. तसेच या वयोमर्यादेचा भंग करणारा विवाह बालविवाह समजण्यात आला. यासंबंधीत पालकांना त्यासाठी कायद्याने जबाबदार धरण्यात आले.

**४. हिंदु उत्ताराधिकारी कायदा १९५६ :**

हिंदू स्त्रीयांना कायद्याने मालमत्तेत वाटा अथवा अधिकार या कायद्याने प्राप्त झाला. या कायद्यानुसार स्त्रीला आई, पत्नी व मुलगी म्हणून संपत्तीत समान वाटा मिळाला. पत्नीस तिच्या मृत पतीच्या संपत्तीत वाटा मिळालाच. शिवाय मृत मुलाच्या आईस तिच्या विधव सून व नातवंडाच्या बरोबरीने वाटा मिळाला. तसेच वडिलांच्या संपत्तीत त्यांच्या मुलींनाही वाटा मिळाला.

**५. हिंदू दत्तक आणि पालनपोषण कायदा १९५६ :**

या कायद्यानुसार मुलाप्रमाणेच मुलीलाही दत्तक घेता येऊ लागले. विधवा स्त्री ही एखाद्याला आपला वारस म्हणून दत्तक घेऊ शकेल, तसेच स्त्री व पुरुष अशा दोघांनाही मुलांच्या पालनपोषणाचा अधिकार समान असेल. त्याचबरोबर पत्नी, विधवा मुलगी, वृद्ध आई-वडील, अज्ञान मुले आणि आश्रित व्यक्तींनाही मालमत्तेत वाटा या कायद्यानुसार मिळू शकतो.

**६. अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ :**

या कायद्यानुसार मुलींचा अनैतिक व्यापार व वेश्याव्यवसाय हा गुन्हा मानण्यात आला. यामध्ये वेश्यावृत्तीला स्त्रिस तयार करणे, प्रोत्साहन देणे, यांचा समावेश होतो. यासाठी कैद व आर्थिक दंड अशी शिक्षेची तरतूद या कायद्यात आहे.

**७. हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ :**

भारतात समाज मग तो शहरी असो किंवा ग्रामीण, अशिक्षित असो किंवा सुशिक्षित, उच्चवर्गीय असोत किंवा कनिष्ठ या सर्वात विवाहावेळी वधूपक्षाकडून वरपक्षाला रोख रक्कम, सोने, इतर संपत्तीच्या स्वरुपात जी संपत्ती द्यावी लागते, त्या प्रथेस हुंडा प्रथा म्हणतात. या प्रथेमुळे वधूपक्षाचे शोषण व वधूचा छळ मोठ्या प्रमाणात होत होता व आहे. अशा स्वरुपाच्या शोषणाला, पिळवणूकीला प्रोत्साहन देणाऱ्या, कारण ठरणाऱ्या प्रथेला नष्ट करण्यासाठी १९६१ ला हा कायदा संमत करण्यात आला. त्यानुसार हुंडा घेणारा व हुंडा देणारा अशा दोघांना अपराधी मानण्यात आले व शिक्षेची तरतूद करण्यात आली.

**८. मातृत्वविषयक कायदा १९२९ :**

या स्त्रीयांना नोकरी, व्यवसाय घरकाम करुन करावी लागते. यातच ती गरोदर असेल तर तिला आवश्यक पुरेशी विश्रांती व सुरक्षितता मिळाली नाही. तिच्या व तिच्या बाळाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. अनेकदा ते दगावतात. हे होऊ नये म्हणून हा कायदा संमत केला गेला. या कायद्यानुसार स्त्रीला प्रसुतीपूर्व व प्रसूतीनंतर पगारी रजा दिली जाईल. हा कालावधी संपल्यानंतर (सहा-सहा आठवड्यांचा) आठ आठवड्याची संगोपन रजाही मिळेल. शिवाय स्त्रीचा गर्भपात होऊन ती आजारी पडल्यास एक महिन्याची रजा मिळेल. प्रसूतीपूर्व व नंतर वैद्यकीय सेवा-सुविधा मोफत दिली जाईल. स्त्री बाळंतपणाच्या रजेवर असताना तिला नोकरीवरुन कमी करता येणार नाही. तसेच गर्भवती स्त्रीच्या आरोग्यावर व गर्भावर विपरित परिणाम होईल असे काम तिला देण्यास या कायद्याने प्रतिबंध केला. १९६१ ला प्रसूतिविषयक सहाय्य कायदा सुधारीत स्वरुपात संमत झाला.

**९. कारखाना कायदा १९४८ :**

या कायद्याच्या माध्यमातून स्त्रियांच्या हक्कांच्या संरक्षणाची काळजी घेण्यात आली आहे. या कायद्यानुसार कामाच्या ठिकाणी तीस किंवा तीसपेक्षा जास्त स्त्री कामगार असतील तेथे स्वतंत्र पाळणाघराची व्यवस्था, स्त्रियाकरिता स्वतंत्र स्वच्छता गृहाची व्यवस्था बंधनकारक करण्यात आली. स्त्रियांची कामाची वेळ सकाळी नऊ ते संध्याकाळी सात या दरम्यानची असावी. एकूण नऊ तासापेक्षा जास्त काम त्यांना देण्यात येऊ नये.

स्त्री कामगारांना अशा प्रकारे संरक्षण इतर अनेक कामगार कायद्यातून देण्यात आले आहे. उदाः मळे व्यावसायविषयक कायदा १९५१ इ.

**१०. जन्मपूर्व निदान तंत्रज्ञान (नियमन व गैरवापरास प्रतिबंध) कायदा १९९४ :**

देशात मुलींचा जन्मदर सातत्याने घटत होता. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन गर्भलिंग चाचणी घेतली जाऊन मुलगी असेल तर तिला जन्मापूर्वीच मारले जाते. यासाठी हा कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार गर्भवती महिलेस सोनोग्राफी सेंटरमध्ये नेऊन मुलगा की मुलगी आहे हे पहाणे, हे पाहण्यासाठी गर्भवती स्त्रीवर दबाव टाकणे, तिचा छळ करणे इ. गुन्हा समजण्यात आला. या कृत्यामध्ये सामील सर्वांना शिक्षेची तरतूद करण्यात आली.

२० सप्टेंबर १९९४ ला हा कायदा संपूर्ण देशात लागू केला तरी महाराष्ट्रात मात्र तो पूर्वीच १९८८ ला लागू करण्यात आला होता. हा कायदा लागू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य.

**११. महिला संरक्षण अधिनियम २००५ (कौटुंबिक हिंसाचार कायदा) :**

देशात घरगुती हिंसाचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांची संख्या खूपच जास्त आहे. बलात्कार, पत्नीला मारहाण, हुंडाबळी, शारिरीक व मानसिक छळ यांना तिला सामोरे जावे लागते. देशात तब्बल ३७% महिला घरगुती हिंसाचाराला बळी पडताता. घरगुती हिंसाचारापासून स्त्रियांना सरंक्षण प्राप्त व्हावे म्हणून हा कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार, 'स्त्रीचा शाारिरीक, लैंगिक, मानसिक, शाब्दीक, भावनिक, आर्थिक छळ करणे, छळाची धमकी देणे म्हणजे कौटुंबिक हिंसाचार मानण्यात येतो.

या कायद्यानुसार असा हिंसाचार करणाऱ्या व्यक्तीला शिक्षा व आर्थिक दंडाची तरतूद आहेच. शिवाय या कामी नियुक्त सुरक्षा अधिकाऱ्याने कामात कसूर केल्यास त्यासही कैद व आर्थिक दंडाची शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

**१२. बलात्कार विरोधी कायदा २०१२ :**

या कायद्यानुसार १८ वर्षाखालील मुलीवर बलात्कार केल्यास १० वर्षे ते जन्मठेप व दंड, सामुहिक बलात्कार केल्यास २० वर्षे ते जन्मठेप व दंड, सार्वजनिक जागी विवस्त्र केल्यास तीन ते सात वर्षे व दंडाची शिक्षेची तरतूद असून बलात्काराचा दुसऱ्यांचा गुन्हा केला असल्यास जन्मठेप किंवा फाशीची शिक्षा देण्यात येते. तसेच या गुन्ह्यातील पिडीत महिलेची साक्ष व उलटतपास, गुन्हेगाराची तपास, उलटतपास याबाबत अनेक नवीन तरतुदी करण्यात आल्या.

**१३. लैंगिक छळ विरोधी नवीन कायदा २०१३ :**

कामाच्या ठिकाणी स्त्रीवर होणाऱ्या लैंगिक छळाच्या विरोधी हा कायदा असून, शारिरीक संपर्क व प्रणयचेष्टा, लैंगिक सुखाची मागणी, विनंती, अश्लील साहित्य प्रदर्शन, अश्लील शेरेबाजी व हावभाव याबरोबरच तिला त्यासाठी आमिष दाखवणे अथवा धमकावणे यास लैंगिक छळवार समजण्यात येते. त्यासाठी वरील वेगवेगळ्या प्रकारच्या गुन्ह्यासाठी वेगवेगळ्या शिक्षा व दंडाची सोय करण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर कारखाना मालकाने यासंबंधी योग्य ती कार्यवाही व सहकार्य न केल्यास त्याला दंडात्मक शिक्षा होते.

**१४. राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम १९९० :**

सन १९९० हा अधिनियम संसदेत समंत होऊन त्यावर राष्ट्रपतींची मान्यता प्राप्त झाली. त्यानुसार ३१ जानेवारी १९९० ला राष्ट्रीय महिला अयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाला न्यायालयासारखे अधिकार असून कालखंड तीन वर्षाचा असतो. आयोगात एक अध्यक्ष, पाच सदस्य व एक सदस्य सचिव असतो. या आयोगाची प्रमुख कार्ये म्हणजे १. महिला संरक्षणासाठीच्या कायद्याचे परीक्षण करणे व त्रुटी आढळल्यास त्यात संशोधन करण्यास सरकारला साहाय्य करणे. २. महिलांना देण्यात येणाऱ्या कायदेशीर मदतीचा आढावा घेणे, त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनास सूचना करणे. ३. महिला अत्याचार प्रकारणाचा शोध घेणे व त्याची चौकशी करणे. ४. सुधारगृह, कारागृहातील स्त्रीयांच्या स्थितीची पहाणी, त्यांच्या पुनर्वसन व सुधाराविषयी शिफारस करणे. ५. महिला विकास कार्यक्रम प्रक्रियेत सहभागी होणे इत्यादी.

**१५. महिला हक्क व संविधानातील तरतुदी :**

भारतीय संविधानातील मुलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे यातून तसेच इतर विविध कलमातून महिला हक्क संरक्षणाची तरतुद घटनाकारांनी केली आहे. त्यातील काही तरतूदी पुढीलप्रमाणे;

१. कलम १४ नुसार कायद्यासमोर सर्वजण समान असून स्त्री-पुरुष असा भेदभाव केला जाणार नाही. २. कलम १५ नुसार लिंगाच्या आधारे भेदभाव करण्यात प्रतिबंध. ३. कलम १६ नुसार नोकरी व सेवा मध्ये स्त्री-पुरुषांना समान संधी. ४. कलम ३९ (३) नुसार स्त्री व पुरुषांना समान कामासाठी समान वेतन. यामध्ये

स्त्री-पुरुष भेदभाव केला जाणार नाही. ५. कलम ५१ अ (क) नुसार स्त्रीयांची अप्रतिष्ठा, अपमान होईल असे वर्तन कोणाही नागरिकांनी करू नये इत्यादी.

उपरोक्त कायद्याशिवाय पुढील कायदेही स्त्रीयांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी भारतात करण्यात आले.

१६. महिला हक्क संरक्षण कायदा १९९०

१७. पंचायत राज्य संस्था व नागरी स्थानिक संस्थात महिलांना १/३ आरक्षण

१८. समान वेतन कायदा १९७६, १९८७

१९. धर्मांतरीत व्यक्तीविवाह विच्छेद कायदा १८६६

२०. घटस्फोट कायदा १८६९

२१. मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३

२२. आनंदी विवाह कायदा १९०९

२३. मुस्लीम स्त्री घटस्फोट हक्क संरक्षण कायदा १९८६

२४. महाराष्ट्र देवदासी प्रतिबंधक व निर्मूलन कायदा २००५

२५. मानसिक आरोग्य कायदा १९८७

२६. कुटूंब न्यायालय कायदा १९८४

२७. देवदासी समर्पण प्रतिबंधक कायदा १९९४.

**ब) बालकांच्या संदर्भातील विशेष कायदे –**

'मुले हिच राष्ट्राची खरीखुरी संपत्ती होय', 'मुले राष्ट्राचे भावी आधारस्तंभ असतात'. या बालकांचा विकास होणे यासाठीच महत्वाचे असते. 'लहान मुलांच्या किंवा बालकांच्या अंगभूत क्षमतेचा पुरेपूर विकास घडवून आणणे किंवा असा विकास घडवून आणण्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न करणे म्हणजे बालविकास होय'. असा विकास साधण्यामध्ये बालकांच्या हक्कांचे उल्लंघन हा अडथळा ठरतो म्हणूनच भारतात बालकांच्या हक्क संरक्षणासाठी विविध कायदे करण्यात आले आहेत ते पुढील प्रमाणे –

**१) बालहक्क व घटनात्मक तरतूद –**

१. कलम १५(३) नुसार 'स्त्रिया व बालके' यांच्यासाठी कोणत्याही स्वरूपाची विशेष तरतूद करण्याचा राज्याना अधिकार देण्यात आला असून याबाबत राज्याला प्रतिबंध केला जाणार नाही.

२. राज्यघटना कलम ३९ न्वये, बालकांचा निरामय पद्धतीने विकास होणेसाठी, मूक्त व प्रतिष्ठापूर्ण वातावरणात विकास होणेसाठी आवश्यक सेवा, सुविधा दिल्या जाव्यात. बालकांना शोषणापासुन संरक्षण दिले जावे. त्यांच्या भौतिक व नैतिक गरजांची उपेक्षा होऊ नये यासाठी आवश्यक संरक्षण

दिले जावे.

३. कलम ४५ नुसार, भारतीय राज्यघटनेच्या प्रारंभापासुन वयवर्ष दहाच्या आतील सर्व बालकांना त्यांच्या वयाच्या १४ वर्षापर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद करावी.

४. कलम २५ नुसार १५ वयवर्षाखालील कोणत्याही मुलाला धोकादायक काम दिले जाऊ नये किंवा कारखाने खाणी इ. ठीकाणी त्यांना कामावर ठेवले जाऊ नये.

५. कलम १५(३), २३ व ३९ नूसार बालकामगार प्रथा बेकायदेशीर मानण्यात यावी. लहान मूलांना कामावर ठेवता येणार नाही.

६. कलम ३९ नुसार शासनाने बालकांच्या विकासासाठी राष्ट्रीय धोरणाची निर्मिती करावी.

**२) बालहक्क संरक्षण कायदा २००५ –**

बालकांच्या सर्वांगीण विकासाकरीता त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, योग्य अंमलबजावणी व्हावी याकरीता बालहक्क संरक्षण कायदा आयोगाची निर्मिती करण्यात आली.

या आयोगात एक अध्यक्ष व सहा सदस्य असावेत. सर्व सदस्य या स्त्रिया असाव्यात. यांची नियुक्ती केंद्र शासन करते. या आयोगाकडून पुढील कार्ये पार पाडली जातात.

१. बालकांच्या सुरक्षिततेसंबंधी करण्यात आलेल्या तरतुदींची अंमलबजावणी करणे.

२. बालहक्कांच्या उल्लंघनसंबधी प्रकरणाची चौकशी करणे.

३. बालकांच्या संरक्षणाकडे व त्यांच्या गरजांकडे लक्ष देणे.

४. बालहक्कांच्या संदर्भात बलदत्या परिस्थिती व नवसमस्यांच्या पार्श्वभूमीवर संशोधन करणे.

५. बालहक्कांच्या जन-जागृतीसाठी, प्रोत्साहनांसाठी आवश्यक ते प्रयत्न व कार्ये पार पाडणे.

६. बालहक्कांच्या उल्लंघनाबाबतीतील घटनांचा शोध घेऊन, परिक्षण करून त्यासंदर्भातील आवश्यक त्या शिफारशी शासनास करणे.

**३) बालन्याय (मुलांची देखभाल आणि संरक्षण) अधिनियम २००० –**

राष्ट्रीय बालकायदा १९८६ अधिनियमाच्या आधारे, उपेक्षीत व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लहान मुलांची देखभाल, संरक्षण, उपचार, विकास व पुर्नवसनाच्या संदर्भात हा कायदा करण्यात आला. याची वैशिष्ट्ये अथवा तरतुदी, कार्ये पुढीलप्रमाणे – १) देशातील सर्व बालकांना समान न्याय व हक्क प्राप्त व्हावेत यासाठी समान कायद्यांची निर्मिती करणे. २) मुलांना त्यांच्या हक्कांचा कोणी हक्क भंग केलाअसल्यास त्यांना न्याय प्राप्त करून देण्यासाठीचे निकष निश्चित करणे. ३) बालगुन्हेगारी निर्मूलनाकरीता निश्चित उपाययोजना तयार करणे. ४) कोणतेही मूल तुरूंग व पोलिसांच्या ताब्यात जाणार नाही याची दक्षता घेणे. ५) बालविकास संबधी स्वंयसेवी संस्थाची जबाबदारी, भूमिका व कार्यक्षेत्र निश्चित करणे. ६) मुलांची देखभाल, संरक्षण, विकास व

पुर्नवसनासाठी आवश्यक उपाय योजने इत्यादि. तथापी या अधिनियमानुसार उपरोक्त कार्याकरीता प्रत्येक जिल्हात जिल्हास्तरावर ‘बाल न्याय मंडळ’ निर्माण केले जाते. ७) या कायद्यानूसार बालगुन्हेगारांना निरिक्षणगृहात ठेवण्याची तरतूद आहे. ८) या अधिनियमानुसार बालगुन्हेगाराचे नांव, फोटो सार्वजनिक स्वरूपात प्रसिद्ध करता येत नाहीत.

**४) मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्काचा कायदा २०१० :**

या कायद्यामध्ये बालहक्कांशी, बालविकासांशी संबधीत बाबी, तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

१) वयवर्ष सहा ते चौदा या वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत व अनविार्य शिक्षण दिले जावे.

२) या वयोगटातील कोणत्याही मुलांस प्रवेश नाकारता येणार नाही.

३) प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मूलांस शाळेतून काढता येणार नाही.

४) इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत विद्यार्थ्यांस नापास करता येणार नाही.

५) राज्य सरकार व स्थानिक प्रशासनाने दुर्बल व वंचित घटकांच्या मुलाबाबत भेदभाव होऊ नये याकडे कटाक्ष ठेवणे.

६) अनुदानित व विनाअनुदानित शाळेत २५% जागा वंचित व कमकुवत घटकांतील मूलांसाठी ठेवण्यात याव्यात या विद्यार्थ्यांची फी राज्यसरकार देईल.

७) कोणतीही शाळा मुलांची निवड करण्यासाठी पालक व मुलांची छाननी प्रक्रियेचा वापर करणार नाही.

८) वयवर्ष सहा ते चौदा वयोगटातील मुलांना शाळेत दाखल करणे हे त्यांच्या पालकांचेही कर्तव्य असेल.

९) स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीत दुर्बल व वंचित वर्गाच्या मूलांच्या पालकांना मूलांच्या संख्येनुसार अथवा किमान ३/४ इतके प्रतिनिधीत्व देण्यात यावे.

१०) शिक्षकांनी प्रत्येक मुलाची क्षमता पाहून ज्यास आवश्यक असेल अशा मूलास ‘विशेष शिक्षण’ द्यावे.

११) मूलांना भिती, चिंता, आघात यापासून दूर ठेवणारा, त्यांच्या सर्वांगीण विकासास पोषक अभ्यासक्रम तयार करावा.

१२) बालहक्क संरक्षण कायदा २००५ नूसार बाल हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापित राष्ट्रीय व राज्य आयोगाने ‘शिक्षणाचा हक्क’ या कायद्याने दिलेल्या बालहक्कांचे संरक्षण करावे.

**५) बालक कायदा १९६० –**

बालक विकासासाठी बालकांचे पालन पोषण योग्यरित्या व्हावे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, त्यांना

शिक्षणाच्या सोयी–सुविधा प्राप्त व्हाव्यात, निराधार व अपराधी बालकांचे पुर्नवसन योग्य पद्धतीने व्हावे त्याचबरोबर भारतातील केंद्रशासीत प्रदेशातील अपराधी बालकांची चौकशी याबाबतच्या तरतुदी असणारा १९६० चा बालक कायदा होय. या कायद्यातच बालकल्याण करीता 'बालकल्याण मंडळ' व 'बालन्यायालयाची स्थापना' करण्याची तरतूद आहे.

**६) बालन्यालय कायदा १९८६ –**

या कायद्यातील 'बालहक्क'संबंधी महत्वाच्या तरतुदी पुढील प्रमाणे –

१. या कायद्यानुसार मुलांचा छळ करणे, शोषण, पिळवणूक करणे हा दखलपात्र गुन्हा मानण्यात आला.

२. या कायद्याची अंमलबजावणी विशेषतः अनाथ, दुर्लक्षित, टाकून दिलेल्या, वाईट मार्गाला लागलेल्या भयग्रस्त मुलांसाठी केली जाते.

३. दुर्लक्षित बालके व बाल गुन्हेगार यांच्यावर योग्य उपचार, समुपदेशन व त्यांना आवश्यक ते संरक्षण देण्याची व त्यांच्या पुर्नवसनाची तरतूद या कायद्यात आहे.

४. बालगुन्हेगाराकडून घडलेल्या गुन्ह्यासंबधी माहिती जमा करून त्यामागील कारणाचा शोध घेण्याची व्यवस्था निर्माण करणेसंदर्भात तरतूद या कायद्यात आहे.

५. बालन्यायालयात मूलांच्या मनावर आघात होऊ नये यासाठी न्यायाधीश, वकील, पोलिस हे सर्व साध्या वेशात असतील, अशी तरतूद या कायद्यात आहे.

**७) मुंबई बालसुधार कायदा १९४८ –**

बालगुन्हेगार गुन्हेगारी वातावरणापासुन अथवा अशा व्यक्तीपासुन दूर रहावेत, त्यांच्यात सुधारणा व्हावी म्हणून या कायद्यानूसार बालगुन्हेगारास तुरूंगात न ठेवता सुधारगृहातच ठेवण्याची तरतूद आहे. तसेच त्याच्या पालकांनी त्याच्या चांगल्या वर्तनाची हमी दिल्यास त्याला पालकाकडे सोपवण्याची तरतूद आहे. शिवाय बालगुन्हेगारास फाशी, जन्मठेप या शिक्षा करता येत नाहीत.

**८) भारतीय कारखाना कायदा १९४८ –**

या कायद्यातील बालहक्क व बालकल्याण विषयक तरतुदी पुढील प्रमाणे – १) या कायद्यानुसार वयवर्ष १५ च्या आतील मुलास 'बालक' म्हणून संबोधण्यात यावे. २) वयवर्ष १४ च्या आतील मूलास कारखान्यात कामावर ठेवता येणार नाही. ३) १४ वर्ष पूर्ण झालेल्या पण बालक असलेल्या (१५ वर्षाआतील) मूलांस दिवसातून साडेचार तासापेक्षा जास्त वेळ कामावर ठेवता येणार नाही. ४) अशा मूलांना रात्री १० ते सकाळी ६ यावेळत कामावर ठेवता येणार नाही. ५) धोक्याच्या, अवघड कामावर बालकामगारास ठेवता येणार नाही. ६) वर्षात १४ दिवस सवेतन सुटी दिली जाईल.

**९) बालकामगार निर्मूलनासंबंधीचा कायदा १९८८ :**

या कायद्यातील प्रमूख तरतुदी पुढील प्रमाणे -

१) वयवर्ष १४ पेक्षा कमी वयाच्या मुलांना विशेष प्रकारच्या कार्यात कामावर ठेवणे निषेधात्मक असेल.

२) भारतात बालकांच्या हक्क व संरक्षणासंबंधी जे विविध कायदे करण्यात आले. या कायद्यातील 'बालक' व्याख्येत एकरूपता आणणे.

**१०) हिंदू अज्ञान संरक्षण कायदा १९५६ -**

या कायद्यानुसार अज्ञान मुलां-मुलीच्या आई व वडील या दोघांचाही मृत्यू झाल्यास त्यांचा सांभाळ व संपत्तीचे संरक्षण न्यायालय करेल अशी तरतूद करण्यात आली परंतु आई-वडीलांकडून मृत्यूपूर्वी एखाद्या व्यक्तीस पालक म्हणून मान्यता दिली असेल तर त्यांच्या मूलांचा सांभाळ न्यायालय न करता पालक करतील पण असा पालक न्यायालयाच्या परवानगीशिवास संबधीत अज्ञान मुला-मुलींची संपत्ती विक्री करू शकणार नाही, गहाण ठेवू शकणार नाही. अशी तरतूद करण्यात आली. तसेच या कायद्यानुसार स्त्रीलासुद्धा पालक बनण्याचा अधिकार, अज्ञान पाल्याच्या संपत्तीचे संरक्षण व व्यवस्था, करणेसाठी देण्यात आला.

याशिवाय बालगुन्हेगारासाठी व बालकामगारांसाठी काही इतर कायद्यातही काही तरतुदी आहेत ते कायदे पुढील प्रमाणे -

११) १८५० चा कायदा.

१२) सुधारगृह कायदा १८९७.

१३) बोस्टल स्कूल कायदा.

१४) औद्योगिक कायदा १८८१, १८९१ व १९९०.

१५) औद्योगिक कायदा १९२२ व १९३४.

१६) बालकामगार वेठबिगार प्रतिबंधक कायदा १९३३.

१७) मळे कामगार कायदा १९५१.

१८) खाण अधिनियम १९५२.

१९) मर्चंट शिपिंग ॲक्ट १९५८.

२०) मोटार वाहतूक कामगार कायदा १९६१.

२१) विडी सिगारेट कामगार कायदा १९६६.

२२) ॲटोमिक एनर्जी ॲक्ट १९६२.

**क) कामगार संबधी कायदे :**

कारखान्यात अथवा इतर ठिकाणी काम करणारा कामगार प्रथम एक माणूस आहे. माणूस म्हणून त्याला प्राप्त हक्कांची पायमल्ली होऊ नये, त्याचे शोषण होऊ नये इत्यादि संदर्भातून भारतात अनेक कामगार विषयक कायदे संमत करण्यात आले. त्यातील काही प्रमूख कायदे पुढीलप्रमाणे-

**१) कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ -**

१९२३ साली स्वातंत्र्यपूर्व भारतात संमत झालेल्या या कायद्यात नंतर अनेक बदल करून त्याची अंमलबजावणी करण्यात येते. या कायद्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे.

१) कामावर काम करत असताना अपघात झाल्यास त्यात त्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटूंबाला नुकसानभरपाई दिली जाते. अपघाताचे स्वरूप व कामगारांचे वेतन लक्षात घेऊन नुकसानभरपाई निश्चित केली जाते.

२) भारतातील प्रमुख २७ प्रकारच्या उद्योगांना हा कायदा लागू करण्यात आला.

३) नुकसान भरपाईची रक्कम कारखानदाराला द्यावी लागेल.

४) अपघातानंतर तीन दिवसात कामगार कामावर आल्यास नुकसानभरपाई दिली जात नाही.

५) अपघातानंतर चार दिवसांच्या आत पगाराची अर्धी रक्कम नुकसान भरपाई म्हणून दिली जाते.

६) या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आयुक्ताची नेमणूक केली जाते.

**२) कामगार राज्य विमा कायदा १९४८ -**

१. क्षय, कर्करोग अशा रोगांना वगळून इतर रोगांनी त्रस्त, आजारी कामगारास ५६ दिवसापर्यंत साहाय्य करण्याची तरतूद.

२. स्त्री कामगारांसाठी या कायद्यात विशेष तरतूद असून १९५९ पासून नैसर्गिक आपत्ती व आजारी काळात १२ आठवड्यापर्यंत संपूर्ण वेतन देण्याची तरतूद आहे.

३. कामगार कामावर असताना अपघात झाला, मृत्यू झाला तर त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटूंबियांना नुकसान भरपाई देण्याची तरतूद आहे.

४. असाध्य रोग अथवा अपघाताने कामगारास अपंगत्व आले तर त्याच्या वेतनाच्या अर्धी रक्कम दिली जाते. कायमचे अपंगत्व आल्यास किती नुकसान भरपाई द्यावयाची याचा निर्णय न्यायालय देते.

५. याशिवाय कामगारांस आरोग्यविषयक सोयी-सुविधा, स्त्रीयांना प्रसूतीसंदर्भातील वैद्यकीय सोयी-सुवधा देण्याची तरतूद आहे.

**३) कामगार भविष्यनिर्वाह निधी कायदा १९५२ -**

सुरवातीला मोजक्याच उद्योगातील कामगारांसाठी लागू असणारा कायदा १९५८ पासून स्थानिक व

सरकारी उद्योगातील कामगारांसाठीही हा कायदा लागू करण्यात आला. या कायद्यात कामगार सेवानिवृत्त झाल्यानंतर या निधीतून त्याला आर्थिक साहाय्य केले जाते. याच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय पातळीवर एक विश्वस्त मंडळ नेमण्यात आले. यामध्ये भविष्य निर्वाह निधी आयुक्त हा कार्यकारी अधिकारी म्हणून कार्य करतो. सेवानिवृत्त कामगाराला हा लाभ मिळतोच शिवाय त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या पत्नीला हा लाभ मिळतो.

**४) कारखाना कायदा १९४८ –**

भारतात १८८१ ला पहिला कारखाना विषयक कायदा झाला. त्यानंतरही १९३४ ला केलेल्या कारखाना कायद्यात पुढे वारंवार सुधारणा किंवा दुरुस्त्या केल्या. त्यानंतर स्वतंत्र भारतात सरकारने संपूर्ण कायदा नव्या स्वरूपात करून १९४८ मध्ये संमत केला. या कायद्यातील तरतूदी पुढील प्रमाणे–

१. ज्या कारखान्यात विद्युतशक्तीचा वापर केला जातो अशा ठिकाणी १० पेक्षा जास्त कामगार असतील व जेथे विद्युतशक्तीचा वापर नाही पण तेथे २० पेक्षा जास्त कामगार काम करतात त्या सर्व कारखान्यांना हा कायदा लागू करण्यात आला.

२. कोणत्याही प्रौढ कामगारास या कायद्यानुसार एका आठवड्यात ४८ तासांपेक्षा जास्त काम लावता येणार नाही. तसेच

३. दिवसाला ०९ तासापेक्षा जास्त काम लावता येणार नाही.

४. कामगारास अर्ध्या तासाची विश्रांती दिल्या शिवाय त्याला ०५ तासापेक्षा जास्त काम देता येणार नाही.

५. १४ वर्षाखालील मूलांना कामावर घेण्यास प्रतिबंध करण्यात आला. तर

६. ५ ते १८ वयातील किशोर मूलांना 'क्षमता प्रमाणपत्र' दिल्याशिवाय कामावर ठेवता येणार नाही तसेच त्यांना दिवसात साडेचार तासांपेक्षा जास्त कामावर ठेवता येणार नाही.

७. स्त्री व किशोरवयीन कामगारांना रात्रीचे काम देता येणार नाही.

८. कामगारांना पगारी रजा व सुट्ट्या देण्याबाबतच्या तरतुदी.

९. कामाच्या ठिकाणी स्वच्छतागृह व विश्रांती कक्षाची तसेच जेवण करण्यासाठी स्वतंत्र खोली, महिला कामगारांच्या मूलासाठी स्वतंत्र शिशूगृहाची सोय, प्रथोमपचाराची सोय केली गेली पाहिजे इत्यादि तरतूदी या कायद्यात करण्यात आल्या.

१०. याशिवाय कामाच्या ठिकाणी आरोग्याच्या दृष्टीने योग्य वातावरण व धोक्यापासुन संरक्षण प्राप्त होणेसाठी सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली.

**५) किमान वेतन कायदा १९४८ –**

या कायद्यात उल्लेख केलेल्या उद्योगाशिवाय ज्या उद्योग व्यवसायात वेतनाचा किमान दर निश्चित करणे

आवश्यक आहे असे केंद्र व राज्यसरकारांना वाटते त्या उद्योग-व्यवसायांना हा कायदा लागू करण्याचा अधिकार त्यांना या कायद्याने देण्यात आला आहे.

या कायद्याने उद्योग व्यवसायात त्या उद्योगाच्या स्वरूपानूसार व कामाच्या स्वरूपानूसार कमीत कमी किती वेतन द्यावे म्हणजे किमान वेतन किती द्यावे याची निश्चिती करण्यास सुरवात झाली. किमान वेतन निश्चित करणेच्या संदर्भातील सल्लागार मंडळ स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली. या मंडळाच्या नियुक्तीचे अधिकार केंद्र व राज्य सरकारांना देण्यात आले. तसेच या कायद्याने कामगारांना देण्यात येणारे वेतन पैशाच्या स्वरूपात देण्याची तरतूद करण्यात आली.

**६) बोनस वेतन कायदा १९६५ :**

केंद्र शासनाने कामगारांना त्यांचा हक्क असणारा असा बोनस दिला जावा या उद्देशाने १९६५ ला हा कायदा संमत केला. या कायद्यानुसार ज्या कामगारांचे वेतन मासिक ३,५०० रुपयापेक्षा जास्त नाही अशा कामगारांना त्यांच्या मालकांने बोनस देणे बंधनकारक केले.

**७) समान वेतन कायदा १९७६ :**

१. स्त्री कामगारावर केवळ 'स्त्री' आहे म्हणून होणारा दुजाभाव दूर करण्यासाठी व स्त्री कामगारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी केंद्र शासनाने हा कायदा संमत केला. या कायद्यामध्ये स्त्री-पुरूष कामगार सारखेच काम करीत असतील तर त्यांच्या वेतनात फरक न करता स्त्री व पुरूष कामगारांना समान कामासाठी समान वेतन देण्याची तरतूद करण्यात आली. तसेच

२. कामगार भरती करताना स्त्री-पुरूष असा लिंगभेद करण्यास प्रतिबंध करण्यात आला.

३. तसेच कामाच्या संदर्भात कामाचे नियम व अटी निश्चित करताना स्त्री कामगारावर होणाऱ्या दुजाभावास प्रतिबंध केला.

४. स्त्रियांना रोजगाराच्या, नोकरीच्या संधी जास्त प्रमाणात उपलब्ध करून देणेसाठी काय करता येईल याबाबत केंद्र शासनास सल्ला देणेकरीता एक सल्लागार समिती स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली.

**८) कामगार प्रॉव्हिडंट फंड कायदा १९५२ –**

केंद्र शासनाने औद्योगिक कामगारांना प्रॉव्हिडंट फंड, विमा व निवृत्तीवेतन यांतून निवृत्ती नंतरही कामगारांना आर्थिक सुरक्षितता देण्याच्या हेतूने हा कायदा संमत केला. २० पेक्षा जास्त कामगार असणाऱ्या तसेच या कायद्यात समाविष्ट केलेल्या उद्योग-व्यवसायातील कामगारांना या कायद्याचा लाभ देण्यात आला. या कायद्याअंतर्गत, 'कामगार प्रॉव्हिडंट फंड योजना १९५२', 'कामगार निवृत्तीवेतन योजना १९९५', 'कामगार डिपॉझिट लिंक्ड इन्शुरन्स योजना १९७६' अशा तीन योजना तयार करण्यात आल्या व त्यांतून कामगारांना सुरक्षितता देण्याची तरतूद करण्यात आली.

**९) वेठबिगार पद्धती (निर्मुलन) कायदा १९७६ –**

या कायद्याने वेठबिगार म्हणून काम करीत असलेल्या कामगारांची वेठबिगारीतून मुक्तता केली. त्यांचे शोषण व पिळवणूक थांबवली. त्यांची कर्जे पूर्णपणे कर्जमाफी करण्यात आली. तसेच एखाद्यास वेठबिगार म्हणून काम करण्यास भाग पाडणाऱ्या व्यक्तीस तुरुंगवास व दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली. तसेच या कायद्याने वेठबिगार कामगारांचा शोध घेणे, त्यांची वेठबिगारीतून मुक्तता करुन त्यांचे पुर्नवसन करणेची जबाबदारी त्या-त्या राज्यसरकारवरती सोपवली गेली.

**१०) कंत्राटी मजूर (नियमन व निर्मुलन) कायदा १९७० –**

१. या कायद्याने ज्या ठेकेदार, कंत्राटदाराकडे २० पेक्षा जास्त कामगार काम करीत असतील तर त्याने परवाना घेणे बंधनकारक केले.

२. एकाच ठिकाणी तीन महिन्यापेक्षा जास्त काम असेल तर त्यांच्या राहण्याची, स्वच्छतागृहाची, पाण्याची व उपहार गृहाची, दिवा बत्तीची सोय करुन देणे ठेकेदारावर बंधन कारक केले.

३. कामाच्या ठिकाणी ठेकेदाराने प्रथमोपचाराच्या सुविधा उपलब्ध करुन देणे बंधनकारक केले.

४. कायम कामगार व कंत्राटी कामगार यांच्या वेतनात फरक नसावा अशी व्यवस्था या कायद्याने केली.

५. कामगारांचे वेतन कामाच्या ठिकाणीच, काम संपल्यानंतर कामाच्या वेळेत व नियमित देण्याचे बंधन कंत्राटदारावर घालण्यात आले.

६. मजुरांचे वेतन संबंधीचे पत्रक व कामाची डायरी, रजिस्टर ठेवणे कंत्राटदारावर बंधनकारक करण्यात आले.

याशिवाय कामगारांच्या हक्कासंबंधीचे, सुरक्षितता संबंधीचे अनेक कायदे भारतात करण्यात आले आहेत ते पुढीलप्रमाणे;

११) वेतनविषयक कायदा १९३६

१२) खाणविषयक कायदा १९५२

१३) मळे व्यावसायविषयक कायदा १९५१

१४) भारतीय व्यापारी जहाज कायदा १९५८

१५) मोटार वाहतूक कामगार कायदा १९६१

१६) द इंडस्ट्रियल डिस्प्युटस् कायदा १९४७

१७) कोळसा खाण भविष्यनिर्वाह निधी व बोनस कायदा १९४८

१८) कामाच्या अटी व कल्याण कायदा

१९) गोदी कामगार (सुरक्षितता, आरोग्य व कल्याण) कायदा १९८६ इत्यादी.

**ड) अनुसूचित जाती व मानवी हक्क कायदे :**

केवळ भारतीय समाजात दिसून येणारी जातव्यवस्था ही भारतीय समाज संस्कृतीवरील कलंक होय. कारण या व्यवस्थेतून वरिष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव होणे. यातून कनिष्ठ जातींना अस्पृश्य माणून त्यांच्याबरोबर अमानवी व्यवहार करणे. त्यांच्या मानव म्हणून असणाऱ्या मानवी हक्कापासून वंचित ठेवणे यातून त्यांचे होणारे शोषण, पिळवणूक संपवणे, त्यांचा विकास साधणे याकरीताचे कायदे;

**१) घटनात्मक तरतुदी -**

१. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात स्वातंत्र्य, समता, बंधुभाव यांची हमी देत सर्व भारतीयांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय प्राप्त करुन देण्याची हमी देण्यात आली आहे.

२. कलम १५ नुसार, राज्य हे नागरिकांना वंश, धर्म, जात, जन्मस्थान व लिंग यापैकी कोणत्याही गोष्टीच्या आधारे भेदभाव करणार नाही. तसेच कोणाही नागरीकास सार्वजनिक ठिकाणांचा वापर करण्यास प्रतिबंध केला जाणार नाही.

३. कलम १७ नुसार, अस्पृश्यतेचे पालन करणे हा गुन्हा ठरवण्यात आला आहे.

४. कलम २९ नुसार, धर्म, वंश, जात, भाषा या अथवा कोणत्याही एका कारणावरुन कोणत्याही नागरिकाला शैक्षणिक संस्थात प्रवेश नाकारला जाणार नाही.

५. कलम ३३० व ३३२ नुसार अनुसूचित जाती व जमातीकरीता लोकसभा व विधानसभेत राखीव जागा ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे.

६. कलम ३३५ नुसार, केंद्र व राज्य संबंधीत सेवा मध्ये नियुक्ती करताना अनुसुचित जाती, जमातीतील व्यक्तींचे हक्क प्रशासनाची कार्यक्षमता राखण्याशी सुसंगत असेल अशा रितीने विचारात घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

७. अनुसूचित जातीसाठी राष्ट्रीय आयोग स्थापन करण्यासंबंधीची तरतूद कलम ३३८ न्वये करण्यात आली आहे.

**२) अनुसूचित जाती राष्ट्रीय आयोग -**

राज्यघटनेच्या कलम ३३८ मध्ये अनुसूचित जाती, जमातींसाठी एक राष्ट्रीय आयोग स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली. तथापी ८९ व्या घटनादुरुस्तीने (२००३) अनुसूचित जाती, जमातीसाठी स्वतंत्र आयोग स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली. यानुसार स्थापन करण्यात आलेल्या अनुसूचित जाती राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगात अध्यक्ष, उपाध्यक्ष व तीन सदस्य असतात व त्यांची नियुक्ती राष्ट्रपतींकडून होते. या आयोगाची कार्ये पुढीलप्रमाणे;

१. अनुसूचित जातीतील व्यक्तींच्या हक्कांच्या संरक्षणासाठी राज्यघटनेतील तरतुदी, कायदे व आदेश या संदर्भातील गोष्टींची चौकशी करणे, कार्यवाहीवर लक्ष ठेवणे व तिचे मुल्यमापन करणे.

२. अनुसूचित जातीना हक्कापासून वंचित ठेवल्याच्या, तसेच त्यांचे हक्क व सवलती हिरावून घेतल्याच्या तक्रारींची चौकशी करणे.

३. अनुसूचित जातींच्या सामाजिक, आर्थिक विकासासंबंधीच्या केंद्र, राज्य सरकारच्या विकासकामांचे, त्यांच्या प्रगतीचे मुल्यमापन करणे.

४. अनुसूचित जाती राष्ट्रीय आयोगाकडे ज्या तक्रारी येतील त्यांच्या चौकशीसाठी आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात आले आहेत.

५. अनुसूचित जातींच्या सामाजिक, आर्थिक विकास करीताच्या नियोजन प्रक्रियेत आयोगाने सल्ला देणे.

६. अनुसूचित जातींच्या हक्कांच्या संरक्षणासंदर्भात घेतलेले निर्णय व कार्य यांचा 'वार्षिक अहवाल' राष्ट्रपतींना सादर करणे.

७. अनुसूचित जातींच्या हक्कांच्या संरक्षणासाठी व विकासासाठी संविधानातील तरतूदी यासंदर्भात ज्या आहेत त्यांच्या अंमलबजावणी करिता योग्य उपाय शासनास सुचवणे.

८. अनुसूचित जातींच्या हक्कांचे संरक्षण, कल्याण यासंदर्भात राष्ट्रपतींच्याकडून सोपवण्यात आलेली कार्ये पार पाडणे.

९. केंद्र व राज्याच्या ज्या धोरणात्मक निर्णयाचा अनुसूचित जातींच्या हितसंबंधाावर परिणाम होणार आहे, असे निर्णय घेण्यापूर्वी शासनाने आयोगाशी विचार विनिमय करणे हे बंधनकारक आहे.

**३) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ –**

अनुसूचित जाती, जमातीतील व्यक्तींना हक्कापासून वंचित ठेवत त्यांची होणारी पिळवणूक, शोषण थांबवणेसाठी, त्यांच्यावरील अत्याचाराला प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने ३० जानेवारी १९८९ ला 'अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा' याची अंमलबजावणी सुरू झाली. ०४ प्रकरणात व २३ कलमाची व्याप्ती असणाऱ्या या कायद्यातील काही तरतूदी पुढीलप्रमाणे;

१. अनुसूचित जाती, जमातीबाहेरील व्यक्ती, गट यांनी या जाती–जमातीतील व्यक्तीवर अत्याचार केला तर त्यास किमान ६ महिने व कमाल ५ वर्षे शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. एकूण १५ प्रकारचे अत्याचार यामध्ये नमूद केले असून त्यामध्ये प्रामुख्याने अनुसूचित जाती–जमातीच्या व्यक्तीच्या घरावर, शेजारी त्यास इजा, अपमान होईल असे घृणास्पद पदार्थ टाकणे. दोन – ज्या कृत्याने मानवी प्रतिष्ठेला धक्का पोहचेल असे कृत्य (उदाः नग्न वरात काढणे इ.) तिसरे – म्हणजे, त्याची स्थावर अथवा त्याने प्राप्त केलेली मालमत्ता हस्तांतरण करण्यास बळजबरीने भाग पाडणे. चौथे – म्हणजे, या जाती–जमातीतील व्यक्तींना सक्तीने काम लावणे, त्यांस वेठबिगार म्हणून ठेवणे, त्यास भीक मागावयास लावणे इ. पाचवे – म्हणजे मतदानाच्या बाबतीत त्याच्यावर अत्याचार करणे. जाती–जमातीतील व्यक्तीविरुद्ध खोटा व चूकीचा दावा दाखल करणे हे सहावे व सातवे– म्हणजे सार्वजनिक ठिकाणी या जाती जमातीच्या व्यक्तींचा अपमान होईल असे त्यांना

वागवणे. आठवे- या जाती-जमातीतील महिलांवर अत्याचार करणे. नऊ - म्हणजे या जाती-जमातीतील व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नाकारणे या संदर्भात शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

२. या जाती-जमातीसाठी बांधण्यात आलेल्या समाज मंदिरे, प्रार्थना स्थळे यांना आग लावणे, मोडतोड करणे, पाडणे याबाबत जन्मठेप होऊ शकते.

३. या जाती, जमातीतील व्यक्तीच्या मालमत्तेत आग लावल्या, जाळल्यास ६ महिने ते ७ वर्षापर्यंत शिक्षेची तरतूद.

४. या जाती, जमातीतील नसणाऱ्या अधिकाऱ्यांने या जाती, जमातीच्या समस्याकडे दुर्लक्ष केल्यास त्यास सहा महिने ते एक वर्षापर्यंत शिक्षेची तरतूद.

**इ) अनुसूचित जमाती व मानवी हक्क कायदे :**

१९९१ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण लोकसंख्येच्या ८.०८% लोकसंख्या अनुसूचित जमातीची होती. अनुसूचित जमातीची विशिष्ट लक्षणे म्हणजे प्रगत समाजापासून दूर रहाणे, अक्षर ओळख नसणे, प्रगत तंत्रज्ञानाचा अभाव, अज्ञान व अंधश्रद्धेचा पगडा, निरक्षरता इ. होत. प्रगत समाजातील लोकांच्या संपर्कात या जामाती आल्या. तेथे त्यांचे शोषण जास्त प्रमाणात सुरू झाले. जंगलतोड व व्यापार करणारे, जमिनदार, ठेकेदार, सावकार यांची या जमातीच्या अज्ञानाचा, दारिद्र्याचा गैरफायदा घेत शोषण केले. या पार्श्वभूमीवर अनुसूचित जमातीच्या हक्क रक्षणासाठी व विकासासाठीचे कायदे पुढीलप्रमाणे;

**१) घटनात्मक तरतूदी :**

१. भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ (५) अन्वये, अनुसूचित जमातींना स्वतंत्र राहण्याचा, संपत्ती धारण करण्याचा, त्याची विल्हेवाट लावण्याचा अधिकार असेल.

२. कलम ४६ अन्वये, राज्याने विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठी शिक्षण, रोजगाराची व्यवस्था करावी. त्यांचे कोणत्याही प्रकारचे शोषण होणार नाही याची काळजी घ्यावी.

३. कलम ३३०, ३३२ व ३३४ नुसार जानेवारी २०१० पर्यंत अनुसूचित जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभा व विधानसभेत प्रतिनिधित्व दिले जाईल.

४. कलम ३३८ (अ) नुसार अनुसूचित जमातीच्या विकास व हितसंबंधाच्या संरक्षणासाठी अनुसूचित जनजाती राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली.

५. कलम ३३९ नुसार अनुसूचित जमाती आयोगाकडून अनुसूचित जमातींच्या विकासासाठी आवश्यक समित्यांची निर्मिती करणेची तरतूद केली.

६. कलम ३४२ नुसार अनुसूचित जमाती संबंधीचे निकष निश्चित करणे.

७. कलम २४३ अन्वये प्रत्येक पंचायतीत अनुसूचित जाती, जमातीसाठी राखीव जागा ठेवणे.

८. कलम २४४ नुसार अनुसूचित जमातींच्या क्षेत्राच्या नियंत्रण व प्रशासन निर्मितीसाठी विशेष तरतूद करण्यात आली.

९. कलम २७५ नुसार राज्यातील आदिवासी जनजाती विकासाच्या योजना तयार करणे व त्याकरिता केंद्र सरकारच्या समेकीत निधीतून सहाय्य घेणे.

**२) राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग –**

सन २००० साली ८३ व्या घटनादुरुस्तीद्वारे या आयोगाची स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली. २००४ साली हा आयोग कार्यरत झाला. आयोगात एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष व तीन सदस्य असतात. त्यांची नियुक्ती राष्ट्रपतीकडून होते. कार्यकाल तीन वर्षाचा असतो. या आयोगाची प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे;

१. अनुसूचित जनजातीना घटना, कायदे, अध्यादेश यातून जे अधिकार दिले आहेत, त्यांचे रक्षण करणे.

२. अनुसूचित जमातीना प्राप्त अधिकार त्यांच्याकडून हिरावून घेतले जात असतील तर अशा प्रकरणांची चौकशी करणे यासंबंधी आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात आले आहेत.

३. केंद्र अथवा राज्य शासनास अनुसूचित जमातीसंबंधी धोरण निश्चित करताना आयोगाशी विचारविनमय करण्याचे बंधन घातले आहे.

४. राष्ट्रपतींना हवा असेल तेव्हा आयोगाने आपला कार्य अहवाल त्यांना देणेची तरतूद आहे.

५. अनुसूचित जमातींच्या कल्याणासाठी आवश्यक धोरण तयार करणे.

६. अनुसूचित जमातींच्या लोकांच्या जमिनीचे हस्तांतर थांबवणे, ज्यांचे हस्तांतरण झाले त्यांच्या पुर्नवसनासाठी उपाययोजना सुचवणे.

७. खनिज संसाधने, पाणी यासंबंधी त्यांना अधिकार देणे व त्यासंबंधी उपाययोजना सुचवणे.

८. वनक्षेत्रात राहणाऱ्या अनुसूचित जमातीना लघु व वनउत्पादनासंबंधी मालकी हक्क देण्यासंबंधी उपाय योजना करणे. इत्यादी.

**३) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ –**

(या कायद्याची माहिती 'ड' अनुसूचित जाती व मानवी हक्क कायदे' यामध्ये क्रमांक ०३ ला आलेली आहे.)

**(१) अपंग अधिनियम १९९५ (समान संधी, समान अधिकार, समान संरक्षण व पूर्ण भागीदारी)**

या कायद्याची अंमलबजावणी १९९६ पासून सुरू झाली. या कायद्याचे विशेष म्हणजे या कायद्यात अपंगांच्या पुर्नवसनासंबंधात अपंगता निवारण व विकासात्मक अशा दोन्हीबाबी संदर्भात तरतूदी करण्यात आल्या आहेत.

या कायद्याद्वारे केंद्र व राज्य स्तरावर सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालय व राज्य समाजकल्याण मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली एक समन्वय समिती निर्माण करुन तिच्याकडे पुढील कार्ये सोपवली आहेत;

१. अपंगांच्या कल्याणासाठी राष्ट्रीय धोरणांची निर्मिती करणे.

२. अपंगासाठीचे धोरण, कायदे, अध्यादेश, कार्यक्रम संबंधी शासनास सल्ला देणे.

३. यांच्या संबंधीचे कायदे, धोरण यांच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन करणे.

४. अपंग मुलास त्याच्या वयाच्या १८ वर्षापर्यंत मोफत शिक्षण देणे.

५. अपंगांना मोफत अथवा अल्प दरात जमीन, घरे उपलब्ध करुन देणे.

६. अपंगांना आवश्यक उपकरणे, यंत्रे उपलब्ध करुन देणे.

७. अपंगांसाठी विशेष विमा योजना लागू करणे.

८. अपंगासाठी व्यावसायिक प्रशिक्षण, रोजगार केंद्राची स्थापना करणे, स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे, अपंगासाठीच्या आरक्षित रिक्त जागांची माहिती घेणे.

९. अपंगाच्या पुर्नवसनासाठी योजना तयार करणे.

१०. अपंगासाठीचे कायदे, योजना यावर देखरेखीसाठी एक मुख्य आयुक्त नियुक्त करणे.

❖ **वृद्धासंबंधी (चरितार्थ, कल्याण, संरक्षण) कायदा २००७ :**

१. या कायद्याने कुटूंबातील वृद्धांची सर्वांगिण काळजी घेण्याची जबाबदारी वृद्धांची सज्ञान मुले, नातवंडे, पणतू व नातेवाईकांच्यावर टाकण्यात आली आहे.

२. या कायद्याने वृद्धांच्या आरोग्यविषयक गरजा (सेवा, सुविधा) ची व्यवस्था करण्याची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारवर टाकण्यात आली आहे.

३. जे वृद्ध निराधार आहेत, विशेषतः त्यांच्या निवासासाठी, सांभाळासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक वृद्धाश्रम निर्माण करणे व तिथे किमान १५० वृद्धांच्या सर्वांगिण कल्याणकारी योजना राबवणे.

४. शासकीय दवाखान्यात ज्येष्ठासाठी विशेष सुविधा (उदाः वेगळी प्रतिक्षा रांग, वेगळ्या राखीव खाटा दिल्या जातील.)

५. शासकीय दवाखान्यात वृद्धावस्था वैद्यक जाणणाऱ्या डॉक्टरांची नेमणूक केली जावी.

६. ज्येष्ठ नागरीकाने आपली देखभाल करावी या आशेने आपली संपत्ती कुणाच्या नावावर केली असेल तर व ते देखभाल करीत नसतील व हे सिद्ध झाल्यास तो व्यवहार अवैध ठरवला जाईल. इ.

### ❖ नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ :

अस्पृश्यता ही अमानवी प्रथा पाळणे, ती पाळावी यासंबंधी शिकवण देणे, अस्पृश्यता या अमानवी प्रथेतून निर्माण होणारे प्रश्न यांना जबाबदार असणाऱ्यांना शिक्षा करण्याची तरतूद या कायद्यान्वये करण्यात आली आहे.

१. या कायद्यान्वये, अस्पृश्य म्हणून कोणास धार्मिक स्थळावर प्रवेशास मज्जाव केल्यास, सार्वजनिक प्रार्थनेच्या जागी मज्जाव केल्यास, सार्वजनिक ठिकाणचे पाणी वापरल्यास मज्जाव केल्यास एक महिना ते सहा महिन्यापर्यंत शिक्षेची व १०० रु. ते ५०० रु. दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे.

२. अस्पृश्यतेच्या कारणास्तवर व्यक्तीला दुकान, सार्वजनिक उपहारगृह, सार्वजनिक मनोरंजनाच्या ठिकाणी प्रवेश नाकारणे गुन्हा होय.

३. कोणताही व्यवसाय, धंदा, नोकरी करण्यास प्रतिबंध करणे गुन्हा मानला गेला.

४. सर्वजण वापरतात ती सार्वजनिक जागा वापरण्यास प्रतिबंध करणे गुन्हा होय. तसेच,

५. सार्वजनिक सामाजिक, धार्मिक, समारंभात प्रवेश नाकारणे,

६. दवाखाना, शिक्षणसंस्था, हॉस्टेल येथे प्रवेश नाकारल्यास,

७. अस्पृश्यतेच्या कारणावरुन माल विकण्यास, सेवा पुरवण्यास प्रतिबंध केल्यास,

८. अस्पृश्यतेच्या कारणावरुन वसाहतीत राहण्याची जागा देण्यास नकार दिल्यास,

९. घटनेच्या कलम १७ नुसार, अस्पृश्यता नष्ट केल्यामुळे या कारणास्तव कोणत्याही माणसाला आपला हक्क बजावण्यास प्रतिबंध केल्यास, बहिष्कार टाकल्यास कैद व दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

### ❖ मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ :

विविध कारणांनी भारतात मानवी हक्क उल्लंघनाच्या अनेक घटना सातत्याने घडत राहिल्याने या संदर्भात मानवी हक्कांचे उल्लंघन होते, त्यांना त्याबाबत तक्रार करणे, न्याय मागणे व त्यांच्या तक्रारीची चौकशी होणे, याकरिता एका स्वतंत्र व परिपूर्ण यंत्रणेची आवश्यकता निर्माण झाली त्यातूनच मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ संमत करण्यात आला.

या कायद्यात एकूण ०८ प्रकरणे व ४३ कलमांचा समावेश केलेला आहे. त्यांची माहिती पुढीलप्रमाणे;

१. प्रकरण दोन मध्ये अंतभूत असणाऱ्या कमल ३ ते ११ मध्ये राष्ट्रीय मानवी हक्क आयोग स्थापन करणे, आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या कर्तव्ये, कालावधी, सेवेच्या अटी, कार्यपद्धती याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

२. प्रकरण तीनमधील कलम १२ ते १६ मध्ये आयोगाची कार्य, मानवी हक्क उल्लंघनाबाबत आयोगाकडे आलेल्या तक्रारीची चौकशी करण्यासंदर्भातील आयोगाचे अधिकार, मानवी हक्क संदर्भात आयोगाकडे

व्यक्तीने करावयाचे किंवा केलेले निवेदनसंबंधी तसेच जर एखाद्या प्रकारणात गैरन्यायीक परिणाम होण्याची शक्यता असेल तर तशा व्यक्तीला त्याची बाजू मांडण्यासंबंधी द्यावयाची संधी याबाबतच्या तरतूदी आहेत.

३. प्रकरण चार मधील कलम १७ ते २० मध्ये तक्रारीची चौकशी करणेसंदर्भात, चौकशीअंती ची उपाययोजना तसेच सशस्त्रदला संबंधीच्या प्रकरणातील आचरण्याची कार्यपद्धती व आयोगाचे वार्षिक व विशेष अहवालासंबंधीच्या तरतूदींचा समावेश आहे.

४. प्रकरण पाच मधील कलम २१ ते २९ ही राज्य मानवी हक्क आयोगाच्या संबंधी आहेत. यामध्ये राज्य मानवी हक्क आयोगाची रचना, अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या, कर्तव्ये, कालावधी, अधिकार व आयोगाच्या वार्षिक व विशेष अहवालासंबंधी तरतूदी आहेत.

५. प्रकरण सहातील कलम ३० व ३१ मानवी हक्क न्यायालयाची स्थापना व विशेष सरकारी वकील यासंदर्भातील तरतूदींची आहेत.

६. प्रकरण सात, कलम ३२ ते ३५ ही केंद्र व राज्य शासनाकडून द्यावयाची अनुदाने, त्यांचे स्वरुप, लेखे व लेखापरिक्षण संबंधीच्या तरतुदीची आहेत.

७. प्रकरण आठ, कलम ३६ ते ४३ ही आयोगाच्या अधिकार कक्षेत न येणाऱ्या बाबी स्पष्ट करतात. तसेच विशेष अन्वेषण पथकाची स्थापना करणे, केंद्र व राज्यशासनाने यासंदर्भात करावयाचे नियम, कायद्याची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी प्रसिद्ध करणेसंदर्भातील आहेत.

### स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

**अ) रिक्त जागा भरा.**

१. भारतात 'बालविवाह प्रतिबंधक कायदा' सर्वप्रथम ------ या साली संमत झाला.

२. 'महिला संरक्षण अधिनियम २००५' ला ------ म्हणूनही ओळखले जाते.

३. मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्काच्या कायद्यानुसार वय वर्ष ---- ते ---- वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत व अनिवार्य केले.

४. 'भारतीय कारखाना कायदा १९४८' नुसार ------ वय वर्षाच्या आतील मुलास 'बालक' म्हणून संबोधण्यात यावे अशी तरतूद केली होती.

५. अनुसूचित जाती राष्ट्रीय आयोगाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती------ यांच्याकडून केली जाते.

### स्वयंअध्ययनासाठी उत्तरे

१. १८७२ साली  २. कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५

३. ०६ ते १४ वयोगटातील  ४. १५ वयवर्षाच्या आतील  ५. राष्ट्रपती

### ४.३.३ राष्ट्रीय मानवी हक्क आयोग : संरचना आणि कार्ये

**प्रस्तावना :**

मानवाधिकाराचा संबंध अशा आधारभूत तत्त्वावर अवलंबून असतो ज्यात स्वातंत्र्य आहे. त्यामध्ये जगण्याचा, अभिव्यक्तीचा, व्यवसाय निवडीचा, समानतेचा, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक इत्यादी चा समावेश होतो. स्वातंत्र्यानंतर नागरीकांचे हक्क आणि कर्तव्ये आबाधीत राखण्यासाठी भारतीय संविधान, मूलभूत अधिकार आणि कर्तव्याची तरतूद केलेली आहे. लोकशाहीला बळकट करण्यासाठी सामाजिक, राजकीय व आर्थिक व्यवस्था मजबूत करण्यासाठी भारतीय संविधानात न्याय, समानता, धर्मनिरपेक्षता यांना महत्त्व दिले आहे. भारताची राज्यघटना ही जगातील सर्वाधिक मोठी लिखीत राज्यघटना आहे. जगातील अन्य देशाची तुलना करताना सर्वाधिक अधिकार आपल्या नागरिकाना भारतीय राज्यघटनेने बहाल केले आहेत. भारतीय घटना ही ब्रिटीश काळात झालेल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक हक्काची पायमल्ली त्याचेच एक प्रतीबिंब आहे. जे नागरिकांना अधिकार देतात. म्हणजेच ब्रिटीश काळात भारतीयाने केलेल्या संघर्षाची प्राप्ती असेच म्हणता येईल. भारतीय संविधानात मूलभूत अधिकार तिसऱ्या भागामध्ये कलम (१२-३५) मध्ये दिले आहे. मूलभूत अधिकार आणि अल्पसंख्यांक या समितीचे अध्यक्ष सरदार वल्लभभाई पटेल हे होते. मूलभूत अधिकाराची घटनेमध्ये व्याख्या केलेली दिसत नाही, परंतु यांना मूलभूत अधिकार एवढ्यासाठीच म्हटले गेले आहे की हे अधिकार कायद्याच्या पेक्षा वरिष्ठ आहेत. त्यांना घटना दुरुस्ती करूनच बदलता येऊ शकते. प्रत्यक्षपणे भारतीय संविधान हे मानवी अधिकाराचे एक प्रारूप आहे. संविधानात व्यक्तीच्या मुलभूत अधिकारामध्ये पुढील हक्काचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये समानतेचा अधिकार कलम १४-१८, स्वातंत्र्याचा अधिकार, शोषणाच्या विरोधात न्याय मागण्याचा अधिकार, धार्मिक स्वातंत्र्यविषयक अधिकार, सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार, घटनात्मक अधिकार. विविध भाषा, प्रांत, धर्म असलेल्या देशातील नागरिकांना एकसंघ ठेवण्याचे आणि सर्वांना समान न्याय देण्याचे महत्त्वपूर्ण काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी घटनेच्या माध्यमातून केले आहे. १९७६ साली ४४ व्या घटना दुरुस्तीत मालमत्ता अधिकार वगळला आहे. मूलभूत अधिकार कलम १४ ते १८. कलम १४ नुसार - सर्वांना समान अधिकार, कायद्यासमोर सर्व समान.

**संसदीय शासन पद्धती :**

राज्यघटनेत कलम ७४ व ७५ नुसार पंतप्रधान व मंत्रीमंडळ यांचे अधिकार स्पष्ट आहेत. राष्ट्रपतीला आणिबाणीचे अधिकार आहेत तर मुख्यमंत्री, राज्यपाल, राज्याचे मंत्रीमंडळ यांचे अधिकार घटनेने बहाल केले आहेत. यातून संसदीय शासन पद्धतीची वाटचाल दिसून येते. कल्याणकारी राज्याच्या धोरणांसंबंधी मार्गदर्शन तत्त्वे-स्वातंत्र्यानंतर भारताच्या सर्वांगीण विकासासंबंधी शासन व्यवस्थेला काही निर्णय घेता यावेत यासाठी आर्थिक, राजकीय, आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वाचा उल्लेख आहे. प्रत्यक्षात मार्गदर्शक तत्त्वे ही बंधनकारक नसतात. त्या विरोधात म्हणजेच सरकार विरोधी न्यायालयात दाद मागता येत नाही. याची उणीव कमी करण्यासाठी १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्ती मार्गदर्शक तत्त्वांना मूलभूत अधिकारापेक्षा जास्त महत्त्व दिले आहे. भारतीय राज्यघटनेत जात, वंश, धर्म, लिंग असा कोणत्याही प्रकारचा भेद

वगळता मतदानाचा अधिकार दिला होता. तो अधिकार २१ वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकास होता. परंतु १९८९ मध्ये झालेल्या ६१ व्या घटना दुरुस्तीनंतर तो १८ वर्षांपर्यंत केला. यामुळे जनतेचे सार्वभौमत्त्व सिद्ध होते. एकेरी नागरीकत्व भारतीय विविधतेचा विचार करता त्या विविधतेतून एकात्मक निर्माण व्हावी यासाठी एकेरी नागरिकत्वाचा पुरस्कार घटनेत केलेला दिसून येतो.

**अल्पसंख्यांकांना संरक्षण**

भारतीय संविधानात सामाजिक, आर्थिक दृष्टीने न्याय व समता प्रस्तापित होण्याच्या दृष्टीकोणातून मागास जाती, जमाती, अल्पसंख्यांचे कल्याण व्हावे, त्याचा सामाजिक, शैक्षणिक, सर्वांगीन विकास व्हावा यासाठी तरतूद केले आहे. धर्मनिरपेक्ष राज्य १९७६ साली झालेल्या ४२ व्या घटना दुरुस्तीत, राज्यघटनेच्या सरनाम्यात धर्मनिरपेक्ष या शब्दाचा उल्लेख करण्यात आला आहे. कल्याणकारी राज्य समता बंधूता आणि स्वातंत्र्याच्या आधारे भारत हे कल्याणकारी राज्य निर्माण करण्याची जबाबदारी शासनाची असते. यामध्ये कोणताही भेदभाव अपेक्षित नाही. मार्गदर्शक तत्त्वाच्या आधारे व्यक्तीचा सर्वांगीण विकास साध्य करून आपले राज्य कल्याणकारी करण्याचा मूळ हेतू राज्य घटनेत आहे.

**राष्ट्रीय मानवाधीकार आयोग**

राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सर्वच स्तरावर मानवाधिकाराचा प्रसार झालेला आहे. भारतात मानवाधिकाराच्या दृष्टीकोनातून भरीव योगदान दिले आहे ते भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून. याचाच एक परिणाम म्हणजे केंद्रिय मानवाधिकार आयोग सध्या नवी दिल्ली येथे कार्यरत आहे. देशामध्ये विविध परिस्थिती वेगवेगळ्या विषयाच्या माध्यमातून मानवाधिकार, मानवतावादी काम करत असतो. जगातील प्रत्येक देशामध्ये राष्ट्रीय स्तरावर या संदर्भात काम पाहिले जावे याकरिता राष्ट्रीय स्तरावर प्रभावी संस्था स्थापून त्याद्वारे मानव अधिकाराच्या प्रभावी विकासाकरिता प्रयत्न करण्यात यावेत. मानवाधीकार संस्था संदर्भात प्रत्येक देशात संस्था असावी या उद्देशाने युनेस्कोने यासाठी पुढाकार घेतला आहे. १९६६ मध्ये युनोच्या महासभेने राष्ट्रीय मानव अधिकार आयोग स्थापण्याच्या संदर्भात एक प्रस्ताव पारीत केला. यानुसार १९७० मध्ये यावर विचार केला जाऊन प्रत्येक राज्याने मानव अधिकारासंदर्भातील प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी एक राष्ट्रीय मानव अधिकार आयोग स्थापन करावा असे सांगण्यात आले. १९७८ मध्ये राष्ट्रीय संस्थेच्या स्थापनेवर भर देण्यात आला पण काही देशांना या संदर्भात असे वाटत होते की, ही संस्था त्यांच्या कार्यपालीका व न्यायपालीकेच्या कार्यवाहीवर परिणाम करू शकेल. यामुळे अनेक देशामध्ये आयोगाच्या स्थापनेसंदर्भात संभ्रमावस्था निर्माण झालेली होती. त्यानंतर ही संभ्रमावस्था दूर करण्याच्या अनुषंगाने १९९३ मध्ये मानवाधिकार विश्वसंमेलनामध्ये ठराव पारीत करण्यात आला. ज्यानुसार मानव अधिकार विश्व संमेलन प्रत्येक शासनाची राष्ट्रीय संरचना, तसेच समाजातील विविध अंग यांना दृढ करण्यासाठी आणि मानव अधिकाराच्या विकासात्मक संरक्षणासाठी प्रत्येक देशाला आवाहन करीत आहे. मानवाधिकार आयोगाची सर्व जगामध्ये स्थापना हे केवळ विश्वसंमेलनाचा एक परिणाम म्हणता येईल. राज्य मानव अधिकार व मानव अधिकारा संदर्भातील न्यायाधीकरणे स्थापन करण्यासंदर्भात अध्यादेश राष्ट्रपतींद्वारे २८ सप्टेंबर १९३३ रोजी काढण्यात आले. यालाच मानव अधिकार संरक्षण अधिनियम १९९३ असे नाव देण्यात आले. १८

डिसेंबर १९९३ रोजी राष्ट्रपती अध्यादेशानंतर लोकसभेने वटहुकूमाला मान्यता दिली. त्यानंतर मानव अधिकार संरक्षण अधिनियम पारीत करण्यात आला. तो अधिनियम ८ जानेवारी १९९४ रोजी संमत करण्यात आला. या अधिनियमाची व्याख्या कलम २ अन्वये करण्यात आली आहे. यानंतर देशभर मानवाधिकार आयोगाची स्थापना प्रक्रिया देशभर विविध राज्यात सुरू झाली. यानुसार भारतामधील राष्ट्रीय मानव अधिकाराची रचना आपणास पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**रचना :**

भारतीय राष्ट्रीय मानवाधिकार आयोग National Human Right Commission ही एक स्वायत्त संस्था आहे. याची स्थापना १२ ऑक्टोबर १९९३ रोजी झाली आहे. हा आयोग मानवाधिकाराचा संरक्षक आहे त्याची निर्मिती भारतीय संविधानाधारित आहे. या आयोगात अनेक सदस्य आहेत. या आयोगाचे प्रथम अध्यक्ष न्यायाधीश रंगनाथ मिश्र होते. सध्या २०१८ मध्ये न्यायाधीश एच एल दत्तू आहेत. आयोगामध्ये पुढीलप्रमाणे रचना अशी-

१) सभेचे अध्यक्ष हे सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश असतील.

२) त्यातील एक सदस्य सर्वोच्च न्यायालयाचा विद्यमान किंवा माजी न्यायाधीश असेल.

३) एक सदस्य उच्च न्यायालयाचा विद्यमान किंवा माजी न्यायाधीश असेल.

४) दोन सदस्य अनुभवी असणारे किंवा त्यांना मानवाधिकाराचे ज्ञान असणाऱ्यांना नियुक्त करावेत.

५) त्याचबरोबर राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग, राष्ट्रीय अनुसूची जाती आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जमाती अयोग आणि राष्ट्रीय महिला आयोग यांचे अध्यक्ष कलम १२ खंड ब अन्वये सदस्य असतील.

६) आयोगाचा एक महासचिव असेल, तो आयोगाचा कार्यकारी अधिकारी असेल.

७) मुख्य कार्यालय दिल्ली येथे असेल व आयोग केंद्रशासनाच्या परवानगीने अन्य ठिकाणी कार्यालय स्थापन करू शकेल.

**अध्यक्ष व सदस्य नियुक्ती :**

आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य यांची नियुक्ती राष्ट्रपतीद्वारे केली जाते. ही नियुक्ती राष्ट्रपती समितीने केलेल्या शिफारशीनुसार करत असतो. समितीची रचना मानवाधिकार संरक्षण अधिनियम १९९३ च्या ४ अन्वये होते. ती रचना पुढीलप्रमाणे-

१) अध्यक्ष - पंतप्रधान

२) सदस्य - लोकसभेचा अध्यक्ष

३) सदस्य - गृहमंत्रालयाचा प्रभारी मंत्री

४) सदस्य - लोकसभेतील विरोधी पक्ष नेता

५) सदस्य - राज्यसभेतील पक्ष नेता

६) सदस्य - राज्यसभेतील उपसभापती/उपाध्यक्ष

७) सदस्य - राज्यसभेतील उपसभापती/उपाध्यक्ष

सामान्यता सर्वोच्च व उच्च न्यायालयातील कार्यरत न्यायाधीशाची नियुक्ती करता येत नाही. परंतु आवश्यकता वाटल्यास सर्वोच्च न्यायालयाचे व उच्च न्यायालयाचे सरन्याधाशी विचारविनीमय करून राष्ट्रपतींच्या परवानगीने करू नियुक्ती करू शकतात. त्यानुसार राष्ट्रपती मानवाधिकार आयोगाच्या व सदस्याची नियुक्ती करू शकतो. सदरच्या समितीमध्ये न काम करण्याच्या कारणावरून थांबवले जाऊ शकत नाही. याच प्रकारची अनुपस्थिती असल्यास सदरच्या समितीचा कार्यभार या आयोगाच्या महासचिवाकडे येत असतो व त्या कालखंडापूरते तो या समितीचे निर्वाहन करू शकतो.

**अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाल :**

मानव अधिकार संरक्षण अधिनियम १९९३ च्या कलम ६ नुसार आयोगाच्या अध्यक्ष किंवा सदस्यास राष्ट्रपतींच्या आदेशानुसार सर्वोच्च न्यायालयाद्वारे एका विहीत प्रक्रियेद्वारे तपासणी करून राष्ट्रपतीद्वारे अभ्यासाअंती सिद्ध झालेल्या घटका आधारे पदावरून दूर केले जाऊ शकते. किंवा अध्यक्ष अथवा सदस्यास भारताच्या राष्ट्रपतीना लेखी सूचना देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येऊ शकतो.

राष्ट्रपती पुढील कारणांवरून अध्यक्ष अथवा सदस्यांना पदावरून काढू शकतात.

१) दरम्यानच्या कालावधीत त्याच्या पदाव्यतिरिक्त इतर लाभाचे पद धारण केले असेल तर

२) मानसिक अथवा शारीरिक दुर्बल असेल तर

३) दोषी असेल तर आणि त्याला अपराधाची शिक्षा झाली असेल तर.

**नियमन कार्यपद्धती :**

कलम १० अन्वये अध्यक्षाला बैठका घेण्याचे व आदेशाचे पालन करण्याचे अधिकार प्राप्त आहेत. तसेच कलम ११ अन्वये भारत सरकार सचिवाच्या दर्जाचा अधिकारी हा आयोगाचा महासचिव असेल. याबरोबरच पोलीस व संशोधन कर्मचारी वर्ग आणि असे इतर पदाधिकारी व कर्मचारी वर्ग ज्यामध्ये प्रशासकीय तांत्रीक आणि वैज्ञानिक अधिकाऱ्यांचा समावेश होतो. या सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती शासनाकडून विहित करण्यात येतील.

**आयोगाची स्वायत्ता :**

१) अध्यक्ष व सदस्य नियुक्तीची कार्यपद्धती

२) त्यांच्या कार्यकालाची मुदत निश्चित करणे व त्याची कायदेशीर हमी देणे.

३) त्यांना दिला जाणारा दर्जा

४) अन्वेषण विभागासह आयोगाच्या संपूर्ण कर्मचारी वर्गाची नियुक्ती करण्याची व कामकाज चालविण्याची पद्धत व कर्मचारी वर्गाच्या आयोगाप्रती असलेल्या जबाबदाऱ्या.

५) मानव अधिकार संरक्षण अधिनियम १९९३ च्या कलम ३२ प्रमाणे आर्थिक स्वायत्ततेसंदर्भात मांडणी करण्यात आली.

**आयोगाची कार्ये :**

मानवाधिकार संरक्षण अधिनियम १९९३ कलम १२ नुसार पुढील कार्ये आहेत–

१) कोणत्याही व्यक्तीने दाखाल केलेल्या फिर्यादीबाबत दखल घेऊन त्याची स्वतंत्र तपासणी करणे.

२) कोणत्याही न्यायालयीन अनिर्णयीत प्रकरणाची न्यायालयाच्या संमतीनुसार हस्तक्षेप करणे.

३) राज्य सरकारच्या अखत्यारीत असणाऱ्या कारागृहे किंवा संस्था ज्याठिकाणी व्यक्तीना स्थानबद्ध केले आहे. तेथे उपचार, संरक्षण अशासाठी दाखल केले आहे. अशा ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन शिफारशी करणे.

४) मानवी अधिकाराच्या संरक्षणासाठी भारतीय राज्यघटनेच्यानुसार सुरक्षात्मक उपायांचा व तरतूदींचा आढावा घेणे आणि त्यांचीं काटेकोर अंमलबजावणी करणे. स्वतः पुढाकार घेऊन पिडीत व्यक्तीच्या याचीकेवरून पुढाकार घेणे किंवा पीडीताच्या तक्रारीची चौकशी करणे.

५) मानवी अधिकारांचा प्रतिबंध करणाऱ्या दहशतवादी सहीत सर्व कृत्ये व घटकाचा आढावा घेऊन त्यावर उपयोजनात्मक शिफारशी करणे.

६) मानवी अधिकारासंबंधी आंतरराष्ट्रीय स्त्रोताचा अभ्यास करून त्या अमंलबजावणीची शिफारस करणे.

७) समाजातील वंचित घटकापर्यंत शिक्षणाचा प्रसार करणे. समाजातील विविध माध्यमाद्वारे जनजागृती करणे. त्यामध्ये चर्चासत्रे, प्रकाशने, मासिके, साप्ताहिके याचा समावेश होतो.

८) मानवी अधिकाराच्या संदर्भात संशोधनात्मक ग्रंथाचा आंतरराष्ट्रीय दस्तऐवजांचा अभ्यास करणे व त्याची अंमलबजावणी करणे.

९) मानवी अधिकाराच्या क्षेत्रात काम करणाऱ्या गैरशासकीय स्वयंसेवी संस्था आणि इतर संस्थाना प्रोत्साहन करणे.

१०) मानवी अधिकार संरक्षण व संवर्धनासाठी आवश्यक सर्व कामे करणे.

इत्यादी कार्ये केंद्रीय मानवाधिकाराकडून पार पाडली जातात.

**चौकशीसंदर्भात आयोगाला बहाल केलेले अधिकार :**

मानव अधिकार संरक्षण अधिनियम १९९३ करम १३ अन्वये मानवाधिकार कायद्यास आधीन राहून दाखल केलेल्या तक्रारीबाबत चौकशी करताना १९०८ च्या दिवाणी तत्त्वप्रणालीच्या नियमावलीनुसार

दिवाणी न्यायालयास फिर्यादीवरील कामकाज चालविण्यासाठी असलेले अधिकार प्रदान केले आहेत. ते पुढीलप्रमाणे–

१) खटला चालवताना साक्षीदाराला आयोगासमोर हजर राहण्याचा आदेश देणे व तो आदेश बनवणे आणि साक्षीदाराची शपथेवर चौकशी करणे.

२) खटला चालविण्यासाठी आवश्यक दस्तऐवज शोधून सादर करणे.

३) प्रतिज्ञापत्रानुसार पुरावा स्वीकारणे.

४) कोणत्याही न्यायालयाकडून अथवा कार्यालयातून कोणत्याही प्रकारच्या सार्वजनिक अथवा सरकारी कागदपत्रे दस्ताऐवजाची औपचारीक मागणी करणे.

५) साक्षीदार अथवा दस्ताऐवजांची तपासणी करण्यासाठी समित्यांची नेमणूक करणे.

६) मानव अधिकारासंदर्भातील कोणताही लागू करण्याजोगा संबंधीत विषय/कृत्य.

**आयोगाची तपासणी यंत्रणा :**

मानव अधिकार कायद्यान्वये राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे मानव अधिकाराच्या उल्लंघना संबंधी दाखल करण्यात येणाऱ्या तक्रारीचा तपास करण्यासाठी स्वतःचा कर्मचारी वर्ग असून पोलीस महासंचालक हे यंत्रणेच्या प्रमुखपदी असतात. केंद्र व राज्य सरकारच्या कोणत्याही आधिकाऱ्याची तपासखात्याची यंत्रणा वापरण्याचे अधिकार आयोगाला प्रदान केलेले आहेत. शिवाय अनेक प्रकरणामध्ये मानवाधिकार आयोगाने स्वयंसेवी संस्थांची मदतही घेतलेली आहे.

**दाखल झालेल्या तक्रारीची तपासणी प्रक्रिया :**

आयोगाकडे दाखल झालेल्या प्रकरणाची तपासणी प्रक्रिया महत्त्वाची असून याचा पाठपुरावा करण्यासाठी पुढील बाबींकडे लक्ष द्यावे लागते.

१) मानव अधिकार उल्लंघनाबाबत दाखल झालेल्या प्रकरणाची अथवा तक्रारीची तपासणी करताना केंद्र व राज्य सरकारच्या तसेच इतर संस्था अधिकारी–कर्मचारी वर्गाकडून ठराविक मुदतीमध्ये अहवाल सादर करण्याची मागणी करणे.

२) आयोगाने निश्चित केलेल्या कालावधीत आयोगाकडे अहवाल सुपुर्द न झालेस आयोग संबंधित तक्रारीचा तपास स्वतंत्रपणे स्वतः करू शकतो.

३) या उलट माहिती अथवा अहवाल सुपूर्द झाल्यानंतर जर आयोगास अहवाल समाधानकारक वाटल्यास अथवा संबंधित तक्रारीबाबत पुढील तपासाची आवश्यकता नसेल किंवा संबंधित सरकारी अधिकाऱ्याने किंवा सरकारने पुढील तपासाची आवश्यकता कारवाई केली असेल तर आयोग फिर्याद न चालवण्याचा निर्णय घेऊ शकतो आणि तसे तक्रार करणाऱ्या व्यक्तीस सुचित करतो.

**तपासणी झाल्यानंतर आयोगापुढील पर्याय–**

मानव अधिकार आयोग हा स्वायत्त आहे. त्यामुळे तो आपली कार्ये स्वायत्ततेने पूर्ण करतो. पण ही कार्ये पार पाडत असताना मानव अधिकार आयोगास ग्रहीत धरून करावी लागतात. एखाद्या खटल्यासंदर्भातील तक्रार आयोगाकडे येते वेळेस आयोग वरील यंत्रणेच्या साह्याने त्या तक्रारीची सखोल तपासणी करतो व तपासणी आयोग पुढीलपैकी पावले उचलतो.

१) मानव अधिकाराचे उल्लंघनास कारणीभूत ठरलेल्या अथवा मानव अधिकारांचे उल्लंघन/हननास प्रतिबंध करण्यास सार्वजनिक सेवेतील व्यक्तीकडून उपेक्षा झाली असलेस व असे तपासणीअंती उघडकीस आल्यास संबंधित व्यक्तीवर कार्यवाही करण्याची अथवा न्यायालयीन खटला दाखल करण्याची शिफारस करू शकतो.

२) अशा तक्रारीची योग्य हाताळणी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालय अथवा उच्च न्यायालये त्यांना आवश्यक वाटतील अशा सुचना, हुकूम अथवा ताकीद जारी करावी या करीता आयोग त्यांना विनंती करू शकतो.

३) आवश्यकतेनुसार मानव अधिकार आयोग उल्लंघनास बळी पडलेल्या व्यक्तीचे व त्याचे कुटुंबियांना तात्काळ हंगामी मदत म्हणून अनुदान द्यावे अशी शिफारस संबंधीत सरकार अथवा अधिकारातील व्यक्ती/संस्थेकडे करू शकतो.

**सारांश :**

मानवाधिकार आयोग एक स्वायत्त संस्था आहे. त्यामुळे एक उच्च यंत्रणा म्हणून ओळखले जाते. वास्तविकपणे हे मानवाधिकार संरक्षण अधिनियम १९९३ चे यश आहे. हा अधिनियम तयार करत असताना न्या ओ चिन्नाप्पा रेडी यांनी असे म्हटले होते की, भारताला यशस्वी होण्यासाठी भारताने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या कोणत्या ना कोणत्या स्वरूपात स्विकार करणे आवश्यक आहे. जेणेकरून भारताच्या विकासाचा मार्ग मोकळा होईल व याचा संदर्भ घेवून आंतरराष्ट्रीय मानव अधिकार कायद्यांचा भारतात अधिकार आयोग यंत्रणा तयार करून स्विकार करण्यात आला.

भारतातील मानवाधिकारास न्यायालया सारखी निर्णय क्षमता नसली तरी ते शक्तीहिन नाही. मानवाधिकार आयोग हे मानवी मुल्याच्या हिताची जोपासना करते व मानवी कल्यानासाठी सदैव कार्यशील असते. मानवाधिकाराचे निर्णय हे समाज, राजकारण अथवा अर्थकारण यांना नक्कीच प्रभावीत करत असतात.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

१) राष्ट्रीय मानवाधिकारास राष्ट्रपतींकडून संमती केंव्हा देण्यात आली?

२) कोणाच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय मानव अधिकार आयोग स्थापन करण्यात आला?

३) मानवाधिकार आयोगाचा मुख्य कार्यकारी अधिकारी कोणत्या पदाने संबोधला जातो?

४) आयोगाचे मुख्यालय कोठे आहे?

५) आयोगाच्या अध्यक्ष आणि सदस्य यांची नियुक्ती कोणामार्फत केली जाते?

६) आयोगाच्या अध्यक्ष आणि सचिवाचा कार्यकाला किती असतो?

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) ८ जानेवारी १९९४ रोजी राष्ट्रपतींकडून संमती देण्यात आली.

२) सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश श्री. रंगनाथ मिश्र यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय मानव अधिकार आयोग स्थापन करण्यात आला.

३) मानवाधिकाराचा मुख्य कार्यकारी अधिकारी महासचिव नावाने संबोधला जातो.

४) आयोगाचे मुख्यालय दिल्ली येथे आहे.

५) आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य यांची नियुक्ती राष्ट्रपतीद्वारे केली जाते.

६) आयोगाच्या अध्यक्ष व सचिव यांचा कार्यकाल ५ वर्षे असतो.

**संदर्भ साहित्य**


१) एस. श्री. वास्तव, भारत में मानव अधिकार की अवधारणा, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली, पृ. २२.

२) www.jainelibrary.org/elib.master/anticle

३) www.allavantbharat.org/ost/amthashatra.pdt.

४) श्रीमती श्रीवास्तव सुधाराणी, मानव अधिकार और वैदीक संस्कृती, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली पृ. १८.

५) en.wikipidia.org/wiki/adharma.


## ४:४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न (घटक ०४ वरील)

**पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. भारतीय राज्यघटनेतील कोणत्या कलमानुसार सार्वजनिक सेवा, नोकरीत धर्म, जात, वंश, वर्ग, जन्मस्थान इ. भेदभाव करुन संधी व प्रवेश नाकारला जाणार नाही.

२. अटक केलेल्या व्यक्तींची अटक कायदेशीर आहे की नाही हे पाहण्यासाठी अटकेतील व्यक्तीस न्यायालयात हजर करा असा आदेश न्यायालय देऊ शकते त्यास काय म्हणतात?

३. भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ३६ ते ५१ मध्ये कशाचा अंतर्भाव करण्यात आला आहे?

४. हिंदू विधवा पुर्नविवाह कायदा कोणत्या साली संमत झाला?

५. १९७८ च्या बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार विवाहासाठी मुलगा व मुलगीचे किमान वय किती निश्चित करण्यात आले?

६. भारतात राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना कधी करण्यात आली?

७. बालकांच्या संदर्भात २००५ साली संमत झालेल्या कायद्याचे नाव कोणते?

८. 'राष्ट्रीय मानवी हक्क अयोगा'च्या अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती कोण करतात?

९. मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्काचा कायद्यानुसार कोणत्या वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत व अनिवार्य करण्यात आले?

१०. अनुसूचित जाती राष्ट्रीय आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती कोण करतात?

### ४:५ सारांश

भारतातील मानवी हक्कासंबंधीचा प्रमाणित आराखडा व अमंलबजावणीच्या दृष्टीने विचार करता सर्वप्रथम भारतीय राज्यघटनेचा उल्लेख करावा लागतो. कारण भारतीय राज्यघटनेचा सरनामा, मुलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याची मार्गदर्शक तत्त्वे यातून मानवी हक्कांच्या संदर्भातील भारतातील घटनात्मक चौकट स्पष्ट होते.

त्याचबरोबर मानवी हक्कांना घटनात्मक संरक्षण देण्याची गरज, त्यासाठी समाजातील वंचित, दुर्लक्षित, शोषित घटकांना मानवी हक्क उपभोगता यावेत यासाठी विशेष कायद्यांची आवश्यकता ओळखून भारतात त्यासंदर्भातील विशेष कायदे विविध वंचित, दुर्लक्षित, शोषित घटकासाठी करण्यात आले. उदा.ः महिला, बालके, अपंग, वृद्ध, अनुसूचित जाती, जमाती इ.

तसेच मानवी हक्क भंगाच्या तक्रारी देणे-घेणे, त्यांची चौकशी करणे यासाठी स्वतंत्र व्यवस्थेची गरज निर्माण झाल्याने भारतात राष्ट्रीय स्तरावर, 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोग' व राज्यस्तरावर 'राज्य मानवी हक्क आयोग' स्थापन करुन त्यांना चौकशीचे विशेष अधिकार देण्यात आले.

अशा पद्धतीने भारतात मानवी हक्कांसंबंधी प्रमाणित चौकट व अंमलबजावणीची विशेष स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

### ४:६ स्वयंअध्ययनासाठी उत्तरे :

१. भारतीय राज्यघटनेतील कलम १६ नुसार सार्वजनिक सेवा, नोकरीत धर्म, जात, वंश, वर्ग, जन्मस्थान इ. भेदभाव करुन संधी व प्रवेश नाकारला जाणार नाही.

२. अटक केलेल्या व्यक्तीची अटक कायदेशीर आहे की नाही हे पाहण्यासाठी अटकेतील व्यक्तीस

न्यायालयात हजर करा असा आदेश न्यायालय देऊ शकते त्यास बंदीप्रत्यक्षीकरण किंवा देहोपस्थिती म्हणतात.

३. भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ३६ ते ५१ मध्ये मार्गदर्शक तत्त्वांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

४. हिंदू विधवा पुर्नविवाह कायदा १८८६ साली संमत झाला.

५. १९७८ च्या बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार विवाहासाठी मुलाचे वय किमान २१ व मुलीचे वय १८ निश्चित करण्यात आले.

६. भारतात राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना ३१ जानेवारी १९९२ ला करण्यात आली.

७. बालकांच्या संदर्भात २००५ ला 'बालहक्क संरक्षण कायदा' संमत करण्यात आला.

८. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपती मार्फत होते.

९. मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क कायद्यानुसार वय वर्षे सहा ते चौदा वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत व अनिवार्य करण्यात आले.

१०. अनुसूचित जाती राष्ट्रीय आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपतीमार्फत होते.

संदर्भ :

Truck, R. 1979, Natural, Right theories, Cambridge : Cambridge University.

Vijapur, A. P. Kumar Suresh, ed, 1999, Perspective on Human Right : A Critical Appraisal Oxford; Deradun Press.

Babu P. K. Constitutional Law in India, Constitution of India.

♦ ♦ ♦